

# धर्मनिरपेक्षता नव्हे, इहवाद

लेखक : म. शं. ढोले



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई



# अल्पपरिचय

नाव : महादेव शंकर ढोले

जन्म : पंढरपूर येथे तारीख १७ ऑगस्ट १९२२ रोजी

वास्तव्य : कमलापूर, ता. सांगोले, जि. सोलापूर

शिक्षण : लोकमान्य विद्यालय, पंढरपूर व संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर. विद्यार्थी दशेतच समाजकार्य व राजकारणाकडे ओढा होता.

कार्य : (१) १९३७-४० विद्यार्थी संघ, राष्ट्रसेवा दल व काँग्रेस यांच्या वतीने पंढरपूर शहरांत व तालुक्यात कार्य केले.

(२) १९४० डिसेंबरमध्ये रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना—परिषदेत सहभाग. १९४४-४६ रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचे पूर्णवेळ कार्य सोलापूरमध्ये व जिल्ह्यात केले. १९४६ च्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीमध्ये सहभाग (सोलापूरात).

(३) १९४७ पासून कमलापूर, ता. सांगोले येथे वास्तव्य.

# धर्मनिरपेक्षता नव्हे, इहवाद

# धर्मनिरपेक्षता नव्हे, इहवाद


लेखक

महादेव शंकर ढोले



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रथम आवृत्ती
मार्च, १९९२

प्रकाशक
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मुंबई–४०० ०३२

© प्रकाशकाधीन

मुद्रक
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय, वाई

किंमत रु. ७०–००

# अर्पण - पत्रिका

माझा हाडामांसाचा गोळा मातापित्यांच्या
मायेने ज्यांनी संस्कार करुन घडविला,
वाढविला, व साकार केला, त्या
कै. गणेश विठ्ठल पाठक (मास्तर) व
कै. पुरुषोत्तम गजानन बेंके (मास्तर)
यांचे पवित्र स्मृतीला सादर समर्पण.

म. शं. ढोले

# अनुक्रमणिका



| अ. नं. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | निवेदन | एक ते दोन |
| | प्रस्तावना | तीन ते सहा |
| | लेखकाचे दोन शब्द | सात ते दहा |
| १ | धर्मातीत शासन कां व कशासाठी ? | १ ते ९ |
| २ | धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ? | १० ते १८ |
| ३ | राज्यघटना आणि इहवाद | १९ ते ३१ |
| ४ | इहवादाचा उदय आणि विकास | ३२ ते ४५ |
| ५ | प्रबोधनाची चळवळ | ४६ ते ५४ |
| ६ | धर्म आणि इहवाद | ५५ ते ८१ |
| ७ | नीती आणि इहवाद | ८२ ते ९८ |
| ८ | भारतात इहवादाचा उदय आणि अस्त | ९९ ते १११ |
| ९ | आधुनिक संस्कृती आणि इहवाद | ११२ ते १३५ |
| १० | भारतीय इहवाद | १३६ ते १५९ |
| ११ | सर्वधर्मसमभाव आणि इहवाद | १६० ते १७६ |
| १२ | राष्ट्रीय एकात्मता आणि इहवाद | १७७ ते २०० |

# निवेदन

भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांनी संविधान तयार करीत असतांना त्याच्या उद्देशिकेत किंवा कोणत्याही कलमामध्ये "सेक्युलर" हा इंग्रजी शब्द वापरला नव्हता. मात्र स्वतंत्र भारताचे लोकशाही गणराज्य कोणत्याही एका धर्माचा स्वीकार किंवा धिक्कार करणार नाही असेच त्यांना अभिप्रेत असल्याचे घटना परिषदेतील चर्चांच्या वृत्तांतावरून स्पष्ट दिसते. १९७६ साली मंजूर झालेल्या बेचाळीसाव्या घटनादुरुस्ती कायद्यामुळे प्रथमच "सेक्युलर" या संज्ञेचा उद्देशिकेत अंतर्भाव करण्यात आला. त्याआधीच "सेक्युलर स्टेट", "सेक्युलॅरिझम" या संज्ञांच्या नेमक्या अर्थाबाबतचा वाद सुरू झाला होता. आजही या संज्ञांच्या अर्थाबद्दलच्या तीव्र मतभेदामुळे अटीतटीने वाद खेळले जातात. भारतीय संविधानात "रिलिजन", या इंग्रजी शब्दाचीही निश्चित व्याख्या कोठे केलेली आढळत नाही. "सेक्युलॅरिझम" म्हणजे सर्वधर्मसमभाव असा अर्थ आज रूढ झालेला दिसतो. "सेक्युलॅरिझम" म्हणजे धर्मनिरपेक्षता आणि धर्मनिरपेक्षता म्हणजे "सर्वधर्मसमभाव" असे म्हटले जाते.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारसरणीने प्रभावित झालेल्या श्री. महादेव शंकर ढोले यांनी आपल्या पुस्तकास "धर्मनिरपेक्षता नव्हे, इहवाद" असे शीर्षक देऊन या वादातील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सर्वंकष स्वरूपाच्या धर्माचा जबरदस्त पगडा असलेल्या भारतासारख्या देशातील समाजात इहवादी शासनाची निर्मिती करणे हे अत्यंत कठिण असले तरी अशक्य नाही असे घटनेच्या शिल्पकारांना वाटत होते. भारताची घटना अस्तित्वात आली त्यालाही चाळीस वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. तरीही येथील शासन अधिकाअधिक इहवादी होण्याऐवजी सर्वधर्मसमभावाचे कातडे पांघरुन धर्माधिष्ठीत चळवळी धुमाकूळ घालीत असल्याचे विपरीत दृश्य दिसत आहे. अशा परिस्थितीत पाश्चिमात्य देशातील तसेच

*आधुनिक भारतातील विचारवंतांच्या इहवादाबद्दलच्या चिंतनाचा मागोवा घेत विश्लेषण करण्याचा श्री. ढोले यांनी प्रयत्न केला आहे तो वाचकांना स्वागतार्ह वाटेल अशी आशा आहे.*

*या नाजुक व गुंतागुंतीच्या विषयाबाबत श्री. ढोले यांनी व्यक्त केलेली मते त्यांचे हे पुस्तक प्रकाशित करणाऱ्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास किंवा महाराष्ट्र शासनास मान्य आहेत असे समजण्याचे कारण नाही. लोकशाही मानणाऱ्या शासनाने विचारमंथनास नेहमीच वाव द्यावा अशी अपेक्षा असते. एखादा अभ्यासक जबाबदारीची जाणीव ठेवून वादग्रस्त विषयाबद्दलची मते गंभीरपणे मांडण्यास उद्युक्त झाला तर त्याला मोकळीक देणे हे लोकशाही शासनाचे एक आवश्यक कर्तव्य असते. लोकशाहीत आपल्याला न पटणाऱ्या मताबद्दल केवळ सहिष्णुता दाखवून भागत नाही तर विरोधी मत मांडणाऱ्याची कदर करण्याची वृत्तीही प्रयत्नपूर्वक अंगी बाणवावी लागते. या पुस्तकाचे वाचक असा उदार दृष्टिकोण बाळगून लेखकाच्या मतांचा विचार करतील असे वाटते.*

य. दि. फडके
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई,
दि. २ मार्च, १९९२

# प्रस्तावना

इहवादाचे किमान दोन अर्थ विशेषत्वाने प्रचारात आहेत. विश्वांतील विविध घडामोडीमागे कसलीही दैवी शक्ती असत नाही. 'पारलौकिक' व 'लौकिक' असे मानवी जीवनाचे भेद करणे केवळ काल्पनिक आहे. मनुष्य त्याच्या बुद्धीसामर्थ्याने आपले भवितव्य घडवू शकतो. नियती वगैरे काही नाही असे मानणारी विचारसरणी, हा इहवादाचा एक अर्थ आहे. यालाच 'निरीश्वरवादी मानवतावाद' असेही म्हणतात.

दुसरा जो अर्थ प्रचारांत आहे, त्याला युरोपमधील प्रबोधनाच्या चळवळीची पार्श्वभूमी आहे. ख्रिश्चन धर्माचे 'चर्च' व त्याचे धर्मगुरु यांच्या जुलमी वर्चस्वाविरुद्ध बाराव्या शतकापासून चालू असलेल्या या चळवळीने यूरोपला जीवनाकडे पाहण्याचा इहलौकिक दृष्टिकोन दिला. त्यांतून विज्ञानशास्त्राची प्रचंड वाढ झाली. 'राजा परमेश्वरी अंश आहे' या पारंपारिक श्रद्धेला सुरुंग लागला. धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली. आधुनिक उदारमतवादी लोकशाहीचा जन्म झाला. ख्रिश्चन चर्च ही धर्मसंस्था व 'राज्य' ही लौकिक सार्वभौम सत्ता यांचेमध्ये श्रेष्ठत्वासाठी झगडे सुरू झाले. त्यात अखेरीस राज्यसंस्थेचा विजय झाला. हा इहवादाच्या उदयाचा इतिहास होय.

इहवादाचा प्रचार त्यानंतर सर्वच पाश्चात्त्य राष्ट्रांतून कमी अधिक प्रमाणांत झाला. तथापि या सर्व राष्ट्रांतून झालेल्या इहवादाच्या प्रसाराचा एक बाब सर्वमान्य आहे. ती म्हणजे तेथे आधी समाज इहवादी झाला व नंतर शासन इहवादी झाले. भारतांत मात्र ही प्रक्रिया उलट घडली.

## आधी कळस मग पाया

दुसऱ्या जागतिक महायुद्धांमध्ये फासिझम–नाझीझमचा पराभव झाला. त्याचा परिणाम म्हणून भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. त्याची राज्यघटना तयार करणाऱ्या परिषदे-मध्ये पंडित नेहरु, डॉ. आंबेडकर यासारखी इहवादी व लोकशाही विचारांनी भारलेली नेते-मंडळी होती. त्यांनी जगातील प्रगत देशांच्या राज्यघटना अभ्यासून भारताची घटना 'लोकसत्ताक व इहवादी' बनविली. 'भारतीय शासन इहवादी लोकसत्ताक' असल्याचे जाहीर करण्यांत आले. पण 'इहवादी शासना'ची घोषणा करणे पुरेसे होत नसते. समाज इहवादी व लोकशाही मूल्ये मानणारा असल्याशिवाय शासन कसे इहवादी होऊं शकेल ? कारण शासन म्हणजे 'सुसंघटित समाज' होय. 'यथा प्रजा तथा शासन' हा लोकशाही समाजांतील नियम असतो. भारतीय प्रजा अंध धर्मश्रद्धांनी जखडलेली आहे. तशीच जन्मसिद्ध उच्चनीचता, सतीप्रथा, जातीप्रथा, अस्पृश्यता मानणारी आहे. शासन इहवादी झाले. पण जनता तशीच मागासलेली राहिली. तिला इहवादी, लोकशाही मूल्ये पटवून देऊन तिचे प्रबोधन केल्याशिवाय ती इहवादी कशी होणार ? समाज इहवादी बनल्या-शिवाय 'इहवादी शासन' कसे होणार ? झाले तरी कसे टिकणार ?

अशी अपेक्षा करण्यांत आली होती की, इहवादी शासनाने अंधश्रद्ध व अशिक्षित भारतीय जनतेमध्ये शिक्षण व इतर सुधारणा वेगाने घडवून आणल्या व आर्थिक सामाजिक प्रगती घडून आली, तर लोकशाहीचे व इहवादाचे संस्कार तिच्यावर करता येतील व ही विसंगत स्थिती नाहीशी करता येईल. त्या हेतूने गेल्या चाळीस वर्षांत भारताने खूपशी धडपड केलीही आहे. काही प्रगती– शेती, उद्योगधंदे, शिक्षण, दळणवळण, ज्ञानप्रसार वगैरे– विविध क्षेत्रांत झालीही आहे. तरीही समाजांत इहवादी, लोकशाही मूल्ये रुजविणे शासनाला अगदीच अशक्य नसले तरी सोपेही नाही, याचा अनुभव आता येऊ लागला आहे. कारण लोकशाही व इहवाद ही मानवी मूल्ये आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही मानवी मूल्ये त्यांचा पाया आहे. ते सांस्कृतिक अधिष्ठान असल्याशिवाय लोकशाही व इहवाद ही मूल्ये समाज आत्मसात करुं शकत नाही. आपल्या सामाजिक परंपरा व धर्म ही मानवी मूल्ये स्वीकारू शकतो काय ?

हिंदू व इस्लाम हे भारतांतील प्रमुख धर्म सर्वंकष स्वरूपाचे म्हणजे मानवी जीवनाचे संपूर्ण नियंत्रित करणारे आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व मानवी व्यवहार त्यांचे साचेबंद कर्म-कांडानुसारच व्हायला हवेत. असा त्यांचा दंडक आहे. सामाजिक उच्चनीचतेची उतरंड त्यांत आहे. कर्ता करविता परमेश्वर आहे. मनुष्य निमित्त मात्र आहे. 'तरीच जन्मा यावे, दास ईश्वराचे व्हावे' हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट मानणारा जीवनविषयक दृष्टिकोन त्यांत

आहे. यांत मानवाला स्वतंत्र अस्तित्वच कोठे आहे ? मग स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही मानवी मूल्ये यांत कशी येणार ? 'स्वतःच्या बुद्धिसामर्थ्याने मनुष्य आपले भवितव्य घडवू शकतो' हा दृष्टिकोन यांत कसा येणार ? स्वातंत्र्य, व्यक्तित्व व प्रतिष्ठा देणारा दृष्टीकोन लोकशाहीचे, इहवादाचे, अधिष्ठान आहे हे भारतीय परंपरा कशी निर्माण करणार ? म्हणून भारतीय धार्मिक परंपरा व लोकशाही इहवादी दृष्टीकोन यांमध्ये मूलभूत विसंगती आहे, हे स्पष्ट आहे. आजच्या भारताचे सर्व प्रश्न या विसंगतीमधून निर्माण झालेले आहेत असे मला वाटते.

भारतीय राज्यघटना लोकशाहीची व इहवादी बनवितांना, घटना समितीला या मूलभूत विसंगतीमुळेच बरीच तारेवरची कसरत करावी लागली ते घटनेवरून स्पष्टच दिसते. उदा., सर्व नागरिकांना घटनेप्रमाणे संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य, श्रद्धा, उपासना व प्रचार करण्याचे– देण्यांत आलेले आहे. त्याबरोबरच 'धर्मसुधारणा व समाजकल्याण' यासाठी कायदे करण्याचे अधिकार शासनाकडे अबाधित राहतील असेही ठरविले आहे. अस्पृश्यता घटनेप्रमाणे नष्ट करण्यांत आली आहे. तर हिंदुधर्ममंदिरे सर्व हिंदू जातीजमातींना खुली करण्याचा अधिकार शासनाकडे राखून ठेवला आहे. सर्व नागरिकांना समान नागरिक हक्कांची हमी दिली आहे तर शिक्षणसंस्था व शासकीय नोकऱ्यामध्ये अनुसूचित जातीजमाती व अन्य मागासवर्गीयांना राखीव जागांची तरतुदही केली आहे. एवढेच नव्हे तर त्यांना व सर्व अल्पसंख्यांकांना स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा व त्या चालविण्यासाठी स्थावर जंगम मालमत्ता करण्याचा अधिकारही दिला आहे.

असे असले तरी ही घटना भिन्न धर्मियांमध्ये आपपरभाव दाखवीत नाही. कोणत्याही धर्मीयांच्या खाजगी धर्मजीवनांत हस्तक्षेप करीत नाही. संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य सर्व नागरिकांना दिलेले आहे. त्याचप्रमाणे शासन स्वतःच कोणताही धर्म पुरस्कारीत नाही. धर्म-क्षेत्र व शासनक्षेत्र यांची संपूर्ण फारकत केलेली आहे. म्हणून ही राज्यघटना इहवादी आहे, हे स्पष्ट आहे. अमेरिकन राज्यघटनेने याबाबत उत्तम उदाहरण घालून दिलेले आहे व ते भारतीय राज्यघटनेशी सुसंगतही आहे.

इहवाद व लोकशाही ही मानवी मूल्ये परस्पर-पूरक आहेत व मानवी समाजाच्या उज्वल भवितव्यासाठी अत्यावश्यक आहेत यांत काहीच शंका नाही. पण भारताच्या चमत्कृतीपूर्ण परिस्थितीमध्ये ती यशस्वी कशी होऊ शकतील हा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यांतच शासनकर्त्यांनी व बऱ्याच नेत्यांनीही इहवादाचा अर्थ सर्वधर्मसमभाव असा चुकीचा समजून घेतल्यामुळे गेल्या चाळीस वर्षांत सर्वच धर्मीयांच्या जातीयवादी चळवळी डोके वर काढू लागल्या आहेत, ही चिंतेची बाब आहे. राजा राममोहन रॉयपासून मानवेंद्रनाथ रॉय-नेहरू-आंबेडकरापर्यंत जो पुरोगामी विचार भारतीय जनमानसांत रुजविण्याचा

सातत्याने प्रयत्न झाला, तो सर्व प्रयत्नच मुळांतून उखडला जातो की काय अशी भीति या जातीयवादी चळवळींनी निर्माण केली आहे. ही भयानक लाट थोपवून धरायची व तिच्यावर मात करायची, तर त्या परिस्थितीचे योग्य निदान प्रथम व्हायला हवे आहे. त्याशिवाय उपाय योजना करता येणार नाही.

या सर्व प्रश्नांचा सांगोपांग व मूलगामी विचार माझे मित्र भाई म. शं. ढोले यांनी त्यांच्या 'धर्मनिरपेक्षता नव्हे, इहवाद' या त्यांच्या ग्रंथात केला आहे. वास्तविक पहाता हा अत्यंत गुंतागुंतीचा, स्फोटक व तितकाच नाजुक विषय झालेला आहे. तरीही श्री. ढोले यांनी त्याच्या विविध बाजू परिश्रमपूर्वक व सविस्तर मांडल्या आहेत. विशेषतः भारताचे धर्मनिरपेक्ष शासन क्रमशः अधिकाधिक इहवादी होत जाणेऐवजी सर्वधर्मसमभावाचे गोंडस नावाखाली जातीयवादालाच खतपाणी घालत आहे व त्यामुळे भारताच्या एकात्मतेला व अखंडत्वाला धोका निर्माण होण्याचा संभव वाढत आहे हा त्यांचा विचार अत्यंत समयोचित व महत्त्वाचा आहे, यात शंका नाही. त्याच्या अत्यंत आवश्यक व धाडसी प्रयत्नाबद्दल मी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

नवी दिल्ली,
३० ऑक्टोबर १९८८

वि. म. तारकुंडे

# लेखकाचे दोन शब्द

भारताची सद्यःस्थिती राजकीयदृष्ट्या आणीबाणीपूर्व कालासारखी, जातीय वातावरण फाळणीपूर्व कालासारखे व समाजस्थिती, वर वर पाहता अद्ययावत पण वैचारिक दृष्ट्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त दिसते. अराजक, बेदिली, भ्रष्टाचार व अनागोंदी कारभार याना अगदी उधाण आलेसे वाटते. अपघात, खून, मारामाऱ्या, बलात्कार, चोऱ्या, दरोडे, अफरातफरी, हत्या यांनी धुमाकूळ घातला आहे. कोणाचेही जीवित, वित्त मालमत्ता किंवा अब्रू आज सुरक्षित राहिलेली दिसत नाही.

राजकीय पक्षांची स्थिती अगदीच केविलवाणी झाल्याचे दिसत आहे. निस्वार्थ लोकहितबुद्धी, सर्वांगीण अभ्यास, व्यासंग, तपश्चर्या, या गोष्टींना कोणत्याही पक्षात केराइतकीही किंमत राहिलेली नाही. लोक गोळा करण्याची ताकत (ती गर्दी कसलीही असो किंवा कोणत्याही मार्गाने गोळा केलेली असो) ज्याची मोठी, तो मोठा नेता ठरतो, अशी स्थिती असल्यामुळे नेतृत्व आणि चारित्र्य यांची संगत क्वचितच दिसून येते. अशा परिस्थितीत अभिनेतेच सर्वश्रेष्ठ नेते बनण्याची अभिलाषा बाळगत असतील तर आश्चर्य कसले? मतलबी लोकरंजन, पैसा व गुंडगिरी ही नेतृत्वाची सोईस्कर साधने बनल्यावर यापेक्षा दुसरे काय होणार?

हे सर्व पाहिल्यावर, समाजहितासंबंधी खरीखुरी आस्था बाळगणाऱ्या व सत्प्रवृत्त व्यक्ती या परिस्थितीत अस्वस्थ, बेचैन होऊन जाणे साहजिकच मानावे लागते. विशेषतः स्वातंत्र्यपूर्वकाळात ज्यांचा वैचारिक पिंड तयार झालेला असेल, त्यांना हेचि फळ काय मम तपाला? असे वाटणे साहजिकच आहे. कै. सानेगुरुजीसारख्या भावनाशील समाजसेवकाला 'हे पाहणे नको' असे वाटले तर त्यात गैर काय? पुढे काय वाढून ठेवले आहे, याची जणू चाहूलच त्यांच्या दूरदृष्टीला आधीच लागली असावी!

देव, धर्म, भाषा यांच्या संरक्षणाच्या नावाखाली विघातक प्रवृत्ती वाढत चालल्या आहेत. त्यामुळे स्वातंत्र्य, लोकशाही व राष्ट्रीय ऐक्य यांना धोका होणार असल्याचे स्पष्टच दिसत आहे. हिंसाचार व भ्रष्टाचार हातात हात घालून सर्वांच्याच डोक्यावर वरवंटा फिरवतील अशी चिन्हे दिसत आहेत.

पण असे कां व्हावे ? आपण तर गहू पेरले होते, गाजर गवतच कां फोफावत आहे ? इहवाद, बुद्धिवाद, व्यक्तिवाद, मानवतावाद, लोकशाही, स्वातंत्र्य उदारमतवाद या मतांचा आपण सतत, अथक पुकारा, गेली शंभराहून अधिक वर्षे केला. आज मात्र हिंसाचार, भ्रष्टाचार, जातीयता एकसारखी वाढत असल्याचे दिसत आहे असे कां व्हावे ? ज्ञानप्रसारांतून यूरोपमध्ये अंधश्रद्धा नष्ट झाली. धर्माच्या नावाखाली चाललेले खिश्चन धर्मगुरुंचे अत्याचार, हूकमत, अरेरावी, नष्ट झाली. इहवाद उदयाला आला. त्याचा प्रसार झाला. औद्योगिक क्रांती झाली. प्रबोधनाचे युग अवतरले. सर्वांगीण समृद्धी झाली. प्रगती झाली, भारतातही पाश्चात्य शिक्षणाचे वाघिणीचे दूध एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी मिळू लागले. आधुनिक संस्कृतीचे, सुधारणांचे, स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. उदारमतवाद, बुद्धीवाद, मानवतावाद, लोकशाही, स्वातंत्र्य आदि नव्या कल्पना फोफावू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळांत शिक्षण प्रसार, उद्योगधंदे यांची वाढ झाली. सुधारणाही होऊ लागल्या. त्याचबरोबर जातीयवाद, हिंसाचार, अराजक, बेदिलीही वाढत आहे, असे का व्हावे ?

डोक्यात विचारांचे वादळ उठले असतांना पंडित नेहरुंचे एक भाषण वाचनात आले, एका वाक्याने माझे लक्ष अक्षरशः खेचून घेतले. ते वाक्य होते, 'भारताचे शासन इहवादी व लोकशाहीचे असले पाहिजे. "भारताचे भौगोलिक ऐक्य व अखंडत्वासाठी त्याची गरज आहे. लोकशाही समाज उभारण्यांसाठीही त्याची गरज आहे." वर उल्लेखलेल्या विचारांनी मन भारावलेले असतांना, एकदम विजेचा झोत यावा, तसा प्रकाश पडला, 'त्यांचा गर्भित इशारा डावलल्यामुळेच तर ही परिस्थिती उद्‌भवली नसेल ? विचारांचे मोहोळच उठले. पंडित नेहरुंनीच इहवाद, लोकशाही यांचे रोपटे लावले, मग जातीयता, भ्रष्टाचार, स्वार्थ, बेदिली, अराजक यांचा निवडुंग कसा फोफावला ? अनेक ठिकाणी ही शंका व्यक्त केली. नित्य चालणाऱ्या चर्चा मधून, विचारविनिमयांतून, भाषणांतूनही प्रकट केली. ज्येष्ठ विचारवंत साथी विनायकराव कुलकर्णी (पुणे), वामनराव कुलकर्णी (सांगली), तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बॅ. वि. म. तारकुंडे, डॉ. मा. पं. मंगुडकर वगैरेशीही सल्लामसलत केली. त्यामुळे ही चिंता शब्दबद्ध करावीशी वाटू लागली.

इहवाद, लोकशाही, समाजवाद, स्वातंत्र्य ही ध्येये स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात आपण उराशी बाळगली. प्राणार्पणाच्या योग्यतेची ही ध्येये आहेत असे अनेकांना वाटले

म्हणून स्वातंत्र्य आले. पण नंतरच्या अनुभवांनी असे आढळून येऊ लागले की, ही ध्येये स्वीकारतांना, त्याचा स्पष्ट, खोल अर्थ आम्ही समजून घेतला नसावा. म्हणूनच वैचारिक गोंधळ झाला व त्यातून हा निवडुंग वाढला असावा. पण निवडुंगाच्या उत्पत्तीला नवीन रासायनिक औषधांनी पायबंद घातला. तसा स्वातंत्र्योत्तर काळातील कुविचारांच्या निवडुंगाला पायबंद घालण्यासाठी, एकेकाळी प्राणार्पणाच्या योग्यतेच्या वाटलेल्या ध्येयांची, पुनःचिकित्सा करण्याची गरज आहे.

प्रस्तुत ग्रंथाची ही जन्मकथा. सर्व प्रचलित दुःखावर, अरिष्टावर रामबाण उपाय सुचविणारा मी कोणी महापंडित नाही. मी यातील काही दुःचिन्हांची फक्त चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. तुमच्याही मनांत असेच अनंत प्रश्न, शंका निर्माण झाल्या असतील. त्याच्याशी ही चर्चा ताडून पहा, एवढीच माझी विनंती आहे. विचाराने विचार वाढतो, वाढावा एवढीच अपेक्षा. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे', म्हणून हा प्रपंच. हे सर्व लिहून काढण्याचे किचकट काम, माझे तरुण मित्र चि. संजय चांदणे, जगदीश व चिंतामणी ढोले, द. वि. गोसावी, यांनी व त्यांच्या मित्रांनी पार पाडले. सांगोले कॉलेजचे प्राचार्य श्री. य. ना. कदम, प्रा. डॉ. कृष्णा इंगोले, मंगळवेढे येथील प्रा. आ. गो. पुजारी, दे. भ. आण्णासाहेब चांदणे, श्री. दत्ता सावळे यांनी ते लिखाण वाचून काढले व उपयुक्त सूचना केल्या. त्यामुळे या लिखाणाला अधिक रेखीवपणा आला. माझे थोर मित्र न्यायमूर्ती वि. म. तारकुंडे व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मार्गदर्शनावाचून हे कार्य माझ्या हातून होणे अशक्यच होते, त्यांनी हे सर्व वाचून काढण्याची तसदी घेतली. त्यांचा बहुमोल वेळ खर्च करून मला सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. हे त्यांचे ऋण फार मोठे आहे. अनेक ठिकाणी अपुरेपणा मलाही जाणवतो, त्याला मात्र एकटा मीच जबाबदार आहे.

न्यायमूर्ती तारकुंडे यांना प्रस्तावना लिहून देण्याची मी विनंती केली, आणि मलाच चुकल्यासारखे वाटू लागले. मी आठ दिवस दिल्लीत राहिलो, आणि मला माझी चूक समजली. पण भाऊसाहेबांनी मात्र आपला बहुमोल वेळ खर्च करून माझा जुलूम सहन केला व प्रस्तावना दिली, हे त्यांचे ऋण मान्यच केले पाहिजे.

मी खेड्यांत राहणारा माणूस, खेड्यात दारिद्य फक्त आर्थिकच नसते. ज्ञानाच्या क्षेत्रात दारिद्याबरोबर दुष्काळही असतो. संदर्भग्रंथाचे बाबतीत हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर, नगरपालिका वाचनालय कराड, विश्वकोश ग्रंथालय वाई, सांगोले कॉलेज ग्रंथालय, नगर वाचन मंदिर सांगोले, अध्यापक विद्यालय एयतपूर, विद्यामंदिर हायस्कूल ग्रंथालय सांगोले, वाटंबरे या सर्वांनी ही उणीव भरून काढण्यांस मला सहाय्य केले. तसेच

या पुस्तकाचे प्रकाशनासाठी सोलापूरचे माझे ज्येष्ठ मित्र भाई अ. के. भोसले, प्रा. श्रीराम पुजारी, डॉ. फडकुले, विश्वासराव नाईकनवरे, सांगोल्याचे आमदार गणपतराव देशमुख वगैरेंनी अनेक प्रकारे प्रोत्साहन व मदत केली. त्या सर्वांचे आभार मानणे जरूर आहे, पण त्यांना ते आवडणार नाही, ही भीती आहे, म्हणून त्यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करतो.

या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने स्वीकारली, म्हणूनच हे प्रकाशित होऊं शकत आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. विशेषतः मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. यशवंत मनोहर व सध्याचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके, सचिव कै. पंढरीनाथ पाटील यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

छपाईचे काम वाई येथील शासकीय मुद्रणालयाकडे सोपविण्यांत आले होते. त्या मुद्रणालयांतील कर्मचारी मित्रांनी छपाईचे काम आस्थापूर्वक, सुबक व अत्यंत त्वरेने आणि हौसेने पार पाडले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

माझा हा धाडशी प्रयत्न कितपत उपयुक्त झाला हे आपणच ठरवावयाचे आहे. याबाबत वाचकांनी आपल्या शंका, किंवा प्रतिक्रिया कळविल्या, तर मला माझ्या प्रयत्नाचे मोलच मिळाल्यासारखे वाटेल.

कमलापूर,<br>ता. सांगोला,<br>जि. सोलापूर.

म. शं. ढोले

# १

# धर्मातीत शासन कां व कशासाठी ?

## १. पूर्वपीठिका

१९३१ साली कराची येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत पास झालेल्या एका ठरावात 'धार्मिक बाबतीत स्वतंत्र भारताचे शासन तटस्थ राहील' असे जाहीर करण्यात आलेले होते. त्याचाच पुनरुच्चार १२ ऑक्टोबर १९४७ रोजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरुंनी आपल्या पत्रकार परिषदेत केला. ते म्हणाले 'आपणांस इहवादी धर्मनिरपेक्ष लोकसत्ताक राज्य' निर्माण करावयाचे आहे. त्यात भारताच्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या जातीधर्माचा विचार न करता समान हक्क व समान संधी मिळू शकेल. देशाच्या भौगोलिक ऐक्याच्या व अखंडत्वाच्या दृष्टीने व लोकशाही समाज उभारण्याच्या आपल्या ध्येयाच्या दृष्टीनेही त्याची गरज आहे."[१]

भारताच्या राज्यघटनेमध्ये या विचारांना मूर्त स्वरुप दिलेले आहे. त्यावेळी लोकसभेत पंडित नेहरु म्हणाले 'शासन सर्व धर्माचे संरक्षण करील. पण कोणताही एक धर्म 'अधिकृत धर्म' म्हणून स्वीकारणार नाही. कोणत्याही एका धर्माचा सन्मान अगर कोणत्याही धर्माचा धिक्कार करणार नाही.'

दुसऱ्या प्रसंगी ते म्हणाले ' शासन व धर्म यांच्या कार्यक्षेत्रांची पूर्ण फारकत केली जाईल. पण व्यक्तीच्या खाजगी जीवनांत धर्माबाबत हस्तक्षेप केला जाणार नाही. '[२]

कराची काँग्रेसचा ठराव व त्याचे पंडित नेहरुंनी केलेले वरील स्पष्टीकरण पाहतांना, त्यातून दोन अर्थ निघू शकतात. भारतात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध वगैरे अनेक धर्माचे लोक पूर्वीपासूनच राहत आले आहेत. स्वतंत्र भारताचे शासन यापैकी कोणत्याही एकाच धर्मीयांचे असणार नाही. ते सर्वांचे असेल. तसेच शासनाला स्वतःचा कोणताच 'अधिकृत धर्म' असणार नाही. ते सर्व धर्मापासून अलिप्त म्हणजे धर्मातीत राहील हा एक अर्थ. दुसरा अर्थ असा होऊ शकेल की धर्म व शासन यांची कार्यक्षेत्रे परस्पराहून स्वतंत्र राहतील. त्यांची काटेकोर विभागणी होईल. एकाला दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करता येणार नाही.

काही लोक असे मानतात की हा दुसरा अर्थ भारतात लागू पडत नाही. कारण भारतात प्रमुख धर्म म्हणजे हिंदु धर्म. त्यात ख्रिश्चन धर्मातील चर्च सारखी 'संघटित व मध्यवर्ती धर्मसंस्था' नाही मग कोणापासून विभागणी करायची ? अशी त्यांची शंका असावी. सकृत दर्शनी ती खरीही वाटते. पण त्याचा अर्थ असा करायचा काय की भारतीयांच्या मनावर धर्माचे प्राबल्य नाही ? भारतीय लोक तर धर्मनिष्ठ असल्याचा पूर्वीपासून लौकिक आहे. हिंदुधर्माची संघटित व मध्यवर्ती संस्थात्मक यंत्रणा नाही हे जरी खरे असले तरी 'जात' या संस्थेची यंत्रणा पूर्वीपासूनच प्रभावी असल्याचे इतिहासावरून दिसून येते. 'हिंदुधर्म ही कल्पना आणि जात ही वस्तुस्थिती' अशीच स्थिती असल्यामुळे विभागणी कोणापासून करायची ह्या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट होते.

तथापि कराची काँग्रेसच्या ठरावाचा अर्थ इतका व्यापक नव्हता असेच म्हणावे लागते. त्यातून 'धर्मनिरपेक्ष किंवा धर्मातीत शासन म्हणजे धार्मिक बाबतीत तटस्थ' राहणारे शासन एवढाच अर्थ निघू शकत होता व तसाच आजपर्यंत झालेला आहे. राष्ट्रसभेच्या राजकारणातील ते एक महत्त्वाचे तत्त्व तेव्हापासून मानण्यांत आलेले असले तरी त्याचा संकुचित अर्थच (धर्मातीत शासन) आतापर्यन्त घेतला गेला आहे.

## २. मुस्लीम समाजाचा अलगपणा

धर्मातीत शासनाचे तत्त्व काँग्रेसने स्वीकारण्याचे आणखी एक कारण संभवते, ते असे. काँग्रेस १८८५ साली स्थापन झाली. काही यूरोपियन, काही पारसी, काही ख्रिश्चन व बरेचसे हिंदू तीत सामील झाले होते. पण मुसलमान अवघे दोनच होते.

काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशन प्रसंगी मुसलमानांनी अधिक संख्येने उपस्थित रहावे म्हणून खास प्रयत्न स्वागत समितीने केले. पण दि सेंट्रल नॅशनल महामैडन असोसिएशन आणि दि महामेडन लिटररी सोसायटी या प्रमुख मुस्लीम संघटनांनी ते निमंत्रण झिडकारुन दिले. त्यामुळे या अधिवेशनाला हजर असलेल्या एकूण ४१३ प्रतिनिधीमध्ये फक्त २७ मुसलमान होते.

तिसऱ्या काँग्रेसचे अध्यक्षपदी बद्रुद्दिन तय्यबजी हे मुस्लीम गृहस्थ होते. त्यावेळी एकूण हजर प्रतिनिधी ४३१ पैकी फक्त ३३ मुसलमान होते. १८९४ मध्ये मद्रास येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला १२०० प्रतिनिधी हजर होते. त्यात फक्त २४ मुसलमान होते. त्याचेपुढील वर्षी पुण्याला काँग्रेस अधिवेशन भरले. त्यावेळी एकूण हजर प्रतिनिधी १५८४ पैकी फक्त १९ मुसलमान होते. त्यापैकी १७ पुण्याचेच होते.

याचा अर्थ मुसलमान समाज काँग्रेसमध्ये सामील होऊ इच्छीत नव्हता असाच होतो. त्याचे कारण, त्या काळातील त्यांचे पुढारी सर सय्यद अहमदखान यांची शिकवणूक हेंच होते. सन १८८७ मधील एका भाषणात ते म्हणाले.[३] 'या देशातून इंग्रजांना घालवून येथील सत्ता आपल्या ताब्यात घेणे हाच काँग्रेस-स्थापनेचा हेतू आहे आणि काँग्रेस ही हिंदु संघटना आहे. हिंदू व मुसलमान या केवळ दोन जमाती नसून दोन भिन्न राष्ट्रे आहेत व त्यांत हिंदु संख्येने मुसलमानांच्या चौपट असल्याने प्रातिनिधिक लोकशाहीच्या पद्धतीप्रमाणे हिंदु नेहमीच सत्ताधारी राहतील व मुसलमान नेहमीच हिंदुच्या आधीन राहतील. तेव्हा मुसलमानांनी काँग्रेसशी कोणताच संबंध ठेऊ नये.'

## ३. काँग्रेस नेत्यांची भूमिका

याचे अगदी उलट लो. टिळक, ना. गोखले, म. गांधी. पं. मोतीलाल नेहरु आदि राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना वाटत होते. राष्ट्रीय चळवळ सर्वसमावेशक कशी होईल ? इंग्रजांचे विरुद्ध भारतीय जनतेची एकसंघ फळी कशी तयार होईल ? मुस्लीम व इतर सर्व अल्पसंख्यांक समाज तीत कसे सामील होतील ? याची चिंता त्यांना लागून राहिली होती. अल्पसंख्य समाजाचा–विशेषतः मुस्लीम समाजाचा–अनुनय करण्याची गरज तृतीय शक्ती जी इंग्रज–त्यांना एकमुखाने तोंड देण्याच्या गरजेंतून निर्माण झाली होती. १९१६ साली झालेला 'लखनौ करार' त्यापैकीच एक प्रयत्न म्हणता येईल. अर्थातच प्रमुख अडथळा मुस्लीम समाजाच्या दृष्टीकोनाचा होता हे आपण पाहिलेच आहे. 'मुसलमान हे एक राष्ट्र आहे' ही सर सय्यद यांची शिकवणूक भारतात नवी नव्हती. ती नुरुद्दिन मुबारकापासून चालत आलेली होती. आपला धर्मच एकमेव खरा धर्म आहे. इतरांवर तो लादणे हा अन्याय नव्हेच उलट त्याचा प्रतिकार इतरांनी करणे हाच अन्याय होय. आमच्या राज्यांत आपल्या खेरीज इतरांना कसलेच अधिकार वा हक्क असू शकत नाहीत. कारण कोणीही आमच्या बरोबरीचे नाहीत. इतरांच्या राज्यात मात्र आम्हांस समानतेने वागवून चालणार नाही. आम्हाला तिथे विशेष अधिकार असले पाहिजेत. कारण आम्ही 'सर्वश्रेष्ठ धर्माचे' म्हणून सर्वश्रेष्ठ आहोत. हा मुसलमान पुढाऱ्यांचा दृष्टीकोन राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना म्हणजेच लो. टिळक, पंडित मदनमोहन मालवीय, पं. मोतीलाल नेहरु आदींना मान्य होणे शक्यच नव्हते. याला दोन कारणे संभवतात. एक म्हणजे इस्लाम हा श्रेष्ठ धर्म आहे ते या हिंदू पुढाऱ्यांना मान्य शक्य होणे नव्हते. दुसरे असे की इंग्रजी राज्य नष्ट करून येथे स्वराज्य स्थापन करावे अशी स्फूर्ति या हिंदू पुढाऱ्यांना होण्याला आर्थिक व राजकीय कारणे जशी होती तशी धार्मिक कारणेही होती. मिशनरी लोकांचा ख्रिश्चन धर्मप्रचार, हिंदू धर्माची निंदा व हिंदू लोकांचे फार मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडवून आणण्याचे प्रयत्न व या सर्व गोष्टींना वाव करुन देणारे इंग्रज सरकार नष्ट झाल्याशिवाय आपला धर्म, संस्कृती, परंपरा, सुरक्षित राहणार नाहीत अशीच हिंदू पुढाऱ्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांचा असा ग्रह झाला

होता की ब्रिटिश राज्यकर्त्यांची 'फोडा आणि झोडा' नीतीच मुसलमानांच्या या दृष्टीकोनाचे कारण असावी. स्वातंत्र्य चळवळीतील एक अग्रगण्य नेते दे. भ. अच्युतराव पटवर्धन यांनी याची स्पष्ट कबुली देऊन टाकली आहे. ते म्हणतात 'जातीय त्रिकोण' या नावाचे एका छोट्या पुस्तिकेचा मी सहलेखक होतो. 'हिंदु-मुस्लिम वितुष्ट इंग्रजांनी निर्माण केलेले आहे. असे त्या पुस्तिकेत मी प्रतिपादन केलेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २१ वर्षांनी आता जाणवते की तसे काही म्हणता येणार नाही. या वितुष्टाचा त्यांनी फायदा घेतला एवढेच म्हणता येईल' त्या पुस्तिकेत मांडलेले विचार 'विषय अतिसोपा करण्याचा प्रयत्न' होता असे नंतरच्या इतिहासावरुन म्हणावे लागते.[४]

## ४. दुष्टचक्र

हिंदु मुस्लीम संबंधाबाबतचे काँग्रेस पुढाऱ्यांचे विचार म्हणजे एक दुष्टचक्र होते हे कोणी कधी लक्षातच घेतले नाही. कारण या दुष्टचक्राप्रमाणे ब्रिटिश असेपर्यंत हिंदु-मुस्लीम ऐक्य होऊ शकणार नाही व ते ऐक्य झाल्याशिवाय ब्रिटिशांना घालविता येणार नाही. या दुष्टचक्रातून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वेगळाच मार्ग शोधला होता. 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्या विना' अल्पसंख्याकांच्या अनुनयाची गरज तृतीय शक्तिला एकमुखाने तोंड देण्याच्या गरजेतून निर्माण झालेली आहे, याची दखलच त्यांनी घेतली नाही. त्यामुळे इंग्रजांना घालविण्याचा मार्गही त्यांनी कधी स्पष्ट केला नाही. काँग्रेस पुढाऱ्यांना आपली चूक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २१ वर्षांनी तरी कबूल करावीशी वाटली. अल्पसंख्यांकाच्या सहकार्याविना सावरकर स्वातंत्र्य कसे मिळविणार होते ते कोण सांगणार? आता स्वातंत्र्यप्राप्तीचा प्रश्न शिल्लक राहिलेला नाही. पण अल्पसंख्य समाजाच्या सहकार्याचा प्रश्न अद्याप सोडवा-वयाचा आहे. त्यांचे सहकार्य कसे मिळवता येईल. हे कोण सांगणार? फाळणीच्या वेळी काही नेते पाकिस्तान मान्य केले तर हा प्रश्न सुटेल असे आग्रहपूर्वक सांगत होते. प्रत्यक्ष अनुभवाने तोही आशावाद भ्रामक ठरला आहे. तेव्हा दे. भ. अच्युतराव पटवर्धन म्हणतात, तेवढे म्हणून भागणार नाही. पर्यायी विचार मांडला पाहिजे. या देशातील जातीय वैमनस्याचा प्रश्न आहे तरी

काय? तो केव्हा कोठे, कसा निर्माण झाला? त्याच्या सोडवणुकीसाठी कोणी कसे प्रयत्न केले? त्यांतील गृहीत कृत्ये कोणती? नंतरच्या इतिहासाने त्यांचा काय निर्णय केला? आजची स्थिति कशी व कां आहे? या सर्व प्रश्नांची पक्षनिरपेक्ष व अभिनिवेश बाजूला सारुन चर्चा होण्याची गरज आहे. प्रस्तुत विवेचनाचा तोच हेतु आहे. त्याशिवाय भारताच्या एकात्मतेचा, किंवा समर्थ राष्ट्रनिर्मितीचा किंबहुना संरक्षणाचा प्रश्नही सोडविणे कठीण आहे.

## ५. भिन्न दृष्टिकोन[५]

आतापर्यंत चार प्रकारे या प्रश्नाचा विचार झाला आहे तो असा.

### (अ) राम-रहीम दृष्टीकोन

याचे सर्वश्रेष्ठ पुरस्कर्ते महात्मा गांधी होते. त्यांचे मते विश्व बंधुत्व, सहिष्णुता आणि दीनदुबळचांच्या बद्दल करुणा आदि नीतीतत्वे सर्वच धर्माच्या शिकवणुकीचा गाभा होत. म्हणून त्यांचे आचरण करुन हिंदूनी अधिक चांगले हिंदू होण्याचा, मुसलमानांनी अधिक चांगले मुसलमान होण्याचा व ख्रिश्चनांनी अधिक चांगले ख्रिश्चन होण्याचा प्रयत्न करावा. हिंदु-मुस्लीम ऐक्य व अस्पृश्यता निवारण हाच त्यांचा स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग होता. या कार्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम केले व शेवटी हौतात्म्य पत्करले. त्यालाही चाळीस वर्षे होऊन गेली, तरी 'जाती धर्मातीत एक जिनसी समाज' निर्माण करण्याचे त्यांचे ध्येय त्यांच्या काळांत जितके दूर होते, तितकेच आजही दूरच आहे. असे मोठ्या दु:खाने म्हणावे लागते.

### (ब) अर्थवादी भूमिका

सर्व सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न मूलतः आर्थिक स्वरूपाचे असतात. हिंदु मुस्लीम वितुष्टाचा प्रश्नही मूलत: आर्थिकच आहे. या दृष्टीकोनातून तो समजून घेतला तर सोडविता येईल अशी मार्क्सवादी लोकांची भूमिका आहे. १९३० सालापासून पंडित नेहरु याच दृष्टीकोनाचा पुरस्कार करीत होते. आयुष्यभर त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्नही केलेले होते. पण तेही यशाप्रत जाऊं शकले नाहीत. एवढेच नव्हे तर तो प्रश्न उत्तरोत्तर चिघळतच गेला, असे दिसून येते.

### (क) कायदा-सुव्यवस्था टिकविण्याची भूमिका

पोलीस, जिल्हाधिकारी गाफीलपणा किंवा पक्षपात करतात. समाज-विघातक शक्तीवर वेळीच प्रतिबंधात्मक इलाज करीत नाहीत. सरकार किंवा राजकीय नेते पोलिसांना खंबीर पाठिंबा देत नाहीत यासारखी कारणे जातीय दंगलीची सांगण्यात येतात. अलीकडे 'परकीय हात' यामागे असल्याचेही सांगण्यात येते. याउलट मुस्लीम नेते म्हणतात की पोलीसही जातीय भावनांनी पछाडलेले आहेत. निःपक्षपाती वर्तणूक सर्वांना सारखी देत नाहीत. म्हणून संरक्षक दलात मुस्लीमांची योग्य प्रमाणात भरती केली पाहिजे. त्यातूनही दंगा झाल्यास अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात यावे, म्हणजे ते प्रश्न सुटू शकतील. काही भडक डोक्याचे लोक, आपणच शस्त्रात्रे धारण केली पाहिजेत. सरकारी दलांवर विसंबून राहणे धोक्याचे ठरत आहे असेही सुचवितात. प्रश्न सोडविण्याचा मार्ग म्हणून शक्तीचा उपयोग करणे हाच एकपरीने या सर्व मार्गांचा मतितार्थ होय. वेगवेगळ्या 'सेना' किंवा 'संघ' निर्माण करण्यामागे हाच हेतु असावा. राम-रहीम भूमिका व कायदा-सुव्यवस्थेची भूमिका (शस्त्रांच्या उपयोगासह) एकमेकांच्या पूर्ण विरोधी आहे. तरीही आतापर्यंत दोन्ही दृष्टीकोनांनुसार उपाय दोन्ही बाजूकडून आणि शासना-कडूनही होऊन चुकले आहेत. तरीही यशाकडे काही वाटचाल झाल्याचे दिसून येत नाही.

### (ड) मानसशास्त्रीय भूमिका

वरील तिन्ही मार्गाशिवाय मानसशास्त्रीय दृष्टीकोनातूनही या प्रश्नाचा विचार झाला आहे. अल्पसंख्य समाजाची विशेषत: मुस्लीम समाजाची मन:स्थिती जास्तीत जास्त सहानुभूतीने समजून घेण्याची भूमिका यात आहे. स्वतंत्र भारताचे लोकनियुक्त मध्यवर्ती शासन, दरडोई एक मत, या नियमा-प्रमाणे धार्मिक दृष्टीने पाहिल्यास हिंदु शासन होणार असे धार्मिक अल्पसंख्य समाजाला वाटते. आपले धर्म, संस्कृती परंपरा यांना त्यामुळे धोका होण्याचा–निदान वाव न मिळण्याचा–संभव आहे अशी भीति त्यांना वाटणे त्यांची मनोभूमिका लक्षांत घेता सहाजिक मानावे लागते. म्हणून ती भीति कशी

काढून टाकायची हा मुख्य प्रश्न आहे. एकजिनसी, सर्व भेदातीत समाज निर्माण होण्याच्या मार्गात हा मोठा अडथळा आहे. तो दूर करणे हाच १९१६ सालच्या लखनौ करारापासून भारतीय राज्य घटनेतील अनेकविध तरतूदीचा हेतु आहे. स्वतंत्र भारताचे शासन केवळ हिंदूंचे शासन होणार नाही अशी हमी अल्पसंख्य समाजाला देणे जरुर होते. 'धर्मातीत' किंवा धर्म निरपेक्ष शासनाची कल्पना या मानसिक गरजेतून निर्माण झालेली आहे. धर्मातीत शासन सर्व धर्मांना, सर्व अल्पसंख्य गटांना जास्तीत जास्त संरक्षण देईल. धार्मिक स्वातंत्र्य देईल, धार्मिक बाबतीत कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी जीवनांत हस्तक्षेप करणार नाही. धर्माधर्मात पक्षपात करणार नाही कारण ते स्वतः कोणत्याच धर्माचे असणार नाही, असा दिलासा अल्पसंख्य समाजाला देण्याची गरज होती. म्हणून पंडित नेहरू व त्यांचे सहकारी 'धर्मातीत शासनाचा' एकसारखा पुरस्कार करीत होते. अल्पसंख्य समाजामध्ये विश्वास निर्माण करुन त्यांना राष्ट्रीय चळवळीच्या मुख्य प्रवाहांत सामील करुन घेण्याचा हेतु त्यामध्ये होता.

भारतातील सर्व पक्षांचा व पंथाचा या कल्पनेला पाठिंबा मिळालेला आहे, हे निःसंशय स्वागतार्ह आहे. फाळणी झाल्यानंतरही भारतात ८३ टक्के हिंदू, ११ टक्के मुसलमान, अडीच टक्के ख्रिश्चन, २ टक्के शीख व दीड टक्का इतर धर्मीय आहेत. त्या सर्वांना असा दिलासा देण्याची गरज आहे. म्हणून 'धर्मातीत शासन' कल्पना भारतीय राजकरणांत आवश्यक व अपरिहार्य आहे. पण 'धर्मातीत शासनाची' केवळ घोषणा पुरेशी नाही. शिवाय तीही एक 'अभावात्मक' कल्पनाच आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. काय नसावे हे त्यातील निषेध स्पष्ट आहेत. तसे कसे काय असावे किंवा कसे असावे व करावे हे गुळमुळीतच आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे सार्वजनिक जीवनांत स्वतःचा धर्म न आणणे. धर्म किंवा त्याचे आचरण निषिद्ध मानणे नव्हे, धर्मावर बंधन नाही किंवा विरोधही नाही, पण ती आपापल्या वैयक्तिक जीवनापुरती, खाजगी बाब राहील. हा आधुनिक सुसंस्कृत जीवनाचा भाग आहे. अशा आधुनिक सुसंस्कृत जीवन पद्धतीला विचारांचे अधिष्ठान हवे असते. हिंदु, बौद्ध, जैन, मुस्लीम, ख्रिश्चन या धर्मानुयायांच्या आचरणाला

त्यांचे धर्माचे वैचारिक (श्रद्धा स्वरुपात कां होईना) अधिष्ठान असते. तसे धर्मनिरपेक्ष जीवनाला वैचारिक अधिष्ठान दिले पाहिजे. ते अद्याप झालेले नाही. धर्मश्रद्ध लोकांचे आचरणांतून त्यांना मानसिक समाधान मिळते असा त्यांचा दावा असतो. धर्मातीत आचरण करणाऱ्या सुसंस्कृत लोकांसाठी असे – ' मानसिक स्वास्थ्य मिळावे असे वाटत असेल तर हे केले पाहिजे. आपल्या देशात धर्मातीत आचरणाचा पुरस्कार करणारे नेते हाताच्या बोटावर मोजण्या-इतकेही झाले नाहीत याच्या कारणांचा विचार या संदर्भात अवश्य केला पाहिजे.'

**सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।।**
**परंतु तेथे विचारांचे । अधिष्ठान पाहिजे ।।**

---

संदर्भ : १. पंडित नेहरुंचे भाषण – हिंदू – १७-७-१९५१ – पृ. क ४.
२. पंडित नेहरुंचे भाषण – हिंदू – १५-४-१९५० – पृ. क. ७.
३. मे. पुं. रेगे लेख – नवभारत – डिसेंबर १९८५ – पृ. क. १६१.
4. What ails our Muslims? A. B. Shaha. Page 8-9.

# २

# धर्मनिरपेक्षता म्हणजे काय ?

## १. बेचाळीसावी घटनादुरुस्ती

भारताचे शासन इहवादी (Secular) किंवा धर्मनिरपेक्ष आहे की नाही यासंबंधी बरीच उलटसुलट चर्चा झालेली आहे व अद्यापही होत आहे. १९७६ मध्ये बेचाळीसावी घटनादुरुस्ती होईपर्यंत आपल्या घटनेत आमचे शासन इहवादी (Secular) आहे, असे कोठेही म्हटलेले नव्हते. घटना समितीचे कामकाज चालू असताना, अशी सूचना आलेली असतांनाही ती फेटाळण्यात आली. त्यामुळे तर या शंकेला बळकटीच आली, तरीही घटनेचे एकंदर स्वरूप पाहता तसा अर्थ मात्र निश्चितच होता असे अनेक पंडितांचे मत आहे.[1]

कांहीही असले तरी १९७६ मध्ये घटनादुरुस्ती झाली व घटनेच्या प्रस्तावनेमध्ये 'समाजवादी' व 'इहवादी' (Secular) असे दोन्ही शब्द घालण्यात आले. त्यानंतर तरी या शंका नाहीशा व्हायला हव्यात. कारण घटनादुरुस्तीनंतर भारत 'स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक समाजवादी इहवादी (Secular) गणराज्य' असल्याचे स्पष्टपणे जाहीर झाले आहे. पण ज्या

प्रकारे हे घडून आले, त्यामुळे शंकानिरसन होण्याऐवजी अधिकच बळकट झाली, असे म्हणण्याला हरकत नाही.

कारण (१) बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीप्रमाणे घटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी' व 'इहवादी' हे शब्द समाविष्ट झाले हे खरे, पण घटनेमध्ये त्या शब्दांचा अर्थच दिला नाही. नेहमीची प्रथा अशी असते की कायद्यामध्ये वापरलेल्या शब्दांचे अर्थ 'व्याख्या' या सदरामध्ये देण्यात येतात. आमच्या घटनेमध्येही कलम १२, ३६, १५२, १९९ व ३६६ यांमध्ये अनेक शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. पण या दोन शब्दांचे अर्थ मात्र दिलेले नाहीत असे का व्हावे ?

(२) १९७८ मध्ये जनतापक्षीय सरकारने पंचेचाळीसावी घटनादुरुस्ती विधेयक आणले त्यामध्ये ती उणीव दुरुस्त करण्याचा प्रयत्न झाला. 'समाजवाद' म्हणजे 'पिळवणूकरहित समाज' व 'इहवाद' (Secular) याचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' (Equal respect for all religions) असे दोन्ही शब्दांचे अर्थ विधेयकात देण्यात आले. पण विधेयक पास होतांना दोन्ही व्याख्या अखेरीस गाळण्यात आल्या ! कारण लोकसभेत विधेयक आणणाऱ्या जनता पक्षाचे जरुर तेवढे बहुमत असल्यामुळे हे विधेयक पास झाले. पण राज्यसभेत जनता पक्षाचे आवश्यक तेवढे बहुमत नव्हते. त्यामुळे त्याला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा मागावा लागला. तो मिळाला व विधेयक संमत झाले. पण विधेयकांत दिलेल्या दोन्ही शब्दांच्या व्याख्या मात्र गाळण्यात आल्या !

हे काय गूढ आहे ? गूढच आहे की त्यामागे काही हेतू आहे ? शक्यता अशी वाटते की घटनाकारामध्येच या शब्दांच्या निश्चित अर्थासंबंधी मतभेद असावेत. त्यामुळे घटनासमितीमध्ये व घटनादुरुस्तीचे वेळीही लोकसभेत या शब्दांचे निश्चित अर्थ देता आले नसावेत. त्यानंतरच्या काळांत मात्र इहवाद किंवा धर्मनिरपेक्षता याचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' असा रूढ झाला आहे. बहुतेक सर्व पक्षांनी तो स्वीकारला असल्याचे दिसते. दुसरी शक्यता अशी दिसते की इहवाद किंवा सिक्युलॅरिझम याचा जो अर्थ पाश्चात्याकडून आपणांकडे आला आहे, तो व आपण भारतीय लोक जो त्याचा अर्थ करतो तो, यांत फरक असावा. यासाठी आपणांस दोन्ही अर्थ समजून घ्यावे लागतील. त्यांची समीक्षा करावी लागेल. त्याशिवाय हे गूढ उकलणार नाही.

## २. इहवादाच्या व्याख्या

(अ) 'अदभुतावरील श्रद्धेचा ऱ्हास' या आपल्या निबंधात सर विल्यम लेकी म्हणतात, 'सृष्टीरचना किंवा निसर्गातील विविध घटना यांच्या कार्य-कारणभावासंबंधी लोकांत अज्ञान असेपर्यंतच मानवी जीवनाच्या सर्व अंगावर धर्माची अधिसत्ता चालते. पण जेव्हां प्रत्यक्ष अवलोकन, प्रयोग, इतिहास, विज्ञान यांच्या प्रभावाने हे अज्ञान कमी कमी होत जाते तेव्हा दैवी शक्ती-वरील श्रद्धा ढासळत जाते, तेव्हा धर्माचा लोकमतावरील प्रभाव कमी कमी होत जातो. म्हणून **प्रायोगिक ज्ञानाचा उपयोग करून सर्व प्रश्नांचा निर्णय करणे हा इहवादाचा** (Secularism) **गाभा होय.**'

(ब) श्री. एम. सी. सेटलवाड हे प्रख्यात कायदेपंडित होते. 'इंडिया ॲज अ सिक्यूलर स्टेट' या आपल्या छोटयाशा पुस्तिकेत ते म्हणतात. आपल्या **जीवनांतील सर्व बाबींचा विचार व व्यवहार केवळ ऐहिक विचारांनी करणे धर्माचा अगर त्याच्या श्रद्धांचा किंवा रुढींचा विचार त्यांत येऊ न देणे आणि अध्यात्मिक प्रगतीच्या बाबीपुरतेच धर्माचे क्षेत्र मर्यादित ठेवणे याचेच नांव इहवाद** (Secularism) **असे आहे.**

(क) मात्र डॉ. राधाकृष्णन म्हणतात 'भारत स्वतःला धर्मनिरपेक्ष राज्य म्हणवते, याचा अर्थ असा नाही की अदृश्य दैवी शक्तीचे अस्तित्व आपण नाकारतो. किंवा धर्माचे जीवनांत स्थान आहे ते नाकारतो. किंवा धर्मबाह्य गोष्टींना उत्तेजन देतो. **भारतीय परंपरेत देवावरील श्रद्धा हे जीवनाचे एक मूलभूत तत्व मानले गेले आहे. तथापि भारतीय राज्य कोणत्याही एका धर्माच्या लोकांचे म्हणून राहणार नाही. कोणत्याही एका धर्माला आम्ही अग्रता देणार नाही. किंवा धर्माधर्मामध्ये आपपरभाव दाखवणार नाही.** हा धार्मिक निःपक्षपातीपणा, सर्वसमावेशक दृष्टी व सहिष्णु वृत्ती आपणांस मदत करील. धार्मिक कारणासाठी म्हणून कोणाही व्यक्तीला निराळी किंवा कमीपणाची वागणूक मिळू नये. एकंदर समाजजीवनांत जास्तीत जास्त भाग घेण्याचे स्वातंत्र्य सर्वांनाच मिळाले पाहिजे. धर्माचे अधिकार व राज्यांचे अधिकार

वेगळे करण्यामागे हेच तत्व आहे. भारतीय राज्याचा सर्वधर्मसमभाव अगर निधार्मिकता म्हणजे नास्तिकता नव्हे. **सिक्युलॅरिझम शब्दाची व्याख्या भारतीय प्राचीन धार्मिक परंपरेनुसार करण्यात आली आहे.**'[२]

(ड) शब्दकोषांमध्ये 'सिक्युलॅरिझम' या शब्दाचे तीन अर्थ दिलेले आहेत (१) **ऐहिक किंवा लौकिक बाबींचा विचार'** (२) नीतिमत्तेचा पाया धर्मातीत असावा असे मत (३) शासकीय शाळामधून धार्मिक शिक्षण देण्यात येऊ नये असे मत. यापैकी पहिला अर्थ अधिक व्यापक, समर्पक व मूलभूत स्वरूपाचा आहे. अन्य दोन्ही अर्थ त्यांतून निष्पन्न होणारे आहेत. उदाहरणार्थ धर्मशास्त्रानुसार मानवी जीवनाच्या दोन कक्षा मानण्यात येतात. इहलोक व परलोक. जन्माला आलेला प्रत्येक मनुष्य मरणाधीन आहे. म्हणून मरणोत्तर जीवनाबद्दल माणसाला अनादिकालापासून मोठे कुतूहल व जिज्ञासा वाटत आली आहे. ज्याच्या त्याच्या कर्मानुसार जीव मरणोत्तर स्वर्गात अगर नरकांत जातो अशी समजूत आहे. स्वर्ग अगर नर्क दोन्ही परलोकच. अन्य कांही लोक मरणोत्तर जीवन मानीत नाहीत. **पुनर्जन्म, स्वर्ग, नर्क सबझूट आहे. इहलोकीचे जीवनच खरे व अंतिम,** असे मानतात. **इहवादाचा हा एक प्रकार होय.**

दुसरे काही लोक जीवाचे मरणोत्तर अस्तित्व मानतात. म्हणजेच परलोक मानतात. पारलौकिक जीवन, पुनर्जन्म मानतात. त्यांचे दृष्टीने जीवनाच्या दोन कक्षा झाल्या. ऐहिक जीवन आणि पारलौकिक जीवन. अर्थातच इहलोकांतील जीवनाचे प्रश्न वेगळे, पारलौकिक जीवनाचे प्रश्न वेगळे, हे ओघानेच आले. दोनही जीवनाची कार्यक्षेत्रे वेगळी. म्हणून तेथील कायदेही वेगळे. लौकिक जीवनाचे प्रश्न शासनाने व पारलौकिक जीवनाचे प्रश्न धर्माने सोडवावे, अशी अपेक्षा असते. **धर्माचे क्षेत्रांत शासनाने व शासनाचे क्षेत्रांत धर्माने हस्तक्षेप करु नये. ही कार्यक्षेत्रांची सरळ सरळ विभागणी आहे.** इहवाद तो हाच. **इहवादामधील हीच मध्यवर्ती कल्पना असते.** 'सिझरचा भाग सीझरला द्या, व देवाचा भाग देवाला द्या'. येशू ख्रिस्ताच्या या वचनाचा हाच अर्थ आहे. **इहवादाचा हा दुसरा प्रकार होय.**[३]

## ३. इहवादांमधील मुख्य कल्पना

मानवाच्या लौकिक जीवनांत समाज, धर्म, शासन अशा अनेक संस्थांचा संबंध येतो. कारण मनुष्य स्वभावतःच कळप म्हणजे समाज करून राहणारा प्राणी आहे. तेव्हा व्यक्ती आणि समाज, व्यक्ती आणि धर्म आणि व्यक्ती आणि शासन यांचे परस्परांशी संबंध कसे असावेत या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार होणे आवश्यक ठरते. सुसंघटित समाज हेच शासनाचे स्वरूप असल्यामुळे व्यक्ती, शासन आणि धर्म यांचे परस्परसंबंध निश्चित करणे हाच इहवादांतील मुख्य विषय ठरतो. श्री. डी. ई. स्मिथ यांनी हीच कल्पना स्पष्ट करणेसाठी India as a secular state या आपल्या ग्रंथात त्रिकोणाचे उदाहरण दिले आहे.[४] – त्रिकोणाच्या खालच्या बाजूचे दोन कोन म्हणजे धर्म व शासन आणि वरचा कोन म्हणजे व्यक्ती असे समजल्यास हे त्रिविध संबंध स्पष्ट होऊ शकतील.

### (अ) व्यक्ती आणि शासन यांचे संबंध– समान नागरिकत्व

कोणतीही व्यक्ती शासनाची नागरिक असते. ती कोणत्याही धर्माची असली तरी, तिचे हक्क, कर्तव्ये समान असतील. अर्थात लोकशाही शासनामध्येच ही स्थिती असू शकते. हुकूमशाही शासनांमध्ये अगर धर्मराज्यांमध्ये व्यक्तीच्या नागरिकत्वाचा किंवा तिच्या हक्कांचा प्रश्नच नसतो. तेथे ती व्यक्ती कोणत्या पक्षाची, अगर धर्माची अगर जातीची हाच विचार मुख्यतः केला जातो. शासन ज्या धर्माचे किंवा पक्षाचे असेल, त्या पक्षाची अगर धर्माची व्यक्ती असेल तरच तिला कांही हक्क असूं शकतात. तसे नसेल तर त्या व्यक्तीला 'दुय्यम नागरिक' किंवा 'परकीय' मानले जाते. नागरिकामध्ये असा पक्षपात करणे इहवादाच्या कल्पनेमध्ये बसूं शकत नाही. नागरिकांची जात धर्म, लिंग यांचा विचार न करता सर्वांना सारखेच हक्क व कर्तव्य असणे हेच इहवादाला अभिप्रेत आहे. 'समान नागरिकत्व' या नांवाने हा विचार ओळखला जातो.

(ब) व्यक्ती आणि धर्म यांचे संबंध– धार्मिक स्वातंत्र्य

संघटित प्रस्थापित धर्म (उदा., हिंदू धर्म, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध) या अर्थाने धर्म शब्द याठिकाणी वापरला आहे. धार्मिक श्रद्धा अगर कल्पना किंवा अध्यात्म हा अर्थ येथे अभिप्रेत नाही. वेगवेगळ्या धर्मांचे गुणावगुण व इष्टानिष्टता यासंबंधी स्वतःशी किंवा इतर व्यक्तींशी चर्चा, विचार विनिमय करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीचे मान्य करणे, त्यांत शासनाने कसल्याही तऱ्हेची ढवळाढवळ किंवा हस्तक्षेप न करणे असा या तत्त्वाचा अर्थ आहे. नागरिकाला मान्य असलेल्या धर्माप्रमाणे, पूजाविधी, प्रार्थना किंवा अन्य विधी करण्याचा किंवा न करण्याचाही त्याचा अधिकार यांतच समाविष्ट आहे. नागरिकांनी अमुक धर्मच मान्य केला पाहिजे. असे नागरिकांना सांगण्याची अगर त्या धर्माच्या कामासाठी नागरिकांवर कर बसविणेचा किंवा कसलीही अन्य सक्ती करण्याचा अधिकार शासनाला नाही. असाही या अधिकाराचा अर्थ होतो. अर्थातच सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता किंवा नीति यांची बंधने अपरिहार्यच असतात. म्हणूनच नरबळी, सतीची चाल, किंवा अस्पृश्यता यांना प्रतिबंध करणारे कायदे शासनाला करता आले.

हा सर्व विचार व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्याचा झाला, याला सामूहिक बाजूही आहे. दोन अगर अधिक व्यक्तींनी एकत्र येऊन धार्मिक कारणाने संस्था स्थापन करण्याचा हक्क यांत येतो. अशा रीतीने संघटित होण्याचा, आपापले धार्मिक व्यवहार करण्याचा, त्यासाठी मालमत्ता संपादण्याचा, तसेच शैक्षणिक अगर धर्मादाय कारणांसाठी संस्था चालविण्याचा अधिकारही यांत समाविष्ट होतो.

(क) धर्म आणि शासन यांचे संबंध– पूर्ण फारकत

माणसाचे लौकिक जीवन हे शासनाचे कार्यक्षेत्र तर त्याचे पारलौकिक जीवन हे धर्माचे कार्यक्षेत्र, ही दोन्ही परस्परभिन्न, त्यामुळे त्यांचे कायदेही भिन्न, दोन्ही कार्यक्षेत्रांत एकच कायदा असू नये म्हणून धर्माच्या क्षेत्रांत शासनाने व शासनाचे क्षेत्रांत धर्माने हस्तक्षेप करु नये. कार्यक्षेत्राची अशी पूर्ण फारकत असावी हा यामागील मुख्य विचार आहे. त्यामुळे इतिहासकाळांत शासनाचा अधिकृत धर्म असणे, शासनाच्या अनेक खात्याप्रमाणे धर्मविषयक

बाबीचे एक स्वतंत्र खाते असणे, शासन प्रमुख अमुक धर्माचाच असणे, शासनामार्फत धर्मगुरुंची किंवा धर्माधिकाऱ्यांची नेमणूक होणे व त्यांना शासकीय निधीतून पगार वगैरे देणे, अशा ज्या प्रथा होत्या, त्या नष्ट करणे आधुनिक काळात अपरिहार्य ठरते. इहवादी (Secular) शासनामध्ये धर्म शासनाहून अलिप्त राहणे, त्याचा दर्जा शासनाहून कनिष्ठ राहणे साहजिकच आहे. शासनाचे सर्वसाधारण कायदे, ज्याप्रमाणे इतर स्वायत्त संस्थांना लागू असतात, त्याचप्रमाणे धार्मिक संस्थांनाही लागू राहतील. सार्वजनिक नीतिनियम पाळणे, कर देणे, वगैरे नागरिकांच्या जबाबदाऱ्या त्यांनाही पार पाडाव्या लागतील, सामाजिक, सांस्कृतिक किंवा आर्थिक हितसंबंधांच्या इतर स्वायत्त संस्थांप्रमाणेच धार्मिक संस्थांचे स्थान राहील. एकमेकांशी कसलाही संघर्ष किंवा हस्तक्षेप न होता धर्म आणि शासन या दोन्ही संस्था एकंदर समाजहिताच्या दृष्टीने आपापल्या क्षेत्रांत कार्यरत राहू शकतील.

इहवादाची व्याख्या करतांना या तिन्ही परस्परसंबंधित बाजूचा विचार महत्त्वाचा आहे. नागरिकांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य, समान नागरिकत्व आणि धर्म व शासन यांच्या कार्यक्षेत्रांची पूर्ण फारकत ज्या समाजात असते, तोच इहवादी किंवा धर्मनिरपेक्ष समाज होय. या तीन बाजूपैकी कोणत्याही एका बाजूवर भर देऊन केलेली इहवादाची व्याख्या एकांगी व अपूर्ण ठरेल. अर्थातच ही व्याख्या आदर्श स्वरुपाची आहे. कोणत्याही देशांत असे आदर्श इहवादी शासन अस्तित्वात नाही. अमेरिकन संयुक्त संस्थाने त्यांतल्या त्यांत या व्याख्येतील आदर्शाशी सर्वात अधिक जवळीक साधू शकतील. इंग्लंडचे शासन बहुतांशाने इहवादी मानले जात असले तरी तेथेही शासकीय चर्च आहेच. त्याला 'अधिकृत चर्च' अशी मान्यताही आहे. तथापि तेथे 'राजा' असल्यामुळे जसे त्यांच्या लोकशाहीला काही उणेपणा येत नाही, तसेच 'अधिकृत चर्च' असल्यामुळे तेथील शासनाच्या व समाजाच्या इहवादाला कसलीही उणीव येत नाही. कारण धार्मिक स्वातंत्र्य, आधुनिकता व उदारमतवाद यांच्या परंपरा तेथील समाजांत प्रभावी आहेत. आशिया खंडात याच्या नेमकी उलट स्थिती आहे. म्हणून येथील इहवादाचा विचार करतांना तीनही बाजूंना सारखेच महत्त्व दिले पाहिजे.

(ड) **इतर समाजसंस्था व धर्म यांचे संबंध– पूर्ण फारकत**

कार्यक्षेत्रांची फारकत केवळ धर्म व शासन यांच्यापुरतीच मर्यादित नाही. इतर समाजसंस्थाही धर्मापासून स्वतंत्रच असाव्यात असेही इहवादाला अभिप्रेत आहे. जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन या ग्रंथात पंडित नेहरु म्हणतात.[५] 'हिंदु व मुस्लिम व इतर धर्म आपापल्या अनुयायांना धार्मिक शिकवणूक तर देतातच पण शिवाय विवाह वारसा हक्क, सामाजिक व गुन्ह्यासंबंधी कायदे, राज्यव्यवस्था नीति आदि अनेक सामाजिक व राजकीय व्यवहाराबाबतही काटेकोर नियम घालून देतात. मानवाच्या संपूर्ण जीवनाचे व सामाजिक व्यवहाराचे नियमन व नियंत्रण त्यामुळे होते, म्हणून ते सर्वंकष स्वरुपाचे धर्म होत. अशा नियंत्रणाला चिरस्थायी स्वरुप देण्यासाठी धार्मिक अधिष्ठान निर्माण करून देण्यांत येते. याबाबतीत हिंदुधर्म त्यांतील जातीसंस्थेमुळे अधिकच आक्रमक ठरतो.' विवाहसंस्था, वारसाहक्क, घटस्फोट, दत्तक, अज्ञानपालन, संयुक्त कुटुंबसंस्था, स्त्रीधन, पोटगी इत्यादी सर्व सामाजिक व्यवहार धर्माच्या नियंत्रणापासून स्वतंत्र असावेत. ते मानवाच्या लौकिक जीवनातील प्रश्न असल्यामुळे शासनाचे कार्यक्षेत्र आहे. धर्माचे कार्यक्षेत्र फक्त पारलौकिक बाबीपुरतेच मर्यादित असावे हा इहवादाचा अर्थ आहे.

पण धर्माचे क्षेत्र पारलौकिक बाबीपुरते मर्यादित ठेवणे कोणत्याच धर्माला मान्य नाही. तसेच ऐहिक व पारलौकिक अशी मानवी जीवनाची काटेकोर व अंतिम विभागणीही कोणताच धर्म मान्य करीत नाही. 'इहलोकी व परलोकी मानवाचे कल्याण साधतो तो धर्म' अशी धर्माची भूमिका आहे. म्हणून तर त्यांना सर्वंकष धर्म म्हणण्यात येते. मानवी जीवनाच्या सर्व अंगांना तो मार्गदर्शन करीत असतो. सगळ्या समाज जीवनाला व व्यक्तीगत आचरणाला धर्माची मान्यता लागते. म्हणून परलोकाच्या नावे चालणारा इहलोकीचा सर्व व्यवहार ही धर्माने आपली कक्षा मानली आहे.

मृत्यूमुळे देह-बंधनातून जीव मुक्त होतो. पण इहलोकी त्याने केलेल्या बऱ्यावाईट कृतीच्या पापपुण्यांतून तो मुक्त होत नाही. मृत्यूनंतर जीवाला जे फळ मिळावयाचे, ते त्याने इहलोकी केलेल्या कर्मानुसार असते. म्हणून

इहलोकांत पापपुण्य, कर्तव्याकर्तव्य कोणते ते धर्म सांगत असतो. पण धर्म ही पारलौकिक बाब आहे. असे इहवाद सांगतो. त्यावेळी त्याचा खरा अर्थ समाजधारणेची मूल्ये देण्याचा अधिकार धर्माचा नाही, असा आहे. उदाहरणार्थ व्यभिचारी पती सहन करावा की सोडावा, देशद्रोह करणारा पती ठार करावा की करू नये, एकदा संन्यास घेतलेल्या ब्राम्हणास पुन्हा गृहस्थाश्रमांत घ्यावे की घेऊ नये, किंवा घेतला व त्याला मुलेबाळे झाली, तर त्यांना ब्राह्मण मानून त्यांचा उपनयन संस्कार करावा की करु नये, तसेच शूद्र कुलांत जन्म घेतलेल्या सत्प्रवृत्त माणसास इतरांना धर्मोपदेश करण्याचा अधिकार आहे किंवा नाही, स्त्री-पुरुष एकाच देवाची लेकरे असतांना त्यांच्यात उच्च-नीचता मानावी की मानू नये, पुरुष स्वर्गाचा अधिकारी व स्त्री पापयोनी कशी हे सर्व प्रश्न सामाजिक स्वरुपाचे म्हणजेच शासनाच्या कार्यक्षेत्रांतील आहेत. पण त्यासंबंधी निर्णय आतापर्यंत धर्माने किंवा त्याच्या अंध परंपरांनी केलेले आहेत. धर्म जर पारलौकिक ठरविण्यांत आला तर या प्रश्नासंबंधी निर्णय करण्याचा अधिकार त्याला उरणार नाही. आणि तसा अधिकार त्याला उरला नाही, तर मानवी जीवनांत त्याला कसलेच स्थान राहणार नाही. म्हणूनच समाजजीवनाच्या कक्षेतून धर्म बाजूला सारणे आणि केवळ पारलौकिक बाबीपुरता तो मर्यादित करणे हाच इहवादाचा अंतिम मतितार्थ आहे.[६]

---

संदर्भ : १. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे – इहवादी शासन – पृ. क्र. ६.
२. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् – योजना मासिक – पृ. क्र. १३.
३. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे – इहवादी शासन – प्रस्तावना पृ. क्र. ५.
४. श्री. डी. ई. स्मिथ – India as a secular state. प्रकरण १ ले.
५. पंडित नेहरू – जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन – पृ. क्र. ७३६.
६. नरहर कुरुंदकर – जागर – पा. नं. १७५ – ८५.

# ३

# राज्यघटना आणि इहवाद

स्वतंत्र सार्वभौम लोकसत्ताक भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० पासून अमलांत आली, ती इहवादी असल्याचा सार्वत्रिक समज आहे म्हणून तिची प्रथम माहिती करून घेतली पाहिजे. त्यावरून ती इहवादी आहे किंवा कसे, असल्यास किती प्रमाणात ते आपणास ठरविता येईल.

## १. भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये

### कायद्याच्या राज्याची संकल्पना

ब्रिटिश न्यायशास्त्राप्रमाणे शासनाच्या कार्यकारणीचा कोणीही सदस्य ब्रिटिश प्रजाजनांच्या मालमत्तेत अगर स्वातंत्र्यात हस्तक्षेप करू शकत नाही. त्याने तसा प्रयत्न केल्यास त्याच्या कृतीचा कायदेशीरपणा न्यायकोर्टापुढे त्याला शाबीत करावा लागतो. अशा बाबींचा निर्णय त्या कार्यकारणीच्या सदस्यांसमक्ष करण्यास ब्रिटिश न्यायाधीश कचरत नाहीत अशी ब्रिटिश परंपरा आहे.[१]

कायद्याच्या राज्याची संकल्पना हा ब्रिटिश राज्याचा वारसा आपल्या राज्यघटनेने घेतला आहे. राज्यघटना म्हणजे राज्याचा मूळ कायदा. आपल्या

राज्यघटनेतील दोन कलमामध्ये कायद्याच्या राज्याची ती संकल्पना समाविष्ट करण्यात आली आहे ती अशी.

**कलम – २१** जीवित आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण–कोणाही व्यक्तीचे जीवित अगर व्यक्तीस्वातंत्र्य कायद्याने प्रस्थापित केलेल्या तरतुदीशिवाय हिरावून घेता येणार नाही.

**कलम – ३१** (१) कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता कायदेशीर तरतुदीशिवाय हिरावून घेता येणार नाही. कायद्याच्या राज्याची संकल्पना लोकशाही राज्य पद्धतीचा पाया आहे.

**नागरिकत्वाचे मूलभूत हक्क**

व्यक्तीच्या मूलभूत हक्कासंबंधी एक स्वतंत्र प्रकरण आपल्या राज्यघटने-मध्ये आहे. त्यात नमूद केलेल्या मूलभूत हक्काची वर्गवारी अशी करता येईल. (अ) समताविषयक हक्क; (ब) स्वातंत्र्यविषयक हक्क; (१) पिळवणुकी-पासून स्वातंत्र्यविषयक हक्क; (२) धार्मिक स्वातंत्र्यविषयक हक्क; (क) शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क; (ड) वरीलपैकी कोणताही हक्क बजावणेसाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणे संबंधी हक्क. पैकी अ व ब चाच विचार या ठिकाणी आपणांस कर्तव्य आहे.

**(अ) समताविषयक हक्क**[२]

समतेसंबंधी जे मूलभूत हक्क आहेत, त्यापैकी सर्वात व्यापक अशा हक्कांचा समावेश राज्यघटनेच्या १४ व्या कलमामध्ये करण्यात आला आहे. ते म्हणते 'कायद्यापुढील समता व कायद्याचे समान संरक्षण भारतीय हद्दीत कोणालाही नाकारण्यात येणार नाही.' या कलमाचा अर्थ फार व्यापक आहे. उदाहरणार्थ कायदा सर्वांना सारखाच लागू आहे. कायद्यापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही. तसेच कायद्याने दिलेले नाहीत असे खास हक्क, वतने, मानमरातब कोणाचेही असणार नाहीत. नागरिकांमध्ये कसलाही भेदभाव करता येणार नाही. सर्वांना सारखीच वागणूक मिळेल. कोणाही पदाधिकाऱ्याला अनियंत्रीत

किंवा अवाजवी अधिकार देणे समतेशी सुसंगत ठरणार नाही. कारण एखाद्या पदाधिकाऱ्याला अनियंत्रीत व अवाजवी अधिकार देण्यात आले आणि त्या अधिकाराच्या वापरावर मार्गदर्शक तत्त्वांची बंधने नसतील, तर तो पदाधिकारी त्याला मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करून व्यक्तीव्यक्तीमध्ये भेदभाव निर्माण करू शकेल. समता हे लोकशाही राज्याचे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. सर्व माणसे समान आहेत. हे तत्त्व अमान्य करणारी कोणतीही व्यवस्था 'लोकशाही' म्हणता येणार नाही. प्रत्येक माणसाला सारासार विचार करणेची शक्ति व बरेवाईट समजण्याची नैतिक जाणीव असते या अर्थाने सर्व माणसे समान आहेत. यावरच प्रत्येक 'व्यक्तीची प्रतिष्ठा अवलंबून' असते. याशिवाय अन्य बाबतीत मात्र सर्व माणसे सारखी असू शकत नाहीत. प्रत्येक मनुष्य स्वतंत्र व वैशिष्टचपूर्ण असतो. सर्व माणसे सर्व बाबतीत सारखी असती तर या जगात काही अर्थ राहिला नसता 'निर्जीव एकसारखेपणा' चोहोकडे दिसला असता, माणसांमाणसांमधील असले भेद लोकशाहीला मान्य असतात. म्हणून प्रत्येक माणसाला आपापल्या आवडीनिवडीनुसार जगू देण्यास व आपल्या सुप्त शक्तींचा अमर्याद विकास करण्यास ती वाव देते. एकच विशिष्ट जीवनपद्धती सर्वांवर लादण्याच्या ती विरुद्ध असते. समतेचा अर्थ जर एकसारखेपणा असा केला तर स्वातंत्र्य नष्ट होईल. स्वातंत्र्य आणि समता एकत्र नांदू शकणार नाहीत. समतेच्या विचारामध्ये दोन गोष्टी अंतर्भूत असतात. एक म्हणजे प्रत्येक मनुष्य स्वतंत्र विचार करू शकतो व निर्णय घेऊ शकतो. दुसरे म्हणजे उपजतच 'नैतिक जाणीव' असल्यामुळे त्याचे निर्णय अपस्वार्थी म्हणजे अन्य व्यक्तीच्या हिताहितासंबंधी बेफिकीर अथवा उदासीन किंवा हानिकारक असू शकत नाहीत. तरीही एखादा हितविरोध किंवा कलह निर्माण झालाच, तर सारासार विचाराने तो कलह मिटवला जाईल, अशी मूलभूत श्रद्धा असते. लोकशाही समाजात सर्वांना समान संधी असते. ती यासाठीच. कारण त्याशिवाय व्यक्तीच्या सुप्तशक्तीचा विकास होऊच शकणार नाही. समताविषयक हक्कांच्या यादीमध्ये याशिवाय जे इतर हक्क आहेत ते या एकंदर विचार-सरणीच्या अनुषंगानेच आलेले असतात. म्हणून त्याचा मुद्दाम उल्लेख करण्याचे कारण नाही.

चौदाव्या कलमाचा एवढा विचार केल्यानंतर कलम १५ ते १८ पाहू.

**कलम – १५** धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थळ यावरून नागरिकामध्ये भेद करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**कलम – १६** शासकीय कार्यालयामधील किंवा त्यासारख्या अन्य नोकऱ्या, नेमणुका बाबत सर्वांना समान संधी देण्यात येईल. धर्म, जात, लिंग, जन्मस्थळ किंवा वास्तव्य वगैरे कारणांनी नागरिकामध्ये भेद, करता येणार नाही.

**कलम – १७** अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविण्यात आला असून सर्व प्रकारची अस्पृश्यता नष्ट करण्यात आल्याचे जाहीर केले आहे.

**कलम – १८** शैक्षणिक व लष्करी पात्रतेच्या पदव्या व्यतिरिक्त अन्य प्रकारच्या पदव्या देणे गैर मानण्यात आले आहे.

**(ब) स्वातंत्र्यविषयक हक्क**[३]

समतेसंबंधीच्या मूलभूत हक्कांचा विचार केल्यानंतर स्वातंत्र्यासंबंधीच्या हक्कांचा विचार करू. कायद्याच्या राज्याच्या संकल्पनेबद्दल विचार करताना स्वातंत्र्याविषयक हक्कांपैकी एका महत्त्वाच्या हक्काचा उल्लेख मागे केलाच आहे. उदाहरणार्थ, कोणाही व्यक्तीचे जीवित, व्यक्तीस्वातंत्र्य अगर मालमत्ता कायदेशीर तरतुदीशिवाय हिरावून घेतली जाणार नाही. (कलम २१ व ३१) हाच तो हक्क होय. तसेच कलम २२ (१) व २२ (२) प्रमाणे अटक झालेल्या कोणाही व्यक्तीला त्याच्या अटकेची कारणे सांगितल्याशिवाय तुरुंगात डांबून ठेवता येणार नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या इच्छेनुसार वकीलाकडून सल्लामसलत घेण्यास व संरक्षण करण्यास नकार दिला जाणार नाही. शिवाय अटक केल्यापासून चोवीस तासांच्या आत त्याला नजीकच्या न्यायाधिशापुढे हजर करण्यांत येईल. न्यायाधीशाच्या परवानगीशिवाय यापेक्षा अधिक काळ त्याला डांबून ठेवले जाणार नाही. कलम वीस व बावीस अशाच स्वरूपाचे संरक्षण देणारी आहेत.

कलम १९ – या कलमाप्रमाणे सात प्रकारची स्वातंत्र्ये प्रत्येक नागरिकाला असतील. ( १ ) भाषण व मुद्रण स्वातंत्र्य, (२) शस्त्राविना शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, ( ३ ) संघटना स्वातंत्र्य, (४) संपूर्ण भारतात संचार करण्याचे स्वातंत्र्य, (५) भारतात कोठेही राहण्याचे स्वातंत्र्य, ( ६ ) मालमत्ता धारण करण्याचे अगर त्याची विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य, ( ७ ) व्यवसाय स्वातंत्र्य. लोकशाही व्यवस्थेमध्ये भाषण आणि मुद्रण स्वातंत्र्य सर्वात महत्त्वाचे आहे.

### (क) न्यायालयीन समीक्षेची तरतूद

याशिवाय न्यायालयीन समीक्षेची तरतूद हे तिसरे वैशिष्टच भारतीय राज्यघटनेचे आहे. त्यामुळे शासनाच्या अधीसत्तेपासून व्यक्तिच्या स्वातंत्र्याचे रक्षण होण्यास मदत होते.

आपण इहवादाच्या मुख्य कल्पना, मागील प्रकरणात पाहिलेल्या आहेत, व आतां आपल्या राज्यघटनेच्या तरतूदीचीही माहिती करुन घेतली आहे. तेव्हा त्या एकमेकांशी कितपत सुसंगत आहेत याचा विचार करू. त्यावरून आपली घटना इहवादाला कितपत सुसंगत आहे याचा निर्णय करता येईल.

## २. इहवाद

इहवादाचा विचार करताना मागील प्रकरणात उल्लेख केलेल्या, त्याच्या तीनही बाजूचा विचार केला पाहिजे.

### (अ) समान नागरिकत्व

भारतीय घटनेचे सुरवातीचे शब्द 'आम्ही भारतीय लोक' असे आहेत. त्यात सर्व भारतीय आले. हिंदु, मुस्लीम, ख्रिस्ती, पारसी, शीख, बौद्ध, जैन आणि इतर सर्व स्त्री पुरुष जे भारतीय भूभागावर राहतात, ते सर्व आम्ही भारतीय या शब्दात आहे. ९ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजी आपल्या

इतिहासप्रसिद्ध भाषणात म्हणाले 'हिंदुस्थान हा इथे जन्मलेल्या आणि वाढलेल्या, ज्यांना दुसरा देश नाही, अशा सर्वांसाठी आहे. म्हणून तो जितका हिंदूचा तितकाच पारसी, ख्रिस्ती, मुस्लीम आणि इतर अहिंदूचा आहे. स्वतंत्र भारत हे हिंदूराज्य नसेल. भारतीय राज्य असेल. ते कुठलाही धर्म, पंथ वा समाजाच्या मताधिक्यावर चालणार नाही. धर्माचा भेदभाव न करता संपूर्ण जनतेचे प्रतिनिधीत्व त्यात असेल.' 'आजचा व उद्याचा भारत' यात नेहरूंनी याच मुद्यावर भर दिला आहे. 'जे लोक इथे राहतात, मग त्यांचा धर्म कोणताही असो, त्या सर्वांचे घर म्हणजे भारत आहे. त्या सर्वांना समान अधिकार असून त्या सर्वांवर समान जबाबदारी आहे. आधुनिक बहुधर्मीय समाजात प्रत्येक व्यक्तीच्या श्रद्धेला आणि आचाराला संपूर्ण स्वातंत्र्य राहील.'[४]

कलम १४ ते १८ याचा बारकाईने अभ्यास केल्यास आपणास कळून येईल की भारतीय नागरिकत्व हे समतेच्या तत्त्वावर आधारलेले आहे. अगदी १८९५ पासून तयार करण्यात आलेल्या सर्व घटना-मसुद्यात अशीच तत्वे होती.

**(ब) धार्मिक स्वातंत्र्य**

ज्याचे वेड त्याला गोडच असते. प्रत्येकाला आपल्या समजूती, श्रद्धा योग्य वाटतात, ' जे आपणास ठावे, ते इतरांना सांगावे ' असेही वाटते. धर्मश्रद्धांना हाच नियम लागू आहे. जगातील असंख्य लोकांची कोणत्या ना कोणत्या धर्मावर श्रद्धा असते. प्रत्येक धर्मात पंथोपपंथ अनेक असतात. बौद्ध व जैन धर्म सोडला तर बाकी सर्व धर्मांची दैवी शक्तीवर श्रद्धा आहे. या श्रद्धेच्या बाबतीत शासनाने लक्ष घालू नये. हस्तक्षेपही करू नये. अशी त्यांची अपेक्षा असते. ज्या त्या धर्माच्या अनुयायांना आपल्या धर्माप्रमाणे वागण्यास त्या धर्माचा आचार व प्रचार करण्यास मोकळीक असावी. असा धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ आहे.

आपल्या घटनेच्या २५ (१) कलमाप्रमाणे धर्माचा आचार प्रचार करण्याची प्रत्येकाला पूर्ण मोकळीक दिलेली आहे. त्याचप्रमाणे ज्यांचा कोणत्याही धर्मावर

विश्वास नाही त्यांना त्यांच्या अविश्वासाचा प्रचार करण्यासही मोकळीक आहे. पण सार्वजनिक सुव्यवस्था, आरोग्य व नीती यांच्या आधीन राहून प्रत्येकाने आपापले आचरण करावे. अशी अट घालण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा की आरोग्य, नीती व सार्वजनिक सुव्यवस्था यांना धोका होणार असेल तर शासन यात हस्तक्षेप करू शकते. कारण धर्माच्या नावाखाली राजरोस कत्तली घडून आल्याची अनेक उदाहरणे इतिहासात आढळतात. हिंदूना सार्वजनिक रस्त्यावरून सवाद्य मिरवणूक न्यावीशी वाटते. त्याच वेळी अशा सार्वजनिक रस्त्यानजीकच्या मशिदीत प्रार्थना करीत असलेल्या मुसलमानांना शांतता हवीशी वाटते. अशा हितविरोधातून अनेक प्रसंगी दंगे होतात. अनेक माणसे प्राणांस मुकतात. सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठी अशा वेळी शासनाला यात हस्तक्षेप करावा लागतो.

त्याचप्रमाणे रोगांच्या साथी येतात. त्यावेळी मोठ्या प्रमाणात रोग-प्रतिबंधक औषधे सक्तीने टोचावी लागतात. अशा वेळी धर्माच्या नावाखाली त्यास विरोध झाल्यास शासनाला हस्तक्षेप करणे सार्वजनिक आरोग्याचे हितासाठी आवश्यक ठरते.

सती प्रथाही अशीच धर्माचा भाग असल्याचे पूर्वी सांगण्यात येत असे. पण राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे शासनाला ती प्रथा बंद करावी लागली.

**कलम –** २५ (२) प्रमाणे धार्मिक व्यवहारातील आर्थिक, राजकीय व इतर ऐहिक बाबीचे नियमन करण्यासाठी शासनाला कायदे करता येतील. उदा., सक्तीने खच्चीकरण करण्यास परवानगी देणाऱ्या कायद्यास धार्मिक कारणावरून हरकत घेता येणार नाही. तसेच संतती प्रतिबंधक उपायांना ख्रिश्चन किंवा मुस्लीम धार्मिक कारणांवरून विरोध करू लागले तर या कलमाप्रमाणे शासनाला कायदे करावे लागतील. हिंदू सार्वजनिक धर्ममंदिरे हरिजनांना मुक्त करण्यासाठी या कलमाखाली शासनाला कृति करता येईल.

**कलम** – २६ प्रमाणे प्रत्येक धर्माच्या पंथोपपंथाना धार्मिक किंवा धर्मादायाचे कारणासाठी संस्था स्थापन करण्याचा, धार्मिक बाबी हाताळण्याचा, स्थावर अगर जंगम मालमत्ता धारण करण्याचा व अशा मालमत्तेची व्यवस्था पहाण्याचा व विल्हेवाट करण्याचा हक्क आहे.

**कलम** – २७ प्रमाणे एखाद्या विशिष्ट धर्माच्या हितासाठी किंवा व्यवस्थेसाठी खर्च करावा म्हणून जमा करणेत येणाऱ्या निधीस कर देण्यास कोणाही नागरिकावर सक्ती करता येणार नाही.

**कलम** – २८ प्रमाणे शासकीय निधीतून चालणाऱ्या शिक्षणसंस्थांतून कोणत्याही धर्माचे शिक्षण देण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. मात्र ज्या शिक्षण संस्था एखाद्या धार्मिक संस्थेने काढलेल्या व चालविलेल्या असतील, त्यांना अशा संस्थातून आपल्या धर्माचे शिक्षण मुलामुलींना द्यावेसे वाटलेस, त्यांना या कालान्वये प्रतिबंध केलेला नाही. पण अन्य धर्मियांची मुलेही अशा शाळेतून शिकत असतील तर त्यांचेवर अशा संस्थांना आपल्या धर्माचे शिक्षण घेण्याची सक्ती, त्यांचे पालकांचे संमतीखेरीज करता येणार नाही.

धर्म व भाषा या दोन कारणावरून आपल्या समाजात बहुसंख्य व अल्पसंख्य असे फरक पडले आहेत. अल्पसंख्य समाजाला, मग ती कोणत्याही कारणानी असो, अशी नेहमीच भीती वाटते की बहुसंख्य समाज विधीमंडळातील बहुमताचे जोरावर अथवा शासनातील प्रभुत्वाच्या जोरावर आपल्या धर्मामध्ये किंवा भाषेमध्ये अगर जीवन पद्धतीमध्ये हस्तक्षेप करू शकेल. आपल्या समाजासाठी शाळा किंवा विद्यालये स्थापन करण्यामध्ये किंवा चालविण्यामध्ये अडथळे येतील, किंवा आपल्या शिक्षण संस्था चालविण्यात अडचणी निर्माण करतील. विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यात अडचणी येतील. हेतूपूर्वक अगर अजाणतां असे घडू शकेल. उदा., **एखाद्या विद्यापीठात अमुक भाषाच शिक्षणाचे माध्यम म्हणून स्विकारली जाते**. शिक्षकाच्या अगर मुख्याध्यापकाच्या नेमणुकीसंबंधी शिक्षण संस्थांच्या पदाधिकाऱ्याकडून, शिक्षण अधिकाऱ्याकडून किंवा

विद्यापीठाकडून अनेक वेळा दडपणे येण्याचे प्रकारही घडतात. त्याबाबत आपल्या राज्य घटनेने कलम २९ व ३० मध्ये मूलभूत शैक्षणिक सांस्कृतिक हक्क नमूद केले आहेत.

कलम – २९ (१) भारतात राहणाऱ्या कोणत्याही नागरिकांच्या गटाची विशिष्ट भाषा, लिपी अगर संस्कृती असेल तर तिचे जतन करणेचे हक्क त्यांना राहतील. (२) शासनाला कोणत्याही शिक्षण संस्थेत धर्म, वंश, जात, भाषा यापैकी कोणत्याही एक अथवा अनेक कारणावरून कोणाही नागरिकांना प्रवेश नाकारता येणार नाही.

कलम – ३० (१) अल्पसंख्य समाजाला मग तो धर्माच्या कारणांनी असो की भाषेच्या, स्वतःच्या पसंतीनुसार शिक्षण संस्था स्थापन करण्याचा अधिकार असेल. (२) अशा शिक्षणसंस्थांना मदत देताना ती अल्पसंख्य समाजाची असल्याच्या कारणावरून शासन कसलाही भेदभाव करणार नाही.

घटनेनुसार सर्व नागरिकांना मूलभूत अधिकार म्हणून प्राप्त होणारी समान वागणूक व समान संधी, धर्मश्रद्धेचे व उपासनेचे स्वातंत्र्य आणि अल्प-संख्याकांना आपली धार्मिक, सांस्कृतिक व भाषिक अस्मिता जपण्याचा व विकसित करण्याचा अधिकार या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार केल्याशिवाय आपल्या घटनेला अभिप्रेत असलेल्या धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप आपल्या लक्षात येणार नाही. **आपण स्विकारलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेत धर्मस्वातंत्र्य, समान नागरिकत्व आणि इहवादी जीवनदृष्टी या तिन्ही गोष्टी एकत्रित दिसून येतात.** त्यावरून घटनेला धर्मस्वातंत्र्य मान्य आहे पण धर्माधिष्ठता मान्य नाही. हे आपल्या लक्षात येईल. म्हणूनच समान नागरी कायदा तयार कर-ण्याचा संकल्प तिने सोडलेला आहे. (कलम ४४) हिंदू कोड बिलाची निर्मिती हे त्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल आहे. पण यापुढे प्रगती होऊ शकली नाही. एवढेच नव्हे तर घटनेने धार्मिक भावना लक्षात घेऊन गोवधबंदीला

संमती दिली. एक धार्मिक परंपरा म्हणून शिखांना कृपाण बाळगण्यास मुभा दिली. मुसलमानांना एकाहून अधिक विवाह करणेस परवानगी दिली. स्त्रियांचे बाबतीत जे पक्षपाती कायदे आहेत, ते कोर्टात रद्द होत नाहीत. कारण त्यामागे धार्मिक रूढी आहेत. अल्पसंख्य जमातीसंबंधीची जी कलमे आहेत त्याची अशीच स्थिती आहे. घटनेच्या कलम ३० चा अर्थ कोर्टात असा उलटा पालटा लावण्यात आला आहे, की त्यामुळे बहुसंख्य जमातीला आपल्यावर अन्याय झाला असे वाटावे. त्यामुळे जातीजातीत मत्सराची भावना निर्माण होते व सामाजिक स्थैर्याला तडा जातो[५] याचे कारण सांगताना न्यायमूर्ती वि. म. तारकुंडे म्हणतात[६] 'भारतात हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्मांचा जबरदस्त पगडा आहे. धर्माच्या कक्षेत येणार नाही अशी कोणतीच गोष्ट हिंदू व मुस्लीम यांच्या जीवनात नाही. म्हणूनच भारतीय घटनेत धर्म-निरपेक्षतेच्या तत्वाचा अंतर्भाव करताना, घटना समितीला बऱ्याच तडजोडी कराव्या लागल्या '.

### (क) धर्म आणि शासन यांच्या कार्यक्षेत्राची पूर्ण फारकत

मानवाचे लौकिक जीवन हे शासनाचे कार्यक्षेत्र आणि त्याचे पारलौकिक जीवन हे धर्माचे कार्यक्षेत्र अशी पूर्ण फारकत हे इहवादी शासनाची तिसरी बाजू आहे. असे आपण मागील प्रकरणात पाहिले आहे. पण भारतीय घटना अशी फारकत पूर्णपणे मान्य करीत नाही. शासनाचे क्षेत्रांत धर्माला हस्तक्षेप करता येणार नाही येथपर्यंत घटनेला फारकत मान्य आहे पण धर्माच्या क्षेत्रात काही बाबतीत शासन हस्तक्षेप करू शकते अशी तरतूद घटनेमध्ये केलेली आहे. उदा., हिंदू सार्वजनिक धर्ममंदिरे हिंदूच्या सर्व जातीजमातींना खुली करणे, धर्ममंदिरांची व्यवस्था पहाणे, व्यवस्थापनाची तपासणी करणे, धार्मिक निधीच्या व मंदिरांच्या गैरवापरास आळा घालणे, धार्मिक मिरवणुका व प्रार्थनेवर कायदा सुव्यवस्थेसाठी निर्बंध घालणे, प्लेगच्या साथीत रोगप्रति-बंधक लस टोचून घेण्यास नकार देणारा विरुद्ध उपाय योजणे, अन्य सुधारणा करणे, भारतीय घटनेचे हे वेगळेपण लक्षणीय आहे.

## ३. शासन इहवादी पण समाज धर्मश्रद्धा

केवळ शासन किंवा राज्यघटना यांचेपुरते बोलायचे तर भारतीय राज्य-घटनेने कोणताच धर्म 'अधिकृत धर्म' मानलेला नाही. त्याचप्रमाणे इहवादाच्या तीनही बाजू राज्यघटनेला बहुतांशी मान्यच आहेत. त्यामुळेही ती इहवादी आहे हे स्पष्ट आहे. नागरिकांनी कोणत्या धर्मावर किंवा धर्माच्या कोणत्या भागावर श्रद्धा ठेवावी तसेच धर्मकल्पनेचा कोणता अर्थ स्वीकारावा याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेले आहेत. हे पूर्ण स्वातंत्र्य देऊन सर्वच नागरिकांना समान हक्क, समान अधिकार देणारे समान नागरि-कत्व दिलेले आहे. या समान नागरिकत्वाने हिंदूंची जातिव्यवस्था कायदेशीर-रीत्या अवैध ठरवून बाद केली आहे. तसेच सर्वच धर्मशास्त्रांच्या विरोधी जाऊन स्त्रियांना समान अधिकार दिलेले आहेत. हे समान नागरिकत्व केवळ हिंदू धर्माचा छेद करीत नाही तर ते मुस्लीम धर्मशास्त्राचाही छेद करते. स्त्रियांच्या हक्काची समानता इस्लामच्या धर्मशासनाच्या विरोधी जाते. मुस्लीम स्त्रीचा मुसलमानेतराबरोबर विवाह करणेचा व मुसलमान म्हणून राहणेचा हक्क, इस्लामच्या धर्मशास्त्राने कधीच मान्य केलेला नव्हता पण भारतीय राज्यघटनेने तो मान्य केला आहे.[७]

सर्व नागरिकांना समान नागरी कायदा निर्माण करणे हा संविधानाचा हेतू, मार्गदर्शक तत्व म्हणून घटनेच्या ४४ व्या कलमांत स्विकारण्यात आला आहे. घटनासमितीत ज्या वेळी हे कलम मांडले गेले, त्यावेळी मुसलमानांचा नागरी कायदा, या कलमातून वगळण्यात यावा अशी उपसूचना मांडण्यात आली होती. ती फेटाळण्यात आली. म्हणजेच ४४ वे कलम कोणत्याही धर्माच्या कायद्यात हस्तक्षेप करण्याचा शासनाचा हक्कच घोषित करते. वास्तविक पाहता गुन्ह्याचा कायदा पूर्वीच समान होता. म्हणून राहिलेला भाग नागरी कायदा एवढाच संविधानात उल्लेख आहे. हिंदू कोड बिलाला पाठिंबा देताना पंडित नेहरु म्हणाले, 'समान नागरी कायद्याच्या वाटचालीत पहिले महत्वाचे पाऊल म्हणून मी या कायद्याकडे पहातो. भारताचे ८५ टक्के नागरिक या कायद्याने एका नागरी कायद्याखाली येत आहेत. ही घटना शंभर

टक्के भारतीय नागरिक एका नागरी कायद्याखाली आणण्याच्या भारतीय घटनेच्या आदेशाला उचित पार्श्वभूमी निर्माण करील.' 'शरियत मध्ये हस्तक्षेप केला जाणार नाही. असे आश्वासन नेहरूंनी दिले नाही उलट योग्य वेळ येताच शरियतमध्ये हस्तक्षेप करू' असे गर्भित आश्वासनच त्यांच्या या भाषणातून मिळते. राज्यघटनेच्या ४४ व्या कलमाने त्यांच्यावर तसे बंधनच घातलेले आहे. ही पार्श्वभूमि लक्षात घेतली तर, **भारतीय संविधान सार्वजनिक क्षेत्रातून धर्मच निष्प्रभ करण्यास उद्युक्त झालेले आहे** असे दिसून येईल. कारण एरवी 'समान नागरिकत्व' या कल्पनेला अर्थच रहाणार नाही. म्हणजे '**इहवादाचा अर्थ धर्माची कक्षा पारलौकिक विचारापुरती मर्यादित करणे असा** आहे. याचा परिणाम सार्वजनिक जीवनातून धर्म निष्प्रभ करणे व व्यक्तीची, व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा निर्माण करून, धर्माच्या गुलामगिरीतून मानवी मन मोकळे करणेत होणार आहे. पण समाजाचे संघटित स्वरूप' म्हणजे शासन अशी लोकशाही समाजात स्थिती असते. म्हणून भारतीय समाज इहवादी झाल्याशिवाय केवळ शासन किंवा राज्यघटना इहवादी असण्याला फारसा अर्थ नाही आणि भारतीय समाज तर फार मोठ्या प्रमाणावर निरनिराळ्या अंध धर्मश्रद्धांच्या प्रभावाखाली पिढ्यान्‌पिढ्या राहिला आहे. दुसरे असे की भारतातील प्रमुख धर्म हिंदु आणि इस्लाम सर्वंकष स्वरुपाचे आहेत. मानवाच्या सर्व व्यवहारावर व वर्तनावर त्याच्या यमनियमांचे काटेकोर बंधन असते. वर्णाश्रमधर्म, चातुर्वर्ण, जातीप्रथा अलीकडे काहीशा शिथिल झाल्यासारख्या वाटल्या तरी त्यांचा समाजजीवनांवर निर्णायक प्रभाव आहे. इस्लाम तर याचे पेक्षाही कर्मठ आहे. 'यथा प्रजा तथा शासन' या लोकशाहीच्या नियमाप्रमाणे या जनमताचा प्रभाव शासनावर पडणे अपरिहार्य आहे. त्यामुळे निरनिराळ्या धार्मिक संस्थांना, मंदिरांना इहवादी शासनाकडून वारेमाप देणग्या मिळत आहेत. शासनामार्फत देवाच्या महापूजा होत आहेत. वृत्तपत्रे त्यांचे फोटो पहिल्या पानावर प्रसिद्ध करीत आहेत. रेडिओ, दूरदर्शन, शिक्षण या माध्यमाचा वापर धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा यांच्या जपणुकीसाठी व वाढीसाठी होत आहे. 'देवापुढे माणूस पालापाचोळा' ही शिकवणूक सातत्याने 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' दिली जात आहे. सर्व शासकीय कार्यक्रम,

भूमीपूजन, उद्घाटन, गृहप्रवेश, साखरेच्या पोत्याचे पूजन वगैरे हिंदुधर्मीय शास्त्रोक्त होत आहेत. 'सत्यनारायण' 'गणेशउत्सव' 'शिवजयंती' हे शासकीय कार्यक्रम होऊन बसले आहेत. काही शासकीय कार्यालयांच्या आवारात देवळे मशिदीही अलीकडे दिसू लागल्या आहेत.

या सर्वांचा परिणाम हिंदू समाजातील विषमतेविरुद्ध बंड करणारे व सत्य-धर्म व समता यांचा संदेश देणारे महात्मा ज्योतीराव फुले यांची पुण्यतिथी माळी समाज साजरी करतो. संतश्रेष्ठ नामदेव महाराजांची पुण्यतिथी शिंपी समाज साजरा करतो. "आधुनिक मनू" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पुण्यतिथी महार समाज करतो. महारवाड्याला 'भिमनगर' मांगवाड्याला 'अण्णाभाऊ साठेनगर' अशा पाट्या दिमाखाने लावण्यात येतात. या थोर विभूतींची विटंबना याहून अधिक चांगली कोण करु शकेल ?

---

संदर्भ : 1. C. T. Daru – Democracy of the Indian Constitution – Page – 3.
2. C. T. Daru – Democracy of the Indian Constitution – Page – 8, 9, 10
3. C. T. Daru – Democracy of the Indian Constitution – Page – 12, 13, 14, 15
4. Justice V. R. Krishna Ayyar – योजना मासिक १५–८–८८ – पा. नं. १०
5. Justice V. R. Krishna Ayyar – योजना मासिक १५–८–८८ – पा. नं. १४
6. Justice V. M. Tarkunde – योजना मासिक १५–८–८८ – पा. नं ४४
७. नरहर कुरुंदकर – जागर – पा. नं. १८८

# ४

# इहवादाचा उदय आणि विकास

'इहवाद हे पाश्चिमात्य राष्ट्रांचे अपत्य आहे. ख्रिश्चन चर्चच्या उदयामुळे निर्माण झालेल्या खास प्रश्नांतून ते निर्माण झालेले आहे. मध्ययुगांमध्ये धर्मसंस्था (चर्च) व राजसत्ता यांच्यामध्ये वर्चस्वासाठी चाललेल्या झगड्यांतून पाश्चिमात्य राष्ट्रांत इहवादाचा उदय झाला.' 'आपले नवे लोकसत्ताक आणि समतावादी राज्य प्राचीन भारतीय परंपरावर किंवा विचारावर उभारलेले नाही.'–सरदार के. एम. पणीक्कर. 'पाश्चिमात्य देशांतील प्रबोधन, धर्मसुधारणा, वैज्ञानिक प्रगती, ज्ञानप्रसार आणि उदारमतवादी लोकशाही तत्वज्ञानाचा उदय या सर्वांमुळे इहवादाचा उदय झाला'–भाई मानवेंद्रनाथ रॉय.

इहवादाच्या परस्परभिन्न व काही अंशी परस्पर विरोधी व्याख्या गेल्या दोन प्रकरणात आपण पाहिल्या. त्यामध्ये धर्माचा अर्थ, त्याचे मानवी जीवनातील स्थान, मानवाचे राज्यसंस्थेशी संबंध वगैरे प्रश्नांचा विचार केला. त्याबाबत अधिक माहिती मिळविण्याशिवाय त्या प्रश्नांचा निश्चित निर्णय आपणास करणेही कठीण होईल, म्हणून इहवादाचा उदय कोठे व कसा झाला, त्यावेळची सामाजिक, राजकीय स्थिती कशी होती याची माहिती आपण घेऊ.

## इहवादाचा उदय

आपल्या विचारसृष्टीतील बहुतेक सर्व महत्वाच्या संकल्पना युरोपमधून आपणांकडे आलेल्या दिसतात. उदा., लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य समाजवाद, इहवाद वगैरे तेथील ख्रिश्चन धर्मशास्त्राप्रमाणे मानवी जीवनाची विभागणी 'लौकिक व पारलौकिक' अशा परस्परभिन्न क्षेत्रामध्ये केली जाते. त्यापैकी लौकिक क्षेत्र हे शासनाचे कार्यक्षेत्र तर पारलौकिक क्षेत्र हे धर्माचे कार्यक्षेत्र मानण्यात येते. शासनाने धर्माच्या क्षेत्रात व धर्माने शासनाचे क्षेत्रात हस्तक्षेप करु नये अशी अपेक्षा त्यामध्ये होती. पण त्यांचा धर्मप्रमुख जो पोप व त्याचे मदतनीस धर्मगुरुनी समाजाच्या सर्वांगावर व राज्यसत्तेवरही आपले वर्चस्व एक हजार वर्षेपर्यंत प्रस्थापित केले. त्यावेळी सबंध युरोपखंड एकच ख्रिस्ती जगत मानले जात होते. धर्मगुरुंच्या जुलमी, पाशवी वर्चस्वाविरुद्ध राजसत्ता व तिच्या नेतृत्वाखालील जनता यांनी जो झगडा केला, त्यातून इहवादाचा जन्म झाला. शासन यंत्रणेत धर्माला स्थान असता कामा नये, धर्म मठापुरता मर्यादित राहिला पाहिजे म्हणून सिक्युलॅरिझमची चळवळ उभी ठाकली. जनतेच्या अंगोपांगाना जखडू पाहणारे चर्चचे पाश या चळवळीने तोडून टाकले. धर्माला चर्चच्या आवारात बंदिस्त केले. शिक्षणांतील पाठयपुस्तकातून धर्मवादाचा पगडा दूर सारला. त्यामुळे भौतिक विज्ञानाकडे पहाण्याचा वस्तुनिष्ठ दृष्टीकोन युरोपीय जनतेला आला. युरोपची भरभराट त्यामुळेच होऊ शकली. युरोपमधल्या सिक्युलॅरिझमचे हे ढळढळीत यश तिने राज्यव्यवस्था व धर्मव्यवस्था यांची पूर्णपणे फारकत केल्यामुळेच मिळालेले आहे.[१]

## श्रेष्ठ कोण ? राज्यसत्ता की धर्मसत्ता

ख्रिश्चन धर्माच्या उदयानंतरच्या आरंभीच्या काळात तत्कालीन राजसत्तेकडून ख्रिश्चन धर्मियांचा भिन्न धर्मश्रद्धांच्या कारणांवरुन अनन्वित छळ झाला पण इ. स. ३९२ मध्ये एडिक्ट ऑफ मिलानप्रमाणे 'पूजास्वातंत्र्य कोणालाही नाकारले जाणार नाही. दैवीबाबीसंबंधी प्रत्येकाला आपापल्या मताप्रमाणे वागण्यास मुभा राहील' अशी तरतुद केली. धार्मिक स्वातंत्र्याच्या दिशेने पडलेले हे पहिले पाऊल होय.

इ. स. ३३७ मध्ये तत्कालीन सम्राट कॉंस्टंटाईन यानेच ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. त्याबरोबर सारेच पारडे फिरले. त्यानंतरच्या काळात ख्रिश्चन धर्मगुरुच इतर धर्मियांचा छळ करु लागले. इ. स. ३४६ मध्ये ख्रिस्तेतरांची धर्ममंदिरे बंद करण्यात आली. त्यांच्या देवांची भक्ती करणाऱ्याना मृत्यूदंडाची शिक्षा देण्यात येऊ लागली. पुढील काळात ख्रिश्चन धर्मगुरु व सम्राट यांच्यात श्रेष्ठ सत्ता कोणाची ? असा वाद निर्माण झाला. पोप गॅलाशस याने त्याकरता 'दोन तलवारींचा सिद्धांत' मांडला त्यानुसार समाजाची व्यवस्था दुहेरी असावी. अध्यात्मिक व पारलौकिक बाबी चर्चने पहाव्यात व मानवाच्या अंतिम कल्याणाची व्यवस्था करावी. आणि सम्राटाने समाजात शांतता सुव्यवस्था पहावी असे सुचविले. यांतील गर्भित अर्थ असा की पोपची सत्ता अधिक महत्वाची, कारण ईश्वराच्या न्यायासनापुढे मानवाच्या, (म्हणजेच सम्राटाच्याही) अंतिम कल्याणासाठी पोपला देवाची करुणा भाकावी लागते. पुढे पुढे पोप असे म्हणू लागले की सर्वच सत्ता देवाने चर्चला दिली आहे. आणि चर्चने धार्मिक सत्ता आपणाकडे ठेऊन ऐहिक सत्ता राजाकडे दिली आहे. म्हणून तीवरही निर्णायक हक्क चर्चचा आहे. पण सम्राटाला हे मत मान्य नव्हते. ते म्हणत की देवानेच दोन्ही सत्ता विभागून, धार्मिक सत्ता चर्चकडे व ऐहिक सत्ता राजाकडे दिली आहे.

श्रेष्ठ सत्ता कोणाची ? यासाठी हा झगडा होता. इ. स. ८०० मध्ये पोपने 'पवित्र रोमन साम्राज्य स्थापन करून व त्यावर जर्मन राजा शार्लमेन याची स्थापना करुन हा वाद मिटवला. त्यामुळे धार्मिक सत्ता पोपची व ऐहिक सत्ता 'पवित्र रोमन सम्राटाची' म्हणजे पोपचीच अशी स्थिती निर्माण झाली तेव्हापासून तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत या ना त्या कारणावरुन पोप व त्या त्या देशाचा राजा यांमध्ये सतत झगडे होत राहिले. शेवटी त्यात पोपचा पराभव झाला व राज्यसत्ता विजयी झाली. इहवादाच्या उदयाचा हा आरंभ होय.

## १. मार्सिग्लिओ-राजसत्तेचा पहिला पुरस्कर्ता

राज्यसत्तेच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेचा त्या काळातील मोठा पुरस्कर्ता म्हणजे पदुआ नगरीचा मार्सिग्लिओ (१२७०-१३४०) हा होय. तो ॲरिस्टॉटलचा

भक्त होता. व पोपचा सत्तेचा हाडवैरी होता. स्वयंपूर्ण व समर्थ समाज म्हणजे शासन हा विचार त्याने मांडला. चर्चच्या ऐहिक मालमत्तेची व्यवस्था व नियमन करण्याचा अधिकार राजाला असला पाहिजे. असे त्याने आग्रहाने प्रतिपादन केले. 'डिफेन्सर पासिस' हा त्याचा ग्रंथ १३२४ मध्ये त्याने लिहिला. त्यामध्ये मानवी व दैवी कायदे असा स्पष्ट फरक त्याने दाखविला. दैवी कायद्याचा अंमल मनुष्य परलोकात गेल्यावर ईश्वरी कृपाप्रसादाच्या किंवा शिक्षेच्या रुपाने होत असतो, म्हणून माणसाच्या धार्मिक श्रद्धामध्ये एकवाक्यता असण्याची सक्ती राजाने करु नये. तसेच माणसाची धार्मिक श्रद्धा कोणतीही असली तरी त्याहून त्याचे मूलभूत हक्क स्वतंत्र असतात. म्हणून धार्मिक श्रद्धासाठी कोणालाही शिक्षा दिली जाऊ नये. या इहवादी शासनाच्या दोन मूलभूत कल्पना त्या ग्रंथामध्ये प्रथमच मांडण्यात आल्या.

मासिग्लिओप्रमाणेच इंग्लंडमधील ओखॅमचा विल्यम (१२९०-१३४५) निस्पृह व निर्भय लेखनामुळे पश्चिम युरोपात गाजलेला होता. इटालीचा महाकवी डॉटे (१२६५–१३२१) फ्रेंच पंडित पियरी डुबाईस इ. स. १३०० च्या सुमारास प्रसिद्धीस आले होते. राज्यसंस्था ईश्वरप्रणीत नसून परिस्थिति व मानवी गरज यामधून तिची निर्मिती होते. असे मत त्याने 'रिकव्हरी' नावाच्या त्याच्या ग्रंथात मांडले होते.

अकराव्या व बाराव्या शतकात फ्रेंच, जर्मन, इटालियन, इंग्लिश या भाषा प्रौढत्वास आल्या. त्यामुळे ते देश भिन्न राष्ट्रे आहेत. अशी भावना निर्माण होऊन तेथील लोकांना आपल्या स्वतंत्र अस्मितेची, राष्ट्रीयत्वाची जाणीव होऊ लागली. आपल्या राष्ट्राबाहेरचा जो पोप, त्याची सत्ता आपल्यावर चालावी. हा विचार लोकांना दु:सह होऊ लागला. इंग्लिश, फ्रेंच राजांनी आपल्या जनतेच्या अस्मितेशी एकरुप होण्यात भूषण मानले. त्यामुळे पोपला अंधश्रद्धेमुळे पाठिंबा देणारी जनता, त्यांच्या राजांच्या पाठीशी उभी राहिली. तिच्या आधारे पोपचे आततायी जुलमी वर्चस्व त्या राजांनी झुगारुन दिले. राष्ट्रवाद हाही इहवादच आहे. नव्या मन्वंतरामागे तीच प्रबळ प्रेरणा होती.

## २. विद्यापीठांची स्थापना

तेराव्या शतकात पोपच्या सर्वंकष सत्तेला विरोध करणारी दुसरी शक्ती पश्चिम यूरोपात निर्माण होत होती. ती म्हणजे नव्याने स्थापन झालेली विद्यापीठे व तेथे होणारा ग्रीक व रोमन विद्यांचा अभ्यास ही होय. बोलोना, सालेर्नो, पॅरीस, ऑक्सफर्ड येथे हिपॉक्रटिस व गॅलन या ग्रीक वैद्याच्या शास्त्राचा अभ्यास सुरु झाला. तसेच रोमन कायद्याचे अध्ययन व अध्यापन तेथील पंडित व विद्यार्थी करु लागले. प्रबोधन युगात विज्ञानाचा जो विकास झाला. त्याची बीजे येथेच पेरली गेली. असे फिशरसारख्या इतिहासवेत्याचे मत आहे. रोमन कायद्याच्या अभ्यासामुळे पश्चिम युरोपांत एक बुद्धीजीवी नवा वर्गच निर्माण झाला आणि व्यापार, शालेय शिक्षण, राजनीती यांवर धर्मसत्तेचे नियंत्रण व त्र्चर्स्व असू नये. समाजहिताच्या म्हणजेच इहवादाच्या दृष्टीने त्या संबंधीचे धोरण आखावे असे सांगू लागला.

## ३. उदारमतवाद – तिसरी शक्ती

रोमन धर्मपीठाच्या निरंकुश सत्तेला आव्हान देणारी आणखी एक शक्ती निर्माण होत होती. ॲरिस्टॉटल, प्लेटो यांच्या ग्रंथांच्या अध्ययनामुळे लोकांच्या ठायी बुद्धीवाद, व्यक्तीवाद, उदारमतवाद व मानवतावाद यांचा उदय होत होता. ही तिसरी शक्ती होय.

## ४. धर्मसुधारणा

रोमचे धर्मपीठ अनेक शतके हजारो एकर जमीन उपभोगीत होते व कराच्या रुपाने अगणित पैसा गोळा करीत होते. लोकांना त्यांनी केलेल्या पापांपासून मुक्त करण्यासाठी मुक्तीपत्रे काढून, ती विकून पैसा गोळा करीत होते. आपल्या कपाळीचा नरक चुकेल व मोक्ष मिळेल या श्रद्धायुक्त आशेने धर्मभोळे लोक ती विकत घेत. यांतून प्रचंड पैसा धर्मगुरुंना मिळे, निरंकुश सत्ता आणि पैसा हाती आल्यावर धर्मपीठे व धर्मगुरु चारित्र्यहीन, भ्रष्ट झाले तर त्यात नवल कसले? (हिस्टॉरियन्स हिस्टरी ऑफ द वर्ल्ड खंड ७ वा पा. नं. ६४८–६४९).

या धार्मिक अत्याचाराला विरोध करण्याचे, व त्यासाठी प्राणदंडही सोसण्याचे धैर्य नवविचारामुळे लोकांच्या ठायी निर्माण होत होते. ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापक वायक्लिफ (१३२४–१३९४) हा अशा लोकांत अग्रगण्य होता. सोळाव्या शतकात ल्यूथरने जी धर्मसुधारणेची चळवळ केली तिचा खरा जनक वायक्लिफच होता. मनुष्य व परमेश्वर यांचेमध्ये मध्यस्थ म्हणून धर्मगुरुची मुळीच गरज नाही. मनुष्याने भक्ती, प्रार्थना, नामस्मरण करून परमेश्वराशी प्रत्यक्ष संबंध जोडला तरी त्याला मोक्ष मिळू शकेल असा सिद्धान्त त्याने मांडला. बायबल हा ग्रंथ त्यावेळी फक्त लॅटीन भाषेतच होता. त्याचे पठन व अध्यापन लोकांनी करण्यास पोपची मनाई होती. आज्ञाभंगाबद्दल मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाई. वायक्लिफने बायबलचे इंग्रजीत भाषांतर करून त्याच्या हस्तलिखित प्रती देशभर पसरुन दिल्या. बायबल वाचण्याचा अधिकार प्रत्येकास आहे असे त्याने निर्भयपणे प्रतिपादन केले.

वायक्लिफचे ते दोन सिद्धान्त पोपच्या सत्तेला सुरुंगच ठरले. शिवाय धर्मपद व राजपद या दोन स्वतंत्र संस्था असून धर्माची राजशासनावर कधीही सत्ता असू नये, राजशासन स्वतंत्र असले पाहिजे, असेही त्याने प्रतिपादन केले. यावरून तो बुद्धीवादी व व्यक्तीवादी होता हे स्पष्ट होते. 'प्रभुभोजन' नामक अंधरुढीवर तो कडक टीका करी.

जॉन हस (१३६९–१४१५) हा बोहेमियातील प्राग विद्यापीठात प्राध्यापक असून वायक्लिफचा अनुयायी होता. तो अत्यंत धर्मनिष्ठ, चारित्र्यसंपन्न होता. त्याला धर्मपरिषदेने विसंगत मतासाठी जाळून मारण्याची शिक्षा दिली. पुढे रोमन सम्राट व हसचे अनुयायी यांच्यात बारा वर्षे युद्ध होऊन शेवटी तह झाला त्याच्या अटी अशा –

(१) धर्मप्रवचनाचे स्वातंत्र्य प्रत्येकाला असावे.

(२) ऐहिक व्यवहारावरील पोपची सत्ता नष्ट व्हावी.

(३) धर्मगुरुंनी प्राचीन ऋषिप्रमाणे वैराग्याने रहावे.

(४) धर्मगुरुच्या संबंधी सरकारी न्यायालयांना न्याय करण्याचा अधिकार असावा. यावरच पुढील काळात प्रॉटेस्टंट पंथाचा पाया घातला गेला.

## धर्मसुधारणांच्या लाटेचे परिणाम

सोळाव्या शतकांत युरोपमध्ये धर्मसुधारणेची लाट आली. मार्टिन ल्यूथर, कॅल्विन झ्विंगली हे तिचे नेते होते. त्यामुळे पोप हे महत्त्वाचे केंद्र राहिले नाही. बायबलने ती जागा आता घेतली होती. प्रत्येक सुधारक बायबलचा अर्थ आपल्या मनाप्रमाणे लावीत होता. त्यामुळे अनेक मतमतांतरे व त्यानुसार भिन्न गट निर्माण होत होते. ख्रिश्चन धर्मियांचे धार्मिक ऐक्य त्यामुळे भंगले. त्यातून दोन मार्ग निघाले. पहिला मार्ग 'पीस ऑफ ऑक्सबर्ग' या नावाने ओळखला जातो. त्याप्रमाणे राजाचा जो धर्मपंथ असेल तोच प्रजाजनांनी स्वतःचा समजायचा. ज्यांना तो धर्म अमान्य असेल, त्यांनी त्यांचा धर्म ज्या राजाचा असेल त्याच्या राज्यांत जाऊन राहावयाचे. इंग्लंड, फ्रान्सनी वेगळा मार्ग स्वीकारला. तेथे धर्मसुधारणेच्या चळवळीमुळे भिन्न धर्ममताचे लहान लहान अनेक गट तयार झाले होते. तरीही ते एकमेकांशी गुण्यागोविंदाने राहत होते. धर्ममते भिन्न असली तरी एका राज्यात सामोपचाराने राहाता येते याचा अनुभव त्यामुळे सर्वांनाच आला व समान नागरिकत्वाची नवी भावना वाढीस लागली. जॉर्ज सबाईन हा लेखक म्हणतो, अगदी संथगतीने, परिस्थितीच्या दडपणाखाली व दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नाही या जाणिवेतून 'धार्मिक सहिष्णुता' वाढीस लागली. भिन्न धर्मियांची राजकीय निष्ठा एकच असू शकते याचे प्रत्यंतर आल्यामुळेच ही गोष्ट घडू शकली. इंग्लंडमधील भिन्नमतपंथियांच्या अनेक गटांचा–बॅप्टिस्ट, कॉंग्रिगे शनीस्ट् क्वेकर्स व स्वतंत्र या कामी हातभार लागला. समान श्रद्धा असणाऱ्या लोकांनी एकत्र येवून स्थापन केलेली स्वायत्त संस्था म्हणजे चर्च, असे त्याला स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राहिले. स्वायत्त संस्थानी आपला कारभार व व्यवस्था करावी. आपले पदाधिकारी आपणातूनच निवडावे. याप्रमाणे चर्चचा कारभार स्वतंत्र झाल्यामुळे ते आपोआपच राज्यसंस्थेपासून वेगळे, अलग व स्वतंत्र झाले. इ. स. १६१४ मध्ये पहिल्या जेम्सच्या कारकिर्दीत एका बॅप्टिस्टाने राजाकडे अर्ज करून ही कल्पना मांडली होती. 'राजे किंवा सत्ताधीश आपल्या तलवारीच्या जोरावर समाजाची ऐहिक व्यवस्था पाहतील. बिशप किंवा धर्माधिकारी आध्यात्मिक बाबींचा कारभार पहातील.

एकाने दुसऱ्याच्या अधिकारक्षेत्रात कसलीही ढवळाढवळ करू नये' इतके असूनही संपूर्ण धार्मिक सहिष्णुता किंवा धार्मिक स्वातंत्र्य किंवा सर्वधर्ममतांच्या लोकांना समान अधिकार प्राप्त व्हायला १८२९ साल उजडावे लागले.

## जॉन लॉकचे सहाय्य

चर्च आणि राज्यसंस्था यांच्या कार्यक्षेत्रांची फारकत कल्पना व धार्मिक स्वातंत्र्य कल्पना इंग्लंडमध्ये वाढीस लागण्यास जॉन लॉक यांचे प्रयत्न फार उपयोगी पडले. सहिष्णुतेसंबंधी पहिल्या पत्रांमध्ये ते म्हणतात, 'शासनाच्या कक्षेबाहेर धर्माचे कार्यक्षेत्र असते'. 'शासनासंबंधी दोन सिद्धांत' या आपल्या ग्रंथात लॉकने 'व्यक्तीचे जीवित, स्वातंत्र्य आणि मालमत्ता यावर कोणतेही कायदेशीर सरकार गदा आणू शकत नाही' असा विचार मांडला. 'शासन आणि समाज' यासंबंधीच्या व्यापक सिद्धांताच्या कक्षेत धार्मिक स्वातंत्र्याचा विचार लॉकने मांडला.

सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत धार्मिक सहिष्णुतेची कल्पना रुजायला आणखीही बरीच कारणे झाली. त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे यूरोपमधील धार्मिक झगड्याचे विनाशक स्वरूप प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे विचारी लोकांवर तीव्र परिणाम घडून आला. दुसरे म्हणजे याच कालांत अनेक धर्मपंथ निर्माण झाले. अंतिम सत्यासंबंधी आपलाच पंथ खरा अशी भूमिका सर्वांचीच असल्याने सगळीच मते 'सापेक्षसत्य' आहेत अशी लोकांची भावना होऊ लागली. फ्रान्समधील धार्मिक युद्धाचे दुष्परिणाम व हॉलंडमधील धार्मिक सहिष्णुतेचे सुपरिणाम हे दोन्ही समक्षच दिसत असल्याने त्यांची आपोआपच तुलना लोक-मानसांत होऊ लागली व सहिष्णुता वाढीस लागली.

## अमेरिकेचे उदाहरण

अमेरिकेतील चार इंग्लिश वसाहतीमध्ये कॅल्विनिस्ट ख्रिश्चन धर्म अधिकृत राजधर्म होता. दक्षिणेतील तीन वसाहतीमध्ये 'चर्च ऑफ इंग्लंड' प्रस्थापित झालेले होते. दुसऱ्या चार वसाहतीमधील अधिकृत सरकारी चर्चमध्ये अनेकदा बदल घडून आले होते. उरलेल्या चार वसाहतीमध्ये अधिकृत चर्च कोणतेच

नव्हते. यूरोपमधील प्यूरिटन पंथियांनी धार्मिक स्वातंत्र्य मिळावे म्हणून आपले यूरोपांतील वास्तव्य, घरदार सोडून अमेरिकेत जाऊन इ. स. १६२८ मध्ये 'मॅसाच्युसेटस' ही वसाहत स्थापली पण तेथे मात्र क्वेकर्स किंवा कॅथॉलिक लोकांना प्रवेश देण्याला त्यांनी नकार दिला. कोणी प्रवेश केलाच तर अशा पहिल्या गुन्ह्याला हद्दपारीची व पुन्हा प्रवेश केल्यास मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाई.

व्हर्जिनिया वगैरे दक्षिणेतील वसाहतींमध्ये प्रस्थापित चर्च ऑफ इंग्लंडवर सरकारी प्रभुत्व पूर्णपणे होते. तेथेही क्वेकर्स किंवा प्रॉटेस्टंट मताच्या लोकांवर अनेक बंधने घातली होती. 'न्यू इंग्लंड' वसाहतीत इ. स. १६८९ च्या सहिष्णुतेच्या कायद्यामुळे परिस्थिती पुष्कळ सुधारली, तरीही कॅथॉलिक मताच्या लोकांची स्थिती पूर्ववतच होती. चर्च व राज्यसंस्था यांची कार्यक्षेत्रे भिन्न असावीत असे मत मांडल्याबद्दल मॅसाच्युसेट्स वसाहतीतून इ. स. १६३६ मध्ये रॉजर वुइल्यमला हद्दपार करण्यात आले होते. त्याने 'र्‍होड आयलंड' वसाहत स्थापली. इस. १६६३ मध्ये त्या वसाहतीने असे जाहिर केले की, 'धर्मासंबंधी कोणतीही मते धारण करणाऱ्या व्यक्तीला कसलाही प्रतिबंध येथे केला जाणार नाही.' 'धार्मिक कारणासाठी कर लादण्याचे धोरण वुइल्यमला अमान्य होते. वसाहतीमध्ये धार्मिक एकवाक्यता घडवून आणणे म्हणजे धार्मिक व सामाजिक बाबींमध्ये गल्लत करण्यासारखे असून ख्रिश्चन धर्माविरुद्ध आहे' असे मत मांडणारी पुस्तिका त्याने लिहिली.

धार्मिक सहिष्णुतेचा दुसरा पुरस्कर्ता, 'वुइल्यम पेन' हा क्वेकर होता. त्याने 'पेनसिल्व्हानिया' ही वसाहत स्थापली त्यावेळी त्या वसाहतीमध्ये प्रत्येक व्यक्तीस संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य असेल अशी त्याने घोषणा केली. साहजिकच विविध धर्ममताच्या लोकांची तेथे गर्दी झाली.

चर्च व राज्यसंस्था यांची कार्यक्षेत्रे परस्परभिन्न असावीत हे मत अठराव्या शतकाच्या अखेरीस जवळजवळ सर्वमान्य होत चालले होते. अमेरिकेतील या तेरा वसाहतीमध्ये अनेक धर्मपंथाचे लोक एकत्र आलेले होते,

हे त्याचे महत्त्वाचे कारण होय. सगळ्या अमेरिकन संस्थानासाठी एकच चर्च स्थापन करावे तर ते कोणते करावे हा प्रश्न अडचणीचा होता. शिवाय ऱ्होड आयलंड व पेनसिल्व्हानिया या वसाहतीतील धार्मिक सहिष्णुतेच्या प्रयोगाचे आकर्षण सर्वांनाच वाटू लागले. 'न्यू इंग्लंड व व्हर्जिनिया' या वसाहतीतील लोकांनी चर्च व राज्य यांची कार्यक्षेत्रे भिन्न असावीत यासाठी आंदोलनेच उभारली. अमेरिकन राज्यक्रांतीच्या काळात लॉकच्या विचाराचा प्रभाव वाढत होता. त्याचप्रमाणे अठराव्या शतकातील यूरोपमधील प्रबोधनाच्या चळवळीतील बुद्धीवाद व संशयवाद यूरोपातून विशेषत: फ्रान्समधून अमेरिकेत पसरत चालला होता. या सर्वांचा परिणाम सर्वच धर्मपंथाच्या लोकांचा कर्मठपणा व हेकटपणा कमी होण्यात व धार्मिक स्वातंत्र्य सहिष्णुता वाढीस लागण्यात झाला. चर्च व राज्य यांची फारकत झाल्यावाचून हे शक्य नव्हते. व्हर्जिनियातील अशा आंदोलनाच्या नेत्यांमध्ये जेम्स मॅडिसन व थॉमस जेफरसन हे प्रमुख होते. इ. स. १७८६ मध्ये त्यांना यश आले. एका मागून एका वसाहतीत अशी फारकत घडून येऊ लागली. मॅसाच्युसेट्समध्ये सगळ्यात शेवटी म्हणजे इ. स. १८३३ मध्ये अशी फारकत घडून आली.

अमेरिकन राज्यघटनेमध्ये केंद्र सरकारचे स्वरूप कसे असावे, याचा जो आराखडा ठरविण्यांत आला तो या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्यांत देवांचा नामनिर्देशही नाही. सहाव्या कलमामध्ये स्पष्टच म्हटलेले आहे. 'अमेरिकन संस्थानातील नागरिकत्वासाठी किंवा त्यातील कोणतेही पदग्रहण करणेसाठी कसलीही धार्मिक कसोटी कधीही लागणार नाही'. पहिले घटना दुरुस्ती विधेयक इ. स. १७९१ मध्ये प्रतिनिधी सभागृहांत मॅडिसनने मांडले. त्यात 'धर्म स्थापनेसाठी किंवा त्यासंबंधी मुक्त विचारास प्रतिबंध करणेसाठी कॉंग्रेस कायदा करणार नाही' या एकाच वाक्यांत धार्मिक स्वातंत्र्याचे तत्त्व आणि चर्च आणि राज्य यांच्या कार्यक्षेत्राची पूर्ण फारकतीचे तत्त्व समाविष्ट करण्यात आले आहे. चर्च आणि राज्य याच्या परस्परसंबंधात एक अनुल्लंघनीय भिंतच या कलमाने उभारली आहे, असे १८०२ मध्ये प्रेसिडेंट जेफरसन यांनी अभिमानाने सांगितले.

## इंग्लंडमधील परिस्थिती

'चर्च ऑफ इंग्लंड' हे इंग्लंडचे अधिकृत चर्च म्हणून आजही मानले जाते. बिशप, आर्च- बिशपाच्या नेमणुका ब्रिटिश पंतप्रधान आजही करतात. 'हाऊस ऑफ लॉर्डस'मध्ये त्यांना मताधिकार आहे. धार्मिक न्यायालयांनी दिलेल्या काही शिक्षा ब्रिटिश शासन आजही अंमलात आणते. चर्चची फार मोठी स्थावर जंगम मालमत्ता शासनाकडून आजही संरक्षिली जाते. इ. स. १९२० मध्ये वेल्समधील चर्च बरखास्त करण्यात आले पण 'चर्च ऑफ इंग्लंड'ची स्थिती आजही पूर्वी होती तशीच कायम आहे.

रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट धर्ममताच्या लोकांना इंग्लंडमधील कोणतेही पद पूर्वी ग्रहण करता येत नसे. कॅथालिकांच्या जमिनीवर दुप्पट कर लादलेला होता. इ. स. १७२७ पासून प्रॉटेस्टंट लोकांवरील बंधने शिथिल होऊ लागली होती. पण कॅथालिक लोकांना 'समान नागरिकत्वाचे अधिकार' इ. स. १८२९ पर्यंत देण्यात आलेले नव्हते. एकोणिसाव्या शतकातील उदारमतवादी व लोकशाही विचारांनी धार्मिक सहिष्णुता, स्वातंत्र्य आणि लोकशाहीचे नाग- रिकत्व – अधिकार यांमध्ये वाढ झाली. जेरेमी–बेन्थॅमच्या सुधारणांमुळे 'समान नागरिकत्व' प्रस्थापित झाले. जॉन स्टुअर्ट मिलच्या 'ऑन लिबर्टी' या ग्रंथातील धार्मिक स्वातंत्र्य आणि उदारमतवादी विचारांनी सबंध युरोप- मध्ये उपयुक्ततावाद आणि व्यक्तीवाद यांचा पाया घातला. त्यामुळे बेन्थॅमच्या सुधारणांना अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली.

## फ्रान्समधील स्थिती

चर्च आणि राज्य यांच्या फारकतीची कल्पना फ्रान्समधील घटनांनी अधिक स्पष्ट केली. ह्यूजेनॉटस (फ्रान्समधील प्रॉटेस्टंट) लोकांचे कार्य यासाठी महत्त्वाचे ठरले. राज्यामध्ये धार्मिक एकवाक्यता असलीच पाहिजे. या आग्रही विचारांवर प्रखर हल्ला 'मॉस्टेस्क्यू' या अठराव्या शतकातील प्रसिद्ध फ्रेंच लेखकाच्या 'स्पिरीट ऑफ दि लॉज' या ग्रंथाने केला. धार्मिक कर्मठपणा व हेकटपणा याविरुद्ध व्हॉल्टेरने (दुसरा प्रसिद्ध फ्रेंच लेखक) टीकेची झोड उठवली. त्याबरोबरच 'समान नागरिकत्वाचे पायावर' संपूर्ण समाजाची

एकात्मता घडवून आणण्यास धर्मांध हेकटपणाच अडथळा आणतो असे म्हणून रुसोने (तिसरा फ्रेंच लेखक) त्याला पाठिंबा दिला. तरीही इ. स. १७४५ पर्यंत प्रॉटेस्टंट लोकांना मुक्त धार्मिक वर्तन करता येत नव्हते. धार्मिक मतभेदासाठी मृत्यूदंडाची शिक्षा १७६२ पर्यंत रद्द झालेली नव्हती.

फ्रेंच राज्यक्रांतीने दुष्ट राजसत्तेबरोबरच प्रस्थापित कॅथॉलिक चर्चही फेकून दिले. इ. स. १७८९ मध्ये असेंब्लीत भाषण करतांना, क्रांतीचा नेता 'मिराबो' याने स्वातंत्र्य आणि सहिष्णुता यातील भेद स्पष्ट केला. तो म्हणतो, 'मी सहिष्णुतेचा उपदेश करण्यास आलो नाही, अमर्याद धार्मिक स्वातंत्र्य हा नागरिकांचा पवित्र हक्क आहे असे मी मानतो. सहिष्णुता हा शब्दच मुळी मला जुलमी व अपमानकारक वाटतो. सहिष्णुता दाखविणारी सत्ता ही कल्पनाच विचार स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कांवर आक्रमण करणारी वाटते. ती सहिष्णुता दाखवते, म्हणजेच तशी ती न दाखवणे तिला शक्य आहे. असा त्याचा अर्थ होतो'.

इ. स. १८३० मध्ये फ्रेंच नेत्यांनी असे जाहीर केले की, 'धर्माला एकाच गोष्टीची गरज आहे, ती म्हणजे स्वातंत्र्य. त्याचे सामर्थ्य लोकांच्या अंत:करणात असते, सरकारी पाठिंब्यात नव्हे. धर्माने राजाश्रय घेणे म्हणजे राजसत्तेची गुलामी स्वीकारणे होय. स्वतंत्र राष्ट्रातील चर्चही स्वतंत्र हवे'. १८७० नंतर धर्मगुरुंच्या वर्चस्वाविरुद्ध उठाव होऊ लागले. शिक्षणावरील धर्मगुरुचे वर्चस्व लोकांच्या रोषास पात्र झाले व त्यातून १९०५ मध्ये चर्च आणि राज्य याच्या कार्यक्षेत्रांची फारकत घडून आली. चर्चला मिळणारी सर्व अनुदाने बंद करण्यात आली. सर्व शाळा शासनाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आल्या.

## पश्चिम युरोपावर झालेले परिणाम

जिनिव्हा व इतर राज्यांनी वरील धोरण मान्य केले. इटलीमध्ये १९२९ पर्यंत चर्च आणि राज्य याच्या कार्यक्षेत्रांची फारकत घडून आली. १९२०च्या वैमार राज्यघटनेमध्ये जर्मनीने याच तत्त्वाचा अवलंब केला. नेदरलँडमध्ये धार्मिक सहिष्णुतेची परंपरा जुनीच आहे. त्यांनी सर्व धर्म कायद्याच्या

दृष्टीने समान मानण्याचे व सर्वच धर्मांना सारखीच मदत देण्याचे धोरण स्वीकारले आहे. आयर्लंडने कॅथॉलिक धर्माला खास मान्यता दिली असली तरी इतर धर्मियांना 'धार्मिक स्वातंत्र्य' व समान अधिकार दिलेले आहेत. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांना अधिकृत चर्चच नाहीत. वीस लॅटिन अमेरिकन राष्ट्रांपैकी निम्म्या राज्यांमध्ये चर्च व राज्ये यांच्या कार्यक्षेत्रांची फारकत घडून आली आहे.

असे असले तरी, अनेक राज्यांमध्ये 'सरकारी चर्च' अद्यापही अस्तित्वात आहेत. म्हणूनच इहवादी शासनाच्या दृष्टीने विचार करताना त्याच्या तीनही तत्त्वांचा विचार एकत्रित करूनच तेथे इहवादी शासन आहे किंवा नाही याचा निर्णय केला पाहिजे. केवळ फारकतीच्या एकाच तत्त्वाचा निकष लावून निर्णय करता येणार नाही. 'धर्माचा शासनावर कितपत प्रभाव पडतो असा एकमेव निकष मानला पाहिजे.'[३] उदारमतवादी लोकशाही परंपरा असतील तर केवळ फारकत आहे की नाही याला अवास्तव महत्त्व देण्याचे कारण नाही. उदा. इंग्लंड, तेथे अधिकृत चर्चही आहे त्याला मोठी शासकीय मदतही आहे. तसेच धार्मिक सहिष्णुता आणि उदारमतवादी लोकशाही परंपरा आहेत.

प्रादेशिक भाषांचा विकास त्यातून निर्माण झालेली राष्ट्रभावना, विद्यापीठांची स्थापना, त्याद्वारे झालेली व्यक्तीवादी तत्त्ववेत्त्याची, धर्मस्वातंत्र्याची व सहिष्णुतेची चळवळ या सर्व कारणांनी पश्चिम यूरोपमधील रोमन धर्मपीठाचे वर्चस्व नष्ट झाले. ते प्रबोधन युगाचे एक वैशिष्टच होय. तेही केवळ अभावात्मक वैशिष्टच होते. विज्ञानाची अधिसत्ता प्रस्थापित करणे ही त्याची भावात्मक बाजू होय. पैकी अभावात्मक बाजू प्रथम सुरू झाली. त्यानंतर प्रबोधन युगास व इहवादाच्या उदयास प्रारंभ झाला.[४]

याचा अर्थ असा मात्र नव्हे की इहवाद धर्मविरोधी आहे. मानवाच्या ऐहिक जीवनातील प्रश्न सोडविण्याकरिता, त्याचे नियमन अगर मार्गदर्शन करण्याचा धर्माला अधिकार नाही. मानवाचे पारलौकिक जीवन हे त्याचे कार्यक्षेत्र आहे. एवढीच त्याची भूमिका आहे. त्या क्षेत्रात इहवाद कधीच

हस्तक्षेप करीत नाही. त्यामुळे धर्म आणि इहवाद यामध्ये विरोध निर्माण होण्याचा प्रश्नच येत नाही. निरनिराळ्या धर्मांच्या बाबतीत तटस्थता अगर सहिष्णुता बाळगणे हा त्याचा अर्थ कधीच नव्हता व होऊही शकणार नाही. ती केवळ धर्मातीतता 'अगर' धर्मनिरपेक्षता होईल. इहवाद नव्हे ते लक्षात घेतले पाहिजे. धर्मनिरपेक्षता म्हणजे इहवाद नव्हे. हे तर डॉ. राधाकृष्णन यांनीच सांगितले आहे.[५] इहवादाचा अर्थ किती व्यापक आहे ते आपण मागील प्रकरणात पाहिले आहे. श्री. लेरवी म्हणतात त्याप्रमाणे प्रायोगिक ज्ञानाचा उपयोग करून सर्व प्रश्नाचा निर्णय करणे हे इहवादाची कसोटी मानली तर व्यक्तीवाद, बुद्धिवाद, मानवतावाद यांचा समावेश इहवादामध्ये करावा लागतो. लोकशाहीची संकल्पना याच मूल्यावर आधारलेली आहे. म्हणून इहवाद व लोकशाही सहचारी कल्पना ठरतात. श्री. एम. सी. सेटलवाड यांचे मतही याच विचारांना पाठिंबा देते.

डॉ. राधाकृष्णन म्हणतात त्याप्रमाणे देवाच्या अस्तीत्वावर श्रद्धा हे जीवनाचे मूलतत्व मानणे, ही केवळ भारतीयांची परंपरा नाही. आधुनिक युगाच्या उदयापर्यंत सबंध जगाचीच ती परंपरा होती. आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीमुळेच व प्रसारामुळे पाश्चात्य देशातून ती परंपरा नाहीशी होत चालली असल्याचे श्री. सेटलवाड यांच्या विचारावरून स्पष्ट होते. तो ज्ञानप्रसार अद्याप आपणाकडे झाला नाही. म्हणून आमचेकडे ती परंपरा मोठ्या प्रमाणात दिसून येते. यांत पाश्चात्य पौर्वात्य असा प्रश्न नाही. पाश्चात्य पौर्वात्य असा संस्कृतीत फरक करणे चुकीचे आहे.[६] असे डॉ. राधाकृष्णन यांनीच सांगितले आहे. मग तीच चूक ते स्वतः कशी करीत आहेत ?

---

संदर्भ : १. पुष्पा त्रिलोकेकर – लोकप्रभा – १७-१-८८
२. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे–इहवादी शासन पा. नं. ८९
३. मा. अ. भि. शहा Challanges to Secularism पा. नं. १६५
४. बरट्रांड रसेल-पाश्चात्य तत्वज्ञानाचा इतिहास
५. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन – योजना मासिक १८-८-८८, पृ. ४ क्र. १४
६. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन – योजना मासिक १८-८-८८, पृ. क्र. १७

# ५

# प्रबोधनाची चळवळ

रोमन धर्मपीठाचे वर्चस्व कां व कसे नष्ट झाले हे पाहिले. आता विज्ञानाची अधिसत्ता कशी प्रस्थापित झाली ते समजून घ्यावयाचे आहे. कारण प्रबोधन युगानेच इहवादाच्या उदयास प्रारंभ झाला आहे.

## १. ग्रीक विद्येचे पुनरुज्जीवन

ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळेच तेराव्या शतकांत पश्चिम युरोपांत इह-वादाचा उदय होत होता किंवा त्याचेही पुनरुज्जीवन होत होते असे म्हणणेच योग्य होईल. कारण प्राचीन काळी ग्रीक लोक पूर्णपणे इहवादी होते. याचा अर्थ ते अधार्मिक होते असा नाही. ते पूर्णपणे धर्मनिष्ठच होते. पण संघटित पुरोहित वर्गाच्या सत्तेची जखडबंदी त्यांचे जीवनावर कधीच नव्हती. ग्रीकांनी ग्रंथप्रामाण्य कधीच मानले नाही. राजकारणांत धर्माचा हस्तक्षेपही कधी होऊ दिला नाही. ते पराकाष्ठेचे समूहजीवनवादी होते. राजकीय प्रगल्भता त्यांच्यात कळसास पोहोचली होती. लोकसत्ता, महाजनसत्ता, एकसत्ता अशा सर्व प्रका-रच्या राजकीय संस्थांचे ते प्रयोग करीत. तीव्र इहनिष्ठेवाचून हे घडले नसते. सॉक्रेटिस हा महापुरुष सर्व पाश्चात्य संस्कृतीचे प्रतीक म्हणून आपणांपुढे

उभा आहे. बुद्धिस्वातंत्र्य, विवेकनिष्ठा हा इहवादाचा आत्मा. तेच ग्रीक संस्कृतीचे आद्य तत्व होते. ग्रीक विद्येचे तेराव्या शतकांत युरोपांत पुनरुज्जीवन होत होते, तेव्हा त्यावेळच्या नेत्यांनी अनास्थीगोरास, पायथागोरास, युक्लिड, हिपोक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल आदि असंख्य थोर पुरुषापासून गणित, ज्योतिष, वैद्यक, इतिहास, राजनीती, रसायन, वनस्पतिशास्त्र, पदार्थविज्ञान आदि विद्यांचे धडे घेतले. आणि युरोपियन संस्कृतीचा पाया घातला. त्या प्रबोधन युगांत जे तत्वज्ञान सिद्ध झाले, तेच आज जगाने स्विकारले आहे. म्हणून तेराव्या शतकांत उदयांस आलेल्या इहवादाचा मूळ प्रारंभ इसवी सनापूर्वी सहाव्या, सातव्या शतकांत ग्रीक भूमीत झाला ते विसरून चालणार नाही.

मार्सिग्लिओ व विल्यम डुबाईस या ॲरिस्टॉटलच्या शिष्यांनी पुढाकार घेऊन ग्रीक विद्येच्या अभ्यासाला चालना दिली. १४ व्या शतकांत पेट्रार्क (१३०४–१३७४) याने व त्याच्या अनुयायांनी शाळाशाळांतून वर्ग चालवून, व्याख्याने देऊन, ग्रंथालये स्थापून ग्रीक विद्येचे संस्कार सर्व पश्चिम युरोपभर पसरविले. इ. स. १३४० ते १५४० हा इटलीचा प्रबोधन युगाचा काळ होय. फ्लॉरेन्स, व्हेनिस, मिलान या नगरराज्यांत व रोममध्ये विद्या, कला, साहित्य यांना ग्रीससारखाच बहर आला होता. पेट्रॉर्क, लिओनार्डो-दा-व्हिंची, डांटे, बोकॅशिओ, मायकेल एंजेलो, लॉरेन्झो, मॅकियाव्हिली या इटालियन मानव संपत्तीने डोळे दिपून जातात.

इटलीनंतर शंभर वर्षांनी इ. स. १४५० ते १५०० चे सुमारास प्रबोधनाचे युग जर्मनीत अवतरले. आठ ज्ञानपीठे या कालांत जर्मनीत स्थापन झाली. जर्मन विद्वत्ता पांडित्य, शास्त्राभ्यास यांचा पाया त्यामुळे घातला गेला. गटेनबर्ग याने मुद्रण कला शोधून काढली. प्रबोधन युगाला ही सर्वांत मोठी देणगी होय. त्याचप्रमाणे स्थापत्य, शिल्प, संगीत, चित्र या कलांनीही चांगली प्रगती केली. निकोलस क्रेब्ज (१४०१–६४) हा जर्मन प्रबोधनाचे प्रतीक मानला जातो. गणित, तत्वज्ञान, तर्कशास्त्र यांत तो कोपर्निकस, हेगेल व देकार्त ह्यांचा पूर्वगामी मानण्यांत येतो. मुद्रणकलेच्या शोधामुळे ॲग्रीकोला, रुश्लिन व व्हॉन हटन यांनी इटलीतून आणलेले प्रबोधन वाङमय सामान्य वाचकाला उपलब्ध

होऊ शकले. जर्मन प्रबोधनाची सुरुवात म्हणजे इरॅस्मसचे वाङ्मय होय. त्याच्या वाङ्मयाचे मुख्य वैशिष्टच म्हणजे धार्मिक विचार पद्धतीविषयी असंतोष आणि धर्मसुधारणेची आवश्यकता ही होय. सहिष्णुतेचा द्रष्टा व मानवतावादी विद्या लोकप्रिय करणारा उत्तम शिक्षक अशी त्याची ख्याती होती. 'इन प्रेज ऑफ फॉली' हा त्याचा ग्रंथ फार प्रख्यात आहे.

## २. विज्ञानाचे पुनरुज्जीवन

प्रबोधनाची ही प्रक्रिया दीर्घकालीन होती. रॉजर बेकन आणि अल्बर्टस मॅग्नस यांच्या अविरत प्रयत्नाने एक शतक आधीच विज्ञानाचे पुनरुज्जीवन सुरु झाले होते. त्यांना अरब पंडिताकडून स्फूर्ति मिळाली होती. इ. स. ८०० मध्ये हरून अल् रशिद याने टॉलेमीचा 'अलमॅजेस्ट' या खगोलशास्त्रीय ग्रंथाचा जीर्णोद्धार केला होता. अरबांचे हे नवे शास्त्रीय ज्ञान कोपर्निकसचा युगप्रवर्तक ग्रंथ प्रसिद्ध होण्याआधी कित्येक शतके युरोपांत पोहोचले होते. 'पृथ्वी स्थिर असून सूर्य तिच्या भोवती फिरतो' हा टॉलेमीचा सिद्धांत खोटा ठरवून 'सूर्य हा विश्वाचे केंद्र असून पृथ्वी त्याचेभोवती फिरते' असा क्रांतिकारक सिद्धांत कोपर्निकस (१४७३–१५४३) या पोलिश शास्त्रज्ञाने सांगितला. याची चाहूल १३ व्या शतकांत रॉजर बेकन (१२१४–१२८४) याला लागली होती. फ्रान्सिस्कन पंथाचा हा धर्मगुरु होता. प्रस्थापित धर्माची मते न मानता अवलोकन व प्रयोग याद्वारे स्वतंत्र बुद्धीने सत्याचा शोध घ्यावा अशी ज्ञानपद्धती त्याने उपदेशिली. म्हणून त्याला 'आधुनिक युगाचा प्रवर्तक' मानतात. चाक्षुस विज्ञान, परावर्तनाचे नियम, इंद्रधनुष्य, गुरुदर्शक भिंग हे त्याचे संशोधनाचे विषय होते. खगोलाचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करून, त्याने पंचांगाची सुधारणा केली. गणित, हवामान, वनस्पतिजीवन आदि विषयांत त्याला गति होती.

त्याची मते पाखंडी ठरवून धर्मपीठाने त्याला २४ वर्षे कारागृहात डांबून ठेवले, प्रयोगसिद्ध ज्ञान व धर्मपीठ सम्मत ज्ञान यांचा झगडा येथूनच सुरु झाला कोपर्निकसची खगोलविज्ञानाची परंपरा टायकोब्राही, केपलर, गॅलिलिओ, न्यूटन या थोर शास्त्रज्ञांनी चालविली. टायकोब्राही याने एक नवा तारा शोधून

काढला. केपलरने गतीच्या नियमाचे स्थूल स्वरुप निश्चित केले. न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत याच पायावर पुढे उभा राहिला. गॅलिलीओने दुर्बिण-सिद्ध करून सर्व अंतरिक्ष सूक्ष्मपणे न्याहाळण्याची सोय करून दिली. चंद्रावरचे डोंगर, सूर्यावरचे डाग, गुरुचे उपग्रह, शनिची कडी, शुक्राच्या कला असे अद्‌भुत चमत्कार त्याने दुर्बिणीतून स्वतः पाहिले व लोकांना दाखविले. गॅलिलीओने 'जगाच्या दोन पद्धती विषयी प्रबंध' या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात 'सूर्य–केंद्र–वाद' मोठ्या समर्पकरितीने मांडला आहे. त्यामुळे आधुनिक खगोलशास्त्र व भौतिकशास्त्र (फिजिक्स) यांचा पाया घातला. त्यावर भौतिकशास्त्र उभे राहिले. कोलंबसने लावलेला अमेरिकेचा शोध, मॅगलनची पृथ्वी प्रदक्षिणा व वास्को-द-गामाचे भारतातील आगमन यामुळे पृथ्वी गोल असल्याचे प्रत्यक्ष सिद्ध झाले. बायबलच्या पुराणकथेवर हा भयानक आघातच होता. विज्ञानाच्या या प्रगतीने 'यांत्रिक विश्वविज्ञानाचा' व 'नियमवद्ध विश्वाच्या कल्पनेचा पाया घातला गेला. त्यामुळे पूर्वसंकेतानुसार व संचितानुसार धर्मपीठाकडून विश्वाचे नियमन होते या धार्मिक श्रद्धेला हादरा बसला, गॅलिलिओच्या या ज्ञानामुळे व लोकप्रियतेमुळे धर्मपीठाचे पित्त खवळले. त्याने त्याला पकडले. 'माझे सिद्धांत खोटे आहेत' असे लिहून देण्यास फर्माविले. गॅलिलिओ वृद्ध असल्यामुळे त्याने तसे लिहून देऊन आपला बचाव केला. जिवोरॅडनो ब्रुनो (१५४८ ते १६००) या शास्त्रज्ञाने पृथ्वीच्या भ्रमणाचा सिद्धांत सांगितल्या-बद्दल त्याला जिवंत जाळण्यात आले. (इ. स. १६००)

### ३. रसायन वनस्पती व शरीरविज्ञान

लिओनार्डो-दा-व्हिन्ची (१४५२–१५१९) हा रसायन, पदार्थविज्ञान, शरीरविज्ञान, जीवशास्त्र, गणित, ज्योतिष, भूगोल, खगोलशास्त्र या सर्व शास्त्रांत आणि चित्र, शिल्प आणि संगीत या कलांमध्ये पूर्ण पारंगत होता. त्याचे ग्रंथ व टिप्पणे १९ व्या शतकात प्रसिद्ध झाली. त्याने मानवी देहाचे विच्छेदन केले होते. विमानाचा नमुना तयार करुन ते आकाशांत उडविण्याचा प्रयत्न केला होता. शिवाय तो तत्त्ववेत्ताही होता.

सालेर्नो व बोलोना ही वैद्यक शास्त्राच्या अध्ययनाची महत्त्वाची केंद्रे होती. किमयेची जागा वैद्यक रसायनाने घेतली. त्यामुळे रोग बरे करण्याच्या शास्त्राची वाढ झाली. अँड्रिस, व्हॅसेलिअस याचा 'मानवी शरीर' हा प्रबंध कोपर्निकसच्या सुप्रसिद्ध ग्रंथाच्या वेळीच प्रसिद्ध झाला. हा फ्लेमीश शास्त्रज्ञ, ग्रीक शास्त्रज्ञ गॅलन याच्या त्याकाळी रुढ असलेल्या २०० चुका याने दुरुस्त केल्या. याला 'आधुनिक शरीरविज्ञानाचा जनक' मानण्यांत येते.

ॲस्पिनी प्रॉस्पेरो – (१५५३–१६१७) : हा इटालियन वनस्पतिशास्त्रज्ञ, युरोप, इजिप्त, हिंडून त्याने वनस्पतीचा अभ्यास केला. कॉफी, खजूर, वनस्पतीची नरमादी भिन्न करुन दाखविणे यांचा विशेष अभ्यास केला.

अल्बर्टस् मॅगनस – (११९३–१२८०) याला रॉजर बेकन याचे खालोखाल मान्यता मिळते. तो अत्यंत धर्मनिष्ठ असला तरी त्याने आपले सर्व आयुष्य विज्ञानव्यासंगात घालविले. पदार्थविज्ञान, निसर्गशास्त्र यांतील विषयांवर त्याने अनेक ग्रंथ लिहिले. जादूच्या विद्येत श्रेष्ठ, तत्त्वज्ञानांत श्रेष्ठ तर आणि धर्मशास्त्रात श्रेष्ठतम असा त्याचा लौकिक आहे.

### ४. तत्त्वज्ञान

निसर्गज्ञानाचा प्रसार होऊ लागला. नवे नवे शोध लागू लागले. तसे देकार्त, मॉटेन, बॉयले यांसारखे तत्त्ववेत्ते उदयास आले व त्यांनी हिरिरीने बुद्धिवादाचा प्रसार केला. देकार्त (१५९६ ते १६५०) अर्वाचीन तत्त्वज्ञानाचा जनक मानला जातो. कोणताही सिद्धान्त प्रथम शंका घेऊन, आक्षेप घेऊन मगच त्याचा विचार केला पाहिजे. असे देकार्त व पिअरी बॉयले यांचे प्रतिपादन असे. बॉयले (१६४७–१७०६) हा व्हॉल्टेअरचा गुरु मानला जातो. वैज्ञानिक विचार पद्धतीचा या दोघांनी पाया घातला. या सर्व तत्त्ववेत्त्यांचा मुकुटमणी इंग्लिश शास्त्रज्ञ फ्रान्सिस बेकन (१५६१–१६२६) हा होय. त्याने 'ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग', 'नोव्हम ऑर्गनम्', 'नॅचरल हिस्ट्री' हे ग्रंथ लिहिले. विज्ञानाच्या व ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनाइतकेच 'प्राचीन इतिहासाचा शोध' हेही प्रबोधनाचे महत्त्वाचे अंग होते. पेट्रार्क व इरॅस्मस् या दोन

मानवतावादी थोर पुरुषांच्या दरम्यान दिडशे वर्षाचे अंतर होते. त्या काळांत होऊन गेलेले कवी, चित्रकार, समीक्षक, निबंधकार, इतिहासकार आणि तत्त्ववेत्ते या सर्वांचा यामध्ये सहभाग होता. जीवनाचा आनंद उपभोगण्यासाठी कीर्ती, सौंदर्य आणि साहस ही प्राप्त करुन घेण्याची संधी मिळणे यातच जीवनाचा आनंद मानणारी ही सर्व कलावंत मंडळी होती. कला, काव्य, आणि आनंद यांच्या रणधुमाळीत ज्यांना जीवनाचे सार्थक मानणारी ती मंडळी होती. यासाठी प्रबोधनाच्या विविध अंगाच्या व लक्षणांचा आपणांस परिचय करून घेतला पाहिजे.

## ५. नीति, सौंदर्य आणि प्रबोधन

'नीती आणि सौंदर्य यांच्यातील संबंधाची समस्या' निर्भयपणे मांडून मानवाच्या चिकित्सक प्रवृत्तीला चालना देणे हे प्रबोधनाच्या संस्कृतीचे ठळक लक्षण होते. मध्ययुगीन ख्रिस्ती संस्कृतीने 'सद्वर्तन म्हणजे संन्यस्तवृत्ती' असे समीकरण बनविले होते. जग हा 'अश्रूंचा डोह' असून त्यांतील प्रत्येक गोष्ट पापमय आहे. म्हणून जीवनातील मोहांचा जितका अधिक त्याग मानव करील, तितका तो देवाच्या जवळ अधिक जाऊन पोहोचेल व पापमुक्त होईल अशी ख्रिश्चन धर्माची शिकवणुक होती. पण आपली प्रतिकृती म्हणून देवाने जर माणसाला निर्माण केले असेल, तर मग त्याचा पार्थीव देह अशुद्ध असणे, त्याच्या इच्छा पापी असणे, त्यांची इच्छापूर्ती अनैतिक असणे, शक्य नाही. म्हणून संन्यस्तवृत्ती किंवा जीवनविन्मुखता ही नीती नसून निसर्गवाद हाच नीतीचा पाया आहे. मानव हा निसर्गाचा अंश असल्यामुळे निसर्गाच्या देणग्यांचा त्याच्या नियमानुसार उपभोग घेणे हेच सद्वर्तन आहे. सौंदर्यवाद व नीतीची ही निसर्गवादी कल्पना परस्पर सुसंगत आहे. एका जुन्या समस्येचा व्यावहारिक उलगडा करुन प्रबोधनाने कलेच्या विकासाला गती दिली. 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' हे वचन सिद्ध केले.

### प्रबोधन व कला

निसर्गाचे शास्त्रीय निरीक्षण हा प्रबोधन कलेचा पाया होता. पण ख्रिस्ती नीती शास्त्रांशी हे सुसंगत नव्हते. मानवतावाद्यांना कला ही नैतिक सत्याचे

द्योतक वाटत होती. ती रुपकात्मक होती. प्रबोधनाची कला निसर्गाचे केवळ अनुकरण नव्हते. तर वास्तवाचे संशोधन होते. निसर्गवाद याचा अर्थ निसर्गातील घटनेमागे, इंद्रियातीत गुढ शक्ति असते. ही अंध समजूत झिडकारणे, असा आहे. हा निसर्गवादच प्रबोधन कलेचे स्फूर्तीस्थान होते. ती एक नैतिक प्रवृत्ती होती. प्रबोधन केलेने स्वयंस्फूर्त इहवादी नीतीचा सिद्धांत सूचित केला होता. नंतरच्या काळातील जीवशास्त्रीय ज्ञानामुळे या विचारांना पुष्टी मिळाली.

## ६. प्रबोधनयुगाची प्रमुख लक्षणे

### (अ) बुद्धीवाद

स्वत: अवलोकन करणे, प्रयोग करणे, उपलब्ध ज्ञानाची पूर्वीच्या ग्रंथातील सिद्धांताशी व रूढ विचाराशी, चिकित्सा करून मगच सत्यासत्य निर्णय करणे हे प्रबोधनयुगाचे पहिले लक्षण होय. ग्रीक विद्येमुळे लोकांना ही नवी दृष्टी मिळाली. या नव्या दृष्टीतून आता भूगोल, खगोल, निसर्ग व मानवी शरीर यांचा विचार होऊ लागला. ११ व्या शतकापासून यूरोपमधील विद्यापीठातून जिज्ञासावृत्ती व बुद्धिवाद रूजत होता, शार्लेमेनच्या कारकीर्दीत लहान प्रमाणावर सुरू झालेल्या उपक्रमाचे पुढे पॅरिसच्या विद्यापीठांत रूपांतर झाले. याच विद्यापीठाच्या व्यासपीठावर 'नामतत्ववाद' व 'वस्तुतत्ववाद' यांच्यात वादविवादाच्या फैरी झडत असत. हे वादविवाद म्हणजे तत्कालिन बौद्धिक क्षोभाचे आविष्कार होते. रासेलिनस्, अॅबेलॉर्ड, अॅनस्लेम आणि ओकॅम यांच्यासारखे नामतत्ववादी, मानवतावादाचे व बुद्धिवादाचे समर्थक होते. ही सर्व माणसे पाद्री वर्गापैकी असून धार्मिक वातावरणांत वाढलेली होती. त्यांच्यापैकीच एका गटाने बाराव्या शतकांत ऑक्सफर्ड विद्यापीठाची स्थापना केली. त्यानंतर पाठोपाठ फ्रान्स, इटली आणि इंग्लंड येथे अनेक विद्यापीठे निर्माण झाली. त्यातून विचार रुजत होते व प्रबोधनाचे रूपाने प्रगट होत होते. याचा परिणाम असा झाला की, धर्मग्रंथात सांगितलेले सिद्धांत, विचार व मते चुकीची आहेत असे लोकांचे लक्षात आले.

### (ब) मानवतावाद

सहिष्णुता, उदारमतवाद, सामाजिक न्याय, समता, प्रवृत्तीपरता आशावाद या सर्वांचा समावेश मानवधर्म किंवा मानवतावादामध्ये होतो. हे प्रबोधन-युगाचे दुसरे लक्षण होय. मानवतावाद आणि विश्वमानवतावाद हे प्रबोधन संस्कृतीचे तर्कदृष्टचा संबद्ध असे दोन पैलू आहेत. डांटे सारे जगच माझा देश आहे असे म्हणत असे. 'जगातील सर्व गोष्टी, ( समाज, धर्म, शासन वगैरे ) मानवाने निर्माण केलेले असून मानवाच्या सुखासाठी, हितासाठी व स्वातंत्र्या-साठी त्या आहेत. म्हणून मानवाच्या हितासाठी त्यांत बदल करण्याचे अधिकार त्यालाच आहेत. मनुष्य सर्व वस्तूंचा मानदंड आहे. हे पायथा-गोरसचे विधान मानवतावादाची कल्पना स्पष्ट करते. पेट्रार्क, ईरॅस्मस, थॉमस मूर व कॉलेट हे प्रबोधनयुगांतले प्रसिद्ध मानवतावादी पुरुष होत. युरोपांतील उदारमतवादाचा इरॅस्मस हा संस्थापक होता.

### (क) व्यक्तिवाद

प्रबोधन संस्कृती व्यक्तिवादी होती. म्हणूनच विमोचनासाठी झालेल्या सर्व आंदोलनांना त्याचेपासून स्फूर्ति मिळाली. व्यक्तिच्या प्रतिष्ठेचा आदर, मानवाच्या सृजनशीलतेवर श्रद्धा आणि इच्छा स्वातंत्र्याचे उत्कटतेने रक्षण ही प्रबोधन संस्कृतीची वैशिष्टचे प्राचीन वाङमयाच्या अभ्यासातून निर्माण झाली होती. व्यक्तित्वाच्या सर्वोच्च विकासाला या काळात अग्रस्थान प्राप्त झाले होते. (बुरघार्ट-रिनेसन्स) व्यक्ती आणि समाज, व्यक्ती आणि शासन, व्यक्ती आणि धर्म यांचे परस्परांचे संबंधांत व्यक्तीचे प्राथम्य हा यातील महत्वाचा विचार आहे. व्यक्तिच्या सार्वभौमत्वाची कल्पना यांतूनच निर्माण झाली आहे.

### (ड) औद्योगिक क्रांती

१८ व्या शतकाचे अखेरीस इंग्लंडमध्ये व त्यानंतर सर्व युरोपात औद्योगिक क्रांती झाली. अपार धनसमृद्धि प्राप्त करून घेणे मानवाला त्यामुळे शक्य झाले. अर्थशास्त्र व भौतिक विज्ञान यांची १८ व्या शतकात जी वाढ झाली. त्याशिवाय औद्योगिक क्रांती शक्य झाली नसती असे अनेक पंडितांचे मत आहे.

(इ) **राजकारण**

१३ व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रभावना उदयास आली. त्यामुळे राजकारणाला इहवादी स्वरूप प्राप्त होऊ लागले. पण त्यावेळी 'देवदत्त राजसत्तेचे तत्व' ही उदयास आल्यामुळे इहवादीवृत्तीचा विकास झपाट्याने होऊ शकला नाही. पण त्यानंतर 'सामाजिक कराराच्या तत्वाचा' उदय झाल्यामुळे देवदत्त राजसत्तेच्या कल्पनेचा लोप झाला. 'मानव निसर्गतः समान व स्वतंत्र असून समाजाच्या रक्षणासाठी त्याने राजाशी करार करून त्याला काही सत्ता व अधिकार दिले व स्वतःवर कायद्याची बंधने घेतली.' असा हा करार तत्वाचा अर्थ आहे. यामुळे राजकारणाच्या ऐहिकीकरणास सुरुवात झाली. रुसो हा या तत्वाचा जनक मानला जातो. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, जनतेचे सार्वभौमत्व आणि सामाजिक कराराचे तत्व यांचा रुसोने प्रसार केल्यामुळे फ्रेंच राज्यक्रांतीचा भडका उडू शकला. त्याआधी हॉब्ज व लॉक हे इंग्लिश राज्यशास्त्रज्ञ या तत्वांचे प्रतिपादन करीत होते. ह्यूम, रुसो, व्हॉल्टेअर, मॉन्टेस्क्यू, थॉमसपेन यांनी राजकारणातून दैवीसत्तेच्या कल्पनेचा उच्छेद केला. 'राईटस् ऑफ मॅन', 'एज ऑफ रीझन' हे थॉमस पेनचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यामुळे १८ व्या शतकाला 'बुद्धिवादाचे युग' म्हणण्याची प्रथा पडली आहे.

---

*संदर्भ* : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, – इहवादी शासन पृ. नं. ८२-८३

# ६

# धर्म आणि इहवाद

भारताने 'इहवादी शासनपद्धती' (Secular State) स्वीकारली आहे. तथापि इहवादाचा अर्थ घटनेत दिलेला नसल्यामुळे 'पानी तेरा रंग कैसा जिसमे मिलाये वैसा' या उक्तीप्रमाणे प्रत्येकजण आपल्या उत्तम समजुतीप्रमाणे त्याचा वेगवेगळा अर्थ करीत असतो.

**इहवादाची भूमिका**

तथापि सिक्युलॅरिझम किंवा इहवादाचा अर्थ अनेक मार्गांनी आपण निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे व्यक्तीच्या पारलौकिक जीवनापुरते किंवा व्यक्ती आणि ईश्वर यांच्या संबंधापुरते धर्माचे कार्यक्षेत्र मर्यादित आहे. व्यक्तीचे लौकिक जीवन हे शासनाचे कार्यक्षेत्र आहे. विवाह, घटस्फोट, वारसा, कुटुंबसंस्था, नीति वगैरे बाबी व्यक्तीच्या लौकिक जीवनांतील असल्यामुळे त्याबाबत कायदे करण्याचा अधिकार शासनाचा आहे. धर्माला त्यांत हस्तक्षेप अगर मार्गदर्शन करण्याचा अधिकार नाही, अशी इहवादाची भूमिका असल्याचे आपण पाहिले पण यामध्ये दोन अडचणी येतात.

**धर्माची भूमिका**

(१) कोणत्याही धर्माला हे मान्य नाही. लौकिक व पारलौकिक अशी मानवी जीवनाची काटेकोर विभागणी करणे व लौकिक जीवन हे शासनाचे कार्यक्षेत्र आणि पारलौकिक जीवन हे धर्माचे कार्यक्षेत्र ठरविणे कोणताच धर्म मान्य करीत नाही. त्याच्या मते ऐहिक पारलौकिक सगळयाच मानवी जीवनाला धर्माची आवश्यकता आहे. ज्याच्यायोगे माणसाला अभ्युदय व निःश्रेयस यांची प्राप्ती होते तो धर्म, असे महर्षी कणादांनी वैशेषिक दर्शनांत सांगितले आहे. अभ्युदय म्हणजे लौकिक व पारलौकिक आनंद आणि निःश्रेयस म्हणजे मोक्ष. हेच मानवी जीवनाचे अंतिम साध्य होय. 'उभौ लोकौ अभिजयति' असे आपस्तंभ धर्मसूत्रामध्ये म्हटले आहे.[१] वर्णाश्रम धर्माने दोन्ही लोक जिंकता येतात अशी धर्मशास्त्राची फलश्रुती सांगितली आहे. कांही वेळा धार्मिक माणसेसुद्धां धर्म ही पारलौकिक बाब आहे, असे म्हणतात. त्यावेळी त्यांचा अर्थ अगदी निराळा असतो. इहलोकांत काय पुण्य मानावे, काय पाप मानावे यांचा विचार करणेचा अधिकार इहलौकिक जीवन जगणाऱ्यांचा नसून याबाबत परलोकांतून आलेले निर्णयच फक्त स्वीकारार्ह आहेत. असे त्यांना सांगायचे असते. उदाहरणार्थ हिंदू समाजांतील सगळी जातीव्यवस्था धर्माच्या मान्यतेवरच उभी आहे. तसेच परलोकाच्या नांवे चालणारा इहलोकीचा सर्व व्यवहार ही धर्माची कक्षा असते. असे त्यांचे मत आहे. मेल्यानंतर जीवात्म्याचे काय व्हायचे किंवा काय व्हावे, हा प्रश्न वाटतो तितका साधा नाही. कारण मृत्यूनंतर जीव देहबंधनांतून मोकळा होतो, इहलोकी केलेल्या पापपुण्यांतून मोकळा होत नाही. मृत्यूनंतर जीवाला परलोकी जे फळ मिळायचे, ते इहलोकीच्या कर्मानुसार असते. म्हणून इहलोकांत कोणते कर्म पुण्य मानावे, कोणते पाप मानावे हे धर्म सांगत असतो.'[२] याचा अर्थ समाजधारणेची मूल्ये देण्याचा अधिकार धर्माचा आहे अशी त्याची भूमिका आहे. धारणात् धर्मः इत्याहुः । धर्मेण विधृताःप्रजा ॥ यःस्याद्धारण संयुक्तः । स धर्मः इति निश्चयः ॥ असे महाभारतांत (शांती) महर्षी व्यासांनी म्हटलेलेच आहे. धारणसंयुक्त असतो तोच धर्म.[३] होय, असे असतांना माणसाच्या लौकिक जीवनांसाठी धर्माची गरज नाही असे म्हणणे अज्ञानमूलक आहे. सर्वच धर्माची

अशीच भूमिका आहे. आणि धर्मश्रद्धांचा प्रभाव भारतीय जनमनावर आहे. त्यामुळे इहवादाच्या विकासाला अनुकूल वातावरण भारतांत निर्माण होणे कठीण झाले आहे. इहवादाची आणि धर्माची भूमिका परस्पर विसंगत आहेत, असे यावरुन दिसून येईल.

(२) भारताची राज्यघटना इहवादी आहे तशीच लोकसत्ताकही आहे. 'यथा प्रजा तथा राजा' हा लोकशाहीचा नियमच आहे. पण भारतीय शासन 'इहवादी तर समाज धर्मश्रद्ध' अशी स्थिती आहे. मग या दोघांचा मेळ कसा बसायचा ? त्यांतही भारतांतील दोन्ही धर्म–हिंदु व मुसलमान–सर्वंकष स्वरुपाचे (म्हणजे मानवी जीवनाच्या सर्वच अंगोपांगाना काटेकोर धर्म-नियमांनी बद्ध करणारे) असल्यामुळे अधिकच गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

जन्माने पाश्चात्य असलेला इहवाद इंग्रजी शिक्षणाचे द्वारे भारतांत आला. त्यांतून प्रबोधनाची व धर्मसुधारणेची चळवळ सुरुं झाली. तिला थोडा जोम प्राप्त होतो न होतो, तेवढ्यांत लाल-बाल-पालांच्या राजकीय चळवळीचा तीवर वरचष्मा झाला. त्यामुळे भारतीय समाजाला अंध धर्मश्रद्धांच्या प्रभावा-तून मुक्त करुन इहवादी बनविणेचे कार्य अर्धवटच झाले. स्वातंत्र्यानंतर येथील शासन इहवादी झाले. पण समाज पूर्वीपासूनच धर्मश्रद्ध, दैववादी व कर्मठ होता तसाच राहिला. यूरोपमध्ये प्रबोधनाच्या व धर्मसुधारणांच्या चळवळीतून आधी समाज इहवादी झाला व त्याचा परिणाम म्हणून शासन नंतर इहवादी झाले. भारतांत मात्र ही प्रक्रिया उलटी घडली आहे. यांतून ही गुंतागुंत निर्माण झाली.

अपेक्षा अशी होती की इहवादी शासन जनतेला लवकरच इहवादी बनवील. कारण जनता इहवादी बनल्याशिवाय शासन इहवादी कसे राहूं शकेल ? पण इहवादी शासनाला अनेक कारणामुळे ते करता आले नाही. साहजिकच धर्मश्रद्ध समाजाचा प्रभाव शासनावर पडून शासनाचा इहवाद भ्रष्ट झाला.

इहवादापासून हळूहळू तेच ढळू लागले व त्याचा शेवट शासन सर्वधर्मसमभावी झाले. त्यामुळे घटनेच्या ४४ कलमान्वये शासनावर टाकलेली समान नागरी कायदा करणेची जबाबदारी गेल्या चाळीस वर्षात शासन पार पाडू शकले नाही. इतकेच नव्हे तर मुस्लीम घटस्फोटीत स्त्रियांना पोटगी देण्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असूनही तो डावलण्यासाठी घटनादुरुस्ती करण्यापर्यंत या शासनाची मजल गेली. सिक्युलॅरिझमचा अर्थ सर्वधर्मसमभाव करण्यांत आल्याची ही तर्कशुद्ध परिणतीच आहे. अशीच धोरणे यापुढेही चालू राहिली तर त्याचा परिणाम कोठवर जाईल, ते पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ता. १२-१०-१९४७ च्या पत्रकार परिषदेत सांगितले होते. ते म्हणाले होते 'आपणांस इहवादी, धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करावयाचे आहे. त्यांत भारताच्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या जातीधर्माचा विचार न करतां, समान हक्क व समान संधी मिळतील. देशाच्या भौगोलिक ऐक्याच्या व अखंडत्वाच्या दृष्टिने व लोकशाही समाज उभारण्याच्या आपल्या ध्येयाच्या दृष्टीनेही त्याची गरज आहे.'[४] हा गर्भित इशारा गेल्या पंचवीस तीस वर्षात डावलला गेल्याचे दुष्परिणामच आपण पंजाब-समस्येच्या व विविध सेनांच्या रुपाने भोगत नाही काय ?

काहीं लोकांना कदाचित असे वाटण्याचा संभव आहे, की 'सर्वधर्मसमभाव' याचा अर्थ सर्व धर्माविषयी लोकांनी व शासनाने समान आदर बाळगावा' असेच म. गांधी सांगत होते. तसेच शासनाने धर्माच्या बाबतीत तटस्थ राहिले पाहिजे असेही ते सांगत. यांत लोकशाहीला व राष्ट्रीय ऐक्याला धोका कोठे व कसा आला ? ही शंका प्रामाणिकपणाची आहे यांत शंका नाही. पण त्यांत धर्माच्या स्वरुपाविषयी व त्याच्यापासून जो जातीयवादाचा धोका निर्माण होतो, त्याविषयी गैरसमज दिसून येतात म्हणून आपण भारतांतील दोन्ही प्रमुख धर्माचे–हिंदु व मुसलमान–स्वरुप समजून घेऊ. त्यामुळे त्यांच्यापासून जातीयवादाचा जो धोका निर्माण होतो आहे तो आपोआपच स्पष्ट होईल. प्रथम इस्लाम धर्माची माहिती घेऊ.

इंग्रजांच्या ताब्यांतून हिंदुस्थान मुक्त करणे हा पहिला टप्पा. मुक्त भारतांत मुसलमानी वर्चस्व निर्माण करणे हा दुसरा टप्पा आणि स्वतंत्र भारतांत मुस्लीम बहुसंख्या निर्माण करणे व मुस्लीम धर्मशास्त्रानुसार राज्य चालविणे हा तिसरा टप्पा. (५) या तीन टप्प्याच्या राजकारणावर विश्वास ठेवून चालणारी चळवळ, म्हणजे वहाबी चळवळ होय. यापैकी पहिला टप्पा हिंदूंच्या नेतृत्वाखाली राहूनसुद्धा साध्य करतां येईल असे मानणारी संघटना म्हणजे 'जमियत उल उलेमा' ही होय.

१९५३ साली पाकिस्तानांत झालेल्या अहमदियाविरोधी दंगलीच्या संदर्भात न्या. मुनीर यांनी लिहिलेल्या वृत्तांतात असे म्हटलेले आहे की अहरार नेते ताजुद्दिन अन्सारी, अताऊल्ला शहा बुखारी, जमियत उल उलेमाचे मौ. अबुल हसनात, मौ. अहमद अल्ली, मौ. अब्दुल हमीद बदायुनी या सर्वांचे एका बाबतीत एकमत होते की,– भारतीय मुसलमानांना भारताशी एकनिष्ठ राहणे शक्य नाही. कारण कोणीही मुसलमान बिगर मुस्लीम राज्यसत्तेशी एकनिष्ठ राहूं शकत नाही. आजच्या मुसलमानांची सर्वांत मान्यवर संघटना 'जमाते इस्लामी' ही आहे. तिचे मार्गदर्शक नेते मौ. मौदूदी त्यांचे असे मत आहे की युद्धकाळांत भारतीय मुसलमानांनी पाकिस्तानला मदत करणे व शांतता कालांतही पाकिस्तानचे हित पहाणे मुसलमानांचे कर्तव्य आहे. या संघटनेचा हेतू सर्व भारतात मुसलमानी धर्मशास्त्रावर आधारलेली राज्यसत्ता निर्माण करणे हा आहे. 'जमायते-इ-इस्लामी की दावत'मध्ये ते म्हणतात 'सिक्युलर शासनामुळे जनतेतून ईश्वराची भीती संपते. लोक स्वार्थाचे गुलाम होऊन बेजबाबदार बनतात. त्यांच्यात घातक राष्ट्राभिमान निर्माण होतात. सर्व जगांतील मुसलमान बंधू आहेत ही भावना क्षीण होते म्हणून राष्ट्रवादी, लोकशाहीवादी, सिक्युलर राजवटीला आमचा विरोध आहे. मग या राजवटी हिंदू चालवोत की मुसलमान चालवोत.' दुसरे एक नेते मौ. सद्रुद्दीन इस्लाही यांनीही याच मताला दुजोरा दिला आहे.

**सर सय्यद अहमदखान**

वरील वहाबी संप्रदायाशिवाय एक वेगळा मतप्रवाह भारतीय मुसलमानांत दिसून येतो. तो म्हणजे सर सय्यद अहमदखान यांचा अलिगड पंथ होय. पंडित नेहरु म्हणतात[६] 'सर सय्यद पक्के सुधारणावादी होते. आधुनिक शास्त्रीय ज्ञानाच्या संदर्भात इस्लामचा अर्थ लावला पाहिजे. असे त्यांचे मत होते. इस्लाम व ख्रिश्चन धर्मातील साम्य त्यांनी निदर्शनास आणले. पडदापद्धती, स्त्रियांचे मुस्लीम समाजातील स्थान, यासारख्या घातकी पद्धतीवर त्यांनी कडाडून हल्ला केला. खिलाफत त्यांना मान्य नव्हती. नवीन इंग्रजी शिक्षण पद्धतीचे ते चाहते होते. मुस्लीम समाजात शिक्षणप्रसार करण्या-मध्ये त्यांना यश आले. त्यांनी राजकीय चळवळीपासून मुस्लीम समाजाचे लक्ष दुसरीकडे वळविले. 'मुस्लीम शैक्षणिक परिषद' त्यांनी स्थापन केली. त्यातून तयार होणाऱ्या मुस्लीम मध्यम वर्गीयांना सरकारी नोकरी व व्यवसायाकडे वळविले.' याचा परिणाम असा झाला की विसाव्या शतकाच्या प्रारंभी मुस्लीम मध्यमवर्गीय सुशिक्षितांमध्ये दोन वर्ग प्रामुख्याने दिसून येत. 'एकाचा ओढा राष्ट्रीय चळवळीकडे तर दुसऱ्याचा ओढा (भारताच्या पूर्व परंपरा व सद्यस्थितीकडे दुर्लक्ष करून) शेजारच्या इस्लामी राष्ट्राकडे–विशेषतः तुर्कस्तानकडे – आशेने मार्गदर्शनासाठी पहाणेकडे'.

१८३०–४० पर्यंत इंग्रजांना मुसलमान व मुसलमानांना इंग्रज आपले शत्रू वाटावेत अशी परिस्थिती होती. इंग्रजांनी आपले राज्य हिसकावून घेतले याची तीव्र बोच मुस्लीम समाजातील धुरीणांना लागून राहणे सहाजिक होते. पण १८६० नंतर क्रमाक्रमाने सुशिक्षित मुसलमानांना इंग्रज आपले मित्र वाटावे अशी परिस्थिती सर सय्यद यांनी आपल्या कौशल्याने निर्माण केली. जानेवारी १८५६ पूर्वीच 'महामेडन असोसिएशन' त्यांनी स्थापन केली होती. भारतीय मुस्लीम समाजात इंग्रजाविषयी सहानुभूती, सहकार्याचे व विश्वासाचे वातावरण त्यांनी निर्माण केले. इंग्रजी शिक्षण आणि पाश्चात्त्य सुधारणा यांचा पुरस्कार त्यांनी केला. अलिगड विद्यापीठाची त्यांनी स्थापना केली. आरंभापासून ते द्विराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. 'मुसलमान हे खरे

स्वयंभू व स्वतंत्र राष्ट्र आहे' असे त्यांचे मत होते. मुसलमान हे आजच्या भारतात अल्पसंख्य असल्यामुळे लोकशाहीची कोणतीही योजना त्यांना जित बनवील, त्यांचे महत्त्व नष्ट करील, अशी त्यांना भीती वाटत असे.[७]

१८८५ साली काँग्रेस स्थापन झाली. १८८८ साली तर सय्यद म्हणाले. 'काँग्रेस ही हिंदू संघटना आहे.[८] तिचा अंतिम हेतू इंग्रजी राज्य संपवून टाकणे व देशात लोकशाही आणणे हा आहे. मुसलमानांनी या संघटनेपासून दूर रहावे. हिंदू बहुसंख्य असलेल्या या देशात शेकडो वर्षे आपले राज्य असूनही आपली बहुसंख्या आपण निर्माण करू शकलो नाही. हिंदूचा प्रतिकार मोडून काढू शकलो नाही', याची तीव्र जाणीव मुसलमानांना होतीच. त्यामुळे इंग्रज जाऊन भारतात लोकशाही राजवट आल्यास मुसलमान 'जितसमाज' बनेल अशी भीती त्यांना वाटत होती. त्याशिवायही एक कारण होते. हिंदू उदारमतवाद त्यांना समानतेने वागविण्याची हमी वरचेवर देत होता. पण या जित मूर्तीपूजकापेक्षा आम्ही श्रेष्ठ असताना त्यांच्याशी समानतेने कसे वागावे ही मानसिक अडचण सुशिक्षित मुसलमानांना वाटे.[९] ही भावना इंग्रजी राज्याच्या हिताची होती, याची इंग्रजांनाही जाणीव होती. १८६० सालानंतर हा विभक्ततावाद फायद्याचा आहे. याची जाणीव सुशिक्षित मुसलमानांना होऊ लागली होती.

## ८. मुस्लीम जातीयवादाचे स्वरुप

पाकिस्तानच्या मागणीचा उगम मुसलमान हे स्वयंभू राष्ट्र आहे. या भूमिकेत आहे. धार्मिक पातळीवर ही भूमिका खलिफा उस्मानपासून आहे. राजकीय परिभाषेत १८९० पासून द्विराष्ट्रवाद भारतांत विकसित होत होता. फटकून वागणाऱ्या मुसलमानांना जवळ कसे करावे हा प्रश्न काँग्रेसच्या अगदी आरंभापासून होता. १८८५ ला रानडे, तेलंगा समोर होता. १९०० नंतर टिळक, गोखले यांच्या समोर होता. १९२० नंतर गांधी, नेहरू समोर होता. भारतीय मुसलमानांच्या राजकारणाला अल्पसंख्याकाच्या राजकारणाचे कांही पदर आहेत. बहुसंख्य हिंदूच्या या देशात आपले काय होईल ही भीती अगर अविश्वास व त्यासाठी कांही संरक्षणाची तरतूद करुन घेणे ही बाजू आहेच.

तथापि मुस्लीम जातीयतेचा उगम ह्या भीतीपोटी नाही. आपलाच धर्म 'एकमेव खरा धर्म' आहे. इतर सर्व धर्म त्या खऱ्या धर्माच्या भ्रष्ट नकला आहेत, म्हणून त्या नष्ट करणे 'खरा धर्म त्यांचेवर लादणे हा अन्याय नव्हे. इतरांनी त्याचा प्रतिकार करणे हा अन्याय आहे. आमच्या राज्यांत आमच्या-खेरीज इतरांना कोणतेही अधिकार असू शकत नाहीत. पण इतरांच्या राज्यात मात्र आम्हाला केवळ समानतेने वागवून चालणार नाही. आम्हाला विशेषाधिकार असले पाहिजेत कारण आम्ही श्रेष्ठ, खऱ्या धर्माचे आहोत' या भूमिकेतून 'जातीयवाद' निर्माण होतो. मुसलमानांच्या आक्रमक आकांक्षा-मधून त्यांचा जातीयवाद निर्माण होतो. विस्तारवादातून होतो. स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाच्या जाणिवेतून होतो.

### इस्लाम-धर्म

मानव जातीच्या उदयापासून जगताच्या कल्याणासाठी परमेश्वराने सर्व जाती जमातीत व जगाच्या सर्व भागांत, व सर्व काळांत १ लाख २४ हजार प्रेषित पाठविले होते. एकाच परमेश्वराचे हे सर्व प्रेषित असल्यामुळे सर्व प्रेषितांचा उपदेश एकच आहे. तोच 'इस्लाम' अशी मुसलमानांची श्रद्धा आहे. **सर्व मानव जातीसाठी, एकच शेवटचा प्रेषित पाठविला, तो म्हणजे महंमद पैगंबर होय. ही कुराणांतील फार महत्त्वाची कल्पना आहे. त्यामुळे कुराण हा शेवटचा व अंतिम स्वरुपाचा ग्रंथ ठरतो.**[१०] त्यांतील आज्ञा जगताच्या अंतापर्यंत चालू राहणाऱ्या ठरतात. या परिपूर्ण धर्मात कुठलीही सुधारणा होऊ शकत नाही. सर्व धर्माच्या प्रजेचे कल्याण एकमेव खरा धर्म जो इस्लाम तो स्वीकारण्यांत आहे. इस्लामचे भ्रष्ट रुपच 'बायबल'मध्ये 'तोराह' मध्ये व 'वेदा'मध्ये आहे. कुराणमध्ये मात्र त्याचे खरे शुद्ध रुप आहे. त्याचप्रमाणे महंमदाच्या उदयापासून होऊन गेलेले सर्व संत ज्ञानेश्वर, रामानुज, वल्लभ वगैरे संत ठरु शकत नाहीत. कारण शेवटचा प्रेषितानंतरचे सगळे संत हे प्रेषितावर विश्वास ठेवणारेच असावे लागतात. चक्रधर किंवा बसव हे धर्मसंस्थापकही ठरु शकत नाहीत. कारण इस्लामनंतर नवा धर्मही होऊ शकत नाही. 'शेवटचा प्रेषित' या शब्दांत इतके सगळे गृहीत आहे.

इस्लामची मूलतत्त्वे

पाच सांगितली जातात. नमाज, रोजा, हज्ज, जकात व वहदत. दिसायला ही तत्त्वे सोपी, साधी, निरुपद्रवी वाटतात. पण त्यांच्या पोटांत फार व्यापक अर्थ आहे. उदा. नमाज म्हणजे ईश्वराची प्रार्थना. मुसलमान सर्व जगाचा परमेश्वर एकच मानतात. त्याचे नाव अल्ला. त्याचा एकमेव शेवटचा प्रेषित 'महंमद' आहे. त्याचा उपदेश 'कुराण' होय. म्हणून परमेश्वराची प्रार्थना कुराणमध्ये सांगितली तशीच व्हायला हवी. जकात म्हणजे धर्मादाय. म्हणजे मुसलमानांचा धर्मादाय, तीर्थयात्रा म्हणजे त्यांचीच तीर्थयात्रा. थोडक्यात म्हणजे **मुसलमान असे मानतो की जगात एकच धर्म पवित्र आहे. तो म्हणजे इस्लाम. उरलेले सारे धर्म धर्मच नव्हेत. इस्लामच्या भ्रष्ट नकला आहेत. पाखंडे आहेत. ते नष्ट करायला हवेत. या परमेश्वराची उपासना करणेचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे त्याचा संदेश जगभर प्रस्थापित करणे. हे करतांना स्वधर्मप्रचार करावा लागेल. तसेच परधर्म खंडनही करावे लागेल. लोकांना हे सहजासहजी पटणार नाही. म्हणून ईश्वरसेवेसाठी मुसलमानांना जग जिंकावे लागेल. हातांत तलवार घेऊन धर्मयुद्ध करावे लागेल.** त्याला 'जिहाद-बा-सैफ'[११] म्हणजे तिहेरी झगडा म्हणतात. स्वतःची धर्मश्रद्धा पक्की करणे. आपल्या अनुयायांची पक्की करणे व इस्लाम ज्यांनी स्वीकारलेला नाही, त्यांना तो पटविणे असे या तिहेरी झगड्याचे स्वरुप आहे. यासाठी तलवार वापरणेस परवानगी आहे.

इस्लाम आणि भारत

१९०४ साली बंगालची फाळणी झाली, त्यामागे मुस्लीम बहुसंख्येचा प्रांत निर्माण करणेची भावना होती. ती फाळणी रद्द झाल्यानंतर मुंबई प्रांताची फाळणी करुन सिंध प्रांत अस्तित्त्वात आला, याला टिळक गोखल्यांनीही पाठिंबा दिला होता हे लक्षात घेतले पाहिजे.

१९०६ साली मुस्लीम लीगने विभक्त मतदार संघ मागितला. १९०९ च्या मोर्ले-मिन्टो सुधारणांनी विभक्त मतदार संघ मान्य केला. या कायद्याची चर्चा ब्रिटीश पार्लमेन्टमध्ये झाली, त्यावेळी केवळ मुसलमानांनी निवडलेल्या व केवळ

मुस्लीम प्रतिनिधींनी केलेले कायदेच मुस्लीमांना लागू होऊं शकतील असा विचार व्यक्त करण्यांत आला होता.

१९१६ साली लखनौ कराराने विभक्त मतदार संघाला, मुस्लीमांच्या विशेषाधिकारांना कॉंग्रेसची मान्यता मिळाली. लखनौ करारांत लोकसंख्येपेक्षा अधिक प्रमाणात जागा हे सूत्र होतेच. या राखीव जागांनी सुशिक्षित मुसलमानांना सर्व महत्त्वाच्या उच्च सरकारी नोकऱ्यामध्ये सुरक्षित राखीव हक्क निर्माण करुन दिले.

**मुस्लीम जातीयवादाचे स्वरुप 'अविश्वास व भीती' हे आहे. या गृहीतकृत्यावर टाकण्यात आलेली ही चुकीची पावले होती.** नेहरु परिषदेने १९२८ साली केंद्रीय विधानसभेत मुस्लीमांना ३३ टक्के जागा देऊ केल्या होत्या. लखनौ कराराहून हे किती तरी अधिक होते. पण मुसलमानांच्या सर्व गटांनी तीवर बहिष्कार घातला. कारण नेहरु परिषद विभक्त मतदार संघ रद्द करावेत असे सुचवित होती. विभक्त मतदारसंघ रद्द होणे म्हणजे मुसलमान हे स्वयंभू राष्ट्र आहे या कल्पनेला सोडचिठ्ठी दिल्यासारखे होते. उलटपक्षी हेच मुसलमान गट आगाखानांच्या नेतृत्वाखालील परिषदेला एकजुटीने हजर राहिले. यावरुन मुस्लीम जातीयवादाचे स्वरुप स्पष्ट होते.

**स्वतंत्र भारतातील मुस्लीमांची स्थिती**

पाकिस्तानची निर्मिती झाली आणि इथे मागे राहिलेल्या मुसलमानांची अवस्था त्रिशंकूसारखी झाली. हे स्वतःला पाकिस्तानी म्हणवून घेत होते पण फाळणीमुळे त्यांना कायमचे भारतात राहावे लागणार होते. पाकिस्तानच्या निर्मितीचा हा परिणाम त्यांनी अपेक्षिला नव्हता. तरीही त्या वस्तुस्थितीशी त्यांना आता सामोरे जावे लागले होते. अशा परिस्थितीत त्यांना दोनच मार्ग उपलब्ध होते. पाकिस्तानची निर्मिती झाली तसाच आपलाही प्रश्न आज ना उद्या सुटेल या श्रद्धेने रहावयाचे किंवा भारताला आपली श्रद्धा वहावयाची. पैकी दुसरा मार्ग त्यांनी कायमचा बंद करुन ठेवलेला आहे असे हमीद दलवाई स्वतःच्या अनुभवावरुन म्हणतात. आता राहिला पहिला मार्ग, पाकिस्तानच्या मागणीला

चिकटून राहण्याचा व द्विराष्ट्रवादाच्या मार्गाने जाण्याचा. भारतीय मुसलमानांनी याच मार्गाने जाण्याचा निर्णय केला आहे, असे हमीद दलवाई म्हणतात. तसेच स्वतःला राष्ट्रीय म्हणवून घेणारे मुसलमान ही परिस्थिती खपवून घेत आहेत. किंबहुना तेही त्याच विचाराच्या आहारी जात आहेत असे त्यांना वाटते. ' हिंदू राज्य करु शकणार नाहीत. शेवटी आपणालाच ते हाती घ्यावे लागणार आहे असे मनातल्या मनात ते मांडे खात आहेत. आणि भावडे लोक त्यांवर विश्वास ठेवून, मिटक्या मारीत आहेत. असेही त्यांना दिसते. दुसरे असे की तसाच प्रसंग पडला तर एक मुस्लीम शेकडो काफीरांना भारी ठरेल असा विश्वास कांही मुस्लीम नेते बाळगीत आहेत. मुस्लीम दिग्विजयाचा इतिहास याला साक्ष आहे. असेही त्यांना वाटते. निर्वासितांचा प्रश्न, काश्मीर प्रश्न, आसाममधील घुसखोरांचा प्रश्न सोडवितांना भारत सरकारची जी वागणूक दिसून आली, तीवरुन हिंदूंच्या दौर्बल्याची खात्री त्यांना पटली असावी. धर्म-निष्ठा चेतवून फुटीर भावना निर्माण करता येते. व मुस्लीम समाजाला संघटित करता येते, यांतून पाकिस्तान मिळवता येते याचा अनुभव त्यांनी घेतलाच आहे. त्याचीच पुनरावृत्ती केल्यास आताही यश मिळविणे अशक्य नाही असे त्यांना वाटत असावे. फाळणी होत असतांना त्यांना पाकिस्तानमध्ये जाण्याची संधी मिळूनही ते गेले नाहीत. त्याचा उलगडा या दृष्टीने लागू शकतो. संपूर्ण भारतच ' इस्लामी राज्य ' होण्याची शक्यता त्यांना त्यावेळी वाटली असावी.

बिगर मुसलमानी राजसत्तेखाली मुसलमान राहू शकत नाही. धर्मसत्ता व राज्यसत्ता एकच असावयास हवी. खलिफा व धर्मगुरु एकच हवा. ही इस्लाम धर्माची परंपरा आहे. इस्लामही भातृभावात्मक संघटना आहे. उम्मत (सहमतीवर चालणारा धर्म समाज) हीच ईश्वरी इच्छा समजून घेण्याचे एकमेव साधन आहे. अशा समाजाशिवाय व्यक्तीला स्वतंत्र स्थान नाही. मग व्यक्तिस्वातंत्र्य किंवा लोकशाही कुठली ? व्यक्ती ही समाजाचा अभिन्न भाग फक्त आहे. या विचारसरणीत मुस्लीम जातीयवादाची व एकाधिकारशाहीची मुळे दिसून येतात.

हिंदू धर्मियांची स्थिती

मनुष्य मात्राचे अंतिम साध्य ईश्वरी कृपा किंवा मोक्ष किंवा आत्म साक्षात्कार असे मानण्यात आले आहे. ऐहिक जीवन हे केवळ त्याचे साधन मानले आहे. 'तरीच जन्मा यावे, दास ईश्वराचे व्हावे' असे म्हटले आहे. जग नश्वर, क्षणभंगूर असून त्यांतील जीवन दुःखाने ओतप्रोत भरलेले आहे. जन्ममृत्यू, वृद्धिक्षय हे रहाटगाडगे अनादिकालापासून चालू आहे. यांतून मुक्तता म्हणजे मोक्ष. धर्मविचारांतील ही मूलभूत कल्पना आहे. 'म्हणौनी मृत्यूलोकी सुखाची कहाणी । आइकैल कवणाच्या श्रवणी । कैची सुखनिद्रा, आंथरुणी । इंगळांच्या ॥ ज्ञानेश्वरांचे हे उद्‌गार व 'सुख पहातां जवापाडे । दुःख पर्वता एवढे ।' ही तुकारामाची भावनाही त्याच दृष्टीची निदर्शक आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीही याच आशयाचे विचार त्यांच्या Hindu View of Life या ग्रंथात व्यक्त केले आहेत.[१२] ते म्हणतात 'यांपासून सुटका करून घेण्याचे तीन मार्ग आहेत. ते म्हणजे भक्ति, कर्म आणि ज्ञान हे होत. हे तीन्ही मार्ग परस्पर सुसंगतच आहेत. ज्ञान म्हणजे अनुभव. भक्तीची अंतीम परिणती ज्ञानांतच होते आणि ही दोन्ही मिळून सत्कर्म किंवा सदाचारी जीवन होते. वर्ण कल्पना ही कर्माची सामाजिक बाजू आहे तर आश्रम-कल्पना ही वैयक्तिक बाजू होय. चार आश्रम म्हणजे (ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, आणि संन्यास) अंतिम उद्दिष्टाकडे जाणाऱ्या जीवन यात्रेतील टप्पे होत.' ऐहिक उत्कर्ष आणि परमार्थसिद्धी यांच्यातील वास्तविक विरोध लक्षात घेऊन परमार्थावरच आपण आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे अशी सर्व धर्मांची शिकवण असते. या परमार्थ वृत्तीची मुख्य लक्षणे दोन.[१३] एक नित्यानित्य विवेक आणि दुसरे ऐहिक व पारलौकिक सुखाविषयी वैराग्य. या विचारांशी सुसंगत असा शरीर व आत्मा यांचा संबंधाविषयीचा धर्माचा दृष्टीकोन आहे. पार्थिव शरीर व चैतन्यमय आत्मा यांच्यात तमप्रकाशवत विरोध आहे, म्हणून तपाच्या योगे शरीर सुकवल्या-शिवाय आत्म्याचा प्रकाश दिसणार नाही. जडाच्या पाशांतून जीवात्म्याला मुक्त केले पाहिजे अशी धारणा धर्मविचारांत असते.

सत्याचा शोध किंवा त्याची साक्षात प्रचीति हे धर्मजीवनाचे एक प्रयोजन आहे. त्रिकालाबाधित शाश्वत सत्य हे मुळांतच अतींद्रिय, अचिंत्य व अबुद्धिगम्य आहे. लौकिक व्यवहारांत उपयोगी पडणारी प्रत्यक्ष व अनुमान ही दोन्ही प्रमाणे सत्यान्वेषण व आत्मदर्शन यांच्या बाबतीत बाजूला सारावी लागतात. **इंद्रियनिग्रह व चित्तवृत्तिनिरोध यांच्या साहाय्याने मन बाह्यउपाधीपासून पूर्ण मुक्त झाल्यावर अंतःस्फूर्तीने जे प्रतीत होते, तेच खरे सत्य होय.**

विविधतेने नटलेल्या बाह्यविश्वांतील एकत्व शोधून काढण्याची माणसाला स्वभावसिद्ध ओढ असते. त्याबरोबरच ज्ञानाच्या पलिकडे झेप घेऊन अज्ञाताला ज्ञानाच्या कक्षेत आणण्याची सुद्धा ओढ असते. या ओढीप्रित्यर्थ चाललेल्या धडपडीतून त्याची तत्वजिज्ञासा जागी होते. व त्या अज्ञात सत्याचा शोध घेण्याचा ध्यास लागतो. त्याच्या अनुषंगाने तो स्वतःलाच विचारू लागतो. विश्वाची घडण कशी झाली असावी ? त्याचा निर्माता कोण ? नियंता कोण ? मानवाचे या अफाट विश्वात स्थान कोणते ? मानवी जन्माचे प्रयोजन काय ? त्याचे साफल्य कशात आहे ? जडचेतन मनुष्येतर सृष्टी व मनुष्य यांचे नाते काय ? माणसामाणसामध्ये संबंध कसे असावेत ? या प्रश्नांची चिकित्सा त्याला करावीशी वाटते. यातून अनेक उपपत्ती पुढे येतात. केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत इ. मतमतांतरे उत्पन्न होतात. जीवित साफल्याचा विचार करताना सत्यासत्य, नित्यानित्य, याच्याप्रमाणे नीतीअनीतीचा विचार करावा लागतो. श्रेय व अश्रेय, तात्कालिक व चिरंतन यांच्यातील विसंवाद दूर करण्याची आवश्यकता जाणवते. यातून नितीमीमांसेचा जन्म होतो.[१४]

हिंदू धर्माच्या पाच ऐतिहासिक अवस्था.[१५] ( १ ) पृथक पृथक संघधर्म. ( २ ) वेदपूर्व अनेक देवतावादी धर्म. ( ३ ) वैदिक आर्यांचा श्रुतिस्मृति धर्म. (४) शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इ. विश्वधर्म. (५) श्रुतिस्मृति पुराणोक्त धर्म. वैदिक धर्म सर्व माणसांचा धर्म नाही. एका आर्य गटाचा आहे. **वैदिक आर्यांच्या समाजसंस्थेचा ब्राह्मण वरिष्ठत्व व शुद्र-दास्य हा महत्वाचा भाग आहे.** वैदिक काळीच राजन्य वर्गात ब्राह्मणवरिष्ठत्वाविरुद्ध प्रतिकाराची चळवळ उत्पन्न झाली. भारतीय युद्धाने या भांडणाचा निकाल लावला व पुरोहितांचे

स्थान समाजात दृढमूल झाले. शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इ. विश्वधर्माचा पुरस्कार वैदिकेतर वरिष्ठवर्गाने केला. राजन्यानी त्यांच्या प्रस्थापनेत पुढाकार घेतला. या वैदिकेतर पंथांनी सर्व मानवांना श्रेयाचा मार्ग खुला करणारी व्यापक उदार भावना प्रतिपादली होती. यातच त्यांची थोरवी दिसून येते.

**एकेश्वरवाद**

वेगवेगळ्या घटना, वेगवेगळे अनुभव यांना एका सिद्धांताच्या सूत्रात गुंफून त्यांना अर्थपूर्णता आणण्याची सदैव धडपड माणूस करीत असतो. यामुळेच एकेश्वरवादाची कल्पना उदयास आली. **परमेश्वर हा विश्वाचा नियंता राजा मानला गेला. पृथ्वीवरील राजा हा त्याचा अंश म्हणून मान्यता पावला.** भारताच्या धर्मजीवनांत अनेक उपासना-संप्रदाय स्थिर झाले होते. शिव, विष्णू दत्त यांचे भक्त आपले उपास्य दैवत म्हणजेच परमेश्वर असे मानीत होते. त्यांचेतील विरोध कमी करण्यासाठी ही सर्व एकाच परमेश्वराची रूपे आहेत असा समन्वय पुढे आला. त्यामुळे एकेश्वरवादाचा आग्रह केवळ तात्विक पातळीवरच राहिला. जनमानसांत ही कल्पना खोलवर रूजली नाही.[१६]

**प्रादेशिक भक्ती संप्रदाय**

प्रादेशिक भक्ती पंथांनी धर्मजीवनाचे शुद्धीकरण करण्याचें कार्य हाती घेतले. त्यासाठी सर्व थरांतील सामान्य लोकांपर्यंत हिंदूतत्वबोध व भक्ति निरुपण नेऊन पोहचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. म्हणून संस्कृत भाषेऐवजी प्राकृताची त्यांनी कास धरली. लोकभाषेत ग्रंथरचना व कीर्तन निरुपण करण्यास त्यांनी सुरुवात केली. या धार्मिक प्रबोधनाच्या कार्यात शूद्र अतिशूद्र स्त्रियाही सामील झाल्या. त्यामुळे कर्मकांड व विद्वतजडता यांत बंदिस्त होऊन पडलेले धर्मजीवन प्रवाही, संस्कारक्षम बनले. पुरोहितशाहीचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी त्यानी गुरुमार्गाची स्थापना केली. सहाजिकच सनातनी शास्त्री पंडितांचा विरोध झाला. अनेक भक्तांचा छळ झाला. चित्तशुद्धी, ईश्वरनिष्ठा, सदाचार आदि नीतितत्वांची महती लोकांच्या मनावर ठसविण्याची त्यांनी पराकाष्ठा केली. याचवेळी वामाचाराला प्रोत्साहन देणाऱ्या शक्ती संप्रदायाचा व तंत्र मार्गाचाही बोलबाला होत होता.

### आश्रमधर्म

**वेदांनी तीन कल्पना दिल्या आहेत. धर्म, ऋण आणि ऋत.** पैकी धर्माचा विचार आपण आतापर्यंत केला. ऋण प्रत्येक व्यक्तिस चार असतात.[१७] ( शतपथ ब्राह्मण.) देवऋण, ऋषीऋण, पितृऋण आणि मनुष्यऋण. प्रकाश, पाणी, अन्न देवापासून मिळते. या ऋणाची फेड देवयज्ञाने करायची असते. परंपरेने प्राप्त झालेली विद्या हे ऋषींचे ऋण होय. ब्रह्मचर्याश्रम पत्करून विद्याग्रहणाने व जन्मभर स्वाध्याय केल्याने हे ऋण फिटते. आपला जन्म हे पितरांचे ऋण आहे. गृहस्थाश्रम स्वीकारून व प्रजोत्पादन करून हे ऋण फेडावयाचे असते. माणसांचे सहकार्य मिळाल्याशिवाय जीवन अशक्य असते. म्हणून ते ऋण अतिथी सत्काराने व नित्यदानाने फेडावयाचे असते. नैतिक जबावदारीच्या तत्वाच्या विकासाची सूचक अशी ही कल्पना आहे.

### वर्णधर्म

ब्रहदारण्य-कोपनिषदात सांगितले आहे की, प्रथम अग्निरुप केवळ ब्रह्म होते. ते एकच होते. त्याचे सामर्थ्य कमी पडू लागले. प्रगती होईना म्हणून त्याने अधिक उच्चरुप धारण केले. ते म्हणजे देवामधील क्षात्रवर्ण होय. तेवढयाने भागेना, प्रगती होईना म्हणून वैश्यवर्ण निर्माण केला. तेवढयाने भागेना म्हणून शूद्रवर्ण निर्माण केला. तेवढयाने भागेना, सामर्थ्य कमी पडू लागले म्हणून अधिक श्रेयस्कर रुप : ब्रह्माने निर्मिले. ते म्हणजे धर्म होय. धर्म हा क्षत्रियांचाही क्षत्रिय आहे. म्हणून **धर्मापेक्षा काही वरिष्ठ नाही.** कारण कमी बळाची व्यक्ती अधिक बळाच्या व्यक्तीला धर्माच्या आधारे आज्ञा करू शकते. हेच देवामधील चातुर्वण्य मनुष्यामध्ये अवतरले.

### ऋत

**विश्वाचे नियमन करणारे धर्मतत्व म्हणजे 'ऋत'** दिवस व रात्र, संवत्सराचे नियमित परिवर्तन, सूर्य, चंद्र ताऱ्यांची नियमबद्ध गती व उदयास्त वनस्पतीच्या पत्र, पुष्पफलरुपी विकासावस्था, प्राण्यांच्या व माणसांच्या गर्भा-वस्थेतील निश्चित कालावधी **अशा प्रकारच्या विश्वव्यवस्थेस 'ऋत' असे**

ऋग्वेदात नांव आहे.[१८] वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत व शिशिर हे वर्षाचे सहा ऋतू. त्यांची नियमित गती पाहून त्यांना ऋतू म्हणतात. योग्यकर्म, सत्यपथ किंवा प्रशस्त वर्तनक्रम यांचा वाचक 'ऋत' शब्द वैदिक नीतिशास्त्रात आला आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांची साधना समाजांतील व्यक्तीस करता यावी म्हणून क्षात्रधर्म प्रवृत्त केला आहे. चार आश्रम चातुर्वण्य याचे संरक्षण राजधर्माधीन आहे. असा सिद्धांत हिंदू धर्मात मूलभूत मानला आहे.

### पुरुषार्थ

भारतीय नीतीशास्त्राच्या दृष्टीने त्रिवर्गाची किंवा पुरुषार्थाची कल्पना फार उपयुक्त आहे. महाभारत, पुराणे आणि स्मार्त धर्मशास्त्र यांच्यात चतुर्विध 'पुरुषार्थ' सांगितला आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थाच्या तत्वाच्या अधिष्ठानावर भारतीय जीवन पद्धती व संस्कृती आधारली आहे. आत्म्याचे अस्तित्व व अमरत्वाचा सिद्धांत कर्मसिद्धांत आणि तन्मूलक पुनर्जन्मवाद हा हिंदूधर्माचा आत्मा होय. मन्वादिस्मृती, महाभारत आणि भगवद्गीता यांतील नीतिशास्त्र कर्मविपाक सिद्धांतावर अवलंबून आहे. स्मृतीतील जन्मसिद्ध चातुर्वण्याचे समर्थन 'ईश्वर' व 'कर्मविपाक' या दोन तत्वावर आधारलेले आहे. (आपस्तंभ धर्मसूत्र) बौद्ध व जैन ईश्वर मानीत नाहीत. पण विश्वाच्या मुळाशी असलेल्या सुकृत दुष्कृताचा अदृष्ट कायदा हिंदू धर्माप्रमाणेच मानतात. सगळे सुधारलेले धर्म, विश्व हे नैतिक राज्य आहे व धर्म त्या नैतिक राज्याचा कायदा आहे असे मानतात.

### विश्वात्मैक्य भाव

जलचर प्राणी, वृषभ, गो, अश्व, वराह, अर्धपशू, अर्धमनुष्य, आकाशस्थ गोल, भूमीपर्वत, वृक्ष, सरोवर इ. मूर्त वस्तूंची आणि प्राण्यांची पूजा करणारे, त्यांचे देवत्व स्थापून तदर्थ यज्ञ, बलिदान इ. प्रकारे अर्चा करणारे जे संप्रदाय होते त्यांना हीन धर्म कल्पनांच्या बंधनातून मुक्त करणारा विचार, वेदांनी प्रथम सांगितला. सर्व चराचर विश्व एकाच ईश्वराचे रुप आहे हा संदेश वेदांनी दिला व विश्वधर्म समन्वयाचा मार्ग सांगितला. हे तत्व हिंदुस्थानांतील

अगणित परस्परविरोधी धर्मसंप्रदायांना एकत्र गुंफण्यास समर्थ झाले. पण त्यामुळे सर्व हीनोच्च धर्म कल्पनांचा विभूतीवादाच्या तत्वाने संग्रह करण्याचा प्रयत्न झाला. तद्वारा संस्कृतीच्या विविध थरांत कायम रुतून बसलेल्या मानवगटांची भली मोठी उतरंड निर्माण झाली. त्यांतून जातिसंस्था निर्माण झाली. हीन धर्मसंप्रदायाचे वैशिष्टच व हीन संस्कृतीचा वारसा या जातिसंस्थेने कायम ठेवला. व्यवसायभेद नैसर्गिक भेद ठरवले. वनस्पती आणि प्राणी या सृष्टीतील वैचित्र्याच्या मर्यादा जशा अबाधित आणि अनुल्लंघनीय असतात त्याप्रमाणे व्यावसायिक, सामाजिक, धार्मिक परंपरा अबाधित व अनुल्लंघनीय ठरविल्या. त्यामुळे मनुष्याचे मन आणि व्यवहार अत्यंत संकुचित, कृत्रिम, पोकळ, व्यर्थ संप्रदायाच्या बंधनांत बंदिस्त झाले. मनुष्याच्या विकासप्रवण शक्तीची कुचंबणा झाली. मानवनिर्मित बंधनांना व कल्पित भेदांना, नैसर्गिक भेदांचे स्वरूप देणारा धर्म दीर्घकालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अवनतीस कारण होणारच. प्राचीन हिंदू समाजरचनेत राजाच्या कायद्यापेक्षा जातीउपजातींच्या चालीरीतींना, रुढींना अधिक सामर्थ्य आले होते. शेकडो प्रकारच्या रुढींचाच अंमल होता. म्हणून चिरस्थायी मोठ्या प्रदेशावरील स्थिर राजवट हिंदू समाजात निर्माण झाली नाही.[१९]

जी स्थिती मुस्लीमांची त्यांच्या धर्मात आहे, तशीच हिंदूंची हिंदूधर्मात आहे. 'हिंदूधर्मात व्यक्तीला कांही स्थान नाही. त्याची रचना वर्णाच्या कल्पनेवर केलेली आहे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी कसे वागावे याची शिकवण हिंदू-धर्मात नाही. एका वर्णाने दुसऱ्या वर्णाशी कसे वागावे याची बंधने हिंदू धर्मात आहेत. व्यक्तीचा विकास हे धर्माचे ध्येय असते. माणसाचा जन्म आत्मोन्नती-साठी आहे. त्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही धर्माची मूलभूत कल्पना व जबाबदारी आहे. त्यासाठी तीन गोष्टी त्या धर्मात असाव्या लागतात. (१) सहानुभूती, (२) समता, (३) स्वातंत्र्य. यांपैकी कांहीच हिंदूधर्मात नाही.[२०]' दुसरे असे की इस्लाममध्ये ज्याप्रमाणे अल्लाचे सार्वभौमत्व मानले आहे, त्याचप्रमाणे हिंदूधर्मात 'धर्माचे सार्वभौमत्व' मानलेले आहे, धर्माप्रमाणे विहीत केलेले स्थानच व्यक्तीस स्वीकारावे लागते. गीतेमध्ये तर असे सांगितले आहे की आपल्या वाटयाला आलेले नियत कर्म निस्वार्थ सेवाबुद्धीने करतात,

ते त्या कर्मांनी ईश्वराचीच पूजा करतात[२१] कै. गोळवलकर गुरुजी म्हणतात, 'हिंदुसमाज हाच परमेश्वर आहे. पुरुषसूक्तामध्ये सर्व शक्तीमान परमेश्वराचे जे वर्णन आहे, त्यावरून हीच गोष्ट स्पष्ट होते. ब्राह्मण त्याचे मुख आहेत, क्षत्रीय त्याचे हात आहेत. वैश्य त्याच्या मांड्या आहेत आणि शुद्र ते त्याचे पाय आहेत. ज्या समाजांत अशी चतुर्विध व्यवस्था आहे, तो हिंदू समाज आपला ईश्वर आहे.[२२] व्यक्ती आणि समाज यांचे संबंध शरीर आणि त्याचे अवयव असे मानण्याची कल्पना व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नाही, असे सांगण्याचीच नाही काय ?

जे काही घडते, ते पूर्वसंचितानुसार अपरिहार्यतेने घडते. हा सर्व त्रिगुणात्मक प्रकृतीचा खेळ आहे.[२३] मानवी जीवनासंबंधीचा हा दृष्टीकोन व्यक्तीला एकंदर लौकिक व सामाजिक कर्तृत्व, महात्म्य, स्वातंत्र्य नसल्याचाच निदर्शक नाही काय ?

तथापि हिंदुधर्मामध्ये इस्लामप्रमाणे राजसत्ता व धर्मसत्ता एकत्र केंद्रीत झालेली नाही. मध्यवर्ती संघटित धर्मसंस्थाही (ख्रिश्चन व इस्लामप्रमाणे) नाही. त्यामुळे व्यक्ती अगदी गुलाम नाहीत. व्यक्तिगत तपश्चर्या, नैतिक वर्तन, यामुळे कोणाही व्यक्तीस मोक्ष प्राप्त करून घेता येतो असे हिंदुधर्म मानतो. हिंदुधर्मात नीति ही चित्तशुद्धीद्वारा मोक्षाचे कारण मानली आहे.[२४] त्यामुळे व्यक्तीला गौण कां होईना पण स्थान आहे. कांही प्रमाणांत भिन्न विचार मांडण्यात आले आहेत. त्यामुळे निदान वैचारिक क्षेत्रांत तरी भिन्न भिन्न विचारांचा विकास होऊ शकला. पण हिंदुधर्म ही कल्पना व जातीसंस्था हीच वस्तुस्थिती असल्यामुळे आचरणाचे बाबतीत मोकळीक मिळू शकत नव्हती. एकोणिसाव्या शतकात इंग्रजी शिक्षण मिळू लागल्याबरोबर त्याचा फायदा हिंदूंनी मोठ्या प्रमाणात घेतला. त्यामुळे त्या समाजांत सुधारणा होण्यास सुरुवात झाली.

**धर्मशासन आणि समाज**

धर्मशासनाला बौद्धिक व नैतिक आधार धर्मग्रंथांचा असतो. त्यांचे रहस्य उलगडून सांगणारा व सामाजिक व्यवहाराच्या संदर्भात धर्माधर्माचा निर्णय

करणारा शास्त्रीपंडितांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण होतो. तसेच देवाचे पुजारी, भिक्षुक, जोशी, भट, गुरव, भगत, देवऋषी यांचाही एक वेगळा वर्ग निर्माण होतो. राजा व प्रजा यांचेमध्ये जसा सरकारी अधिकारी वर्ग असतो, त्याप्रमाणे देव व त्यांचे भक्त असणारी सामान्य प्रजा यांचेमध्ये वर उल्लेखलेले मध्यस्थ असतात. त्यांचा योगक्षेम राजाकडून व समाजांतील वरिष्ठ वर्गाच्या दातृत्वा-मधून होत असतो.

**शूद्रादिशूद्रांना व स्त्रियांना येथे विद्यार्जनास बंदी होती.** समाजांतील अशाच विद्यावंचित अन्य घटकांनी सामाजिक विषमता, उच्चनीचता, भेदाभेद नैसर्गिक व ईश्वरप्रणीत मानावेत. स्वधर्माप्रमाणे प्राप्त नियत-कर्म कितीही हीन प्रतीचे असले, तरी ते आचरण्यांतच आपले खरे हित व अंतिम कल्याण मानावे अशी शिकवण शास्त्रीपंडितांनी व भटाभिक्षुकांनी, धर्मग्रंथांनी व पुराणांनी दिली. मनुष्याच्या विचारशीलतेला व निर्णयशक्तीला अवसर ठेवला नाही. त्यामुळे सामान्यांची मने अगतिकता, न्युनगंड, पराभूतपणा, वैफल्य भावना आणि प्रारब्धवाद यांनी ग्रासून गेली. सत्यासत्य, कार्याकार्य, धर्माधर्म, नीतीअनीति यांचा निर्णय धर्मशास्त्राच्या आधारे किंवा रूढीप्रामाण्यानुसार होई. श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म सर्वांवरच बंधनकारक होता.

**विद्याबंदीमुळे हिंदू समाजात ज्ञान आणि श्रम यांची फारकत घडून आली उत्पादक वर्ग एकीकडे तर पढिक वर्ग दुसरीकडे अशी विभागणी झाली.** रुढीदास्य, प्रयोगशीलतेचा अभाव आणि अनुभवजन्य ज्ञान व तत्त्वचिंतन यांच्यांतील दुरावा यामुळे उत्पादन साधनांत येथे सुधारणा होऊ शकली नाही. कष्टकरी समाज जातीजातीत विभागला असल्यामुळे त्यांच्यात एकजूट कधी होऊ शकली नाही. विद्रोहाची भावना निर्माण झाली नाही. अस्मिता कधी जागृत झाली नाही. शतकानुशतके नीच पातळीवरील दयनीय जिणेच कंठण्यांत त्याला इतिकर्तव्य मानावे लागले. आलीया भोगासी सादर व्हावे लागले.

**हिंदूंचे धार्मिक तत्त्वज्ञान पुनर्जन्मावर श्रद्धा ठेवणारे असल्यामुळे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीच्या विरोधी आहे. हिंदुधर्मपरंपरा व संस्कृती ज्यांच्या हाडीमासी खिळली आहे, असे लोक धर्मपरिवर्तनालाच नव्हे तर कोणत्याही**

**परिवर्तनास नेहमीच प्रतिकूल राहिले आहेत.**[२५] या मनोवृत्तीमुळे आपल्या परंपरा टिकवून ठेवण्याचे व चिवटपणे जतन करणेचे कार्य हिंदू समाजाने नेहमीच केले आहे. हिंदुंच्याइतकी चिवट जमात जगाच्या इतिहासांत सापडत नाही. हिंदू समाजाची टिकून राहण्याची शक्ती एवढी प्रचंड आहे की कत्तली, विध्वंस व अत्याचार होऊनही, शतकानुशतकांच्या पराभवानंतरसुद्धा हा समाज टिकून राहिलेला आढळतो. हा विलक्षण चिवटपणा मध्ययुगीन धार्मिक अत्याचारांच्या काळांत हिंदू समाजाला वरदान ठरला असेल, पण स्वातंत्र्याच्या काळांत तो मोठा शाप ठरणार आहे. **सगळे सुधारक, सगळे विचारवंत पचवून आत्मसात करून पुन्हा जसेच्या तसेच शिल्लक राहण्याची हिंदू समाजाची शक्ती फार प्रचंड आहे.** राम मोहन रॉयपासून, ज्योतिबा फुलेपासून, आजतागायत सर्व सुधारकांचे तीनशे वर्षांतील आंदोलन विचारांत घेतले व त्याचे यशापयश पाहूं लागले, तर शहरांतून वावरणारा १५ ते २० टक्के समाज तोही मर्यादित प्रमाणांत या सुधारणांनी प्रभावित झाल्याचे दिसते. **बुद्धापासून आंबेडकरापर्यंत सर्व संघर्षाचे फलित काय, असे विचारले, तर जातिभेद अद्याप फारसा शिथिल झालेला नाही, उलट प्रौढ मतदानाने सुप्त जातीयवाद उसळून वर आलेला आहे, असेच म्हणावे लागते.**[२६]

एवढा चिवट हिंदू समाज कमालीचा असहिष्णु, निर्दय, क्रूर असूनही उदारमतवादी, सहिष्णु म्हणून ओळखला जातो. तोंडाने सर्वधर्मसमानत्व व आत्म्याचे अद्वैत सांगणाऱ्या या समाजाने निदान दोन हजार वर्षे कांही कोटी आदिवासींना संस्कृतीच्या बाहेर व उरलेल्या काही कोटी अस्पृश्यांना संस्कृतीच्या आंत गुलाम करून टाकले आहे. स्त्रियांची गुलामी वेगळीच. उदार हिंदू संस्कृतीत इंग्रजांनी कायद्याने बंद करीपर्यंत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत माणसांच्या खरेदीविक्रीचे बाजार, गुरांच्या आठवडा बाजाराप्रमाणे, भरत असत! दासी, बटकी, वेश्या यांचा मिळून जगांतील सर्वात मोठा समूह निर्माण केलेला होता, ते वेगळेच!

अंधश्रद्धा व गुलामी दोन हजार वर्षे टिकवून धरणाऱ्या हिंदू परंपरेला सहिष्णु कसे म्हणावे? अगदी आरंभापासून अनेक देवता, पंथ, आणि

चालीरीति येथे चालू होत्या. म्हणून हा समाज सहिष्णु वाटतो. परिवर्तन-विरोधी व असहिष्णु असणारे पांचसातशे गट समुच्चयाने हिंदू समाजात वावरतात म्हणून तो सहिष्णु वाटतो, इतकेच यांतील सत्य समजायचे.

हिंदू समाज संघटित नाही, हेच त्याचे चमत्कारिक सामर्थ्य आहे.[२७] आज आपण एका चमत्कारिक दुष्टचक्रांत सापडलो आहोत. मुस्लिम समाजांतील धर्मवेडे, आक्रमक, आणि राष्ट्रद्रोही राजकारण आवरणे आपणांस जमलेले नाही. त्यामुळे हिंदू समाजात त्याची प्रतिक्रिया म्हणून क्रमाने आक्रमक, व प्रतिगामी श्रद्धा बलवान होत आहेत. हिंदू समाजातील सर्व सुधारणावाद मुळापासून उपटला जाण्याची व तो समाज मोठ्या प्रमाणांत प्रतिक्रियावादी होण्याची दाट शक्यता निर्माण होत आहे.

**हिंदुजातीयवाद** – चार सोज्वळ भूमिका घेत असतो. (१) सर्वच धर्म सारखेच पवित्र व सत्य आहेत. (२) धर्माविषयी कांहीच न बोलता, सर्व जातीयवाद्यांशी तडजोडी करणे. (३) हृदयपरिवर्तनाची गरज. (४) हिंदुधर्म सर्वश्रेष्ठ धर्म आहे. आज भारतात बहुसंख्य असलेला हिंदू समाज कर्मठ, अंधश्रद्ध, व धर्मश्रद्ध आहे. त्यांत दोन प्रकारचे लोक येतात. पहिला प्रकार म्हणजे परंपरागत धर्म म्हणून स्वीकार करणारांचा. त्यांतील चालत आलेल्या कल्पनांचा, रुढींचा स्वीकार करणारांचा. कालाचे ओघात त्यातील काही बाबींचा व्यवहारांत वापर करता आला नाही. तरी त्याचा फारसा विधी-निषेध न बाळगतां वैचारिक निष्ठा तशीच अभंग ठेवणारांचा. दुसरा प्रकार धर्मश्रेष्ठत्वाच्या अहंकाराने भारलेल्यांचा. हिंदुधर्मातील आध्यात्मिक संस्कृती पाश्चात्यांच्या जडवादी संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ असल्यामुळे सगळ्या जगाने तिचा स्वीकार व अनुकरण केले पाहिजे असे प्रतिपादन करणाऱ्यांचा.

धर्मश्रेष्ठत्वाच्या अहंकारांतून जातीयवाद निर्माण होतो हे आपण इस्लामचा विचार करतांना पाहिले आहे. तोच प्रकार येथे आहे. शिवाय भारतात हिंदुंची बहुसंख्या आहे. बहुमतानुसार त्यांचेच येथे राज्य असले पाहिजे, ही भावनाही यांत प्रमुख आहे. त्यामुळे मुसलमानांप्रमाणेच हे लोकही सारासार

**विचार, सामोपचार, तडजोड वगैरे बाबी भित्रेपणाच्या व अकर्तेपणाच्या निदर्शक समजतात.**

**भारतांतील दोन्हीही प्रमुख जमाती मिळून जवळजवळ ९५ टक्के लोकसंख्या अशा रीतीने जातीयवादाच्या प्रभावाखाली आहेत किंवा जात चालल्या आहेत. तोच इहवादास मोठा अडथळा आहे.** त्यांचा चिवटपणाच इहवादाच्या विकासाला प्रतिबंध करीत आहे. म्हणून सर्वच जातियतेविरुद्ध आंदोलन उभे केले पाहिजे. त्यासाठी खालील गोष्टींचा प्रथम विचार झाला पाहिजे.

(१) सर्वच धर्म सर्वंकष स्वरूपाचे आहेत. इहवाद धर्मविरोधी नाही. पण सर्वंकष धर्म इहवादाच्या विरोधी आहे हे लक्षात घेऊन धर्म पारलौकिक क्षेत्रापुरता व मनुष्य व ईश्वर यांचे संबंधापुरता मर्यादित आहे असे मानले पाहिजे. म्हणजेच ऐहिक जीवनासाठी किंवा समाजधारणेसाठी मूल्ये देण्याचा धर्मांचा अधिकार अमान्य केला पाहिजे.

(२) इस्लाम व हिंदू धर्माप्रमाणे समाजच ईश्वर आहे. कुराणामधून व्यक्त होणारी ईश्वरी इच्छा समजून घेण्याचे एकमेव साधन 'उम्मत' हेच आहे. असे इस्लाम मानतो. त्यामुळे त्या धार्मिक समाजाचा एक अभिन्न भाग एवढेच व्यक्तीला स्थान आहे. त्याचप्रमाणे हिंदु समाजच परमेश्वर मानणाऱ्या समाजांतही व्यक्तीस स्वतंत्र स्थान नाही. जेथे व्यक्तिमहात्म्य नाही तेथे व्यक्तिस्वातंत्र्य कसे असणार ? हा धर्मविषयक दृष्टीकोन लोकशाही जीवनमूल्यांचे विरोधी आहे.

(३) ज्ञानाचे बाबतीत सर्वच धर्मांची भूमिका एकच आहे. आत्मज्ञान व भौतिक ज्ञान असा फरक सर्वच धर्म करतात. आत्मज्ञानच म्हणजे आत्म्यासंबंधीचे ज्ञानच श्रेष्ठ मानतात. ज्ञान ग्रहण करण्याचे मानवी बुद्धीचे सामर्थ्य कोणत्याही धर्माला निरपवाद मान्य नाही. त्यापेक्षा ईश्वरी प्रेरणा किंवा अंत:प्रेरणा हेच खऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीचे साधन मानण्यांत येते. अल गझाली म्हणतो, 'ज्योतिष, गणित, वैद्यक व अन्य शास्त्रे निरीक्षणाद्वारे ज्ञान मिळवण्याचा दावा करतात. पण खरे ज्ञान ईश्वरी कृपाप्रसादानेच फक्त शक्य

आहे, हे त्यांनी लक्षांत ठेवले पाहिजे. **बुद्धीने होणाऱ्या ज्ञानापलिकडे वेगळे ज्ञान असते व मानवी डोळ्यांना अदृश्य असे ज्ञान वेगळ्याच दृष्टीने पहाता येते. भावी घटनांची जाणीवही त्याद्वारे होऊ शकते. या दृष्टीकोनामुळे ज्ञानाचे स्वरूपच बदलून जाते व त्याचा परिणाम मानवी बुद्धीच्या सामर्थ्याबद्दल शंका निर्माण होण्यांत होतो.** साहजिकच व्यक्तित्व, व्यक्तिमाहात्म्य, भौतिक ज्ञान, बुद्धिवाद, व्यक्तिवाद, मानवतावाद व शेवटी लोकशाही यांना अर्थच राहत नाही.

(४) 'सार्वभौमत्व फक्त अल्लाचे' ही इस्लामची भूमिका व 'धर्माचे सार्वभौमत्व' ही हिंदूंची भूमिका यामुळे 'जनतेचे सार्वभौमत्व' व 'लोकशाही' या कल्पना पोकळ व औपचारिक ठरतात. इस्लामी शासन बिगर मुस्लिमांना कसलेही अधिकार देत नाही, हे अर्धसत्य आहे. ते मुसलमानांनाही कसलेच अधिकार (मताधिकार, नागरिक हक्क किंवा प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार) देत नाही. अधिकार, सत्ता फक्त उलेमांना. तेही धर्मशास्त्राला सापेक्ष ठेवून. एरवी सर्वाधिकार खलिफा किंवा सम्राट यांनाच. म्हणून **इस्लामी शासन म्हणजे मुसलमानांची गुलामीच. हिंदुराज्य म्हणजे हिंदूंची गुलामी. 'ईश्वरी सत्तेचा दास' एवढेच स्थान मानवाला धर्मदृष्टचा आहे.** मग मानवतावाद किंवा लोकशाही कोठे राहिली ?

(५) कोणताही करार करणेसाठी दोन व्यक्तींची साक्ष घालावी लागते. त्यापैकी एक व्यक्ती पुरुष असेल तर इस्लाम धर्माप्रमाणे दुसरी व्यक्ती एक स्त्री असून चालत नाही. दोन स्त्रिया लागतात. वारसा हक्क, विवाह, घटस्फोट याबाबतही स्त्री पुरुषांच्या हक्कांमध्ये इस्लामप्रमाणे विषमता आहे. बंधुत्वाचा पुरस्कार इस्लाम करतो असे म्हणतात. पण तो मुस्लिमांपुरताच मर्यादित असतो. तेही प्रार्थनेच्या वेळेपुरताच. अल्लाची लेकरे म्हणून. इतरांना ते काफरच समजतात.

(६) धर्माच्या अपरिवर्तनीयतेची कल्पना इहवादाला विरोधी आहे. इस्लाम अपरिवर्तनीय असल्याचा दावा करण्यांत येतो. तेच त्याचे वैशिष्टच असल्याचेही सांगितले जाते. पण **मुन्नीर कमिशनचा वृत्तांत पाहता इस्लाममध्ये आतापर्यंत**

काहीच बदल झालेला नाही ही समजूत गळून पडते. त्याचप्रमाणे शरियत कायद्याप्रमाणे, आजच्या काळातच नव्हे, तर पैगंबराच्या निधनानंतर कोणतेच इस्लामी राज्य वागू शकलेले नाही, हेही स्पष्ट होते. कालौघाप्रमाणे काळाच्या गरजानुसार, इतर धर्मांप्रमाणेच इस्लामही बदलत आलेला आहे. पाकिस्तान, ईजिप्त, तुर्कस्तान वगैरे इस्लामी राज्यांतील मुस्लिम व्यक्तिगत कायदा भारतातील मुस्लिम व्यक्तिगत कायद्यापेक्षा कितीतरी प्रगत आहे. हिंदुधर्मीय लोक मात्र शेवटचा प्रेषित कोणालाच मानीत नाहीत. ईश्वराच्या प्रेषितांची परंपरा अखंड चालणार आहे असे मानतात. त्यामुळे धर्मसुधारणांना वाव आहे.

कोणताही धर्म प्राथमिक अवस्थेत अशी अपरिवर्तनीय भूमिका घेत असतो. त्याचप्रमाणे इस्लामने ती घेतली होती. पण गेल्या काही शतकांच्या ओघात ती टिकू शकलेली नाही, हे जगातील इस्लामी राष्ट्रांच्या अनुभवावरून दिसून येते. उदा., शरियतचा कायदा, त्याचा एक भाग गुन्ह्यासंबंधीचा कायदा असतो. दुसरा भाग राज्यरचना सांगतो. तिसरा अर्थव्यवहार व समाजरचना सांगतो. चौथा आंतरराष्ट्रीय कायद्याचा तर पाचवा साक्षीसंबंधीचा आहे. सातव्या आठव्या शतकांत या कायद्याप्रमाणे एका समाजाचे संपूर्ण जीवित नियंत्रित होत होते. आज यापैकी काय शिल्लक राहिलेले आहे? सगळ्याचा सगळा गुन्ह्याचा कायदा इंग्रजी अमदानीत, फार पूर्वीच रद्द झाला आहे. साक्षीचा व पुराव्याचा कायदाही संपलेला आहे. आंतरराष्ट्रीय धोरण, राज्यरचना, आर्थिक व्यवहार याबाबत शरियतचा कायदा अस्तित्वांतच नाही. म्हणजे शरियतचा ८० टक्क्याहून जास्त भाग रद्दच झालेला आहे. मुसलमान त्यावेळी काय करू शकले? त्यांची पद्धत फक्त अडून बसण्याची असते, बंड करणे सोईचे नाही याची जाणीव त्यांना दुर्गापूर, रांची येथील दंगलींनी करून दिली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लीम धर्मात हस्तक्षेप करणारे जे कायदे भारतात झाले. (उदा., स्पेशल मॅरेज ॲक्ट) त्यांचा संदर्भ लक्षात ठेवला पाहिजे. या कायद्याने मुस्लिम स्त्रीचा पती बिगर मुसलमान असू शकतो. मुस्लिम पुरुषाची कायदेशीर पत्नी बिगरमुस्लिम असू शकते, याला मान्यता मिळाली आहे. गोषा व पडदा सोडून नोकरीत सामील होणाऱ्या मुस्लिम

स्त्रियांची संख्या वाढत आहे. मराठी माध्यमाच्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या मुस्लिम विद्यार्थ्यांची संख्याही ग्रामीण भागांत वाढत आहे. तसेच रमजानचा उपवास किती मुस्लिम तरुण तरुणी करतात ? शुक्रवारी नमाजाला किती मुस्लिम तरुण जातात ? परिस्थिती बदलली म्हणजे त्या दडपणाखाली बदल होतच जातात. हमीद दलवाई, प्रो. हबीब, रफिक झकेरिया, आलम खुंदमेरी ही नवीन माणसे पुढे येत आहेत. त्यावरून मुस्लिम समाज कधी बदलतच नाही ही समजूत सोडून दिली पाहिजे.

मुस्लिम समाजात सुधारणावाद बळकट करणेची जरूर आहे हे मात्र खरे. त्यासाठी दोन गोष्टी प्रथम केल्या पाहिजेत.

(१) ऐतिहासिक सत्ये त्यांना वरचेवर समजून दिली पाहिजेत. मुस्लीम धर्माची चिकित्सा मोकळेपणाने केली पाहिजे. व मुसलमानांना ती करू दिली पाहिजे. कारण सर्व चिकित्सेचे मूळ धर्मचिकित्सेत असते असे मार्क्सचे वचन सत्यच आहे. अशी मुक्त चिकित्सा सर्वच गोष्टींची करण्याची सवय त्यामुळे वाढू शकेल. (२) भारतीय घटनेचे मूळतत्त्व 'सार्वभौमत्व जनतेचे' हे आहे. अल्लाचे नव्हे किंवा धर्माचे नव्हे, हे त्यांना समजून दिले पाहिजे. (३) कुटुंब नियोजन, समान नागरी कायदा यांचा जोरदार पुरस्कार केला पाहिजे (४) धर्मसुधारकांना मोठ्या प्रमाणांत पाठिंबा दिला पाहिजे. इतर समाजाप्रमाणेच मुसलमान समाजही बदलत आला आहे. भारतांतही तो बदलला पाहिजे.

अशा तऱ्हेची प्रबोधनाची चळवळ हिंदू समाजात काही प्रमाणांत झालेली आहे. पण काही ऐतिहासिक कारणांनी मुसलमान समाज त्यापासून दूर राहिला. पण तसे आंदोलन घडून आल्याशिवाय मुस्लिम समाजाची प्रगती होणार नाही. शिवाय एक समाज अशा रीतीने कर्मठ, मागासलेला, धर्मवेडा व म्हणून आक्रमक राहण्याचा परिणाम इतर समाजावर होतो. भारतांतील दोन प्रमुख समाजाच्या बौद्धिक प्रगतीमध्ये ही जी तफावत पडली आहे, त्यातून आजच्या भारताचे बहुतेक सांस्कृतिक व सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून प्रबोधनाचे आंदोलन हीच आजची गरज आहे. त्याशिवाय इहवादास

अनुकूल वातावरण निर्माण होणार नाही. ही गरज एकंदर भारतीय समाजाचीच आहे **प्रेषिताने शेवटी हीच भूमिका सांगितली आहे. ते म्हणतात 'ईश्वरी आदेशाव्यतिरिक्त ऐहिक बाबतीत मी एक साधा माणूस आहे.' याचा अर्थ ऐहिक बाबतीत मनुष्य म्हणून तेही चुकीस पात्र आहेत. म्हणजेच सुधारणा करतां येऊ शकते. केली पाहिजे. करण्यास वाव आहे.**

विसाव्या शतकाच्या या अंतिम कालखंडांत जगांतील भिन्नभिन्न व दूरदूरचे मानवसमाज परस्पर संबंध जुळून एकत्र येत आहेत. त्यांच्यांत दळणवळण अतूटपणे सुरू झाले आहे. आर्थिक व राजकीय दृष्टीने जगांतील सगळी राष्ट्रे परस्परावलंबी बनू लागली आहेत. अशा वेळी **जगांतील सगळ्या राष्ट्रांना आणि समाजांना एकत्र सहकार्याने जगता येईल. सामाजिक सहकार्य उत्पन्न होईल. मानवी एकता प्रस्थापित होईल अशा तऱ्हेच्या विवेकबुद्धीला पटणाऱ्या नीतीधर्माची आवश्यकता आहे.** यासाठी आपल्या परंपरागत धर्मांना अंतर्गत व्यवहारापुरते मर्यादित ठेऊन, व्यापक स्वरूपाची मानवी मूल्ये स्वीकारली पाहिजेत. एकात्मक मानव समाजाचे भवितव्य सुरक्षित होईल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे.

**मानवी जीवशास्त्रदृष्टया शुद्ध, विवेकनिष्ठ व धर्मग्रंथाच्या आधाराची गरज नसलेला, व्यापक मानवी प्रेमावर आधारलेला, निरपवाद मित्रतेचा धर्म प्रत्ययास येऊ शकतो.** आज जागतिक शांतता, सहकार्य व समृद्धी, यांच्या तत्त्वांवर स्थिर राहायचे तर धर्माधर्मातील पक्षपात किंवा भेदभाव अयोग्य ठरतात. या दृष्टीकोनाला पोषक अशी निरपेक्ष व्यापक मानवी प्रेमभावना मनुष्याच्या ठिकाणी उपजतच असते. दुसरे असे की स्वार्थापेक्षा परोपकारांनी मानवी व्यवहार सर्वमान्य होऊ शकतात. उदा., वैद्यकसंस्था, बँका, शिक्षणसंस्था आजच्या नागरी संस्कृतीचे संवर्धन करणारी केंद्रस्थाने मानली जातात. म्हणून **इहवादी नैतिक तत्त्वज्ञानाला शिक्षणव्यवस्थेत अग्रस्थान प्राप्त करून दिले पाहिजे. अशा तऱ्हेचे तत्त्वज्ञान भाई मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'नवमानवतावाद' या नावाने जागतिक विचारासाठी मांडले आहे.** विवेकबुद्धीचे प्रामाण्य धर्मग्रंथापेक्षा अधिक आहे ही गोष्ट भगवान बुद्धाने फार पूर्वीच स्पष्ट केली

आहे. त्या विवेकबुद्धीस व मानव संस्कृतीस सर्व मानवांची समता आणि एकता निर्माण करणाऱ्या नीतिधर्माचे अधिष्ठान निर्माण करुन देणे आवश्यक आहे.

---

संदर्भ : १. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – हिंदूधर्मसमीक्षा – व्याख्यान दुसरे
२. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. १६०
३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – हिंदूधर्मसमीक्षा – व्याख्यान दुसरे
४. जवाहरलाल नेहरु, – हिंदू (१७–७–५१) – पा. नं. ४
५. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. २४१
६. जवाहरलाल नेहरु, – डिस्कव्हरी ऑफ इंडिया – पा. नं. ४१०-११
७. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. २४५
८. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. २४६
९. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. २४७
१०. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. २०३
११. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. २१०
१२. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन – हिंदू व्हयू ऑफ लाईफ – प्रकरण ३ रे
१३. गं. बा. सरदार, – धर्म आणि समाजपरिवर्तन – पा. नं. २९
१४. गं. बा. सरदार, – धर्म आणि समाजपरिवर्तन – पा. नं. १४
१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह – पा. नं. २०८
१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह "
१७. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह – पा. नं. २०७
१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह – पा. नं. १७७
१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – हिंदूधर्म समीक्षा – व्याख्यान तिसरे
२०. डॉ. बी. आर. आंबेडकर, – निवडक भाषणे – संपा. बी. जी. जावळे
२१. मा. स. गोळवलकर, – विचारधन – पा. नं. ९६
२२. मा. स. गोळवलकर, – विचारधन – पा. नं. २५
२३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – हिंदूधर्म समीक्षा – व्याख्यान दुसरे
२४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – हिंदूधर्म समीक्षा – व्याख्यान दुसरे
२५. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. १९०
२६. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. १९२-९३
२७. नरहर कुरुंदकर, – जागर – पा. नं. १९५

# ७

# नीति आणि इहवाद

इहवादासंबंधी आपल्या समाजांत गैरसमजच फार आहेत. 'खा पी, मजा कर, जीवन हा फुलबाग' अशी उच्छृंखल मनोवृत्ती म्हणजेच इहवाद अशी समजूत प्रचलित आहे. तसेच पाश्चात्य संस्कृती इहवादी किंवा जडवादी आहे तर भारतीय संस्कृती अध्यात्मिक आहे असेही सांगितले जाते. भारतीय संस्कृती त्यामुळे श्रेष्ठ आहे असेही दर्शविले जाते. पण ही समजूत पूर्णपणे निराधार आहे हे आतापर्यंत इहवादाचा व संस्कृतीचा जो विचार आपण केला त्यावरून दिसून येईल. जीवनाकडे पाहण्याच्या इहवादी दृष्टीकोनामध्ये प्रवृत्ति-परतेबरोबरच बुद्धीवाद, व्यक्तिवाद व मानवतावाद यांचा समावेश होतो हे आपण पाहिले आहे. अशा विचारांनी प्रेरित झालेल्या व्यक्तींनी मानवी इतिहासांत कितीतरी महान कृत्ये केलेली आहेत. उदा., पंडित नेहरु, महात्मा फुले, प्रा. आगरकर, भाई मानवेन्द्रनाथ रॉय, जयप्रकाश नारायण, स्वातंत्र्य-वीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदि थोर महात्म्यांनी समाजाच्या कल्याणासाठी आपले संपूर्ण जीवन वाहिलेले आहे हे सुप्रसिद्धच आहे.

तरीही इहवादाचा नीतीशी काही संबंध असेल किंवा असावा अशी कल्पना बऱ्याच लोकांना विसंगत वाटते. याउलट धर्म आणि नीति यांचा संबंध

जवळचा व साहजिक वाटतो. किंवा धर्मातूनच नीतिचा उगम होतो असेही बरेच लोक मानतात, आणि इहवाद तर धर्माच्या विरोधी आहे अशी ही समजूत आहे म्हणून वैयक्तिक किंवा सार्वजनिक जीवनात नीतिचा आग्रह धरणाऱ्यांनी इहवादापेक्षा धर्माचा आसरा घेतला पाहिजे असेही त्यांना वाटते. याचे अलिकडच्या काळातील उत्तम उदाहरण म्हणजे म. गांधींचे देता येईल. त्यांनी तर नीति हाच धर्म मानला होता हे प्रसिद्धच आहे. म्हणून या सर्वच प्रश्नांचा मूळातून विचार होणे जरूर आहे. इहवादाच्या दृष्टीकोनांतून ईश्वर आणि मनुष्य यांचेमधील परस्पर संबंध व मानवाचे पारलौकिक जीवन एवढाच धर्माचा विषय आणि आशय आहे. पण कोणत्याही धर्माला हे मान्य नाही. त्याची भूमिका उपासना, कर्मकांड, समाजरचना, तत्वज्ञान, नीति वगैरे मानवी जीवनाच्या सर्वच अंगोपांगांना गवसणी घालण्याची आहे. या त्याच्या सर्वंकष प्रवृत्तीमुळे धर्म आणि नीति एकमेकाशी जखडली गेली आहे. किंबहुना धर्माशिवाय नीति असू शकते ही कल्पना सुद्धा माणसाला त्यामुळेच करवत नाही.

तथापि समाजाच्या वेगवेगळ्या घटकांत सुसंवाद व सहकार्य असावे, सर्व माणसांच्या अनेकविध गरजांची परिपुर्ती व्हावी, व्यक्तिमत्वाचा अत्युच्च विकास व्हावा यासाठी नीतिमूल्यांची गरज समाजात असते. हे सर्वमान्य सत्य आहे. नीतिच्या या कार्याचा धर्माशी तसा साक्षात संबंध येत नाही म्हणून धर्माशिवाय नीति संभवतच नाही ही कल्पना योग्य नाही. धर्म आणि नीति यांच्यात नेहमीच सुसंवाद किंवा साहचर्य राहिलेले आहे असेही इतिहासावरून दिसून येत नाही. उलट वेगवेगळ्या धर्माच्या नावाखाली आजतागायत कितीतरी अनीतिची व क्रूरपणाची कृत्ये घडलेली आहेत. नरमेध, कन्याहत्या, सती, पुर्नविवाह बंदी, केशवपन, जातीप्रथा, स्त्रीदास्य, अस्पृश्यता यासारख्या दुष्ट व अमानुष रूढींना धर्माने पावित्र्य बहाल केले आहे. त्यावरून धर्म ही नीतिची हमी आहे असे म्हणता येत नाही. जगाच्या इतिहासांत धर्माच्या प्रेरणेने रक्तपात, कत्तली, अनंत वेळा अनंत ठिकाणी झाल्या आहेत. एवढेच नव्हे तर हे करणाऱ्या लोकांच्या मनांत अपराध भावनेचा लवलेशही नव्हता. उलट त्याबद्दल त्यांना अभिमानच वाटला असावा. कारण हे प्रत्येक कृत्य त्यांना धर्मकृत्य वाटत होते. उदाहरणासाठी हिंदू धर्म घेतला तर त्यातील

तत्वचिंतकांना आणि साधुसंतांना अस्पृश्यता, जातीप्रथा, शुद्रांची आर्थिक व मानसिक कुचंबना, रूढीदास्य, स्त्रीदास्य इत्यादि गोष्टी अनीतिमूलक आहेत अशी शंकासुद्धा कधी आली नसेल! चोरी, फसवणूक, अफरातफर, अत्याचार, बलात्कार हे गुन्हे मानले जातात. पण विविध सामाजिक संस्थांत, रूढीत व प्रथामध्ये जी अनीति काठोकाठ भरून राहिली आहे तिची कोणास कधी खंत वाटली नाही! चीड तर नाहीच नाही. जमीनदार, सावकार, पुरोहित, शासनसंस्था यांच्याद्वारे कित्येक शतके कष्टकरी लोकांचे जे राजरोस शोषण चालू आहे त्यांत अनीति किंवा अन्याय आहे असे त्या काळांतील जाणत्या व जबाबदार लोकांनाही कधी वाटले नाही! कौटुंबिक व वैयक्तिक जीवनातील नीतिनियम मनुष्य तत्परतेने पाळतो. पण सामाजिक न्याय व नीति याविषयी तेवढी आस्था त्याच्या ठिकाणी क्वचितच दृष्टीस पडते. स्वतःचे शरीर व घर आपण कटाक्षाने स्वच्छ ठेवतो, पण रस्त्यावर कचऱ्याचे ढीग पडले असले तरी त्याबद्दल आपणांस काही वाटत नाही! उलट आपल्या घरातील केरकचरा आपण त्यात नेऊन टाकतो. सध्या आपल्या सामाजिक जीवनात जिकडे तिकडे स्वार्थीपणा, फसवाफसवी, भोंदूपणा व भ्रष्टाचार माजला आहे. त्याबरोबरच धार्मिक अंधश्रद्धा, कर्मकांड, देवदेवळे, पुजाअर्चा, उपास-तापास, कथाकीर्तने व प्रवचनेही खूपच वाढली आहेत. धर्म आणि नीति यांचे परस्परावलंबन किंवा साहचर्य असते या समजूतीत थोडे जरी तथ्य असते तरी असा प्रकार दिसला नसता.[२]

**नीति म्हणजे काय ?**

चोरी कधी करु नये असे वचन आपण नेहमी ऐकतो पण चोरी करण्याचा मोह होऊनही एखाद्याने चोरी केली नाही तर तेवढ्यावरून तो मनुष्य नीति-मान ठरु शकेल असे नाही. कारण चोरी केल्यास कायद्याप्रमाणे शिक्षा होईल या भयामुळे त्याने चोरी केली नसेल तर त्याचे वर्तन कायदेशीर ठरेल पण नीतिमान ठरणार नाही किंवा चोरी केल्यास पाप लागेल व नरकांत पडावे लागेल या भयाने त्याने चोरी केली नसेल तर त्याचे वर्तन धार्मिक ठरेल पण नीतिमान ठरणार नाही. चोरी करणे योग्य नाही असे वाटल्यावरून त्याने चोरी केली नसेल तर मात्र त्याची कृती नैतिक ठरेल यांत शंका नाही.

नैतिक वर्तन बहुधा स्वाभाविक असते. काहीवेळा मात्र अनेक पर्याय असूनही जाणूनबुजून ते केलेले असते. कसेही असले तरी त्या वर्तनामागील हेतू दयाळूपणा, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा हाच असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या मूल्यांनी प्रेरित होऊन जे वर्तन घडते त्याला नीति म्हणतात.[३]

मूल्ये अनेक प्रकारची आहेत. माणसाच्या शारिरिक आरोग्यासंबंधी काही मूल्ये असतात. उदा. स्वच्छता, उत्तम हवामान, अन्नाचा तजेलदारपणा वगैरे. मानसिक स्थितीसंबंधी काही मूल्ये असतात. उदा. ध्येय, चिकाटी, निर्णयशक्ती वगैरे. नैतिक मूल्यांचा प्रकार मात्र वरील दोन्ही प्रकारच्या मूल्यांहून वेगळा असतो. कारण त्यांना सामाजिक हेतू असतो. परस्पर साह्यकारी व परोपकारी समाज टिकून धरण्याला ती मूल्ये मदत करणारी असतात. प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, समता, न्याय अशा मूल्यांना वरील गुणधर्म असतात. मानवाच्या कल्याणासाठी सहकारी समाज जीवन उपयुक्त असते. म्हणून त्याचे मूल्य बनते. तेव्हा नैतिक मूल्यांनी प्रेरीत होऊन केलेले वर्तन म्हणजे नीति होय. सहकारी समाज जीवनाला सहाय्यक ठरतात ती मूल्ये म्हणजे नैतिक मूल्ये.

**नीतिचे अधिष्ठान**

दैवीशक्ती निसर्गाच्या व्यवहारांत कोठेही कसलाही भाग घेत नसतात. या गृहित कृत्यावर सर्व विज्ञानशास्त्रे आधारलेली आहेत. मनुष्यही निसर्गाचा भाग आहे. तेव्हा त्याच्या मानसिक व्यवहारांचा व वर्तनाचा अभ्यास करताना हेच गृहित कृत्य स्वीकारण्यास हरकत नसावी. म्हणून मानवी मनाचे सर्व व्यवहार हेतू, इच्छा, गुणधर्म व प्रलोभने समजून घेण्यासाठी प्राण्यांच्या उत्क्रांतीच्या इतिहासाकडे वळणे भाग आहे.

सर्वच प्राण्यामध्ये तीव्र जीवन कलह असतो. त्यामध्ये टिकून राहण्यासाठी निसर्गाशी जुळवून घेण्याची कला आत्मसात करणे, सर्वच प्राण्यांना प्राथमिक अवस्थेत भाग असते. ही कला शारिरीक व मानसिक दोन्हीही स्वरुपाची असते. उत्क्रांतीच्या प्रदीर्घ कालात होमो सॅपीन्सच्या पूर्वजांनी व होमो सॅपीन्सनीही निसर्गाशी जुळवून घेणारे मानसिक गुण संपादन केले असणार हे उघड आहे. माणसाची इच्छाशक्ती व बुद्धी हे असेच संपादित गुण असावेत.

होमो सॅपीन्स हे समाजप्रिय प्राणी आहेत. तसेच त्यांचे पूर्वजही असावेत. कारण जीवनकलहात टिकून राहण्यासाठी एकएकटचा व शारीरीकदृष्टचा दुर्बल प्राण्यांना एकमेकांना मदत करणे व समूह करून राहणे भाग होते. समाजामुळे एकएकटचा प्राण्यांना संरक्षण तर मिळालेच शिवाय तोपर्यंतच्या काळात समाजाने संपादन केलेले निसर्गाचे ज्ञानही मिळाले. या सर्व कारणासाठी समाजांत राहणे अपरिहार्य व उपयुक्त आहे हे समजून आल्यावर त्यानुसार उपयुक्त मनोधर्म त्या प्रदीर्घ काळात त्यानी आत्मसात करून घेतले असावेत. 'मनुष्याचा सामाजिक स्वभाव' असे डार्विनने ज्याला नाव दिले आहे, तो अशा रीतीने निर्माण झाला असावा व त्यातूनच नैतिक मूल्येही निर्माण झाली असावीत. डार्विनने लिहिले आहे 'वात्सल्य व कुटुंबभावना यासह सामाजिक स्वभाव ज्या प्राण्यांचा बनला आहे त्यांच्यामध्ये माणसाप्रमाणेच बौद्धिकशक्तीबरोबर नैतिक विवेक शक्तीही उत्पन्न होणे अपरिहार्य आहे असे मला वाटते. (सर ज्युलियन हक्सले यांच्या 'मानवतावाद्याचे निबंध' या ग्रंथातून हा उतारा घेतला आहे).

कनिष्ठ व उच्च दर्जाच्या सर्वच प्राण्यामध्ये प्राथमिक स्वरूपाची नैतिक जाणीव दिसून येते. यावरून नीतीचा उगम प्राण्यामध्ये नैसर्गिकच आहे असे दिसून येईल. धर्माशी तिचा अर्थाअर्थी काही संबंध नाही कारण धर्माचा उगम मानवविकासक्रमांत खूप नंतरच्या काळात झालेला आहे.

मानवप्राणी सुजाण असतात एवढेच नव्हे तर त्यांना स्वत्वाची जाणीवही असते. त्यांना भावना असतात त्याचप्रमाणे त्यांना त्या भावनांची जाणीवही असते असे स्पिनोझाने दाखवून दिले आहे. ज्यावेळी त्यांना दयाळूपणाची भावना होते व ही भावना सद्भावना असल्याचे कळते त्याचवेळी मूल्य निर्माण होते. नैतिक भावनांच्या जाणीवेतून नैतिक मूल्ये निर्माण होतात.

प्राणीजीवनाच्या उत्क्रांतीच्या ओघांत मानव प्राण्यांनी जे अनेकविध मानसिक गुणधर्म आत्मसात केले त्यांत स्पर्धात्मक किंवा अहंकारी गुणधर्म होते तसेच परोपकारी व सहकारी गुणधर्मही होते. जीवनकलहासाठी या दोन्ही

प्रकारच्या गुणधर्माची त्याला आवश्यकता होती. त्यातूनच त्यांचा नैतिक विकास होतो. अहंकारी व स्वार्थी गुणधर्मावर सहकारी व परोपकारी गुणधर्मांचा वरचष्मा निर्माण होणे ह्यालाच नैतिक विकास असे म्हणतात. असे दोन्ही प्रकारचे परस्परविरोधी गुणधर्म मानवाच्या अंगी असतात म्हणूनच त्याला अर्धासुष्ट व अर्धादुष्ट असे म्हणले जाते.

#### व्यक्तीचा नैतिक विकास

बालवयात व्यक्तीचा नैतिक विकास त्याच्या कुटुंबांतील वडीलधाऱ्या माणसाकडून व समाजाकडून होतो. अर्थातच प्रचलित सामाजिक विषमतेवर आधारलेले व व्यक्तीविकासास प्रतिबंध करणारे नीतिनियम तो समाजाकडून शिकतो. त्या काळातील त्याची वागणूक सर्वांच्या आवडीनिवडीनुसार व प्रशंसेनुसार असते. कालांतराने काही व्यक्ती आपला बौद्धिक विकास करून घेतात आणि त्याचे जोरावर सामाजिक नीतिमत्तेची समीक्षा करून स्वतःच आपली नैतिक मूल्ये ठरवितात. म्हणजेच ते स्वतंत्र होतात व नीतिमानही होतात. आता त्यांची नैतिक वागणूक समाजमान्यतेला अनुसरून नसते तर स्वतःच्या मर्जीप्रमाणे असते.

मनुष्य स्वभावतः स्वार्थी आणि स्खलनशील आहे व म्हणून त्याला नीतिने वागणे भाग पाडण्यासाठी कायद्याच्या किंवा दैवी शक्तीच्या धाकाची व भीतीची गरज आहे असे काही लोक मानतात. पण ही समजूत बरोबर नाही. आपण आताच पाहिल्याप्रमाणे मनुष्य स्वभावामध्ये स्वार्थी व परोपकारी दोन्ही प्रकारचे गुण उपजत असतात. म्हणून नीति बाहेरून लादण्याचे कारण नाही. त्याच्या परोपकारी भावनांच्या विकासाला वाव करून दिल्यास तो आपणहून नीतिने वागू शकतो असे लक्षांत येईल.

नैसर्गिक भावनेची पूर्ती झाली म्हणजे माणसाला समाधान वाटते हा सार्वत्रिक अनुभव आहे. तो माणसाच्या स्वार्थी भावनांना लागू आहे तसाच परोपकारी भावनांनाही लागू आहे. दुसऱ्या माणसाशी तुम्ही दयाळुपणाने वागला किंवा एखादे उदात्त भावनेचे कृत्य केले तर तुम्हाला समाधान वाटते.

उलटपक्षी अहंकारी मनोभावनेच्या आहारी जाऊन तुम्ही एखादे निष्ठुरपणाचे किंवा दुष्टपणाचे कृत्य दुसऱ्या व्यक्तीशी केले तर त्यामुळे तुम्हालाही खूपच मानसिक ताण सहन करावा लागतो. आणि जर नैतिकदृष्टया तुमच्या भावना तीव्र व संवेदनशील असतील तर अहंकारी भावनांच्या आहारी जाऊन तुम्ही जे काही क्षणिक सुख मिळविले असेल त्यालाही मुकण्याची तुमचेवर पाळी येते. याचा अर्थ सुसंस्कृत स्वार्थच नैतिक व सुखी जीवनाला कारण होऊ शकतो. याचेच उत्कृष्ट वर्णन ग्रीक तत्त्ववेत्ता एपीक्युरस याने केले आहे. तो म्हणतो 'मला नीतिमान व्हावेसे वाटते ते देवाला प्रसन्न करण्यासाठी नव्हे तर मला स्वत:लाच.'

**समाजाचा नैतिक विकास**

व्यक्तीचा नैतिक विकास त्याच्या बौद्धिक क्षमतेच्या विकासांतून होतो. तसेच समाजाच्या नैतिक विकासास बुद्धीवाद साह्यभूत होऊ शकतो. समाजातील दुर्बल घटकांची बौद्धिक व सांस्कृतिक फसवणूक होत असते. त्यापासून त्यांची सोडवणूक करण्यासाठी न्याय व समतेच्या पायावर नवी समाजव्यवस्था उभारण्याचे कार्य बुद्धीवाद करतो. संस्कृतीच्या प्राथमिक काळांत काही गुंड व दुष्ट व्यक्तींच्या अहंकारी किंवा स्वार्थी प्रवृत्तीपासून समाजाचा बचाव करण्याचे कार्य धर्मामुळे झाले असेल. पण सध्याच्या काळांत धर्माचे कार्य केवळ नकारात्मकच आहे. सावकार, जमीनदार व धर्मगुरु यांचेकडून होणारी समाजाची पिळवणूक धार्मिक कर्मठपणामुळेच शक्य होते. तरुणावर वृद्ध लोकांचे व स्त्रियांवर पुरुषांचे अवाजवी वर्चस्व कायम ठेवणे धर्मामुळेच शक्य होते. दारिद्र्यांत सुख मानण्याची, किंवा स्वाभिमानशून्यतेची व आत्मवंचनेची शिकवण धर्मच देत असतो. त्यामुळे माणूस स्वत:ची फसवणूक करीत आला आहे सामाजिक पातळीवरही हेच होत असते. पण बुद्धीवादाच्या प्रसाराबरोबर धार्मिक कर्मठपण नष्ट होण्यास सुरुवात झाली व बहुसंख्य समाज जागृत स्वाभिमानी व स्वावलंबी होऊ लागला. त्याला स्वत्वाची व स्वतःच्या अधिकारांची जाणीव होऊ लागली की समाजाचा नैतिक दर्जा सुधारत जातो. याचाच अर्थ असा की संस्कृतीचा अगदी प्राथमिक काळ सोडला तर धर्म व

समाजाचा नैतिक दर्जा यांचे नाते व्यस्तच आहे असे म्हणावे लागते. अगदी अलीकडे वेगळयाच कारणामुळे समाजाचा नैतिक दर्जा खालावत चालल्याचे दिसते. पण त्याचे कारण कांही लोक समजतात त्याप्रमाणे धर्मग्लानी हे नाही. समाज अलीकडे अधिक गुंतागुंतीचा बनत आहे व त्यामुळे त्याला समाजाच्या नैतिकतेच्या अधिक उच्च दर्जाची गरज आहे. पण तो उच्च दर्जा दिसत नाही, हे आहे. बुद्धी आणि नीति यामधील संबंध स्पष्ट करताना प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ मॉरिस जिन्स बर्ग म्हणतात 'ऐतिहासिक विकासक्रमामध्ये मनुष्य हळुहळु अधिकाधिक बुद्धीवादी होत चालला आहे आणि ज्या प्रमाणांत तो बुद्धीवादी होत चालला आहे त्या प्रमाणांत तो नीतिमानही होत चालला आहे असे मला वाटते.'[४]

उदा., वरील विधानाची सत्यता दाखवणारी काही उदाहरणे देता येतील. (१) चौदाव्या ते सोळाव्या शतकाच्या दरम्यान प्रबोधनाच्या चळवळीमुळे यूरोपमधील नैतिक परिस्थिती सुधारण्यास सुरुवात झाली. धार्मिक कर्मठपणास आव्हान देणे एवढेंच त्या चळवळीचे उद्दीष्ट होते. बुद्धिवाद व व्यक्तीस्वातंत्र्य या मानवतावादी ध्येयापुरतीच त्या चळवळीची मर्यादा होती. पण त्या चळवळीतून जे वातावरण निर्माण झाले त्यामुळे विज्ञान शास्त्रांची व उद्योगधंद्यांची प्रचंड वाढ झाली. त्यामुळे अठराव्या शतकास विद्याप्रसाराचे किंवा बुद्धिवादाचे युग म्हणण्यांत येऊ लागले. कारण याच काळात मानवाचे सर्व प्रश्न बौद्धिक कसोटीवर सोडवावे असे मत मांडले जाऊ लागले. त्याचाच स्फोट फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये व यूरोप अमेरिकेत लोकशाही स्थापनेत झाला. युरोपमधील नैतिक दर्जा सुधारण्यास तेव्हापासून प्रारंभ झाला असे इतिहासावरुन दिसून येते.

(२) सोळाव्या शतकापर्यंत इंग्लंडमध्ये चांदीची काही नाणी चोरल्याबद्दल मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाई. शिक्षा देण्याची पद्धतीही अत्यंत अमानुष असे. प्रथम गुन्हेगाराला जाहीररीत्या फरफटत न्यायचे, नंतर त्याचे हातपाय तोडायचे व शेवटी त्याचा शिरच्छेद करायचा. पुढे बुद्धिवादाचा प्रसार झाल्यानंतर इंग्लीश कायदा सुधारला. न्यायाधिशांची वागणूकही बदलली. सतराव्या शतकात त्यावेळचे लॉर्ड चॅन्सेलर फ्रान्सीस बेकन यांना पक्षकाराकडून लाच

घेतल्याबद्दल शिक्षा झाली त्यावेळी त्यांनी आपला बचाव करताना ‘ पक्षकाराकडून आपण बक्षिसी घेतल्याचे कबूल केले. पण त्या काळांतील न्यायाधिशांची तशी प्रथाच होती. आपण जगावेगळे काही केले नाही असे त्यानी सांगितले. शिवाय त्या बक्षिसामुळे आपण दिलेल्या निर्णयावर काहीही परिणाम झालेला नाही असेही सांगितले.’ हल्लीच्या इंग्लिश न्यायाधिशाकडून अशा वर्तनाची कल्पनाही करता येत नाही.

(३) युरोपांतील प्रबोधनाच्या चळवळीसारखी चळवळ ब्रिटीश राज्य भारतांत स्थापन होईपर्यंत झालेली नव्हती. त्यामुळे भारत मध्ययुगांतील अंधकारमय वातावरणांतच खितपत पडला होता. बंगाल प्रांतात ब्रिटीश सत्ता प्रथम स्थापन झाली. त्याकाळातील तेथील वातावरणाचे वर्णन सर यदुनाथ सरकार यांनी केले आहे. ते म्हणतात ‘देशाचा राज्यकारभार अत्यंत अप्रामाणिकपणाचा व अकार्यक्षमतेचा झाला होता. जनता भीषण दारिद्र्याने व अज्ञानाने गांजून गेली होती. राज्यकर्ते दुबळे, नालायक, गर्विष्ठ व स्वार्थी असून प्रजेला गांजत होते. अलीवर्दीच्या घराण्यात राज्य करण्याच्या योग्यतेचा एकही पुरुष निपजला नाही आणि स्त्रिया पुरुषापेक्षाही दुष्ट होत्या. सिराज व मिराज यांनी वरिष्ठ वर्गातील प्रजाजनानाही त्राही भगवान करुन सोडले होते. देशद्रोही लोकांनी सैन्य पोखरले होते. दुर्गुण आणि मूर्खपणा यांचा सर्वत्र नंगा नाच चालला होता.’

इतिहासकार डॉ. आर. सी. मुजुमदार लिहतात ‘ १८१५, १८१६, १८१७ मध्ये कलकत्ता व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत अनुक्रमे २५३, २८९ व ४४१ स्त्रिया सती गेल्या. ठग्गीची अमानुष चाल दैवी मानली जात होती व म्हणून मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. देवीला बळी देण्यासाठी मानवी जीवांची हत्या करण्यांत येई. या दैवी कार्यासाठी बक्षिस म्हणून लूट करु दिली जावी असे त्यांचे मागणे असे. त्याशिवाय पेंढारी लोक चोऱ्या, लुटालुट व खूनही करीत. लहान मुलामुलींच्या हत्या मोठ्या प्रमाणात होत असत. कायदा व सुव्यवस्था स्थिती इतकी खराब होती की ब्रिटीश राज्याची स्थापना देवानेच केली असे लोक मानू लागले होते.’

मध्ययुगीन यूरोपचा किंवा भारताचा इतिहास पाहिला तर असे दिसते की धार्मिक कर्मठपणाच्या वातावरणांत नीतिमत्ता वाढू शकत नाही. उलटपक्षी हा धार्मिक कर्मठपणाच नैतिक अध:पाताचे कारण असतो. अंधश्रद्धा व धर्म-भोळेपणा यांच्या आहारी गेलेले लोक स्वार्थी धर्मगुरूंच्या कारवायांना सहजासहजी बळी पडतात. भारतातील सतीप्रथा व युरोपमधील चेटकींना जाळून मारण्याचे प्रकार ही याचीच उदाहरणे होत.

ब्रिटीश राज्य येथे पूर्णपणे स्थिर झाल्यावर एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात येथील नैतिक वातावरणांत थोडीशी सुधारणा होण्यास प्रारंभ झाला. ब्रिटीश उदारमतवादांतील स्वातंत्र्य, बुद्धिवाद व मानवी प्रतिष्ठा या विचारांचा भारतीयांवर परिणाम झाला व त्यानंतर सतीबंदी, विधवा पुर्नविवाह, स्त्री-शिक्षण, अस्पृश्यता निवारण अशा चळवळींच्या रुपाने प्रबोधनाची चळवळ येथे सुरु झाली. राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, महात्मा ज्योतिबा फुले आणि प्रा. आगरकर वगैरे थोर स्वातंत्र्य-वादी या चळवळीचे नेते होते. ही प्रबोधनाची चळवळ फार काळ टिकाव धरु शकली नाही. कारण विसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारतांतील इंग्रज सरकारने राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्यास सुरवात केली. त्यामुळे त्या चळवळीने हे आव्हान स्वीकारुन सामुदाईक स्वरुप धारण केले. त्याच सुमारास तिला धार्मिक पुनरुज्जीवनवादी स्वरुप आले. त्यामुळे नवजात प्रबोधनाची चळवळ तीत गुदमरुन गेली. बुद्धिवादाची चळवळ आधीच अगदी संथ गतीने चालू होती. तिच्या दुबळ्या व संथ गतीमुळेच भारतीय लोकशाहीही दुबळी राहिली होती. त्यातच या नव्या संकटामुळे तिचे होते तेवढेही अवसान खचून गेले. व धार्मिक पुनरुज्जीवनवादाचा प्रभाव वाढत राहिला. या सर्व कारणांमुळे भारतीय समाजकारणात व राजकारणात अनैतिकता वाढत राहिली असल्याचे दिसून येते.

**अनीतिची जागतिक लाट**

अगदी अलीकडच्या काळात सगळ्या जगांत अनैतिकतेची लाटच आल्या-सारखी दिसत आहे. त्यामुळे भारतातील नैतिक दृष्ट्या मूळचीच नाजूक

स्थिती अधिकच गंभीर बनली आहे. विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत सबंध जगभर नैतिक दर्जा घसरत चालल्याचे दिसून येते. भारतही त्याला अपवाद नाही. याचे मुख्य कारण या काळांत वेगाने होत असलेल्या तंत्रशास्त्रीय विकासामुळे आधुनिक समाज पूर्वीपेक्षा अधिक गुंतागुंतीचा होत चालला आहे हे होय. त्याचा परिणाम आधुनिक शासनसंस्थेवरही होत आहे. तिला अनेकविध स्वरुपाच्या जबाबदाऱ्या स्विकाराव्या लागत आहेत त्या पेलण्यासाठी अधिकाधिक अधिकार ती धारण करीत आहे. अशा गुंतागुंतीच्या स्थितीत सर्वाधिकारसंपन्न शासनसत्तेच्या नियंत्रणाखालील नोकरशाहीला व जनतेला आपल्या जीवनाचा उत्तम दर्जा टिकवण्यासाठी उच्च दर्जाची नीति आवश्यक ठरते. सध्याच्या किचकट समाजस्थितीचे एक लक्षण असे सांगता येईल की दूर दूर राहणाऱ्या व दूरच्या देशातील लोकांचे जीवन परस्परावलंबी झाले आहे. त्यामुळे नैतिक वर्तनाची गरज आता पुर्वीप्रमाणे केवळ आपले शेजारी, नातेवाईक यांच्यापुरती मर्यादित राहिली नाही. दूर देशातील अज्ञात व्यक्तीशी व्यवहार होऊ लागले असल्यामुळे उच्च दर्जाची नीतिमत्ता जरुर आहे व ती सार्वत्रिकही असण्याची गरज आहे. तसेच शासनाची कर्तव्य क्षेत्रे वाढली असल्यामुळे तीची नोकरशाही व नागरीक यांचे परस्पर संबंधही वाढले आहे. त्यामुळे कर चुकवेगिरी, लाचलुचपत, वशिलेबाजी पक्षपात यांच्या शक्यताही वाढल्या आहेत. यावरुन सध्या नैतिक अध:पतनाची लाट आल्याचा जो उल्लेख केला आहे. त्याचे कारण लोकांच्या नैतिक दर्जामधील घसरण हे नसून सध्याच्या जगांतील तांत्रिक विकासामुळे गुंतागुंतीच्या बनलेल्या आधुनिक समाजाच्या गरजांना पुरे पडण्यास जो नैतिक दर्जा आवश्यक असतो त्याच्या उणेपणामुळे ही लाट आल्याचे जाणवत आहे. समाजातील बुद्धी व संस्कृती यांचा विकास तंत्रशास्त्रीय विकासाच्या बरोबरीने होत नसल्यामुळे ही स्थिती निर्माण होत आहे.

अशा स्थितीत धर्माचे पुनरुज्जीवन करुन नैतिक दर्जा उंचावता येईल काय? असा प्रश्न विचारता येईल. धार्मिक कर्मठपणाच अनीतीचे कारण आहे हे पाहिल्यानंतर वरील प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे नकारार्थी देणे भाग आहे. दुसरे असे की धार्मिक व राजकीय सत्ताधारी वर्गाकडूनच जनतेची छळवणूक,

पिळवणूक व फसवणूक होत असते. जनतेचा धार्मिक कर्मठपणामुळेच ते होऊं शकते. त्याला तोंड देण्यास जनतेला समर्थ बनविण्याचे काम बुद्धिवादच करु शकतो. शिवाय जनतेच्या बौद्धिक विकासाबरोबर नैतिक विकासही होत असतो हेही आपण पाहिले आहे.

### भारतीय लोकशाही

भारतीय लोकांचा नैतिक दर्जा उंचावल्याशिवाय लोकशाहीचा प्रयोग येथे यशस्वी होणार नाही. याला दोन कारणे आहेत. (१) निवडणुका खुल्या व मुक्त वातावरणांत झाल्याशिवाय आणि लोकप्रतिनिधी–विशेषत: सत्तास्थाना-वरील–जबाबदारीने वागल्याशिवाय लोकशाही शक्य होत नसते. ही तत्वे जर पाळली गेली नाही तर राजकारणाला केवळ भयानक सत्तास्पर्धेचे स्वरुप येते व सत्ताधारी लोकप्रतिनिधी आपला स्वार्थ साधण्याच्या मागे लागतात असे चित्र सर्वत्र दिसते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या नैतिक मूल्यांचा प्रत्यय लोकशाहीच्या दैनंदिन आचरणांतून जनतेला यावा लागतो. पण ही नैतिक मूल्येच ज्यांना परकी आहेत अशा लोकप्रतिनिधींच्या राज्यात लोकशाही कशी यशस्वी होणार? (२) आर्थिक मागासलेपणा व वाढती लोकसंख्या यांनी भेडसावणाऱ्या प्रचलित परिस्थितीत दारिद्रय विनाशाच्या कार्यक्रमाला सर्वाधिक महत्व प्राप्त होणे अपरिहार्य आहे. पण सध्या चालू असलेल्या भ्रष्टाचाराचा विचार करता दारिद्रय विनाशासाठी उचललेले प्रत्येक पाऊल वाढत्या भ्रष्टाचारामुळे अपयशी ठरणार हे उघड आहे. आर्थिक बाबतीत खाजगी क्षेत्रात स्वार्थ आणि सार्वजनिक क्षेत्रातील निष्काळजीपणा व बेफिकीरी यांतून आर्थिक समता तरी कशी साधणार? व जनतेचे कल्याण तरी कसे करणार? म्हणून आर्थिक व राजकीय क्षेत्रातील सत्ताधाऱ्याच्या वागणुकीचा दर्जा सुधारल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणे शक्य नाही. याच कारणामुळे भारताच्या आसपासच्या देशांतील लोकशाही राज्यपद्धती कोसळलेल्या आहेत. तेच भवितव्य भारताचे नशिबी येण्याचे भय आहे!

यातून काही मार्ग काढायचा तर प्रथम धर्म आणि नीति यांचे संबंध निश्चित केले पाहिजेत. साधारणपणे असे मानले जाते की नीतिचा उगम

धर्मातून होतो. तेव्हा नैतिक दर्जा सुधारण्यासाठी धर्मश्रद्धा बळकट केल्या पाहिजेत. म्हणजे इहवादी शासनपद्धतीचा त्याग केला पाहिजे असा त्याचा अर्थ होतो. परंतु धर्मातून नीतीचा उगम होत नसेल तर मात्र नैतिक दर्जा सुधारण्यासाठी वेगळे उपाय शोधावे लागतील. म्हणून धर्म आणि नीति यांचे परस्परसंबंधाचा विचार करु.

**धर्म आणि नीति**

नीतिसंबंधी धर्माचे दोन प्रकारचे दृष्टीकोन आहेत. पैकी एकाप्रमाणे मानवी शरीर व आत्मा यामध्ये द्वैत मानण्यात येते. मनुष्याचे शरीर निसर्गाचा भाग आहे हे खरे. पण आत्मा काही निसर्गाचा भाग नव्हे. तो त्याहून स्वतंत्र असून परमात्म्याचा अंश असतो. शिवाय तो अमर व अविनाशी आहे असेही मानले जाते. मानवी सुखे ही शारीरिक किंवा भौतिक सुखे असतात. त्यांचा आत्म्याशी काही संबंध नसतो. किंबहुना असलाच तर विरोधी संबंध असतो. म्हणून शारीरिक सुखांचा मोह आत्मोन्नती करुन घेण्याची इच्छा असणाऱ्या माणसाने धरु नये. जप, तप वगैरे मार्गाने शरीर जितके सुकवता येईल, कष्टवता येईल तितका आत्म्याचा प्रकाश वाढविणे शक्य असते. परमेश्वराचे ध्यान, चिंतन, तपश्चर्या हेच आत्मोन्नतीचे म्हणजे मोक्ष प्राप्तीचे मार्ग होत. या विचारसरणीचे दोन भाग होतात. (१) नैतिक वर्तनाबद्दल या किंवा नंतरच्या जगांत दैवीशक्तीकडून बक्षीस म्हणजे स्वर्ग प्राप्ती होते व अनैतिक वर्तनासाठी शिक्षा म्हणून मरणोत्तर नरकयातना भोगाव्या लागतात. (२) भौतिक म्हणजें शारीरिक सुखांच्या मोहामुळे शरीर दुबळे होते व आत्माही शरीराचा गुलाम होतो. साहजिकच ईश्वरसेवेकडे दुर्लक्ष होते म्हणजेच त्याची अधोगती होते. तो जर हा मोह टाळू शकला व संपूर्ण निरीच्छ झाला तर त्याला ईश्वराची कृपा साध्य होते व स्वर्ग प्राप्ती किंवा मोक्ष प्राप्ती होऊ शकते. म्हणून शरीरसुखाच्या अतीमोहाला अनैतिक मानण्यात आले आहे. कारण जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त होणे म्हणजेच मोक्ष होय. मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय मोक्ष प्राप्ती हेच आहे. अशीच सर्व धर्माची शिकवण आहे.

दुसरा दृष्टीकोन महाभारतांत भीष्माचार्यांनी युधिष्ठिराशी संवाद करतांना सांगितला आहे (शांति अ २५९) ते म्हणतात, 'ज्या तऱ्हेचे वर्तन दुसऱ्या माणसाने आपल्यांशी करू नये असे आपणांस वाटते, त्या तऱ्हेचे वर्तन आपण दुसऱ्यांशी करू नये. जे आपणांस अप्रिय ते दुसऱ्यालाही अप्रिय होय. ज्याला स्वतःचे जीवित प्रिय आहे, त्याने दुसऱ्याच्या घात का बरे करावा ? जे जे आपणांस हवे, ते ते दुसऱ्यासही मिळावयास हवे अशी वासना धरावी. भगवद्गीतेंत यालाच 'आत्मौपम्य दृष्टी' असे म्हटले आहे. लो. टिळकांनी त्यांच्या गीतारहस्य ग्रंथात या दृष्टीलाच नीतिशास्त्राचा मूलभूत सिद्धांत मानले आहे'.

भारतीय नीतिशास्त्रामध्ये सर्वभूतहित हे सर्वश्रेष्ठ नीतीमूल्य मानले आहे. मानवांचे वर्तन हे प्राणिमात्राच्या व विश्वाच्या स्थितीस किंवा धारण पोषणास अनुकूल झाले, तरच मोक्षप्राप्ती होते, असा त्यामध्ये दृष्टीकोन आहे. याचा अर्थ असा की मोक्ष किंवा साक्षात्कार हे मानवी जीवात्म्याचे अंतिम उद्दिष्ट भारतीय नीतीशास्त्रामध्ये मानलेले आहे. म्हणून हा धार्मिक दृष्टीकोन होय.

याउलट पश्चिमी नीतिशास्त्रांप्रमाणे मानवेतर प्राणी किंवा सर्व सजीव अजीव मानवेतर विश्व ही मानवी जीवनाची केवळ साधनेच होत. कांट म्हणतो 'मनुष्य हा केवळ साधन नाही, साध्य आहे तो स्वतःकरता आहे, केवळ दुसऱ्याकरता नाही.'

मानवी जीवनासंबंधीच्या या दृष्टीकोनांचा विचार करता पहिली गोष्ट अशी लक्षात येते की नीतिची जी कल्पना या ठिकाणी गृहित धरली आहे तिला काहीही सामाजिक हेतू नाही. केवळ दैवी शक्तीची कृपा साध्य करणे एवढाच हेतू आहे. नीतिचा जो अर्थ आपण पाहिला त्याप्रमाणे ज्या मूल्यांना सामाजिक हेतू असतो त्या मूल्यांनी प्रेरित झालेले मानवी वर्तन म्हणजेच नीति होय. नीतिचा विषय माणसा माणसांमधील संबंध हा असतो. धर्माच्या नावाखाली जी नीति सांगितली जाते तीत सामाजिक हेतूचा काही संबंध नाही. तेव्हा या धार्मिक वर्तनाचा नीतिशी संबंध काय ? दुसरी गोष्ट अशी की

वरील दोन्हीपैकी कोणत्याच विचारांना विज्ञान शास्त्रांचा आधार नाही. शिवाय प्राणी जीवनाच्या उत्क्रांती सिद्धांताशी ते पूर्णपणे विरोधी आहे. अंधधर्मश्रद्धा एवढाच त्यांचा आधार आहे. शिवाय समाजाचा नैतिक दर्जा उंचावण्यास हे विचार मदत करू शकतील काय याचे उत्तर युरोपच्या व भारताच्या इतिहासाने नकारार्थी दिल्याचे आपण पाहिलेच आहे.

**भारतातील स्थिती**

भारत अंधधर्मश्रद्धांनी जखडलेला देश आहे. निरनिराळे बाबा, गुरु, महाराज यांचे प्रस्थ वाढले आहे व सतत वाढत चालले आहे. गरीब किंवा अडाणी लोकांतच हे प्रस्थ वाढते आहे असे नाही तर अगदी सुशिक्षित, उच्चभ्रू न्यायाधीश व मंत्री यांचेमध्येही हे प्रस्थ वाढत आहे. राजकारणांतही हीच स्थिती आहे. याचे कारण म्हणजे आपण आपल्या गुणांनी, प्रयत्नांनी, चिकाटीने व बौद्धिक सामर्थ्याने काही करु शकतो, यावर त्यांचा विश्वास नसतो हेच आहे. ज्यांचा स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास नसतो तेच बाबा, बुवांच्या मागे मतलबासाठी लागतात.

अशा तऱ्हेचे दैवीशक्तीस शरण जाण्याचे वातावरण सार्वत्रिक फैलावण्याचे आणखी एक कारण आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून अनेकविध प्रश्नांनी माणसाला बेजार करून टाकले आहे. त्यांतील काही प्रश्न राजकीय आहेत, काही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व नैसर्गिकही आहेत. एक प्रश्न सोडवेपर्यंत दहा प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे मुळांतच प्रश्न सोडवण्यास अधीर झालेल्या लोकांना ही वाढती संकटे पाहून हताश व्हावे लागत आहे. उशिरा होत असलेला विकास, हे त्याचे कारण आहे. यूरोपमधील राष्ट्रांना आपला विकास करून घेण्यास कित्येक शतके लागली. तोच विकास एक दोन पिढ्यात आपणास करून घ्यावयाचा आहे. छोट्या छोट्या आर्थिक सुधारणा करून युरोपियन लोकांना आपला विकास करून घेता आला. विकासातून उपलब्ध होणारे जादा मनुष्यबळ अन्य क्षेत्रांत त्यांना सामावून घेता आले. आपण जेव्हा आर्थिक प्रगती करायला लागलो त्यावेळी आधुनिक तंत्रशास्त्रीय प्रगतीमुळे मोठ्या प्रमाणावरील बेकारीला तोंड द्यावे लागले. त्याचवेळी वैद्यकीय

शास्त्रांच्या प्रगतीमुळे व सोईमुळे मृत्यू प्रमाण कमी झाल्यामुळे निर्माण होणारा वाढत्या लोकसंख्येचा बोजाही सहन करावा लागतो. आधीच दारिद्र्यामुळे जर्जर झालेली प्रजा. त्यात हे बेकारीचे भूत पुढे उभे ठाकल्यावर हताश होण्यास काय उशीर? अशा परिस्थितीत हताश झालेल्या जनतेला कोणी त्राता, भगवान भेटेल अशी आशा करावी लागली तर त्यांत नवल कसले? राजकारणांतही असेच आहे. युरोपने लोकशाहीचा प्रयोग तीनशे वर्षे केला तो आपणांस अर्धशतकांत यशस्वी करून दाखवायचा आहे. तोही प्रौढ सार्वत्रिक मताधिकार देऊन. सांस्कृतिक क्षेत्रांतही बुद्धिवादाचा विकास युरोपमध्ये होण्यास शेकडो वर्षांचा कालावधी लागला. आपणाला एक दोन पिढ्यांत तो घडवून आणावयाचा आहे. शिवाय तंत्रशास्त्रीय प्रगतीमुळे जी गुंतागुंत निर्माण झाली आहे त्यातून मार्ग काढून हा विकास घडवावयाचा आहे. या भयानक प्रतिकूलतेमुळेच विकसनशील राष्ट्रांपैकी अनेक देश लोकशाही संस्था टिकवून धरू शकले नाहीत. भारत अद्याप तरी लोकशाही यंत्रणा टिकवून उभा आहे. याचा अर्थ लोकशाहीला किमान अत्यावश्यक असलेली बौद्धिक, नैतिक, सांस्कृतिक पातळी व यंत्रणा भारतात आहे असा याचा अर्थ होतो. तेव्हा वरील परिस्थितीतून आपण मार्ग काढू शकू अशी आशा करायला जागा आहे. त्याचबरोबर भारतीय लोकशाही दुबळी आहे, अस्थिर आहे हे लक्षात घेऊन आपला नैतिक दर्जा यापुढे घसरत न जाईल एवढेच नव्हे तर विकसित होत जाईल याची काळजी घेतली पाहिजे. म्हणून तातडीची उपाययोजना खालीलप्रमाणे सुचवता येईल.

(१) राज्य घटनेमध्ये अंतर्भूत असलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या मूल्यांच्या आधारे नवा शोषणमुक्त समाज निर्माण करता येईल. गांधीजींना अभिप्रेत असलेला नीतिधर्म या मूल्यांशी सुसंगत आहे. अशा विस्तृत पायावर सामाजिक व सांस्कृतिक विषमतेच्या व उच्चनीचतेच्या परंपरागत मूल्यांना समाज जीवनांतून हद्दपार करणारी प्रबोधनाची चळवळ सुरू केली पाहिजे.

(२) सामाजिक जीवन धर्मनिरपेक्ष व इहवादी नसेल तर इहवादी शासन टिकू शकत नाही असा प्रत्यक्ष अनुभव आपण घेतला आहे. म्हणून शासकीय

पातळीवर कोणत्याही धर्माचे विधी केले जाऊ नयेत. शासकीय पदाधिकाऱ्यांनी अशा कार्यक्रमात सहभागी होऊ नये. शिक्षण, आकाशवाणी, दूरदर्शन व पाठ्यपुस्तके यांतून कोणत्याही धर्माच्या अंधश्रद्धांना उत्तेजन मिळणार नाही अशी काळजी घेतली पाहिजे. समान नागरी कायदा त्वरीत करण्यात यावा.

(३) शासनाकडून तीन प्रकारे वरील कार्य केले जावे. (अ) लोकशिक्षण, शिक्षण व ज्ञानप्रसार माध्यमे व शासकीय सार्वजनिक समारंभ वरील उद्देशास पूरक होतील अशा कल्पकतेनेच वापरावी. (ब) आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाह, कुटुंब नियोजन साक्षरताप्रसार यांना प्रोत्साहन द्यावे. (क) अस्पृश्यता, बालविवाह यांना प्रतिबंध करावा. यासंबंधीचे शासकीय कायद्यांचा अंमल समाधानकारक होत नाही म्हणून शासनाने याबाबतची कार्यक्षमता वाढवावी. (ड) लोकांचे प्रबोधन करावे. ग्रंथ प्रकाशन, ज्ञानप्रसार या स्वरूपाच्या कार्याचा उपयोग करून घ्यावा. (ई) धर्मनिरपेक्षतेच्या व इहवादाच्या प्रचारासाठी सर्व माध्यमांचा उपयोग करावा. (फ) लोकांना स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करावे. (ग) सर्वच धर्म मानवनिर्मित व मानवासाठी असल्या कारणाने धर्माची मीमांसा करण्याची व ती लोकांपर्यंत पोहचवण्याची व्यवस्था करावी. (घ) धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्वधर्मसमभाव नव्हे तर इहवाद आहे आणि बुद्धिवाद, व्यक्तिवाद आणि मानवतावाद असा त्याचा अर्थ आहे. हे लोकांना समजावून सांगण्याची व्यवस्था व्हावी.

---

*संदर्भ :* १. गं. बा. सरदार, धर्म आणि समाजपरिवर्तन पा. नं. ३९
२. गं. बा. सरदार, धर्म आणि समाजपरिवर्तन पा. नं. ४०
३. न्यायमूर्ती वि. म. तारकुंडे, फॉर फ्रिडम पा. नं. ११६
४. न्यायमूर्ती वि. म. तारकुंडे, फॉर फ्रिडम पा. नं. ५६
५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, लेखसंग्रह पा. नं. ३०९

८

# भारतांत इहवादाचा उदय आणि अस्त

अठरावे शतकांत इंग्रजांचा व इंग्रजी शिक्षणाचा संपर्क भारताशी घनिष्ठ स्वरुपांत आला. त्यानंतर स्वातंत्र्य, लोकशाही, समता या कल्पनांबरोबरच इहवादाचा विचारही भारतीय धुरीणांच्या मनांत आला, हे खरे आहे. तथापि प्राचीन काळी भारताची भौतिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली होती हेही खरे आहे. प्रगतीच्या अत्युच्च शिखरांवर आज विराजमान झालेल्या पाश्चात्य राष्ट्रांच्या तत्कालीन स्थितीशी तुलना करतां भारत सर्व क्षेत्रांत प्रगत होता, असे इतिहास सांगतो आणि ज्याअर्थी प्रगति, उत्कर्ष होता त्याअर्थी त्याकाळी भारतांत इहवाद (किंवा इहनिष्ठा) असला पाहिजे असे अनुमान आतापर्यंतच्या विवेचनावरून काढता येते, म्हणून त्यासंबंधी थोडी माहिती आपण घेऊं.

### भारतीय इतिहासाचे तीन कालखंड

डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी लिहिलेल्या 'इहवादी शासन' या ग्रंथात भारताच्या ज्ञात इतिहासाचे तीन कालखंड कल्पिले आहेत.[१]

(१) सुवर्णयुग– इ. स. पूर्व ६०० ते इ. स. ८०० पर्यंत अशी १४०० वर्षे.

(२) तमोयुग– इ. स. ८०० ते १८०० पर्यंत १००० वर्षे.

(३) अरुणकांतियुग – १८०० च्या पुढील काळ.

## सुवर्णयुग

(अ) धर्म

कृत, द्वापार, त्रेता व कली या प्रत्येक युगांत धर्म निराळा असतो. (महा. शांति ३६–११) मनु, बोधायन, अत्री या स्मृती ग्रंथात जागोजागी देशकाल परिस्थितीचे महत्त्व सांगितले आहे. तेव्हा धर्मशुद्धीकाराने प्रत्यक्ष परिस्थिती, पूर्वेतिहास, अनुमान आणि विविध शास्त्रे यांचा आश्रय करावा. (मनु–१२–१०५) चाणाक्याने धर्मग्रंथ, व्यवहार (कायदा), चरित (इतिहास) व राज्यशासन हे धर्माचे चार आधार सांगितले आहेत. यांत कोठे विरोध आल्यास उत्तरोत्तर प्रामाण्य मानावे असा निर्णय दिला आहे. प्रवृत्तिपरता – ऐहिक उत्कर्षाची जबरदस्त ईर्षा – हा इहवादाचा आत्मा होय. भारताचा इ. स. नवव्या व दहाव्या शतकापर्यंतचा इतिहास पाहतां त्या काळांत, अखंडपणे नवेनवे धर्मशास्त्र रचले जात होते असे दिसते. निरनिराळ्या स्मृती रचल्या जात होत्या, त्याही नवी धर्मशास्त्रें सांगण्यासाठीच. त्याचबरोबर पूर्वीच्या स्मृतिकारांचे अमुक मत मला मान्य नाही. आता काळ पालटला आहे. तेव्हा ही मते त्याज्य मानली पाहिजेत, असेही अनेक स्मृतीकारांनी निर्भयपणे म्हटलेले दिसून येते.[२]

वरील विवेचनावरून त्या काळांत धर्म परिवर्तनीय मानला जात होता. त्याचप्रमाणे नवे धर्मशास्त्र रचतांना अगर धर्म निर्णय करतांना परिस्थिती पाहून तसे केले पाहिजे. त्यासाठी मानवी बुद्धीस योग्य अवसर असला पाहिजे. तर्कशक्तीचा आश्रय केला पाहिजे. केवळ धर्मशास्त्रावरून निर्णय केला तर धर्महानी होण्याचा संभव आहे. हा महाभारतांतील विचार प्राचीनकाळी सर्वमान्य होता असे दिसून येते. 'वेदवाक्य प्रमाण मानून त्याखेरीज दुसरे कांही नाही असे म्हणणारे लोक मूढ आहेत.' वेद हे त्रैगुण्याच्या गोष्टींनी भरलेले आहेत.

हे अर्जुना, तू त्रिगुणातीत हो 'वेदावरून धर्माचे संपूर्ण व निर्दोष ज्ञान होऊं शकत नाही, कारण वेदांत सांगितलेल्या गोष्टी ते वेद ज्या युगात झाले असतील त्यानंतरच्या युगांत निरुपयोगी ठरतात' (महा–शांती--२६०) स्मृती भिन्न भिन्न काळी झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे वेदांतील सूत्रेही. त्यावरून ती मानवकृत आहेत म्हणूनच वेदांचे अपौरुषेयत्व व प्रामाण्य फोल ठरते.[३] पाणिनी, पातंजली, सांख्यसूत्रकार व तत्वचिंतामणीकार यांसारखे थोर पंडित वेदांचे सर्वंकष अंधप्रामाण्य मुळीच मानीत नाहीत.[४]

भारताच्या प्राचीन वैभवाच्या काळी येथील शास्त्रवेत्ते, तत्त्ववेत्ते, धर्माचार्य व इतर थोर पंडित शब्दप्रामाण्याच्या विकृतीपासून मुक्त होते असे यावरुन मानावे लागेल. याचाच अर्थ त्यावेळचे वातावरण बरेचसे इहवादी होते. धर्माची परिवर्तनीयता, बुद्धिप्रामाण्य, शब्दप्रामाण्याचा त्याग आणि सर्वांत महत्वाचे, प्रवृत्तिपरता ही भारतीय इहवादाची लक्षणे तत्कालिन समाजांत पूर्णपणे वसत होती. उद्योग, व्यापार, कृषी, राज्य, दिग्विजय याविषयीची जबरदस्त ईर्षा, हा इहवादाचा आत्मा होय.

आपण मागे इहवादाचा अर्थ पाहतांना निश्चित केलेल्या अर्थाच्या तीनही बाजू प्राचीनकाळांतील इहवादाला लागू पडत नाहीत. समान नागरिकत्व, धार्मिक स्वातंत्र्य व धर्म आणि शासन यांची फारकत या संस्थात्मक बाजू होत. त्या काळात त्या अपेक्षिणेही योग्य होईल असे वाटत नाही. धार्मिक स्वातंत्र्य सहिष्णुतेच्या रुपाने कां होईना, पण होते असे वरील विवेचनावरून दिसते. पण मुख्यतः धर्माची परिवर्तनीयता व लोकांची प्रवृत्तिपरता, बुद्धिप्रामाण्य ही इहवादाची मानसिक बाजू लोकांच्या ठायी होती यावरून अलिकडील काळांतला नसला तरी प्राथमिक स्वरुपांतील इहवाद होता असे मानण्यास प्रत्यवाय नाही.

**इहवाद धर्माच्या अविरोधी**

प्राचीन पंडितांनी धर्माच्या ज्या व्याख्या केल्या आहेत, त्याही हाच विचार स्पष्ट करतात. महाभारतातील शांतीपर्वात भीष्मांनी स्पष्टच म्हटले आहे

की, 'या जगांत लोकजीवन नीट चालावे म्हणूनच धर्मशास्त्र निर्माण झाले आहे. त्यामुळे ऐहिक व पारलौकिक कल्याण साधते.' लोकजीवन नीट चालावे याचाच अर्थ लोकांना अर्थ, काम हे पुरुषार्थ नीट साधता यावेत. 'ज्याने समाजधारणा होते तो धर्म', 'अभ्युदय आणि निःश्रेय यांची प्राप्ती ज्यायोगे होईल तो धर्म' अशी धर्माची व्याख्या कर्णपर्वात व शांतीपर्वात केलेली आहे. तसेच धर्मानेच अर्थ व काम यांची प्राप्ती होते असे महर्षि व्यासांनी महाभारतांत म्हटले आहे. धर्म आणि इहवाद ही पूर्णपणे एकमेकांशी अविरोधी असल्याचे या व्याख्यांवरून दिसते.

**महाभारतातील विचारमंथन**

धर्म, अर्थ व काम यांच्या महत्त्वांसंबंधी भीम, अर्जुन, युधिष्ठीर व विदुर यांचा संवाद महाभारतांत दिला आहे. त्यावरून तत्कालिन समाजस्थितीमध्ये इहवादाचे काय स्थान होते. यावर स्पष्ट प्रकाश पडतो. विदुराच्या मते 'धर्म हा सर्वश्रेष्ठ असून अर्थ व काम गौण आहेत'. अर्जुनाला हे मत मान्य नव्हते. तो म्हणतो, 'प्रपंचाचा उद्योग सर्वांत महत्त्वाचा'. कृषी, गोरक्षण, वाणिज्य व विविध कला या समृद्धि साधनांचेच या कर्मभूमीत जास्त महत्त्व मानले पाहिजे. कारण त्यापासून अर्थप्राप्ती होते. अर्थावाचून धर्मसाधना अशक्य आहे. इंद्रियनिग्रही, वैराग्यशील पुरुष, भगवी वस्त्रे नेसून राहणारे विद्यासंपन्न पुरुष हेही अर्थप्राप्तीची इच्छा करतात. फक्त अज्ञ व मूढ लोकांनाच अर्थाचे श्रेष्ठत्व आकलन होत नाही'. त्यावर भीम म्हणतो, 'धर्म, अर्थ व काम यामध्ये काम हाच श्रेष्ठ होय.' ज्याला कसलीही कामना नाही, इच्छा नाही तो मनुष्य अर्थाची उपासना कशाला करील ? धर्माची तरी त्याला काय मातब्बरी ? कशाची तरी कामना असते म्हणून ऋषी तप आचरतात. काही आकांक्षा असते, म्हणूनच पंडित वेदांचा अभ्यास करतात. व्यापारी, शेतकरी कलाकार हे सर्व कामप्रेरित होतात. म्हणूनच उद्योग करतात. काम ही प्रपंचाची मूळ प्रेरणा आहे. अर्थ व धर्म त्याच्या गर्भात असतात. धर्मापेक्षा अर्थ, काम श्रेष्ठ होय. असे सांगण्याइतके विचार स्वातंत्र्य त्याकाळी होते. असाच या संवादाचा अर्थ होतो. परमेश्वर आत्मा यांचे अस्तित्व नाकारणारे

दर्शनकार त्याकाळी होते. सांख्य दर्शनाचा प्रणेता कपील, वैषेशिक दर्शनकार कणाद, मीमांसा दर्शनाचा जैमिनी हे सर्व नास्तिक होते. चार्वाक तर याही पलिकडे गेला होता. हिंदू, बौद्ध व जैन धर्मांना मान्य असणारा कर्मसिद्धांतही तो मानीत नव्हता. 'वेद हे भंड, धूर्त व निशाचरांनी रचले आहेत'. असे तो म्हणत असे. विचार स्वातंत्र्य, परमतसहिष्णुता यांचा तो काळ होता असा त्याचा अर्थ होतो.

### (ब) विज्ञान

विज्ञानशास्त्रांतही भारतीयांनी आपल्या पराक्रमाची ध्वजा उंचच फडकत ठेवली होती. ज्योतिष, गणित, रसायन, वैद्यक आदि विज्ञानशास्त्रातील भारतीय शास्त्रज्ञांची प्रगती आश्चर्यकारक वाटावी अशी होती.

#### ज्योतिषशास्त्र

इ. स. ५ व्या शतकापासून भारतात अनेक श्रेष्ठ ज्योतिषी होऊन गेले. त्यामध्ये आर्यभट्टाचा (इ. स. ४७६–७७) प्रथम उल्लेख केला पाहिजे. 'आर्यभट्टीय अथवा आर्यसिद्धांत' हा त्यांचा ग्रंथ. हा ज्योतिषशास्त्रावरील पहिला प्राचीन ग्रंथ होय. भारताचा दुसरा ज्योतिषी म्हणजे वराहमिहीर (सन ४९०). तो अवंतीचा राहणारा होता. 'पंचसिद्धांतिका' हा ग्रंथ त्याने लिहिला. ज्योतिष, गणित, फलज्योतिष या तिन्ही शास्त्रावर त्याने ग्रंथ लिहिले आहेत. ब्रह्मगुप्त (इ. स. ५९८ ते ६६५) याने 'ब्राह्मस्फुट सिद्धांत', 'खंडखाद्यकरण' हे ग्रंथ लिहिले. न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा 'सिद्धांत' १००० वर्षे आधी त्याने सांगितला होता. भास्कराचार्यांनी 'सिद्धांत शिरोमणी' आणि 'करणकुतूहल' हे प्रसिद्ध ग्रंथ लिहिले. शिवाय मुंजाल, सदानंद व गणेश दैवज्ञ इ. प्रसिद्ध ज्योतिषी पंधराव्या शतकापर्यंत होऊन गेले.

#### गणित

भारतीय गणिताचा विकास ज्योतिषशास्त्राच्या अनुषंगाने झाला. विशेषतः अंकगणित व बीजगणित यांत भारतीयांनी मोलाची भर घातली. 'लाप्लास' हा गणिती म्हणतो, 'दशमान पद्धती आपणांस भारतीयानी दिली.' बीज-गणितांतही त्यांनी बरीच मोलाची प्रगती केली होती.

**वैद्यक**

मंत्र, तंत्र व जादूटोणा यांच्या सहाय्याने निरनिराळे रोग कसे निवारतां येईल याचे वर्णन अथर्ववेदांत दिले आहे. आयुर्वेद हा अथर्ववेदाचाच एक भाग आहे. नालंदा येथील विद्यापीठांतून हे शास्त्र शिकविले जात होते. 'सुश्रुत', 'चरक', 'वाक्‌भट्ट', 'नागार्जुन' हे या विषयावरील प्रसिद्ध तज्ञ होते.

**रसायनशास्त्र**

वैद्यकशास्त्राची शाखा म्हणून हे शास्त्र उदयास आले. धातूंची भस्मे करून औषधे बनविली जात. 'सिद्ध नागार्जुन' हा प्रसिद्ध ग्रंथ. गुप्तकाळांत रसायन-शास्त्राचा विशेष विकास झाला. रंगकाम, कातडी कमाविणे, साबण, कात, सिमेंट वगैरे उद्योग वाढीला लागले. रोमला या सर्व वस्तूंचा पुरवठा होत असे. लोखंड शुद्ध करण्याचे ज्ञान भारतीयांना चांगले होते. याची साक्ष दिल्ली येथील गुप्तकालीन लोहस्तंभ आजही देतो आहे. 'पारा' या धातूसंबंधी नागार्जुनाने प्रथम विचार मांडले. पोलादाचा वापर कसा करावा याचेही त्यांना ज्ञान होते. सृष्टीचा असा अखंड अभ्यास त्यावेळी होत असे. म्हणूनच भारतभूमीला त्याकाळी अपार वैभव प्राप्त झाले होते. म्हणूनच त्याला इतिहासांत 'सुवर्णयुग' असे नांव मिळाले आहे.

**(क) धर्मसहिष्णुता**

अशोक, खारवेल हे बौद्ध, जैन राजे, सातवाहन, गुप्त, चालुक्य, राष्ट्रकूट हे वैदिक धर्माचे उपासक, भिन्नधर्मीय प्रजेला सहिष्णुतेने वागवीत असत. सम्राट हर्ष दर पांच वर्षांनी 'विश्वजीत' यज्ञ करुन त्याप्रसंगी सर्व धर्मियांना आपल्या संपत्तीची सारखी वाटणी करुन देत असे. चिनी बौद्ध प्रवासी ह्यू-एन-त्संग याने या महोत्सवाचे वर्णन करुन ठेवलेले आहे. या कालखंडात रामायण, महाभारत आदि ग्रंथ कालिदास, भवभूती आदि साहित्यिक, नागार्जुन, आर्यभट्ट, वराहमिहिर, लल्ल, चरक, सुश्रुत आदि शास्त्रज्ञ, पाणिनी, पातंजली, कपिल, कणाद, बुद्ध, महावीर आदि थोर तत्त्ववेत्ते, चंद्रगुप्त मौर्य, गौतमी पुत्र, सातकर्णी, समुद्रगुप्त, सत्याश्रम, पुलकेशी, हर्ष, राष्ट्रकूट, गोविंद

हे सम्राट होऊन गेले. यावरून या काळांत या भूमीत मानवी कर्तृत्वाला सर्व-क्षेत्रांत अमाप बहार आला होता असे दिसून येते.

## तमोयुग

इ. स. ८०० ते १८०० पर्यंतचा हा काळ. याचे मुख्य वैशिष्टय म्हणजे प्राचीन काळातील भारतीय वैभवाला याच काळात उतरती कळा लागली. या कालखंडाच्या आरंभीच नव्या स्मृतींची रचना बंद झालेली दिसते. म्हणजे धर्माची परिवर्तनीयता संपली. पुढील काळांत निबंधकार, भाष्यकार झाले. त्यांनी मीमांसकाची समन्वयपद्धती अवलंबून बुद्धिप्रामाण्य संपुष्टात आणले. त्याच्या जोडीला निवृत्तीवाद, संन्यासवाद आला. ऐहिक वैभवाच्या आकांक्षा हळूंहळूं मंदावू लागल्या व पुढे पूर्णपणे विझून गेल्या.

मराठे, शीख, रजपूत आदि कांही राजे झाले. ज्ञानेश्वर, तुकाराम 'तुळशीदास' कबीर आदि कांही साधूसंत झाले. पण गणित, रसायन, पदार्थ-विज्ञान, वैद्यक, ज्योतिष, राजनीती, व्यापार, उद्योग, कृषी, शिल्प, नृत्य, नाटय हे सर्व कोरडेच राहिले. धर्मासाठी, व्यापारासाठी, परदेशगमन नाही. इतिहास, कादंबरी, काव्य नाही, कपिल नाही, पातंजली नाही, युद्धशास्त्र नाही, व्यक्तिवाद नाही, राष्ट्रवाद नाही, कसलीही क्रांती नाही. सर्व पुरुषार्थाचा मूलस्त्रोत्र म्हणजे भीमाच्या म्हणण्याप्रमाणे या भूमीत कामच नव्हता. कर्तृत्व येणार कोठून ? इ. स. च्या ९ व्या शतकापासून या ग्रहणास सुरुवात झाली. आणि १२ व्या शतकापर्यंत ग्रहण खग्रास झाले.

## कारणे

### (१) जातीप्रथा

याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपली अविचारी जातिसंस्था होय.... इ. स. पूर्व ६ व्या शतकात जातीसंस्था दृढ होऊ लागली होती. तरीही इ. स. ९ व्या शतकापर्यंत जातीची परिवर्तने चालू होती. जातीभेद निर्मितीचे कारण पावित्र्याच्या खोटया कल्पना, अपावित्र्याचे (विटाळाचे) भय आणि भक्ष्याभक्ष्याचा विचार ही होत. बोधायन व धर्मसूत्रकाराचे मत असे आहे की,

उत्तर आणि दक्षिण देशांमध्ये आचारांत फरक आहे. एकाचा आचार दुसऱ्यास दोषास्पद वाटतो. बृहस्पती स्मृतीमध्ये व देवलस्मृतीमध्ये ज्या त्या ठिकाणचे रुढ आचार म्हणजेच धर्म मानून त्या त्या लोकांनी चालू ठेवावेत. त्यावर राजाने बंधने घालू नयेत, असे सांगितले आहे. प्रदेश बदलला की पापपुण्याच्या कल्पनाही बदलतात. पावित्र्य व कर्मकांड जातवार वेगळे राहिल्यामुळे जातीजातीतील अंतर्गत परिवर्तन बंद झाले. प्रत्येक जातीतील व्यक्तीच्या स्वातंत्र्यास व नैसर्गिक कार्यांना मर्यादा पडल्या. प्रगतीचा वेग मंदावला. जातीभेद वाढल्यामुळे जातीसंस्था निर्माण झाली. समाजसंस्था दुर्बल झाली. त्यामुळे राजकीयदृष्टया भारतीय समाज कधीच संघटीत होऊ शकला नाही. राज्य-संस्था प्रबळ होऊ शकली नाही. क्षत्रियत्व हा सर्वांचा धर्म कधीच होऊ शकला. नाही.[५] त्यामुळे परकिय आक्रमणावर मात करणारे राजकीय व आर्थिक सामर्थ्य समाजांत राहिले नाही. बाहेरुन येणाऱ्या व क्षुद्र क्षुल्लक आक्रमणासही भारत वरचेवर बळी पडत राहिला. अगदी अलिकडील काळांत भारत दोन वेळा राजकीय पारतंत्र्यांत सापडला. याचाच अर्थ असा की, राजकीय पारतंत्र्य हे जातिनिष्ठ दुर्बल कर्मठ समाज व्यवस्थेचा परिणाम आहे, कारण नव्हे.

जाती पोटजातीचा बुजबुजाट होऊन भारतीय समाजाला कधी एकजिनसी-पणा आलाच नाही. आपण एक आहोत या भावनेचा सर्वस्वी लोप झाल्यामुळे प्रत्येक वर्ग, प्रत्येक गट, प्रत्येक जात आत्मकेंद्रित दृष्टीने आपल्याच संकुचित हितसंबंधाची चिंता वाहू लागली. भारतीयांना विद्या, ज्ञान आणि शौर्य यापासून ब्राह्मणांनी दूर ठेवले. समाजांत भेद निर्माण केले. त्यामुळे इंग्रजांना हिंदुस्थान जिंकता आला.[६] अंधधर्माच्या सर्वंकष सत्तेमुळे भारतीय कर्तृत्वाची निर्घृण हत्या झाली असे मत लोकहितवादी—गोपाळ हरि देशमुख यांनीही आपल्या शतपत्रांतून मांडले आहे. जाती वर्चस्वाचे प्रश्न न्यायासनासमोर न्यावेत तर तेथे 'जुने मोडू नये' या कायद्याने निवाडा होई. म्हणून जातीबंधने त्याकाळी सर्वंकष ठरली. रुढीच्या आधारे त्यांचा अंमल होई. प्रवास, पोशाख, खाणेपिणे, विवाह आदि संस्कार सर्व जातिबंधनाने जखडलेले असत. धंदा व्यवसायाचे नियम म्हणजे जातीव्यवस्थेचा प्राण होता. त्यात प्रमाद झाल्यास बहिष्कार पडे आणि बहुसंख्यानी प्रमाद केला असल्यास, तेवढ्या लोकांची नवी जात होई.

शास्त्र व रुढी यांनी घातलेले दंडक पाहिले म्हणजे त्यांना तर्काचा, कार्यकारण-भावाचा किंवा बुद्धीचा कसलाच धरबंद नसल्याचे दिसून येईल. या सर्व नियमांचा समाज उत्कर्षाशी कसलाही संबंध नसे. न्यायमूर्ती रानडे म्हणतात, 'आपल्या अध:पाताचे मूल कारण म्हणजे आपणावरची सर्व बंधने ही विवेक-बंधने नसून ती बाह्य व जड बंधने होती हे होय.' उदा., प्राचीनकाळी व्यापार, धर्मप्रसार व साम्राज्यासाठी हिंदू लोक जगभर पर्यटन करीत. अकराव्या शतकांत हे निषिद्ध ठरले. त्यामुळे व्यापार मुस्लीम व ख्रिस्ती व्यापाऱ्यांच्या हाती गेला. धर्मप्रसार बंद पडला. या अंधधर्मशास्त्रामुळे भारताचे सर्व वैभव लयाला गेले. डॉ. काणे म्हणतात. 'भारतातले स्वराज्य नष्ट होत असतांना धर्मशास्त्रज्ञ, क्षुद्र व्रतमहात्म्य व प्रायश्चित्त यांत गर्क होते. कारण त्यांना काळजी परलोकांतील सुखाची होती. इहलोकीच्या वैभवाची, उत्कर्षाची नव्हती.'

**(२) वामाचारप्रधान तंत्रोपासना**

'भारताचे अध:पतन केवळ वर्णजातिभेदांतून निर्माण झालेल्या विषमतेमुळे सुरु झाले असे समजणे योग्य होणार नाही. अनेक इतिहासकार या अंगावर भर देऊन भारतीय जीवनाच्या विघटनेचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतात. या मीमांसेत बऱ्याच प्रमाणांत सत्यांश आहे हे निश्चित' पण 'वामाचार प्रधान तंत्रोपासना, लैंगिकविकृतींनी पछाडलेली आणि मंत्र-सामर्थ्याने अलौकिक सिद्धि प्राप्त करुन घेण्याच्या मागे लागलेली योगसाधना, धर्मसाधनेला अनीतीचे आणि अनैसर्गिकतेचे केंद्र बनविणारे सखी भावप्रधान विकृत भक्त्याचरण, ऐहिकाचा-सामाजिक जीवनाचा यत्किंचितही विचार न करणारी व्यक्तिनिष्ठ मोक्षसाधना, मठमंदिरातील संन्याशांच्या विलासी जीवनाचे आकर्षण आणि शेवटी व्रत-वैकल्ये, पूजा-अर्चा ब्राह्मण-भोजने यांसारख्या कर्मकांड प्रधान उपासनापद्धतीचे वाढते महात्म्य यांनी भारतीय जीवनांतील ऐहिकाच्या पौरुषाच्या प्रेरणाच लुप्त करून टाकल्या होत्या.'

'प्रज्ञापारमिती' आणि 'गृह्यसमाज' यांसारख्या ग्रंथाचा सप्रयोग अभ्यास हे ( विक्रमशील विद्यापीठाचे ) वैशिष्टच बनले होते. त्यांत ५३ अध्यापन

शाळा केवळ तांत्रिक क्रियेसाठी राखून ठेवल्या होत्या. हिंदू समाजातही याच संस्कृतीची जोपासना होत होती. हिंदूराजांच्यामध्ये मठ-मंदिरांची आणि विहारांची उभारणी करण्याची जणू स्पर्धाच लागली होती. लक्षावधी कारागिरांचे श्रम आणि श्रमजिवी जनतेच्या श्रमांतून उत्पन्न होणारा पैसा या अनुत्पादक कार्यात खर्ची पडत होता. मथुरा, कनोज, कोणार्क, भुवनेश्वर, पुरी येथील प्रचंड मंदिरे आणि तेथील वामाचार प्रधान अथवा सखोभावप्रधान अध्यात्मसाधना यांचा कोणता भयावह परिणाम समाजजीवनावर झाला असेल हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही,' 'अशा या प्रचंड अनुत्पादक धर्मसंस्था आणि मठविहार राजे लोकांचे विलासी जीवन, संपत्तीचा अनुत्पादक खर्चाकडे होणारा व्यय आणि समाजांतील फार मोठ्या वर्गाचे विकृत धर्माचरण यामुळे समाजाचे भौतिक व आत्मिक जीवन किती विकृत झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी. साहजिकच सातव्या शतकापासून अरबांची लाट येताच हा समाज वाळूच्या किल्ल्यांप्रमाणे कोसळून पडला.'[७]

**(३) विद्यापीठाचा अभाव**

नवव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या काळांत भारतात इहवादी तत्ववेत्ते झाले नाहीत. कारण, या काळात भारतामध्ये यूरोपप्रमाणे विद्यापीठे कोणी स्थापन केली नाहीत. प्राचीन काळी येथे तक्षशिला, उज्जैनी, विक्रमशीला, नालंदा अशी फार मोठी विद्यापीठे होती. त्यांतील बहुतेक प्राचीन काळातच नाहिशी झाली होती. राहिलेली मुस्लिमांनी धुळीला मिळविली. नंतरच्या राज्यकर्त्यांनी (मराठे, रजपूत, विजयनगर वगैरेंनी) राज्ये स्थापन केली. पण विद्यापीठे अध्ययन, अध्यापनासाठी स्थापिली नाहीत. डॉ. अ. स. आळतेकर आपल्या 'एज्युकेशन इन अेन्शंट इंडिया' या ग्रंथात म्हणतात. 'इ. स. च्या सहाव्या शतकाच्या सुमारास शब्दप्रामाण्य वाढीस लागले. शंकराचार्य, रामानुजम यांना आपले सिद्धांत उपनिषद वाक्यांनी सिद्ध करण्यासाठी प्रचंड आटापिटा करावा लागला. यावरून हे स्पष्ट होते. आर्यभट्ट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त या जोतिर्विदांना पृथ्वी, चंद्र यांच्या छायेमुळे ग्रहणे लागतात हे ज्ञान होते. पण पुराणांनी राहू, केतू उपपत्ती मान्य केली होती. त्यामुळे तिचे खंडण करून लोकांना सत्य सांगण्याचे धैर्य त्यांनी दाखविले

नाही. ब्रह्मगुप्ताने तर लोकाराधनेच्या वृत्तीला बळी पडून छायोत्पत्तीच चुक आहे व राहू केतू उपपत्ती वेदांनी सांगितली असल्यामुळे खरी आहे. असे भाष्य करून आर्यभट्टादि पंडितावर टिका केली आहे. यूरोपांत कोपर्निकस, केप्लर, ब्रूनो, गॅलिलिओ यांनी सत्य सांगण्याचे जे नीतीधैर्य दाखविले ते या पंडिताने दाखविले नाही.

(४) ऐहिक आकांक्षांचा लोप

भारतातील विद्यापीठे तेराव्या शतकांत मुस्लिमांनी नष्ट केली हे खरे असले तरी त्याआधीच या विद्यापीठातील विद्या नष्ट झाली होती. त्यामुळे भौतिकविद्या, राजकारण, दंडविधी, इतिहास, भूगोल, ज्योतिष गणित याच्या अध्ययनामुळे जो एक बुद्धीजीवी वर्ग निर्माण व्हावयाचा तो भारतात झालाच नाही. नवी विद्यापीठे उदयास आली असती अगर जुनी कार्यक्षम राहिली असती तर यूरोपात जसे ग्रीक विद्येचे पुररुज्जीवन झाले तसे भारतीय विद्येचे पुनरुज्जीवन झाले असते. यूरोपप्रमाणेच एक विद्यासंपन्न मध्यमवर्ग येथे उदयास आला असता. पण त्या सुमारास भारतीय पंडितांची ऐहिक वैभवाची आकांक्षा–त्याचा कामच नष्ट झाला होता.

(५) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव

तेराव्या–चौदाव्या शतकांत येथे तमीळ, तेलगू, मराठी, गुजराथी, बंगाली या भाषा चांगल्या नावारुपास आल्या होत्या. भाषिक अस्मिता निर्माण होण्याची परिस्थिती येथे निर्माण झाली होती. विद्यापीठे असती तर विद्या-विभूषित मध्यम वर्ग स्वातंत्र्याचे तत्वज्ञान परिपुष्ट करू शकला असता व जातीसंस्थेला सुरुंग लागू शकला असता. लोकशाही उदयास आली असती. ब्रिटिशांच्या राज्यांत पाश्चात्य विद्या प्रसृत होऊन विद्यासंपन्न वर्ग निर्माण होताच लोकशाही आकांक्षा निर्माण झाल्या. व १०० वर्षांच्या आंत स्वातंत्र्य लढा यशस्वी करण्याइतक्या प्रबळ झाल्या याचा अर्थ असा की ते १७ व्या–१८ व्या शतकांत घडू शकले असते. पण या भावना इहवादावाचून निर्माण होत नाहीत आणि इहवाद हा निवृत्तीवाद, परलोकवादी, मोक्षैक दृष्टीचे लोक, संसाराला माया म्हणणारे लोक जोपासू शकत नाहीत. बाळीत पडण्याच्या

भीतीमुळे परदेशगमन बंद झाले होतेच पण तेथील इतर समाजांत मिसळणे देखील विटाळाच्या भीतीने बंद झाले होते. त्यामुळे त्यांची माहिती, अभ्यास या हजारो वर्षांत कोणी केलाच नाही. ज्ञानाचे एक दार असे बंद झाले तर दुसरे दार छापखाना. १५५० च्या सुमारास गोव्यास पोर्तुगिजांनी छापखाना आणला होता. पण त्यांच्या शाईत चरबी असते. कागदाच्या निर्मितीतही असाच निषिद्ध पदार्थ असतो. असल्या समजुतीमुळे, छापखान्यामुळे जात बाटते. म्हणून तेही दार बंद करण्यांत आले. सोळाव्या शतकांत विद्यापीठांतून बुद्धी-वादी इहप्रवण वैभवाकांक्षी वर्ग भारतांत निर्माण झाला असता तर त्याने हे लोकभ्रम नष्ट करून भारतांत मुद्रणकला आणली असती. बुद्धीजीवी वर्गाने लिहिलेले ग्रंथ जनतेपर्यंत गेले असते. अवलोकन, स्वतंत्र अनुभव, प्रयोग, स्वतःचे निर्णय याचे महत्व जनतेला पटून युरोपातल्या प्रमाणे येथेही शास्त्रज्ञ निर्माण झाले असते. असे न झाल्यामुळे अंधधर्मश्रद्धांना आव्हान देणारी शक्ती भारतांत निर्माण झाली नाही. विवेकाने सांगितलेल्या सत्यासाठी आत्मबलिदान करणारे जॉन हस्, ब्रुनो, लॅटिमर, क्रॅनमर यांसारखे वीरपुरुष व त्यांचे हजारो अनुयायी युरोपमध्ये निर्माण झाले पण भारतांत निर्माण झाले नाहीत. त्यामुळे व्यक्तिचे व्यक्तित्व, तिने विचारपूर्वक निश्चित केलेली मते, तिने चिंतन करून प्रस्थापिलेले सिद्धांत यांना काही अर्थच राहिला नाही. विवेकनिष्ठ सत्याचा दृढ आग्रह त्यामुळे शिल्लक राहिला नाही. मग आत्मबलिदान करण्याचे धैर्य कोठून येणार? भारतांतील समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रांत कामहीन झाला होता. निवृत्तीवादाने, संतांनी, आचार्यांनी केलेल्या संसारनिंदेमुळे व मायावाद, कर्मविपाक यासारख्या सिद्धांतामुळे या भूमीत ऐहिक वैभवाच्या, श्री समृद्धिच्या सर्व आकांक्षा नष्ट झाल्या होत्या. स्वराज्य नष्ट होत असतां-नाही या भूमीत असंतोष नव्हता याचे हेच कारण आहे. 'ठेविले अनंते तैसेची रहावे. चित्ती असू द्यावे समाधान' अशी वृत्ती इथल्या समाजाची झाली होती. शेतकरी वर्ग, कारागिर वर्ग, व्यापारी वर्ग, सगळे अत्यंत अल्पसंतुष्ट, आकांक्षा-हीन. येथील क्षत्रिय, ब्राह्मण सगळे कामहिनतेमुळे पराभूत झालेले. येथल्या परकीय सत्ता त्यांनीच पोसल्या. भारतीय सेना हा तर ब्रिटीश सत्तेचा आधार

होता. असे असूनही आपण राजे व्हावे असे त्यांना कधीच वाटले नाही. यांत आश्चर्य कसले ?

---

संदर्भ : १. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे – इहवादी शासन – पृष्ठ क्र. १३६
२. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे – इहवादी शासन – पृष्ठ क्र. १३१
३. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकणे – धर्मस्वरुप निर्णय –
४. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकणे – वेदप्रामाण्य विचार – पृष्ठ क्र. ४८–५०
५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – वैदिक संस्कृतीचा विकास – पृष्ठ क्र. २५५–६५
६. धनंजय कीर – महात्मा फुले – पृष्ठ क्र. २११
७. स. रा. गाडगीळ – प्राचीन व मध्ययुगीन धर्मकल्पना आणि मराठी संत – पृष्ठ क्र ७९ ते ८२

# ९

# आधुनिक संस्कृती आणि इहवाद

भारताच्या २५०० वर्षांच्या ज्ञात इतिहासापैकी पहिल्या दोन कालखंडातील इतिहास मागील प्रकरणांत आपण पाहिला आहे. आता तिसऱ्या कालखंडातील म्हणजे अरुण कांतीयुगातील म्हणजेच इ. स. १८०० च्या पुढील इतिहासाची माहिती घ्यावयाची आहे.

## अरुण कांतीयुग

या काळातील सर्वांत महत्त्वाची भारतीय इतिहासाला कलाटणी देणारी व तमोयुगाचा शेवट करणारी घटना म्हणजे ब्रिटिश राज्याची स्थापना ही होय. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्रजी राज्य संपूर्ण भारतांत प्रस्थापित झाले त्यापूर्वीच्या मुसलमानी किंवा मराठी सत्ता नष्ट झाल्या व इंग्रजी राज्यसत्ता येथे प्रस्थापित झाली. एवढाच या घटनेचा अर्थ नाही. आचार्य शं. द. जावडेकर ह्यांनी त्यांच्या 'आधुनिक भारत' ग्रंथात या घटनेचा अर्थ सांगताना म्हटले आहे 'ब्रिटिशानी, हिंदुस्थान जिंकताना आणि तो जिंकल्या-वर आपली सत्ता सुस्थिर करतांना, या देशांत एक सामाजिक क्रांति घडवून

आणली होती, एवढेच नव्हे तर, सर्वांगिण समाजक्रांति करण्याचे बीजारोपण त्याद्वारे त्यांनी केले'.[१]

**ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केलेल्या सुधारणा**

(अ) अंतर्गत बंडाळ्या, दंगेधोपे, लुटालूट करणाऱ्या ठग, पेंढारी लोकांचा बंदोबस्त करून देशांत संपूर्ण शांतता, सुव्यवस्था व सुरक्षितता निर्माण केली. (ब) देशाच्या कानाकोपऱ्यात शासनाची 'पोलादी चौकट' स्थापन केली. श्रीमंत–गरीब. लहानथोर, हिंदु–मुसलमान, स्त्री–पुरुष, ब्राम्हण–मराठे, महार–मांग-चांभार सर्वांना एकच कायदा व न्याय लागू करून 'कायद्याचे राज्य' प्रस्थापित केले. कायद्यापुढे सर्व नागरिक सारखे ही राजनीति प्रस्थापित झाली. (क) सर्व देशांत रस्ते, रेल्वे, पोस्ट, तारायंत्रे यांचे जाळे निर्माण केले. (ड) पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण सर्वांना उपलब्ध करून दिले.

**शिक्षणपद्धती व सुधारणा**

या शिक्षणपद्धतीबद्दल १८२९ मध्ये एल्फिन्स्टन म्हणतात, 'येथील लोकांची आपण इतकी सुधारणा करावी की परकी सरकार येथे राहण्याची गरजच पडू नये. अशा मरणाची आपण अपेक्षा करावी'. लॉर्ड मेकॉले म्हणतात, 'आपण स्वतंत्र व सुसंस्कृत आहोत. मानव जातीच्या एका विभागास ही मूल्ये आपण नाकारली तर आपल्या स्वातंत्र्यास व संस्कृतीस अर्थच राहणार नाही'. हिंदी लोकांना सुसंस्कृत बनविणे हे आपले ईश्वरदत्त कर्तव्य आहे असे बहुतेक इंग्रज राज्यकर्ते मानीत. 'हे कार्य कायद्याच्या केवळ संहितेने होणार नाही, तर मातापिता ज्याप्रमाणे अधिकार गाजवितात, मुलांना शिस्त लावतात, तसा अधिकार गाजवून होईल' असे जॉन स्टुअर्ट मिल म्हणतात. मिल व बेंथॅम यांच्या विचारांचा प्रभाव तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांवर होता. नीति व संस्कृती यांचा प्रसार करण्याचे साधन म्हणजे कायदा, असा बेंथॅम व हॉब्ज यांचा सिद्धान्त होता. त्याप्रमाणे सर विल्यम बेंटिंग व लॉर्ड डलहौसी यांच्या कारकीर्दीत अनेक क्षेत्रात त्यांनी सुधारणांचा धडाका लावला. समाजसुधारणेचे कायदे तसेच इंग्रजी शिक्षण सुरू केले. जमीन महसुलाची पद्धती बदलली.

पाश्यात्त्य पद्धतीचे शिक्षण द्यावे, असा निर्णय होण्यास, संस्कृती प्रसाराची ही भूमिकाच कारण होती.[२]

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर आपल्या निबंधमालेत या शिक्षणासंबंधी म्हणतात, 'आपल्या देशांत जो जो इंग्रजी विद्येचा प्रसार होत जाईल, तो तो सुधारणा, स्वातंत्र्य व सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार. एक इंग्रजी विद्येचे वज्र आपल्या हाती असले, म्हणजे मग लिटनशाही, टेंपलशाही वगैरे शंभर शाह्यांना सुद्धा आम्ही दाद देणार नाही.' 'हिंदुस्थानांत रेल्वे आधुनिक उद्योगांची अग्रदूत ठरेल' असे कार्ल मार्क्सने म्हटले आहे. प्रातिनिधिक सरकारची मागणी होण्यास इंग्रजी शिक्षणच कारण आहे. त्याचबरोबर रेल्वे, पोस्ट, रस्ते आणि दळणवळणाच्या सोयीमुळे निरनिराळ्या भागांतील लोकांचा संपर्क वाढला. पंडित नेहरूंनी म्हटलेले आहे, 'शिक्षणप्रसार मंदगतीने होत गेला. तरीही त्यामुळे नवी ध्येये व क्रांतिकारक विचार भारतीय मनांमध्ये येण्यास वाव मिळाला'.

आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये औद्योगिक क्रांतीला फार मोठे श्रेय द्यावे लागते. त्यामुळे भारतीय समाजाचा आर्थिक पायाच बदलून गेला. तसेच एडमंड बर्क व इतर ब्रिटिश तत्त्ववेत्त्यांच्या राजकीय लेखांना व भाषणालाही मोठे श्रेय द्यावे लागते. लॉर्ड मेकॉले यांचे शिक्षणविषयक धोरण त्यादृष्टीने विशेष महत्त्वाचे आहे. ब्रिटिश व्यापारी कंपन्यांनी ॲडम स्मिथचा आर्थिक विचार व जेम्स वॅटचा आचार सोदाहरण दाखविला. या सर्वांमुळे १८५० साली जातिविषयक गुन्हे निवारणाचा कायदा आला. धर्मांतर करणारांचा आनुवंशिक मालमत्तेवरील हक्क त्यामुळे कायम राहिला.[३]

सर्वांगीण स्वरूपाच्या या सुधारणांमुळे परस्परविरोधी स्वरूपाच्या दोन प्रतिक्रिया भारतीय जनमानसांत उमटल्या. एक या सुधारणांना अनुकूल व दुसरी प्रतिकूल होती.[४]

### (अ) अनुकूल प्रतिक्रिया

सामान्य लोकांना या सुधारणांमुळे अतोनात सुख, समाधान, शांतता वाटू लागली. जीवित, वित्त व अब्रू यांची शाश्वती वाटू लागली. देवधर्म,

पूजा-अर्चा, यात्रा करण्याच्या सोयी झाल्या. 'काठीला सोने बांधून कोठेही जावे' अशी म्हण पडण्याइतकी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सामान्य लोकांना इंग्रज सरकार 'मायबाप सरकार' वाटू लागले. पूर्वीच्या अर्थव्यवस्थेत व्यवसाय जातीनिहाय होते. स्पर्धा नव्हती. नव्या अर्थव्यवस्थेत, जातीचा कायदा राहिला नाही, व्यक्ती ही समाजाची घटक बनली, स्पर्धा सुरू झाली. दळणवळणाच्या वाढीवरोबर ही व्यवस्था चोहोकडे पसरली. सर्वांना इंग्रजी शिक्षण मिळू लागले. पूर्वी शिक्षण म्हणजे लिहिणे, वाचणे, गणित, व्याकरण व धर्मशिक्षण एवढेच होते. तेही सर्वांना उपलब्ध होत नव्हते. आता शिक्षण तर सर्वांना मिळू लागलेच. शिवाय त्यांत लिहिणे, वाचणे, गणिताबरोबर पदार्थविज्ञान, रसायन. इतिहास-भूगोल इ. शास्त्रांचीही ओळख होऊ लागली. मिशनरी लोकांनी शिक्षणाप्रमाणेच दवाखानेही काढले. ख्रिश्चन धर्माचा प्रसारही होऊ लागला. धर्मचर्चेचे वर्ग भरू लागले. त्यांत हिंदुधर्मातील जातीभेद, अस्पृश्यता, मूर्तिपूजा, पशुहत्त्या, देवदासी, सतीप्रथा, स्त्रीपुरुष विषमता, कृष्णलीला वगैरेंची चर्चा, वाद, टीका होऊ लागल्या. त्यामुळे या दुष्ट रूढी नष्ट करून धर्मसुधारणा करावी असे विचार सुशिक्षितांमध्ये होऊं लागले. याच सुमारास सरकारने 'सतीप्रथा' कायद्याने बंद केली. गुलामगिरीही नष्ट केली. सरकारच्या या कृतीचे लोकांकडून स्वागत झाले. इतर सुधारणाही अशाच सरकारने कराव्यात अशा मागण्या लोकांकडून होऊ लागल्या.

## शहरे आणि खेडी–भिन्न समाजस्थिती

इंग्रजपूर्व काळांत गुन्हेगारी कायदा जातीनिहाय वेगवेगळा होता. तो बंद झाला. एकाच गुन्ह्यासाठी सर्वांना एकच कायदा, एकच न्याय लागू झाला. पण नागरी कायदा मात्र पूर्वीपासून चालू होता तो तसाच चालू राहिला. कारण लोकांच्या धार्मिक व सामाजिक व्यवहारांत इंग्रजांनी सहसा हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे सामाजिक व्यवहारांत जातीभेद, उच्चनीचता, अस्पृश्यता, स्त्रियांबद्दलची उपेक्षावृत्ती पूर्वीप्रमाणेच चालू राहिली. सतीची चाल, कन्याहत्या, धर्मांतर, विधवा-विवाह यासंबंधी कायदे करून समाज सुधारणा

करण्याचा प्रयत्न सुरुवातीच्या काळांत राज्यकर्त्यांनी केला. पण १८५७ च्या बंडानंतर ते सावध झाले व अशा बाबतीत तटस्थता पाळू लागले. तथापि आधुनिक शासनपद्धती, दळणवळणाची साधने व उद्योगप्रधान व्यवस्था यामुळे गांवगाडा शहरांपुरता मोडला. पण जातीसंस्थेची स्वायत्तता व ग्रामीण भागांतील गांवगाडा पूर्वीप्रमाणेच शाबूत राहिला. परिणामी भारतांतील समाजस्थिती शहरी भागांत नवी व ग्रामीण भागांत जुनी अशी दुहेरी बनली.

पाश्चात्त्य शिक्षण म्हणजे 'वाघिणीचे दूध' पिऊन जी पहिली पिढी तयार झाली, तीमध्ये ज्याप्रमाणे विद्युत्‌संचार होताक्षणी एखादे यंत्र थडथडावे, तशी जागृती प्रस्थापित समाजांत वडून आली. युगायुगाची निद्रा क्षणार्धात नष्ट झाली. आपल्या सद्यस्थितीचा विचार सुरू झाला. अशा कांही मोठ्या प्रतिक्रियांचा मागोवा घेणे जरूर आहे.

## बंगालमधील प्रतिक्रिया

### ब्राह्म समाज

हिंदू धर्मातील दोषस्थळे ज्या सुशिक्षितांच्या निदर्शनास आली, त्यांच्यात अंतर्मुख प्रवृत्ती निर्माण झाली. आपल्या धर्माची आमूलाग्र सुधारणा करावी व त्यास आधुनिक कालानुरुप रूप द्यावे अशी ओढ निर्माण झाली. श्री. राम मोहन रॉय म्हणत, 'धर्म हे समाजाचे हृदय आहे. त्याच्या सर्व व्यवहारात सुधारणा करावयाची असेल, तर प्रथम त्याच्या हृदयांत म्हणजेच धर्मात सुधारणा झाली पाहिजे. ख्रिश्चन, इस्लाम धर्माप्रमाणे हिंदू धर्माला एकेश्वरी स्वरूप दिले पाहिजे. त्यामुळे सर्व धर्मांचे अंतरंग एकच असल्याचे दाखवून देता येईल. धर्मभेदांचा अंधार नष्ट करून सार्वत्रिक विश्वधर्माचा प्रकाश दाखविता येईल.' राम मोहन रॉय (१७७४–१८३३) यांनी अनेकेश्वरवाद व सतीची चाल याविरुद्ध झोड उठविली व विधवा-विवाहास उत्तेजन दिले. त्यांनी ब्राह्मसमाजाची स्थापना केली. तसेच बेकन व देकार्त यांच्यापासून चालत आलेली, पाश्चात्त्य शिक्षणपद्धती भारतीयांना द्यावी, यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न केले. कोलंबस, शिकंदर, वॉशिंग्टन, नेपोलियन, न्यूटन यांची चरित्रे, त्याचप्रमाणे फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांतीचे इतिहास मातृभाषेत

आणले. अनेक ग्रंथ भाषांतरित केले. परदेशगमन स्वतः अनेकवेळा केले व आपल्या अनुयायांनाही करावयास उत्तेजन दिले. धर्म ज्योतिष, इतिहास, यांचे संशोधनासाठी 'तत्त्वबोधिनी सभा' स्थापली. कोणत्याही धर्माचे धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत. म्हणून त्यांत श्रेष्ठ-कनिष्ठ भाव होऊ नये. जगांतील प्रत्येक धर्मात सत्यांश असून तो ओळखण्याची विवेकबुद्धी माणसांत आहे असा उपदेश त्यांनी केला. सर्व धर्मांच्या कल्पनांवर बुद्धिवादाचा प्रकाशझोत टाकून त्यांच्या अनुयायांमध्ये विचारांना चालना दिल्याशिवाय अनिष्ट धार्मिक झगडे संपणार नाहीत व मानवी समतेकडे जगाचा प्रवास होणार नाही असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी सर्व धर्मांचे सखोल अध्ययन केलेले होते व त्यावरून सर्व धर्मांचा गाभा 'नैतिक तत्त्वेच' आहेत, सर्वांचा परिपालक एकच परमेश्वर आहे, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

## महाराष्ट्राची प्रतिक्रिया

### प्रार्थना समाज

या विश्वधर्माचे स्वागत महाराष्ट्रांत लोकहितवादी श्री. गोपाळराव देशमुख (१८२३–१८९२) व महात्मा ज्योतिराव फुले (१८२७–१८९०) यांनी केले. लोकहितवादींनी सन १९४८ मध्ये 'शतपत्रे' लिहून हिंदुधर्म, समाज व परंपरा यांच्यासंबंधी आपले परखड विचार धीटपणे मांडले. ते ब्राह्म-समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज व आर्य समाज या सर्व धर्मसुधारणेच्या आंदोलनांत सदैव आघाडीवर राहिले. त्यांनी इंग्रजी, मराठी, संस्कृत या भाषांचे सखोल अध्ययन केलेले होते. नव्या सामाजिक शिक्षणासाठी आवश्यक अशी वृत्तपत्रे, ग्रंथालये इ. संस्थांना त्यांनी उत्तेजन दिले.

### लोकहितवादींचे विचार

सर्व धर्मग्रंथ मनुष्यकृत असून त्यांत सत्याचे शाश्वत आणि सापेक्ष अंश एकमेकांत मिसळलेले असतात. परमेश्वराला अनन्यभावाने शरण जाऊन त्याची प्रार्थना करणे, व्यवहारांत सत्याने, न्यायाने व नीतीने वागणे, अभागी दीन बांधवांची दुःखे निवारणे हीच खरी ईश्वरसेवा होय. सर्व धर्मग्रंथ हेच

सांगतात. आचार, उपासना, कर्मकांड हे धर्माचे केवळ बाह्यांग होय, प्रत्येक धर्मातील किमान विधीसंबंधी सर्वांनी सहिष्णुता व आदर बाळगावा असे ते सांगत.[५]

श्री. बाळशास्त्री जांभेकर व लोकहितवादी यांनी शासन व शिक्षण या दोन्ही क्षेत्रामध्ये धर्मनिरपेक्षतेचे धोरण अंगिकारावे असे सांगितले. धर्मशिक्षण आवश्यक असले, तरी ते ज्या त्या समाजाने द्यावे असे त्यांचे मत होते. हे दोघेही पक्के बुद्धीप्रामाण्यवादी होते. तरी धर्मसुधारणा, स्त्रीसुधारणा, बालविवाह प्रतिबंध आदि सर्व सामाजिक सुधारणा धर्मशास्त्राच्या आधारे कराव्यात, असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या मते देशाच्या ऊर्जितावस्थेसाठी तीन अडचणी निवारण्याची गरज आहे. एक जातीप्रथा, दुसरी स्त्रियांची स्थिती व तिसरी बालविवाह. तसेच हिंदूंच्या भिन्न जाती पोटजातीमधल्या चाली-रीती, पोषाख, संस्कार, खाणेपिणे, पूजा-प्रार्थना वगैरे बाबतीत इतकी भिन्नता आढळते की हिंदु समाजातीलच या सर्व आहेत या म्हणण्याला काही अर्थच राहत नाही, असे त्यांना वाटत असे. स्त्रियांची उपेक्षा, विटंवना व पारतंत्र्य यांना जुनाट व खुळचट धर्मसमजुतींनीच शतकानुशतके खतपाणी घातले असल्यामुळे स्त्रीस्वातंत्र्यासाठी धडपडणाऱ्या सुधारकांना धर्मसुधारणेची चळवळ अपरिहार्यपणे हाती घ्यावी लागली.'

'खरी कालगणना, खरा भूगोल, खरा इतिहास, यांची हिंदू लोकांस मुळीच ओळख नाही. इंग्रज सरकारच्या या राज्यांत त्यांनी सर्व विद्या वाढवून लोकांना शहाणे करून सोडावे. जेव्हां स्वदेशाचे राज्य चालविण्याचे ज्ञान त्यांना येईल, पृथ्वीवरची हकिगत सर्व ते जाणतील, तेव्हा ते राज्य त्यांनी त्यांच्या हाती द्यावे.'

'शहाण्या, उद्योगी, प्रयत्नशील लोकांचे राज्य म्हणजे स्वराज्य होय.' 'भौतिक प्रगती, शिक्षणप्रसार व सामाजिक सुधारणा यांतून स्वातंत्र्याला अनुकूल वातावरण तयार होते. असे इंग्रज येण्यापूर्वी नव्हते, म्हणून पारतंत्र्य आले.' 'व्यक्तिस्वातंत्र्य व लोकांना स्वराज्याचे अधिकार ज्या राज्यात

असतील, ते सर्वोत्कृष्ट राज्य होय.' 'सरकारची सत्ता लोकांत विकेंद्रित व्हावी, न्यायदान, शांततारक्षण, कायदे करणे ही कामे लोकांनी स्वतंत्रपणे करावीत, परचक्र व अंतर्गत कलहापासून संरक्षण एवढेच कार्य राज्य ज्यावेळी करील, तीच खरी लोकशाही.'

'ब्राह्मण लोक वेदपाठ करतात. पण अक्षरशत्रू असतात. लोक अर्थाखेरीज विद्या शिकतात, त्यामुळे ज्ञानशून्यता आली. धर्म बुडण्यास व अज्ञानास हेच कारण होय. तीन हजार वर्षांपूर्वी मोठमोठे ऋषी विचार करीत, ग्रंथ लिहीत, आकाशांत नक्षत्रे पाहून नियम करीत. रानातली औषधे शोधून, त्यांचे गुण शोधीत, त्यांनी करून ठेवले इतकेच शिकावे, त्यांत भर घालूच नये हा आपला धर्म आहे काय ?'[५]

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (१८४२–१९०१)**

प्रार्थना समाज स्थापन करणेसाठी लोकहितवादींच्या बरोबरीने परिश्रम न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केले. त्यांच्या मृत्यूलेखांत 'केसरी' म्हणतो, 'महाराष्ट्र थंड गोळा होऊन पडला होता. अनेक रीतीने त्याला पुन: सजीव करण्याचे काम केले ते रानडयांनीच.' इंदूप्रकाश मधून त्यांनी लेखन केले. महाराष्ट्रातील बहुतेक सार्वजनिक चळवळीशी त्यांचा निकट संबंध होता. जुन्या शास्त्रग्रंथांतून आपल्या आधुनिक आचरणास व मतास समर्थन शोधण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती. लोककल्याणाची तळमळ व तीव्र बुद्धिमत्ता त्यांचे ठिकाणी होती. हिंदुस्थानच्या हिताकरता इंग्रज ईशप्रेरित दूत आहेत अशी त्यांची भावना होती. 'ब्राह्मणशाहीचे वर्चस्व हेच आमच्या अवनतीचे कारण झाले' असे त्यांचे मत होते.[६] हिंदी राजकारणांत अर्थशास्त्राचे निराळे महत्त्व पटवून हिंदुस्थानचा आर्थिक ऱ्हास कसा होत आहे ते त्यांनी दाखवून दिले व त्यावरील उपाय म्हणून स्वदेशी चळवळीचा मंत्र दिला. ही त्यांची महान कामगिरी होय. 'यूरोपियनांची विद्या तारुण्यावस्थेत तर आमची विद्या वृद्धावस्थेत–आसन्नमरणावस्थेत म्हणणेस चिंता नाही' असे ते म्हणत.[७]

**आर्यसमाज**

हिंदु धर्माला झालेल्या रोगाची चिकित्सा स्वामी दयानंद सरस्वतींनी यथार्थतेने केली. लोकांच्या गळयांत माळ घालून, त्यांना समान दर्जावर आणता येणार नाही, त्याऐवजी ब्राह्मणांपासून चांडाळांपर्यंत सर्वांना एकाच वैदिक पद्धतीने वेदाधिकार देऊन त्यांना समान पदावर स्थानापन्न करावे. सर्वांचे खाणेपिणे आचारविचार एक व्हावा म्हणून जन्माऐवजी गुणकर्माला, निरामिष भोजनाला, प्रत्येक व्यक्तीचे सोळा संस्कार होण्याला प्राधान्य द्यावे. निदान खाण्यापिण्याच्या बाबतीत तरी आर्य समाज जातीजातीत भेदभाव करीत नाही. स्वामीजींनी अनाथाश्रम, विधवाश्रम स्थापन केले. वेदप्रामाण्य हे मुख्य गमक त्यांनी मानले होते. प्रकृती, जीव व परमेश्वर हे अनादी व अनंत आहेत. दैववाद, अवतारवाद मूर्तीपूजा मान्य नाही, सगुण उपासना मान्य नाही. अशी त्यांची तत्त्वे होती.

**सत्यशोधक समाज-महात्मा ज्योतीराव फुले (१८२७-१८९०)**

'अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा काढणारा पहिला भारतीय, आधुनिक भारतांतील स्त्रीशिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रियांच्या हिताचा व स्वातंत्र्याचा उद्गाता, शेतकरी व कामगार यांची दुःख निवारण्यासाठी चळवळ करणारा पहिला पुढारी. जातीसंस्थेवर कडाडून हल्ला चढविणारा व मानवी समतेची घोषणा करणारा पहिला नेता. सामान्यांच्या दुःखाला व दैन्याला वाचा फोडणारा पहिला महात्मा. 'सत्यमेव जयते' या दिव्य मंत्राने भारून गेलेला खरा सत्यशोधक' असे ज्योतीराव फुले यांचे वर्णन प्रसिद्ध चरित्रलेखक श्री. धनंजय कीर यांनी केले आहे.[८] महात्मा ज्योतीराव फुले यांनी हिंदुधर्मातील भिक्षुकशाही व सामाजिक, बौद्धिक गुलामगिरी यांवर जोराचा हल्ला चढविला. 'सर्वसाक्ष जगत्पति, त्याला नकोच मध्यस्थी' असे सांगून प्रत्येक स्त्री-पुरुषाला ईश्वराशी साक्षात संबंध जोडता येतो, ते त्यांनी सामान्य, भोळ्या, अडाणी लोकांना त्यांच्या भाषेत समजून दिले. अनाथ, अपंग, गरीब, अज्ञानी जनांच्या कल्याणासाठी झटणे, यांतच खरी ईश्वरोपासना आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. धर्म ही वैयक्तिक बाब असल्यामुळे

प्रत्येक स्त्रीला व पुरुषाला हवा तो धर्म स्वीकारण्याची मोकळीक असली पाहिजे असे त्यांचे मत होते. एका समाजातच नव्हे तर प्रत्येक कुटुंबातही भिन्न धर्मीय लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदण्यास हरकत नाही. धर्मभेदाचा बाऊ न करता सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे, अशी त्यांची शिकवण होती. त्यांचा सत्यधर्म स्वातंत्र्य व समता आणि बंधुभाव मानणारा होता. समाजाच्या तळाच्या थरापर्यंत हा धर्म नेण्याची त्यांना उमेद होती. शुद्रातिशुद्रांच्या हिताविषयी तळमळ, सेवाभाव, त्याग, धडाडी व निगर्वता या त्यांच्या गुणांवरून सर्व समाजात त्यांचेबद्दल आदरभाव होता. त्यांचे जीवनकार्याचे दोन भाग पडतात.

(१) १८४८–६५ : शिक्षणप्रसार, स्त्रीदास्य विमोचन, दलितोद्धार आदि कार्ये या काळांत ज्योतीबांनी हाती घेतली. शिक्षण वरिष्ठ वर्गातून झिरपत जाऊन कनिष्ठ वर्गापर्यंत जाईल या तत्कालिन प्रचलीत सिद्धांताला त्यांनी भ्रामक ठरविले व सामान्यांच्या शिक्षणाला प्राधान्य मिळावे अशी त्यांनी मागणी केली. इ. स. १८६३ मध्ये पुण्यांत त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

(२) १८६५–९० : ख्रिस्ती ईश्वरनिष्ठ मानवधर्म व त्यासाठी मिशनरी लोकांचे समर्पित जीवन यांनी ज्योतिबांना मोहिनी घातली. विशेषत: त्यांतील 'एकेश्वरवाद', 'ईश्वराचे पितृत्व व मानवाचे भ्रातृत्व' ही तत्त्वे त्यांना आकर्षक वाटली. ईश्वराची भीति बाळगून न्यायाने व नीतीने वागावे असा त्यांनी उपदेश केला. ज्योतिबांच्या कार्याचे मुख्य वैशिष्टय म्हणजे त्यांनी त्यांच्या लिखाणामधून तत्कालीन समाजाचे सुस्पष्ट दर्शन घडविले. त्याचप्रमाणे गेल्या तीन हजार वर्षात असा विषमताधिष्ठीत समाज कसा निर्माण झाला असावा याची मीमांसा केली. त्यांच्या मते ब्राह्मण लोक म्हणजे बाहेरून आलेले आर्य लोक होत. त्यांनी एतद्देशीय क्षत्रिय शूरांचा पराभव करून त्यांना दास्यात लोटले. तेच शुद्र होत. त्यांचे ब्राह्मणी वर्चस्व टिकवून धरणेसाठी जात, वर्ण, कर्म, पुनर्जन्म वगैरे गूढ कल्पनांचे जंजाळ धर्मगुरू व इतर विद्वानांच्या मदतीने उभे केले व त्याला धर्माचे रूप दिले. वास्तविक पाहतां हा धर्म नसून सामान्य

माणसांसाठी 'सामाजिक गुलामगिरी' होय. असे त्यांनी ठासून सांगितले भारतीय इतिहासाचा अन्वयार्थ लावण्याचा ज्योतिबांचा हा धाडसी प्रयत्न होता. ब्रिटिश राज्यस्थापनेनंतरही हीच गुलामगिरी शुद्रांचे अज्ञानाचा फायदा घेऊन कायम टिकविण्याचा प्रयत्न होत होता. म्हणून ब्राह्मण वर्चस्वांकित राष्ट्रीय चळवळीबद्दल ज्योतिबांना आस्था वाटत नव्हती. त्यांनी शुद्रामध्ये शिक्षणप्रसार करून मानवी हक्कासंबंधी जागृती घडवून आणली. १८७१ मध्ये 'दीनबंधू' पत्र काढले. १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' ही पुस्तके लिहिली. या सर्वांच्या मार्फत सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड उभे केले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्त्वांच्या पायावर नवा समाज उभारण्याचे त्यांनी आवाहन केले.

**प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर**

निखळ इहवादी दृष्टीकोन मांडण्याचे पहिले श्रेय प्राचार्य आगरकर यांना द्यावे लागते. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर व भाई मानवेंद्रनाथ रॉय यांचा क्रम लागतो. आधुनिक शिक्षण सुधारणा व संस्कृती याबाबत ते सर्वजण आगरकरांचे इतकेच आग्रही होते. सुधारकाग्रणी प्राचार्य आगरकर हे अज्ञेयवादी होते. त्यांनी मानवी इतिहासाचे परिशीलन करून धर्म, राजकारण, समाजरचना व कायदा यांचेमध्ये सतत होत असणारे बदल इष्ट दिशेने होण्यासाठी बुद्धीवादाचा अवलंब करावा लागतो असा सिद्धांत प्रस्थापित केला. व्यक्तिवाद, बुद्धीवाद, मानवतावाद हा त्यांच्या विवेचनाचा गाभा होता.

धर्मसंस्थेबद्दल ते म्हणतात 'धर्मसंस्थेचा मूळ आरंभ नैसर्गिक घडामोडी-संबंधी अज्ञान व भीति यांतून झाला आहे. म्हणून यापुढे मानवी समाजाला तिच्या मार्गदर्शनाची गरज नाही.' चिपळूणकर–टिळकांचा धर्माधिष्ठित समाजसुधारणांचा मार्ग त्यांनी त्याज्य ठरविला व स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या चिरंतन मानवी मूल्यावर आधारलेला सामाजिक सुधारणांचा विचार विस्ताराने मांडला. राजकीय सुधारणाही त्यांनी त्यांतच अंतर्भूत केल्या होत्या. 'केसरी'चे आद्य संपादक आगरकर होते. पण टिळकांशी झालेल्या मतभेदामुळे

त्यांनी 'केसरी' सोडला व 'सुधारक' पत्र काढले. 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. त्यानुसार त्यांनी 'सुधारक' चालविले. महाराष्ट्रांतील मूर्तीभंजकामध्ये आगरकर श्रेष्ठ होते. बौद्धिक प्रामाणिकपणा, निष्कलंक चारित्र्य, सचोटी, दानत या गुणांची ते साक्षात 'मंगलमूर्ती' होते. आधुनिक शिक्षणासंबंधी ते म्हणतात, 'पाश्चिमात्य शिक्षणाबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांत मनुष्य सुधारणेच्या अत्यावश्यक तत्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांना लयास जावयाचे नसेल, त्यांनी त्याचे अवलंब केले पाहिजे.'[९]

आधुनिक सुधारणांबद्दल त्यांचे असे मत होते की, 'समाजाचे कुशल राहून त्यांना अधिकाधिक ऊर्जितावस्थेस येण्यास जेवढी बंधने अपरिहार्य आहेत तेवढी कायम ठेऊन, बाकी सर्व गोष्टीत व्यक्तिमात्रास जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल, तितका द्यावयाचा हे अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणांचे मुख्य तत्त्व आहे.'[१०]

ज्या समाजसुधारणा करावयाच्या त्या आधी कोणत्या करावयाच्या ? सामाजिक की राजकीय ? हा त्या काळांत वादाचा मुख्य विषय होता. सामाजिक सुधारणा आधी कराव्या, मग त्यांत राजकीय सुधारणा आपोआपच येऊन जातात ही आगरकरांची भूमिका टिळकांना मान्य नव्हती.

**सुधारक पंथाचे साधारण स्वरुप**

आधुनिक शिक्षण, सुधारणा व संस्कृतीला अनुकूल असणाऱ्या सर्व पंथांचे साधारण स्वरूप असे होते. (अ) पाश्चात्य विज्ञान संपूर्ण स्वागतार्ह आहे. (ब) पारंपारिक धर्माशी कसलाही संबंध नसलेले आधुनिक शिक्षण सर्व सुधारणांचा गाभा होय. (क) जातीभेदामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने येत असल्यामुळे, जातीभेद संपूर्ण नष्ट होणे जरूर आहे. (ड) चातुर्वर्ण्याचे तत्त्वज्ञान समाज व व्यक्ती विकासास प्रतिबंध करणारे म्हणून त्याज्य होय. (ई) व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर लोकसत्ताक राज्यव्यवस्था हिंदुस्थानात निर्माण होण्याची गरज आहे. त्यासाठी समाजपरिवर्तन होणे जरूर आहे. त्याची सुरुवात

कुटुंब–संस्था व विवाह–संस्था यामधील बदलाने होते. म्हणून स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य यांचा पुरस्कार केला पाहिजे.'[११]

(ब) प्रतिकूल प्रतिक्रिया

भारतीय समाजांतील विविध घटकांची सामूहिक अस्मिता धर्म व जात यांच्याशी निगडित राहिली. ख्रिश्चन धर्मविचाराचा परिणाम सुशिक्षित, अशिक्षित सर्वांवरच होत होता. त्यामुळे धर्मांतराच्या लाटा वरचेवर येत राहिल्या. खेडयापाडयांतील अनेक लोक, अनेक प्रकारांनी बाटविण्यांत येऊं लागले. त्यामुळे या नव्या सुधारणामुळे आपल्या धर्मावर घाला येतो की काय अशी भीति जुन्या धर्ममार्तंडाना वाटूं लागली. यांतून 'सुधारक' व 'दुर्धारक' (सनातनी) असे गट समाजांत पडू लागले.[१२] ही प्रतिकूल प्रतिक्रिया पाश्चात्त्य सुधारणाविरोधी होती, तशी इंग्रजी राज्याविरोधीही होती. कारण इंग्रजी राज्यामुळेच हे सर्व घडत असल्याचा त्यांचा ग्रह झाला होता. इंग्रजी राज्यामुळे ज्यांचे अतोनात नुकसान झाले, असे पूर्वीच्या जमान्यांतील सरदार, वतनदार, शिपाई आता बेकार झाले होते. पेंढारी व ठग लोकांचा बंदोबस्त सरकारने निष्ठुरपणे केलेला होता, ते रामोशी, व तत्सम लोकही आता बेकारच झालेले होते. पेशव्यांच्या दरबारांत केवळ ब्राह्मण जातीत जन्मण्याचे भाग्य लाभल्याने ज्यांची उपजीविका, मानमरातब व चैन चालत होती, त्यांच्या पोटावरच नव्या राज्याने पाय आणल्यामुळे तेही सर्व असंतुष्टच होते. या सर्व कारणांनी इंग्रजी राज्याविरोधी भावनांचा प्रक्षोभ झाला होता.

एकंदरीने पाश्चात्त्य सुधारणांच्या विशाल वैभवाचा मत्सर व हजारो वर्षे निष्ठेने पूजलेल्या पुराण संस्कृतीच्या नाशाची भीति अशा दोन भावना या असंतोषाच्या मुळाशी होत्या. या दोन परस्परविरोधी, प्रतिक्रियांचा झगडा म्हणजेच इंग्रजी राज्यातील हिंदी समाजाचा इतिहास होय. राजकारण समाजकारण, धर्म, वाङ्मय इत्यादी सर्व क्षेत्रांत हा झगडा प्रगट झालेला दिसतो. [१३]

धर्मजीवनांतील अंधश्रद्धा, वर्णदास्य, कर्मकांड व पुरोहित वर्गाचे वर्चस्व यांविरुद्ध जगांतील सर्व भागांत सुधारकांनी आवाज उठविल्याचे दिसून येते. तसेंच सनातन्यांनी जुनी परंपरा टिकवून धरण्याची व नव्या प्रवृत्तींना चिरडून टाकण्याची शिकस्त केली असेही दिसून येते. उदा., ख्रिस्ती धर्मामध्ये कॅथॉलिक चर्च व पोप यांचेविरुद्ध प्रॉटेस्टंट पंथाने फार मोठी चळवळ उभारली. मार्टिन ल्यूथर, कॅल्वीन प्रभृती धर्मसुधारक बायबल मानीत, पण चर्चची मध्यस्थी व हुकमत त्यांना नको होती. पेनसारख्या तत्त्वचिंतकाने बायबलचेही प्रामाण्य झुगारून दिले व ईश्वरनिष्ठा आणि नैतिक प्रेरणा यांचाच हिरीरीने पुरस्कार केला, मुसलमान धर्मातही सूफी संप्रदायाने असाच प्रयत्न केला. त्याला मुल्ला-मौलवींनी असाच विरोध केला हिंदुधर्मातही शैव-वैष्णव, भागवत, जैन, बौद्ध, शीख, वारकरीपंथ उदयास आले. 'अध्यात्मनिष्ठ भक्तिप्रवण मानवतावाद' हे या सर्व धर्मसुधारकांचे प्राणतत्त्व होते त्यांनी आपल्या विचारांत ज्ञान आणि भक्ति, धर्म आणि नीति, प्रवृत्ति आणि निवृत्ति, वैराग्य आणि लोकसंग्रह यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. ऐहिक सुखसमृद्धीबद्दल ते उदासीन होते. पण ऐहिक जीवनांतील सत्त्वसंपन्नता हेच परमार्थसाधनेचे प्रमुख अंग ते मानीत होते. जातिसंस्था, वर्णधर्म, कर्मसिद्धांत यांचे त्यांनी सश्रद्ध भावनेने समर्थन केले. त्यामुळे त्यांच्या चळवळीमुळे हिंदू समाजव्यवस्थेचा पाया जरासुद्धा हादरला नाही. उलट पुढील काळांत पुनरुज्जीवनवादाची लाटच त्यांतून उसळली. शास्त्रीपंडित, कीर्तनकार, पुराणिक, भटभिक्षुक यांचे प्रस्थ त्यांतून बोकाळण्यास मदत झाली.

मध्ययुगांतील या अनुभवांचीच पुनरावृत्ती आधुनिक भारताच्या इतिहासांत होणार की काय अशी भीति अलीकडे निर्माण होऊं लागली आहे. त्याची कारणे अशी सांगता येतील.

## (अ) चिपळूणकर-टिळक

इंग्रजी राज्याबरोबर आधुनिक संस्कृतीला विरोध करणारी जी प्रतिक्रिया होती तिचे नेतृत्व कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळक यांचेकडे होते. लो. टिळक म्हणतात, 'देशाची स्थिती खराब असली तरी ती शाश्वत

निकृष्टावस्था नाही, नैमित्तिक आहे. मूलत: आमच्या देशास फारसे काही झालेले नसून परकीय अमलाच्या मगरमिठीमुळे ग्लानी आली आहे.'[१४] त्यांच्या मते अवनती व पारतंत्र्य चक्रनेमिक्रमाने आलेले आहे. आज प्रगतीपथावर असलेली राष्ट्रेही कधी ना कधी या चक्रामध्ये सांपडणे संभवनीय आहे. आपली संस्कृती आजही पाश्चात्य संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे. कांही तात्कालिक कारणांनी व विशेषत: दैव फिरल्यामुळे सध्यां आपणांस जरी विपन्नावस्था आलेली दिसत असली तरी ती तात्पुरती आहे. तरी आपण ती निपटून काढली पाहिजे. त्यासाठी आपण धर्मसंस्कृती सोडून पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करणे धोक्याचे ठरेल. इंग्रजी राज्यापासून व संस्कृतीपासून आपल्या संस्कृतीला असलेला धोका टाळणेसाठी इंग्रजी राज्य नष्ट करणे जरूर आहे. त्यावरच सर्व शक्ति एकवटली पाहिजे. बाकीचे सर्व प्रश्न गौण आहेत असे त्यांचे म्हणणे होते. लो. टिळक म्हणत. 'आपली परंपरागत संस्कृती आणि आपला धर्म यांच्या चौकटीत बसेल अशाच रीतीने सुधारणांची आखणी करावी. जे फेरफार करावयाचे त्यामुळे हिंदुत्वाचा अभिमान नष्ट होऊ नये अशी खबरदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. गीता, उपनिषदे यांतील तत्वज्ञान आणि श्रुतिस्मृति पुराणोक्त वर्णाश्रमधर्म यांच्या आधाराने व परंपरेने चालत आलेले जे काहीं-एक वैशिष्टय ते हिंदुत्व किंवा हिंदूधर्म होय.'[१५] टिळकांचा स्त्रियांविषयक दृष्टिकोन कोणत्याही परंपरानिष्ठ माणसाप्रमाणेच अनुदार होता. शारदा सदनच्या वादांत त्यांचा हिंदुधर्माभिमान प्रगट झाला आहे. हिंदुधर्माबाबत टिळकांना वाटणारा हा अभिमान त्यांना 'लोकमान्य' करण्यास नेहमीच उपयुक्त ठरला.[१६] सुधारक आणि दुर्धारक (सनातनी) यांच्यामध्ये जशी मतभिन्नता दिसते, तशीच मतभिन्नता व वैचारिक संघर्ष पुढील काळांत टिळक-गोखले, महात्मा गांधी-पंडित नेहरू यांचेपर्यंत चालूच राहिला.

## (ब) टिळक आणि गांधी

गांधीजी स्वत:ला गोखल्यांचे शिष्य म्हणवीत असत. पण त्यांच्या आचार–विचारात गोखले व टिळक या दोघांचाही प्रभाव– विशेषत: टिळकांचा अधिक दिसून येतो. सर्वांगीण सामाजिक सुधारणांचा आग्रह व घटनात्मक प्रगतीच्या

विचारांवर विश्वास या गोखल्यांच्या दोन्ही बाबी गांधीजींना मान्य होत्या. तसेच राम मोहन रॉयपासून आगरकरापर्यंतच्या सर्व सामाजिक सुधारणाही त्यांना मान्य होत्या. म्हणून ते गोखल्यांचे शिष्य तेवढ्यापुरते ठरू शकत होते. तथापि या सामाजिक व राजकीय सुधारणांमागील ना. गोखले व इतर नेमस्त मंडळींची विचारसरणी मात्र त्यांना अजिबात मान्य नव्हती. शिवाय जालीयनवाला बाग प्रकरणानंतर ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरील त्यांचा विश्वासही उडाला. मग गोखल्यांचे त्यांचेजवळ काय राहिले ?[१७] विशेषतः आधुनिक सुधारणा व संस्कृतीला त्यांचा तीव्र विरोध होता. एवढेच नव्हे तर त्या विरोधावरच त्यांचा जीवनविषयक सर्व दृष्टीकोन आधारलेला होता. १९०९ साली त्यांनी लिहिलेल्या 'हिंद–स्वराज्य' या छोटेखानी पुस्तिकेत गांधीजी म्हणतात, 'आधुनिक संस्कृती पश्चिमेने संपूर्णपणे टाकून दिल्याशिवाय पूर्व व पश्चिमेचे ऐक्य कधीच होणार नाही. या संस्कृतीच्या विजयाची जेवढी म्हणून चिन्हे असतील, ती सर्व टाकून दिल्याशिवाय सविनय प्रतिकाराचे तत्त्वांचा त्यांना अंगिकार करतां येणार नाही. ते सर्व शोध म्हणजे रेल्वे, तारायंत्रे, दूरध्वनी, वाफेची यंत्रे, आगबोटी, यंत्रोत्पन्न कापड, शहरे ( जी प्लेगची उगमस्थाने आहेत ) एवढेच नव्हे तर वैद्यकीय ज्ञान ( काळ्या जादूचा प्रभावी अर्क ) व इस्पितळे (सैतान आपल्या हेतुसिद्धीसाठी त्यांचा उपयोग करतो) ही सर्व नष्ट केली पाहिजेत. जनतेच्या भौतिक जीवनपद्धतीला मर्यादा घालणेतच खरे शहाणपण आहे'. रेव्हरंड जोसेफ डॉक म्हणतात, 'पाश्चात्त्य संस्कृतीचा धि:कार आणि अहिंसा तत्त्व एकमेकांशी संलग्न करणारा गांधीजींचा सिद्धांत त्यांच्या सर्व विचारांचा गाभा आहे.'[१८] या मूळ सिद्धांतावरील त्यांची श्रद्धा अगदी अखेरपर्यंत कायम असल्याचे गांधीजींनी त्यानंतर अनेकवेळा जाहीर केले होते. त्यावरून आधुनिक संस्कृती व सुधारणांसंबंधी गांधीजी किती विरोधी होते हे स्पष्ट होते.

उलटपक्षी ना. गोखले व इतर नेमस्त मंडळींच्या विचारसरणीमध्ये मात्र आधुनिक संस्कृती व सुधारणांना सर्वाधिक महत्त्वाचे स्थान होते. सनदशीर राज्यकारभाराच्या संस्था व्यवस्थित चालणेसाठी आणि भारतीय समाजाचे आधुनिकीकरण करण्याचे एक साधन म्हणून नेमस्त मंडळी आधुनिक

शिक्षणाकडे पहात होती. गोखले यांचे मते 'शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ कार्य विद्याप्रसार एवढेच नसून जुन्यापुराण्या ध्येयांच्या जखडबंदीतून भारतीय मने मुक्त करणे व पाश्चिमात्य जीवन, विचार आणि चारित्र्य यांतील सुंदर असेल त्याचा भारतीय विचाराशी मिलाफ घडवून आणणे हे आहे.'[१९]

'इंग्रजी शिक्षणाचा परिणाम म्हणजे श्रद्धेवर बुद्धीचे, बाह्यशक्तीवर सद्विवेकाचे श्रेष्ठत्व पुकारणे होय. त्यामुळे राजकीय हक्कांची व सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण होण्यास मदत होते. शतकानुशतके रूढीग्रस्त आणि मृतवत झालेल्या जीवनांत एका नव्या विचाराची संजीवनी प्राप्त होते. धर्म, समाज आणि शासन यांचेकडे बघण्याचा चिकित्सक दृष्टीकोन त्यामुळे निर्माण होतो.'[२०]

न्या. रानडे म्हणत असत 'राजकीय हक्कांच्या बाबतीत तुम्ही मागासलेले असाल, तर तुमची समाजव्यवस्था चांगली असणे शक्य नाही. तुमची समाजव्यवस्था समता, सामंजस्य व न्याय यांवर आधारलेली नसेल, तर तुम्ही राजकीय हक्क वापरू शकत नाही व तुमची अर्थव्यवस्थाही ठीक असू शकत नाही. त्याचप्रमाणे तुमचे धार्मिक विचार जर मागासलेले असतील, तर तुमची आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थितीही ठीक असणार नाही. हे निसर्गाचे परस्परावलंबन आहे'.[२१] यावरून आधुनिक संस्कृती व शिक्षणाबाबत गांधीजींचे विचार व नेमस्त मंडळींचे विचार किती परस्परविरोधी होते ते लक्षांत येईल.

### लो. टिळकांची भूमिका

उलटपक्षी गांधीजींच्या भूमिकेसंबंधी लो. टिळक म्हणतात, 'गांधींनी स्वीकारलेला नि:शस्त्र प्रतिकाराचा – अडवणुकीचा किंवा त्यांच्या भाषेत सत्याग्रहाचा मार्ग अडचणीतच त्यांना सुचलेला असून त्यांनी अडचणी सोसून त्याचा अवलंब केल्यामुळे तो आता शास्त्रपूत झाला आहे.'[२२]

चिरोल केसमध्ये टिळकांना कोर्टात विचारलेल्या प्रश्नोत्तरावरून नि:शस्त्र प्रतिकाराचे समर्थन धार्मिक भावनेच्या आधारानेच करावे लागते असे टिळकांचे मत असल्याचे त्यांनी स्पष्टच सांगितले आहे. 'नि:शस्त्र प्रतिकाराचा अर्थ

स्वतः दुःख सोसून प्रतिकार करणे असा त्यांनी सांगितला. त्यांवर 'हे कसे होते' असे विचारलेवर टिळक म्हणाले, 'धार्मिक भावनेने आपण दुःख सोसले म्हणजे त्याचा इतरांवरही परिणाम होतो, असे धर्मग्रंथांत सांगितले आहे'. याशिवाय १९१८ मध्ये 'गांधींच्या मार्गाची थोरवी मोठी आहे हे सर्वांना कबूल करावे लागेल' असे उद्गार त्यांनी काढले होते.

तेव्हा आधुनिक सुधारणा व संस्कृति यांना असलेला गांधीचा विरोध व त्याचेशी असलेला त्यांचा अहिंसा तत्त्वाचा अविभाज्य संबंध यांना धर्माच्या दृष्टिकोनांतून टिळकांचा पाठिंबा होता. याउलट गोखले, रानडे वगैरे नेमस्त मंडळींचा आधुनिक शिक्षणाला, सुधारणांना व संस्कृतीला पाठिंबा होता हे लक्षात घेता गांधीजी गोखल्यांचेपेक्षा टिळकांकडेच अधिक झुकलेले होते हे आचार्य जावडेकरांचे मत ग्राह्य मानावे लागते.[२२]

**महात्मा गांधींची भूमिका**

ब्रिटिश राज्याच्या बंधनांतून भारतीय जनतेची मुक्तता करणे एवढेच गांधीजींचे ध्येय नव्हते, तर आधुनिक संस्कृतीच्या अतिक्रमणापासून त्यांना मानवजातीची मुक्तता करावयाची होती. भारतीय स्वातंत्र्याचा लढा त्यांचे दृष्टीनें त्या व्यापक कार्याचा एक भाग होता. युरोपीय आधुनिक संस्कृतीशी संपर्क आल्यामुळे भारतीय समाजावर व धर्मावर झालेले अनिष्ट परिणाम त्यांना पुसून टाकावयाचे होते. मूळच्या शुद्ध भारतीय संस्कृतीची त्यांना परत प्रतिष्ठापना करावयाची होती. ते त्यांचे ध्येय होते 'हे लो. टिळक व गांधीजी यांच्या विचारांत साम्य दिसते'[२३] अनेक प्राचीन धर्मांची जन्मभूमी असलेला देश, त्याची प्रकृती व संस्कृती यांना पूर्णपणे जुळणारा असा निशस्त्र प्रतिकाराचा मार्ग आहे. त्यासाठी आधुनिक संस्कृतीपासून शिकण्यासारखे विशेष कांहीच नाही. कारण ती संस्कृती अत्यंत दुष्ट प्रकारची हिंसा व मानवतेचा अभाव यांवर आधारलेली आहे. आत्मनाशाकडे तिची सध्या वेगाने वाटचाल होत आहे, असा संदेश १९०९ साली भरलेल्या अमृतसर कॉंग्रेसला गांधीजींनी पाठवला होता. त्यांत त्यांच्या भूमिकेचे सर्व सार होते.

पंडित जवाहरलाल नेहरुंची भूमिका

'शिक्षणप्रसार मंदगतीने होत होता. ते मर्यादित व विकृत स्वरुपाचेही होते. तरीही त्यामुळे नवी ध्येये व क्रांतिकारक विचार भारतीय मनांमध्ये येण्यास वाव मिळाला.'

'ज्या ज्या देशांत राष्ट्रवाद वाढत जातो, तेथे तेथे सामाजिक प्रगतीसाठी धर्माव्यतिरिक्त इतर मार्गाचा अवलंब केला जातो. भूतकाळाकडे झेप घेतली जाते. भारताच्या भूतकाळांतील सांस्कृतिक विविधता आणि श्रेष्ठत्व सर्व भारतीय जनतेचे हिंदु-मुस्लीम, बौद्ध-जैन-ख्रिश्चन आहे. त्या सर्वांच्या पूर्वजांचा आपणांस मिळालेला तो वारसा आहे. त्यांचेपैकी कांहीनी पुढील काळांत जरी धर्मांतर केलेले असले तरी त्यामुळे त्यांच्या वारसाहक्काला कसलीच बाधा येत नाही. प्राचीनकाळातील तत्त्वज्ञान, वाङमय, कला, इतिहास यामुळे केवळ हिंदूनाच समाधान वाटेल असे नाही. तो सर्वांचाच वारसा मानला पाहिजे'. 'प्राचीन वाङमयापैकी बरेचसे आपण हरवून बसलो ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. ग्रीस, भारत व इतर देशांतील हे वाङमय पाम वृक्षाच्या पानांवर लिहिलेले असल्यामुळे नष्ट होणे अपरिहार्य होते. इतर ग्रंथांतील संदर्भावरून फक्त त्याची माहिती आपणांस आज उपलब्ध होऊं शकते. प्राचीन उप-निषदांच्या नंतरच्या काळांतील जडवादावरील सर्व साहित्य नष्ट झाले आहे. तथापि जडवाद भारतांत कित्येक शतके प्रचारांत होता यांत शंका नाही. इ. स. पूर्व चौथ्या शतकांतील कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र नावाच्या प्रसिद्ध ग्रंथात तसा उल्लेख आहे. जैन, बौद्ध व हिंदू तत्त्वज्ञान तार्किक चिकित्सेवर आधारलेले होते असे त्यावरुन समजून येते.'

'ग्रीक, चिनी व अरब लोकांप्रमाणे भारतीयांनी इतिहास लिहीला नाही हे दुर्दैव आहे. इतिहासांतील घटनांचा व्यवस्थित काळानुरुप अर्थ लावणे त्यामुळे काहीसे अशक्य झाले आहे. इ. स. च्या बाराव्या शतकांत 'राजतरंगिनी' (काश्मीरचा इतिहास) हे एकच जुने पुस्तक इतिहास नावास पात्र असे आहे. बाकी सर्व बाबतीत आपणांस पुराण व तत्सम इतर काल्पनिक इतिहासावरच समाधान मानावे लागते, कांही तत्कालीन शीलालेख, कलात्मक अवशेष, नाणी

व संस्कृत साहित्य किंवा परदेशी प्रवाश्यांनी लिहीलेले तत्सम वृत्तांत यांवरच भिस्त ठेवावी लागते. म्हणून खरा इतिहास इंग्रज भारतांत आल्यापासूनच सुरु होतो असेच म्हणावे लागते.

पाश्चात्य संस्कृतीचा भारतावर झालेला परिणाम म्हणजे गतिमान समाजाचा कुंठित समाजावर झालेला परिणाम होय. वाफेची इंजिने व रेल्वे यामुळे भारताची मध्ययुगीन समाजरचना मोडून टाकण्याचे फार मोठे कार्य झाले आहे.[२४] ते पुढे म्हणतात 'हिंदुस्तानात खरे रण हिंदु व मुसलमान संस्कृतीत माजलेले नसून या दोन्ही संस्कृती व त्या दोन्हीहून अत्यंत भिन्न असणारी आधुनिक संस्कृती यांत माजलेले आहे. आधुनिक संस्कृतीची मुसंडी थोपविण्याचे कितीही प्रयत्न हिंदु व मुसलमान संस्कृतीच्या अभिमान्यांनी केले, तरी ते फसणार याविषयी मला तरी तिळमात्र शंका नाही '.[२५]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका**

'हिंदुस्तानांतील दलित समाजाची उन्नति करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करणे व पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्णियांची सेवा करावयास लावणे नव्हे. खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून, त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागते, तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे, चालू समाज-पद्धतीमुळे जें त्यांचे जीवन निर्दयपणे लुबाडण्यात आले आहे, त्याचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे हाच त्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज कशानेही ते साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर, माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे.'[२६]

**भाई मानवेन्द्रनाथ रॉय यांचे विचार**

' शास्त्रीय विचारप्रणाली हाच आधुनिक पाश्चात्य सुधारणांचा पाया आहे. ही भारतात आपण विकसित करू शकलो नाही. त्यामुळे आपला विकास खुंटला, आर्थिक मागासलेपणा आला व राजकीय गुलामगिरी आली. आणि युरोपियन लोक झपाट्याने आपल्यापुढे गेले. सांस्कृतिक विकासाच्या प्रथमा-वस्थेत युरोपियन लोकापेक्षा आपण अधिक प्रगत होतो. युरोपमध्ये तीनशे

वर्षापूर्वीपासून जशी प्रबोधनाची चळवळ झाली, तशीच आपणांकडे झाली असती, तर आपणही त्यांचेपुढे गेलो असतो. पण बौद्धधर्माच्या अपयशानंतर बुद्धीवादाचा विकास भारतांत होऊ शकला नाही. त्यामुळे शास्त्रीय विचार-प्रणाली वाढू शकली नाही. व पश्चिमेकडे जशा सुधारणा झाल्या, तशा आपणां-कडे होऊ शकल्या नाहीत तेव्हा शास्त्रीय विचारसरणीची कांस आपण धरली पाहिजे, त्यासाठी बुद्धीवादाचा, प्रबोधनाच्या चळवळीचा मार्ग आपण धरला पाहिजे. तरच पाश्चिमात्य राष्ट्रांचे बरोबरीने विकास आपणही करू शकू.[२७]

### इहवादाचा निकष

नेहरु, आंबेडकर आणि रॉय यांचे जे विचार सविस्तर दिले आहेत त्यावरून आधुनिक शिक्षण, सुधारणा व संस्कृती यांचे महत्त्व भारताच्या प्रगतीसाठी किती आहे हे आपल्या लक्षात येऊ शकेल. ना. गोखले, न्या. रानडे, म. ज्योतिबा फुले, आगरकर यांनीही या शिक्षणाचे, सुधारणांचे व संस्कृतीचे महत्त्व मानले होते. लो. टिळक व म. गांधी या सुधारणा व संस्कृतीच्या मूलतः विरोधी आहेत. धर्म आणि समाजकारण किंवा राजकारण यांची फारकत होणे टिळक गांधींना मान्य नाही तर नेहरु, आंबेडकर, आगरकर, रॉय यांचा त्याबाबत आग्रह आहे. इहवाद केवळ शासन व धर्म यांचीच फारकत अवश्य मानतो असे नाही, तर सर्व सामाजिक संस्था, म्हणजे विवाह, कुटुंब, वारसा-हक्क, समाज, नीति या सर्वांची धर्मापासून फारकत व्हावी असे मानतो. तेव्हा आधुनिक काळांत टिळक गांधी यांचे भूमिकेपेक्षा नेहरु, आगरकर, आंबेडकर, रॉय यांची भूमिका इहवादास अधिक पूरक आहे असे मानावे लागते. याचा अर्थ असा की आधुनिक संस्कृती व सुधारणा, शिक्षण यांचेबद्दलची अनुकूल भूमिका हाच इहवादाचा निकष मानावा लागतो.

### धर्म व समाजकारण

गांधीजी व लो. टिळक 'धर्मनिरपेक्ष शासनाचे' पुरस्कर्ते होते. पण त्यांची वैयक्तिक आचरणाची व विचार प्रतिपादनाची पद्धती धार्मिक वळणाची होती. पंडित नेहरुंनाही त्यांची धार्मिक पद्धती आवडत नव्हती. तसे त्यांनी स्पष्टपणे म्हटलेही आहे. टिळक व म. गांधींमुळे एकंदरीत भारतीय लोकांच्या अंध

धर्मश्रद्धा बळकट करण्याचेच कार्य झाले आहे असे म्हणावे लागते. पंडित नेहरुंच्यानंतर त्यांची कन्या श्रीमती इंदिरा गांधी स्वतःच देवदेवळे करणाऱ्या होत्या. त्यामुळे त्यांचे कारकीर्दीत अनेक संतमहंतांचे प्रस्थ वाढण्यास मदत झाली. भारतीय राज्यघटनेने इहवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद ही मूल्ये दिली असूनही भारतीय समाज इहवादी बनण्यास त्यामुळे फारशी मदत झालेली दिसून येत नाही. त्याची महत्वाची कारणे दोन संभवतात. एकतर प्रथमपासूनच याबाबतीत घ्यावी तेवढी काळजी कोणीच घेतली नाही. उदा. डॉ. राजेन्द्रप्रसादसारख्या उच्चपदस्थ व्यक्तीने पाटण्याला ब्राह्मणाचे पाय धुतले. त्यामुळे पंडित नेहरु त्यांचेवर फारच संतापले होते हे प्रसिद्धच आहे. सोरटी सोमनाथाची प्रतिष्ठापना करणेची गोष्टही अशीच आहे. दुसरे म्हणजे येथील नेत्यांनी इहवादाचा अर्थच सर्वधर्मसमभाव असा करून घेतल्यामुळे सर्वच धर्मांच्या धार्मिक श्रद्धांना मुक्तद्वारच झाले आहे. प्रत्येक गोष्टीला धार्मिक वळण देण्याच्या सवयीमुळे समाजवादसुद्धा 'हिंदु समाजवाद', 'मुस्लीम समाजवाद' झालेला दिसतो ! शासकीय कार्यक्रमांना मुहूर्त पाहिले जातात ! भूमिपूजनांचे, सुवासिनींच्याकडून ओवाळून घेण्याचे कार्यक्रम होतात. गांधींनी खिलाफत चळवळीला याच कारणांनी पाठींबा दिला होता ! धर्म व समाजकारण यांच्या सीमारेषा आजवर आपण ठरवू शकलो नाही. त्यामुळे धर्माचा उपयोग राजकारणासाठी सर्वांनीच केलेला दिसतो. पण आता पंजाबातील शीख किंवा महाराष्ट्रातील शिवसेना तो करू लागल्यानंतर 'धर्म व राजकारण यांची फारकत केली पाहिजे' असा विचार काँग्रेस नेत्यांकडून पुढे येऊ लागला असल्याचे दिसते. सर्वधर्मसमभाव याचा अर्थ सर्व धर्मांचा सनातनीपणा व परिवर्तनविरोधी भूमिकाबाबत संदिग्ध रहावयाचे असाच अर्थ शासनाने व या नेत्यांनी आतापर्यंत करून घेतल्याचे दिसते. बोहरा समाजाचे धर्मगुरुंची सर्वंकष सत्ता आपले धर्मनिरपेक्ष म्हणवून घेणारे शासन कसे काय खपवून घेते ? मुस्लीम स्त्रीस पोटगीचा अधिकार न्यायालयाने दिला असताना तावडतोब घटनादुरुस्ती करून तो हिरावून घेतात. काँग्रेसनेते मुस्लीम व्यक्तिगत कायद्यांत बदल करणार नाही असे वचन देतात, याला काय म्हणावे ? घटनेतील ४४ वे कलमांतील समान नागरी कायद्याची जबाबदारी ते कशी

डावलू शकतात ? अशा अर्धवट बोटचेपे धोरणामुळे एकतर कर्मठ मुसलमानांचे फावते तर दुसरीकडे बहुसंख्य हिंदुनांही या तत्वशून्य, लाचारीचा राग येतो. त्याचा परिणाम हिंदुसमाज जातीय संघटनांच्या आहारी जाण्यांत होतो हे सारे दुष्टचक्र आहे. अलीकडे रेडिओ, दूरदर्शनवरून निरनिराळ्या धार्मिक उत्सवांचे प्रक्षेपण केले जाते. शासकीय मंत्री, त्यांतून मिरवीत असल्याचे लोकांना मुद्दाम दाखविले जाते. निरनिराळ्या बुवा-महाराजांचेही स्तोम याच प्रकारे माजविण्यांत येत आहे. गुरुद्वारांत शस्त्रे जमविली व त्याचा दुरुपयोग करून निरपराध नागरिकांचा काटा काढण्याचा उद्योग अप्रतिहत चालू केला, तरी शासनाने त्यांत हस्तक्षेप करायचा नाही. शासकीय उच्चपदस्थानी शिखांच्या धार्मिक न्यायालयापुढे नमावे लागते, हे धार्मिक मूलतत्ववादाचे दर्शन नव्हे काय ? जातीयवादाचा सामना करण्याची हीच पद्धती काय ? गेल्या चाळीस वर्षांतील आमच्या धर्मनिरपेक्ष शासनाची हीच परिणती काय ? पंडित नेहरूंच्या जन्मशताब्दीच्या वर्षात त्यांच्या इहवादी शासनाने हीच श्रद्धांजली अर्पण करावी काय ?

---

*संदर्भ* :
१. आचार्य, शं. द. जावडेकर, – आधुनिक भारत
२. गोविंद तळवलकर, – सत्तांतर भाग १ ला
३. गोविंद तळवलकर, – सत्तांतर भाग १ ला
४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह – ज्योतिनिबंध पान नं. ३८६
५. लोकहितवादी गो. ह. देशमुख, – शतपत्रे क्र. ६४
६. न्यायमूर्ती, म. गो. रानडे, – Misce. writings.
७. न. र. फाटक, – रानडे चरित्र – पृ. क्र. ३०२–०३
८. कीर धनंजय म. – ज्योतिराव फुले – प्रस्तावना
९. ना. श्री. बनहट्टी, – टिळक आणि आगरकर
१०. गो. ग. आगरकर, – निबंधसंग्रह, भाग १ ला – पृ. क्र. ६
११. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह भाग १ ला–ज्योतिनिबंध पान नं. ३८८
१२. प्रभाकर पाध्ये, – आजकालचा महाराष्ट्र
१३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, – लेखसंग्रह – ज्योतिनिबंध पान नं. ३८७ भाग १ ला
१४. लोकमान्य टिळक, – केसरीतील लेख भाग ४ था – पृ. क्र. ३७०
१५. लोकमान्य टिळक, – केसरीतील लेख भाग ४ था – पृ. क्र. ३७०
१६. य. दि. फडके, – टिळक आणि आगरकर
१७. नरहर कुरुंदकर, – जागर – (महात्मा गांधी) पा. नं. १४४
१८. रेव्ह. जोसेफ डॉक –India, Gandhi of the world.

१९. फ्रीडमन मॉरिस–India, Gandhi of the world.
२०. प्रा. आर. सी. मुझुमदार – History of Culture of the Indian People Vol–XP–465.
२१. न्यायमूर्ती म. गो. रानडे, – Misce. writings.
२२. लोकमान्य टिळक, – गांधी चरित्र – प्रस्तावना
२३. शं. य. जावडेकर, – आधुनिक भारत
२४. पंडित नेहरु, – आत्मचरित्र – पान नं. ७८
२५. पंडित नेहरु, – आत्मचरित्र – पान नं. ७८
२६. वसंत पळशीकर, – नवभारत – काँग्रेस खास अंक डिसेंबर ८५
२७. मानवेन्द्रनाथ भाई रॉय, – Renaissance Movement P - 31

# १०

# भारतीय इहवाद

आधुनिक शिक्षण, संस्कृति, सुधारणा यासंबंधीचा आणि व्यक्तिवाद, बुद्धिवाद, मानवतावाद यासंबंधीचाही अनुकूल दृष्टीकोन हा इहवादाचा निकष मानला पाहिजे, केवळ समान नागरिकत्व, धार्मिक स्वातंत्र्य आणि धर्मापासून शासनाची व इतर सामाजिक संस्थांची फारकत अशा शासकीय तरतुदी होणे एवढाच मर्यादित अर्थ इहवादास घेऊन चालणार नाही. कारण भारतांतील लोकांच्या धर्मश्रद्धा इहवादाला संपूर्ण विसंगत आहेत. समाज इहवादी असल्याशिवाय इहवादी शासन असण्याला फारसा अर्थ नाही. शासनाचा इहवाद जनतेच्या धर्मश्रद्धांपुढे दुर्बल ठरतो हे आतापर्यंतच्या विवेचनावरून व प्रत्यक्ष अनुभवावरून आपल्या लक्षांत आलेच आहे. गांधीजी व पं. नेहरु यांचेमधील वैचारिक संघर्षामध्ये त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर, बॅ. सावरकर व भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्या कार्यामध्येही या संघर्षाचे प्रतिबिंब दिसून येते.

### पंडित जवाहरलाल नेहरु आणि नवभारताची उभारणी

'गांधीजींच्या यंत्रविषयक व आधुनिक संस्कृतीबद्दलच्या कल्पना आमच्यापैकी फारच थोड्यांना मान्य असतील. ते स्वतःच आपल्या कल्पना

आदर्शवादी व आजच्या परिस्थितीत गैरलागू समजत असावेत असा आमचा अंदाज होता', असे पं. नेहरुंनी त्यांच्या आत्मचरित्रांत स्पष्टच म्हटलेले आहे.[१] भारतीय शासनाचे स्वरुप आणि रचना तसेंच पाश्चात्त्य शिक्षण, संस्कृती व सुधारणा यासंबंधी पंडित नेहरु व गांधीजी यांच्या विचारांत काहीही साम्य नव्हते. गांधीजी ग्रामोद्योगप्रधान समाजरचनेचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांना विकेंद्रित ग्रामव्यवस्था व राज्य रचना हवी होती. उलट पंडित नेहरू औद्योगिकीकरणाचे व आर्थिक नियोजनाचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांची भूमिका प्रबळ केंद्रीय सत्ता असणाऱ्या सामर्थ्यवान संघ– राज्याची होती. गांधीजींचे धार्मिक परिभाषेतील विचारही नेहरुंना मुळीच मान्य नव्हते[२] 'गांधींचे विचार व त्यांचे नेतृत्व यांत फरक करून स्पष्टपणे एक वैचारिक भूमिका घेणे नेहरुंना अवश्य होते. अशी भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळांत नेहरुंनी घेतली ती प्रथम संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाच्या प्रश्नावर. १९२९ मध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास करून घेऊन नेहरुंनी राजकारणांतील पहिला विजय मिळविला. १९३७ च्या निवडणुकीनंतर उत्तर प्रदेशांत नेहरुंनी मुस्लीम लीगबरोबर संमिश्र मंत्रीमंडळ करण्याचे नाकारले. १९४२ साली क्रिप्स मिशनशी वाटाघाटीमध्ये गांधींचे इच्छेविरुद्ध स्वतःच्या अटीवर नेहरू युद्धामध्ये सहभागी होण्यास तयार होते'.[३]

'स्वातंत्र्यानंतर निर्वासितांचे लोंढे थांबणार नसतील, तर बंगालमध्ये फौजा घुसविण्याची नेहरुंनी तयारी केली होती. त्या दडपणाखाली नेहरु लियाकत अल्ली करार झाला'.[४] 'गांधीजी म्हणजे भारत' 'गांधीजींना विरोध करणे किंवा त्यांची शक्ती खच्ची करणे म्हणजे पर्यायाने राष्ट्रीय चळवळ खच्ची करणे होय' असे जरी नेहरु मानीत होते तरीही आपले मतभेद स्पष्टपणे मांडण्याची किंवा प्रसंगी स्वतंत्रपणे कांही गोष्टी करण्याची त्यांची तयारी होती, हेच यावरून दिसून येते. (म. गांधीजी व सरदार पटेल यांच्या निधनानंतर) १९५० नंतरच्या काळांत त्यांच्या विचारांना व कर्तृत्वाला अधिक अवसर मिळाला.

नवभारताची उभारणी कशी होईल, याचा आराखडा कराची काँग्रेस ठरावाने १९३१ साली दिला होता. त्याचे शिल्पकार पंडित नेहरुच होते. भारतीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सर्वांना विकासासाठी समान संधी आणि प्रौढ मताधिकार यांवर आधारलेली असेल. असे त्या ठरावांत नमूद केलेले होते. म्हणजे स्वातंत्र्यपूर्वकाळांतच नेहरुंनी धर्मनिरपेक्ष राज्याची व लोकशाही स्वातंत्र्याची संकल्पना जनमानसांत रुजविण्याचा प्रयत्न सुरू केलेला होता, असे दिसून येते.

**(अ) धर्मनिरपेक्षता**

संसदीय लोकशाही, जागतिक शांतता आणि समाजवाद ही पंडित नेहरुंच्या राजनीतिची मुख्य तत्त्वे आहेत. पैकी धर्मनिरपेक्षतेसंबंधीचे त्यांचे विचार आपण मागे पाहिलेच आहेत.

**(ब) लोकशाही**

लोकशाही म्हणजे जनतेचे स्वातंत्र्य आणि अधिसत्ता होय. त्यांचे मते संसदीय लोकशाही परिपूर्ण नव्हे. ज्यावेळी जनता सत्तेमध्ये सहभागी होते, त्याचवेळी जनतेच्या हितासाठी सत्ता राबवणे शक्य होते. ही गोष्ट फक्त समाजवादांमध्येच घडू शकते.[५] असे त्यांचे मत होते.

लोकशाहीचा अर्थ सामाजिक, राजकीय व आर्थिक समता असाच मानला पाहिजे केवळ राजकीय समता किंवा कायद्यापुढील समता एवढाच संकुचित अर्थ करून चालणार नाही. १९५५ मध्ये पंडित नेहरु म्हणाले 'वर्गहीन समाजाची निर्मिती हे आपले ध्येय असले पाहिजे. सर्वांना समान संधी देणाऱ्या सहकारी तत्त्वावर जो समाज आधारलेला असेल, त्यासाठी शांततामय व लोकशाही मार्गाचा अवलंब आपण केला पाहिजे.[६]

**(क) समाजवाद**

प्रत्येक व्यक्तीला किमान जीवनमान उपलब्ध झाले पाहिजे. विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. समाजातील विषमता संपली पाहिजे. गरीब श्रीमंतामधील अंतर कमीतकमी झाले पाहिजे. ही समाजवादासंबंधी नेहरुंची

स्थूल कल्पना होती.[७] मोठ्या प्रमाणांत उत्पादनवाढ झाल्याखेरीज जीवनमानांत वाढ होणे शक्य नाही. खाजगी भांडवलदार व उद्योगांना त्यासाठी योग्य संधी देणे आवश्यक आहे. म्हणजेच मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला पाहिजे, असे त्यांचे मत होते. समाजवादाच्या दिशेने पावले टाकणेसाठी प्रथम त्यांनी इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयकरण केले.[८] समाजवादाची घोषणा प्रथम १९२९ मध्ये त्यांनी केली. लाहोर काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून ते म्हणाले 'विषम समाजरचना आणि दारिद्र्य यांची समाप्ती आपणांस अभिप्रेत असेल, तर समाजवादाशिवाय तरणोपाय नाही मात्र त्याबाबत स्वतःच्या परंपरा आणि संस्कृती यांना जुळतील अशा मार्गाचा शोध भारतीयांना घ्यावा लागेल.'[९]

'जगासमोर उत्पादनवाढीचा व त्याच्या न्याय्य वितरणाचा असे दोन प्रश्न आहेत. एकाचे उत्तर भांडवलशाहीने व दुसऱ्याचे उत्तर समाजवादाने दिले आहे. या दोन्ही मार्गातील चांगल्या बाबींचा समन्वय करून, आपल्या गरजा पूर्ण करणारा आमच्या इतिहास परंपराशी सुसंगत असा मार्ग आपणांस शोधायचा आहे.'[१०] 'भारतांत राष्ट्रीयीकृत उद्योग, खाजगी उद्योग, आणि मिश्र उद्योग अशा तिन्ही प्रकारांना वाव द्यावा लागेल. हे तिन्ही प्रकार परस्परांशी सुसंवादी कसे होतील हे पाहण्याची गरज आहे.'[११] 'भारताच्या औद्योगिकीकरणासाठी तीन गोष्टींची गरज आहे. (१) यंत्रे उत्पन्न करणारे अवजड उद्योग धंदे, ( २ ) शास्त्रीय संशोधन संस्थांची उभारणी, ( ३ ) विद्युत्शक्ती.[१२] या तिन्हीचेही उत्पादन वाढविण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. त्यांचे साधन म्हणून औद्योगिक सहकारी संस्था उपयुक्त ठरतील, असे त्यांना वाटत होते. भारताचे जलदगतीने औद्योगिकीकरण केल्याशिवाय जमिनीवरील लोकसंख्येचा बोजा कमी होणार नाही, दारिद्र्यही नष्ट होणार नाही. आणि जीवनमानही उंचावणार नाही.'[१३] असे त्यांचे मत होते.

## भारतीय इहवादाची उलटी चाल

यूरोपांतील प्रबोधनाच्या व धर्मसुधारणांच्या चळवळीचा परिणाम तेथील समाज इहवादी बनण्यामध्ये झाला व तेथील शासन ही इहवादी बनले.

पण भारतांत याउलट घडले. येथे 'इहवादी शासन' आधी निर्माण झाले व त्याने पिढयान्‌पिढया अंध धर्मश्रद्धा असलेला समाज इहवादी बनविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याला स्वत:च्या अस्तित्वासाठी तसे करणे भागच होते. समाज अंध धर्मश्रद्धांनी जखडलेला असेल तर शासन इहवादी कसे राहू शकेल ? 'यथा प्रजा तथा शासन' निदान लोकशाही शासनाचा तरी हा नियमच आहे.

म्हणून गेली चाळीस वर्षे ह्या उद्देशाने सर्व शासकीय प्रयत्न होत आहेत. अर्थवादी दृष्टीकोन त्यासाठी शासनाने स्वीकारल्याचे दिसते. जनतेचे भयानक दारिद्रय, अज्ञान व त्यांतून निर्माण होणारा सांस्कृतिक मागासलेपणा घालविण्याचे प्रयत्न सातत्याने, चिकाटीने होत आहेत. सात पंचवार्षिक योजना याच उद्दीष्टाने आखण्यात आल्या व शक्य तितक्या अंमलांतही आणल्या त्याद्वारे, लोकांमधील देवभोळी, अंधश्रद्धाळू, दैववादी मनोवृत्ती नष्ट करणेचे आणि प्रवृत्तीपरता, आत्मविश्वास, आशावाद निर्माण करणेचे प्रयत्न झाले. शेतीसुधारणा, औद्योगीकरण, शिक्षणप्रसार, वहातुकीची व विनिमयाची साधने, ज्ञानप्रसाराची व करमणुकीची साधने यांचा विकास करण्याचे प्रयत्न झाले. सबंध देशभर वैज्ञानिक प्रयोगशाळेचे व अणुशक्ती विकासकेंद्राचे जाळे तयार केले. यामुळे भारताचे रंगरूप पालटून गेले. अन्नधान्याचे बाबतीत सुद्धां पूर्णपणे परावलंबी असलेला भारत आता जवळजवळ स्वावलंबी झाला. अन्य क्षेत्रांतही लक्षणीय प्रगती भारताने केली. अनेक नवी विद्यापीठे, महाविद्यालये, प्रयोगशाळा गावोगांवी स्थापन झाल्या. त्यांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही अनेक पटींनी वाढली. तरीही जनतेमध्ये चिकित्सक दृष्टीकोन विशेष वाढला असल्याचे आढळत नाही. देवळांतून, मशिदीतून, चर्चेसमधून भक्तांच्या रांगा, लांबच लांब लागतच आहेत. देवापुढे बळी जाणाऱ्या कोंबडयाबकऱ्यांची संख्याही वाढतच आहे. ठिकठिकाणी बुआ, बाबा, महाराजांना चांगलीच बरकत आल्याचे दिसून येते. सर्व क्षेत्रात प्रगती होत आहे. तशी या धर्मभोळेपणांतही वाढच होत आहे. स्त्रियांवरील व अस्पृश्यावरील अत्याचारही वाढत आहेत. जातीय दंगलीही वाढत आहेत. धर्माच्या नावाखाली जे स्वत:चे मतलबी राजकारण करतात त्यांचेही प्रस्थ वाढतच आहे. असे कां व्हावे ?

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी आधुनिक शिक्षण भारतांत प्रथम देण्यांत येऊं लागले. ते 'वाघिणीचे दूध' म्हणून गौरविण्यांत येऊ लागले होते. ते पिऊन तयार झालेली पहिलीच पिढी 'धर्मसुधारणेच्या' 'समाजसुधारणे'च्या गर्जना करीतच बाहेर आली. त्यामानाने अलीकडील काळांत शैक्षणिक व इतर प्रगती कितीतरी पटीने अधिक होऊनही, शिक्षण त्यावेळच्या मानाने कितीतरी अधिक सखोल, प्रगत असूनही समाजांत त्याची प्रतिक्रिया अशी निर्जीव कां दिसावी ? समाजऋण, बांधिलकी, वगैरे कल्पना अभावानेच कां दिसाव्या ? चिकित्सक प्रवृत्ती ऐवजी 'महाजने येन गतः स पंथः' ही वृत्ती कां दिसावी ? कर्तृत्व, आत्मविश्वास, बंडखोर प्रवृत्ती तरुणांतही अभावानेच कां असावी ? याची कठोर चिकित्सा होण्याची गरज आहे. प्रगतीची पावले टाकत असताना थोडे सिंहावलोकनही करण्याची गरज असते. या परिस्थितीची तीन प्रमुख कारणे वाटतात.

### कारणमीमांसा

(अ) स्वातंत्र्यपूर्व काळात व नंतरही स्वराज्याचा अर्थ 'आपल्या लोकांचे राज्य' एवढाच जनमानसांत रुढ होता आपल्या म्हणजे 'हिंदी लोकांचे' असा अर्थ कांहींनी घेतला तर कांहींनी 'आपल्या जातीजमातीच्या किंवा धर्माच्या लोकांचे' राज्य असा घेतला. स्वातंत्र्यलढ्याच्या आकर्षणापेक्षा भाषावार राज्यरचनेसाठी झालेल्या लढ्याचे आकर्षण त्यामुळेच लोकांना अधिक वाटले. स्वातंत्र्यानंतर लोकशाही राजकारणाचा एक भाग म्हणून निवडणुकांचे राजकारण सुरु झाले. निवडणुकीतील प्रश्न समजावून सांगून लोकशिक्षण करुन जनतेचा पाठिंबा मिळवण्यापेक्षा 'आपली' माणसे निवडून आणणेसाठी त्यांच्या जातीद्वेषाला व धर्मनिष्ठेला आवाहन करून मते मिळविणे केव्हांही सोपे जाते. सर्वच पक्षांनी या मार्गाचा अवलंब केल्यामुळे जातीद्वेष, गटबाजी, व्यक्तिस्तोम, जाती-कलह यांना ऊत येणे अपरिहार्य झाले. शासकीय व संस्थात्मक कारभाराची पातळीही यामुळे खालावत जाणे अपरिहार्यच आहे.

(ब) मागास वर्गीयांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगती घडवून आणल्याशिवाय व त्यांना इतर जमातीच्या बरोबर आणल्याशिवाय समाजवाद,

लोकशाही किंवा समता नांदणे अशक्य आहे. यासाठी घटना दुरुस्ती करुन त्यांचेसाठी शिक्षणसंस्था व शासकीय नोकऱ्यांमध्ये राखीव जागा व अन्य सवलती देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले. मागासवर्ग आयोगही नेमण्यात आले. पण मागासवर्गीय ठरविणेसाठी 'जात' हा निकष ठरविल्यामुळे जाती संबंधीच्या जाणीवा प्रबळ होऊ लागल्या. जन्मल्यापासून मरेपर्यंत शिक्षणा-साठी, नोकरीसाठी, बढतीसाठी सर्व ठिकाणी व निवडणुकीतही जाती–निकष प्रभावी ठरल्यामुळे जातीप्रथांना पुन्हां उधाण आले. कांही लोकांचे त्यामध्ये हितसंबंध निर्माण झाले. जिद्द, इर्षा, निरोगी स्पर्धा, नष्ट झाली. [१४]

(क) भारतीय आध्यात्मिक संस्कृती श्रेष्ठ असल्याचा अहंकार वरिष्ठ वर्गीयांमध्ये मुळात होताच. त्याला प्रज्वलित करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व-काळापासून सातत्याने व अनेकविध मार्गांनी केले जात आहेत. त्यातून आधुनिक संस्कृतीला व सुधारणांना पाश्चात्य म्हणून हिणवण्याची प्रवृत्ती व त्यासंबंधी तिरस्कार भावना निर्माण झाली आहे. एकतर फार मोठ्या बहुसंख्य जनतेस तिच्या अमानुष दारिद्र्यामुळे, अज्ञानामुळे, मागासलेपणामुळे स्वतःच्या संकुचित जीवनकलहांत कसेतरी टिकून राहण्यापलीकडे गेली हजारो वर्षे कसलेही सांस्कृतिक जीवन राहिलेले नाही. मूठभर वरिष्ठ वर्गीयांमध्ये विश्व-संस्कृती, मानव संस्कृतीची भाषा चालत होती, तोही विचार या कलुषित अहंकारामुळे मागे पडून तथाकथित राष्ट्रीय संस्कृतीचा दर्प निर्माण झाला. खरे तर सर्वच संस्कृती व मानवी मूल्ये विश्वैकच असतात. विशेषतः सध्याच्या तांत्रिक प्रगतीमुळे सारे विश्वच एक खेडे होऊन बसले आहे. असे असूनही राष्ट्रीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा अहंकार वरिष्ठ वर्गीयांकडून सातत्याने जोपा-सला जात आहे. गंमत अशी की हेच लोक तोंडाने मात्र 'सर्वधर्मसमभाव' मंत्र जपत असतात. त्यामुळे आक्रमक जातीयवाद राष्ट्रभक्तीच्या नांवाखाली डोके वर काढीत आहे.

अर्थवादी दृष्टीकोन स्वीकारुन गेल्या चाळीस वर्षात सामान्य जनतेचे दारिद्र्य, अज्ञान व मागासलेपण कमी करण्याचे जे प्रयत्न आपण केले, त्यामुळे मागासलेपणा व धर्मभोळेपणा कमी न होता वाढत आहे, याची जी कारणे

आपण पाहिली त्यात आणखी एक महत्वाच्या कारणाची भर घालावी लागणार आहे. आर्थिक सुखसमृद्धी व शिक्षणप्रसार झाला की अंध धर्मश्रद्धा किंवा धर्मभोळेपणा कमी होईल ही आपली समजूत फलद्रूप न होण्याचे ते महत्वाचे कारण मानावे लागते. कदाचित आपल्या ज्ञानप्रसार माध्यमामध्येही कांही दोष संभवनीय आहेत. विशेषतः शिक्षण किंवा ज्ञान संस्कृतीच्या प्रसाराचे साधन मानण्यांत येते. आपण प्रसारीत असलेल्या शिक्षणांतून व ज्ञानांतून आधुनिक संस्कृतीची स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय ही चिरंतन मूल्ये कां प्रसारित होत नाहीत ? उलट, विषमता, उच्चनीचता, द्वेष, तिरस्कार ही दुष्ट मूल्ये कां फैलाविली जावीत? हे महत्वाचे प्रश्न आहेत. राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, महात्मा फुले, प्राचार्य आगरकर वगैरेनी पुरस्कारलेली नवी संस्कृति प्रसारीत होण्यास सुरवात होत होती, इतक्यांत लाल-बाल-पालांचे व त्यांचे मागोमाग गांधीजींचे राजकारण सुरु झाले. त्यांतून पाश्चात्याच्या राज्या बरोबरच त्यांनी बरोबर आणलेल्या आधुनिक संस्कृतीचाही द्वेष सुरु झाला. समाजसुधारणेचा विचार मागे पडला.[१५] परकीय द्वेषाचे राजकारण प्रभावी झाले. इंग्रजी राज्य परकीय म्हणून त्याचा द्वेष, त्यांनी आणली ती आधुनिक संस्कृतीही, शिक्षणही परकीय म्हणून त्याचाही द्वेष सुरू झाला. 'आमच्या समाजास मुलतः काहीही झालेले नाही. आमची प्रकृती ठणठणीत आहे', अशा भ्रमाचा फुगा जोरजोराने फुगविण्यात आला. आधुनिक सांस्कृतिक मूल्ये आमच्या समाजात प्रभावी न होण्याचे व प्राचीन धार्मिक संस्कृती व परंपरा यांचा प्रभाव टिकून राहाण्याचे व वाढत राहाण्याचे ते महत्वाचे कारण होय.

आपण आतां स्वतंत्र झालो आहोत. तरीही नेत्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे दह्या-दुधाच्या नद्या भरून वाहतांना दिसत नाहीत. सुखसमृद्धीची दिल्ली अद्यापही 'बहुत दूर है'. ४६ टक्के जनता आजही दारिद्र्य रेषेखाली जगत असल्याचें सरकारच सांगत आहे. 'निरक्षर लोकांचा जगांतील मोठा देश' असा आमचा गौरव होत आहे. दारिद्र्याबरोबरच व अज्ञानाबरोबरच बेकारी, अनारोग्य, अंधश्रद्धा यांचाही भस्मासूर भेडसावत आहे. आमची प्रकृती ठणठणीत होती, मूलतः आमच्या प्रकृतीस काहीही झालेले नव्हते, मग

ही भूते कोठून आली ? याचा शोध लावला पाहिजे. या संशोधनालाच प्रबोधनाची चळवळ म्हणतात. या चळवळीमुळेच युरोपांत सर्वांगीण प्रगती घडून आली. आपणही ती चळवळ करणे जरुर आहे, असे पं. नेहरू, डॉ. आंबेडकर, सावरकर, भाई रॉय या सर्वांचे मत आहे. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी तिची सुरवात झालीही होती. पण लाल–बाल–पालांच्या व गांधीजींच्या राजकारणाच्या प्रभावामुळे तिला खीळ बसली. ती चळवळ परत चालू केली पाहिजे. तीच आजही आपली निकडीची गरज आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दुहेरी लढा

१९२४ ते १९२८ या कालखंडांत डॉ. आंबेडकरांची भूमिका अस्पृश्यांच्या राजकारणी नेत्याइतकीच हिंदुसमाजसुधारकांचीही होती.[१६] दलितांची चळवळ सेवाभावाच्या किंवा उद्धाराच्या पातळीवरून त्यांनी मानवी हक्कांच्या पातळीवर नेली. दलित समाजांतील स्वत्व भावना जागृत करून तिला आत्मोन्नतीची प्रेरणा त्यांनी दिली. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, पर्वती सत्याग्रह व काळाराम मंदीर प्रवेशासाठी सत्याग्रह त्यांनी मोठ्या जोमाने व जिद्दीने केले. २५ डिसेंबर १९२७ रोजी ते म्हणाले 'हिंदु समाज स्वतंत्र करावयाचा असेल, तर चातुर्वण्य व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एक वर्णियत्व व समानता या दोन तत्वांवर केली पाहिजे'.[१७]

डॉ. आंबेडकरांची ज्ञानोपासना निर्विवादच आहे. त्यांच्या अनुयायांनीही तशीच करावी, असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी त्यांनी १९४५ साली पीपल्स एज्युकेशन सोसायटी काढली. अनेक शिक्षणसंस्था, विद्यालये, महाविद्यालये गावोगांव काढली. अनेकांना उच्चशिक्षणासाठी परदेशी पाठविले. 'मूकनायक', 'जनता', 'बहिष्कृत भारत' इ. वर्तमानपत्रे काढली. 'अस्पृश्य पूर्वी कोण होते',? भाषिक राज्ये, पाकिस्तान वगैरे अनेक ग्रंथ लिहीले. त्यांचा लढा दुहेरी होता. एक आर्थिक विषमतेशी दुसरा सामाजिक विषमतेशी. त्यांचेवर गौतमबुद्ध, कबीर, महात्मा फुले व कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा प्रभाव फार मोठा होता.

"भारतांतील जाती म्हणजे एकसंघ समाजाचे कृत्रीमपणे लचके तोडून निर्माण केलेले स्थिर व निश्चित घटक होत. त्यांपैकी प्रत्येकांवर जात्यंतर्गत विवाहाच्या रुढीद्वारे परस्परांत मिसळून जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. जात म्हणजे 'स्वयंमर्यादित वर्ग' होय." अशी जातीप्रथेची मीमांसा डॉ. आंबेडकरांनी केलेली होती. हिंदु समाजाची रचना संयुक्त स्वरुपाची असली, तरी तेथे गंभीर स्वरुपाचे सांस्कृतिक ऐक्य आहे, असे त्यांचे मत होते. दोन कारणांनी जातिप्रथा टिकून राहिली असे त्यांचे मत होते. त्यापैकी एक म्हणजे शस्त्रे वापरण्यास परवानगी नव्हती व दुसरे म्हणजे बहुसंख्य समाजाचे गाढ अज्ञान. म्हणून जातीनिर्मूलनासाठी 'ज्ञान प्रसारातून स्वत्वनिर्मिती' हाच एकमेव मार्ग आहे असे ते म्हणत असत. तरीही सामाजिक दर्जासंबंधी कलह चालूच राहील. कारण अस्पृश्य खालचे आहेत. त्यांनी 'पायरी' सोडली, समता मागितली की कलहास सुरवात होते. म्हणून अस्पृश्यता निवारण हा वर्गकलहाचा प्रश्न आहे असे त्यांना वाटत असे.[१८]

हिंदुधर्मासंबंधी ते म्हणतात 'हिंदुधर्मात व्यक्तिला स्थान नाही. त्याची रचना वर्गाच्या कल्पनेवर केलेली आहे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी कसे वागावे, याची शिकवण हिंदुधर्मात नाही. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाशी कसे वागावे, याची बंधने हिंदु धर्मात आहेत.'[१९] समाज हे साधन व व्यक्तिविकास हे त्याचे ध्येय असते. व्यक्तिविकासासाठी त्या समाजात व्यक्तिस्वातंत्र्य, समता व एकमेकाविषयी सहानुभूती यांची गरज असते. असे वातावरण हिंदु समाजात निर्माण करणे हे धर्माचे कार्य होते. पण हिंदुधर्म ते करु शकला नाही.

बौद्धधर्मासंबंधी ते म्हणतात "त्याचा 'प्रधान हेतू' मानवी समता" हा आहे. बुद्धीच्या कसोटीवर घासून प्रत्येक गोष्टीचा निर्णय करावा अशी त्याची शिकवण आहे. म्हणून तो सद्धर्म आहे. त्यांत माणसाने माणसांशी कसे वागावे याची शिकवण आहे. नीतिचे संबंध सांगितले आहेत. शील हे धर्माचे मोठे अंग होय. शिक्षणाबरोबर माणसाचे शील सुधारले पाहिजे.

'जातीनिर्मूलना'वरील आपल्या प्रसिद्ध व्याख्यानांत ते म्हणतात 'राजकीय क्रांत्या नेहमीच सामाजिक आणि धार्मिक क्रांतीनंतर होतात, असा जगाचा इतिहास आहे. मार्टिन ल्युथरने सुरु केलेली धर्मसुधारणेची चळवळ म्हणजे युरोपियन लोकांच्या राजकीय मुक्तीची पूर्व लक्षणेच ठरली. इंग्लंडमध्ये प्युरिटॅरियनीझमने राजकीय स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला प्युरिटॅरियनीझमने अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध जिंकले. अरबांच्या हाती राजकीय सत्ता येण्यापूर्वी हजरत पैगंबराने सुरु केलेल्या धार्मिक क्रांतीच्या मार्गातून त्यांना जावे लागले. चंद्रगुप्ताच्या नेतृत्वाखाली घडलेल्या राजकीय क्रांतीआधी बुद्धाची धार्मिक सामाजिक क्रांती होऊन चुकली होती. महाराष्ट्रांतील संतांनी केलेल्या धार्मिक चळवळी नंतरच शिवाजीची राजकीय क्रांती घडून आली. गुरु नानकाच्या धर्मक्रांतीनंतरच शीखांची राज्यक्रांती यशस्वी झाली. कोणत्याही राष्ट्राच्या राजकीय मुक्तीसाठी प्राथमिक आवश्यकता म्हणून त्यांचे मन व आत्मा मुक्त होणे जरुर असते. हिंदुधर्माचा त्याग व बौद्धधर्मप्रवेश ही अशीच क्रांती आहे.'[२०] म्हणून१ ९५६ साली त्यांनी स्वत: बौद्धधर्माची दीक्षा घेतली व आपल्या लाखो अनुयायांनाही दिली. पण त्यानंतर लगेचच त्यांचे अकाली निधन झालेमुळे त्यांचे संकल्पीत कार्य पूर्ण होऊ शकले नाही. त्यांच्या अनुयायांची व त्यांच्या चाहत्यांची बौद्धिक पातळी आणि ते स्वत: यांच्यामध्ये जमीन व आस्मानाइतके अंतर होते. त्यामुळे त्यांचेकडूनही विशेष प्रगती या दिशेने झाली नाही. सामान्य जनतेचे दृष्टीने विचार केला तर डॉ. आंबेडकरांचे विचार म्हणजे 'उंच खुंटीवर अडकवलेले गाठोडेच' होते. महात्मा जोतीराव फुल्यांच्याप्रमाणेच त्यांना अमाप लोकप्रियता व अनुयायी वर्ग लाभला. फार मोठ्या संख्येने त्यांना अक्षरश: देवच मानले. पण त्यांचे विचार त्यांना पेलण्याजोगी परिस्थिती नव्हती.

**बॅ. वि. दा. सावरकर (१८८३–१९६६)**

आधुनिक भारताच्या उभारणीस सर्वांगीण वैचारिक क्रांतीची आवश्यकता आहे. या डॉ. आंबेडकरांच्या मताशी सहमत असणारे व अशा क्रांतीस दीर्घकालपर्यंत सहकार्य देणाऱ्या, ज्या कांही उच्च ध्येयवादी व्यक्ती झाल्या त्यांच्यामध्ये बॅ. सावरकर हे अग्रगण्य तत्वचिंतक म्हणून गणले पाहिजेत. ते

कृतिशील तत्वचिंतक होते. तसेच प्रतिभावंत कवि, वक्ते व लेखक होते. त्यांची काव्यप्रतिभा क्रांतदर्शी होती. तशीच आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाचे सामर्थ्य आत्मसात करणारी व मानवी जीवनमूल्यांचे भव्य दर्शन घडविणारीही होती. विश्वाकडे व जीवनाकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टीकोन विज्ञाननिष्ठ व बुद्धीवादी होता.

क्रांतीकारकत्व, हिंदुत्वाचा अभिमान, आणि सामाजिक सुधारणांचा आग्रह हे सावरकरांच्या जीवनाचे अविभाज्य पैलू मानले जातात. त्यांच्या सामाजिक सुधारणांचे अधिष्ठान म्हणजे हिंदुराष्ट्राचा अभिमान हे होय. हिंदुसमाजांत शिरलेल्या दुष्ट रुढी घालविण्यासाठी, समाजसुधारणेसाठी आणि हिंदुसमाज संघटित करणेसाठी हिंदुत्वाचा अभिमान जागविणे ही मात्रा गुणकारी ठरेल असा त्यांचा विश्वास होता.[२१]

सावरकरांच्या सर्वच राजकीय विचारांचा व कार्याचा याठिकाणी उहापोह करता येणे आपणांस अशक्य आहे. त्यांच्या क्रांतिकार्याचा विचारही येथे अप्रस्तुत ठरेल. फक्त सामाजिक सुधारणांचा आग्रह व हिंदुत्वाचा अभिमान या त्यांच्या जीवनाच्या दोनच पैलूंचा विचार आपणांस येथे कर्तव्य आहे.

## समाजसुधारणा

मनुस्मृती काय, याज्ञवल्क्य स्मृती काय सर्व ऐतिहासिक चीजा मानल्या पाहिजेत. जन्मसिद्ध विषमता नष्ट करुन गुणसिद्ध विषमता निर्माण केली पाहिजे. हिंदु समाजाला जखडणाऱ्या सप्त बेडया म्हणजे (१) वेदोक्त बंदी, (२) व्यवसाय बंदी, (३) स्पर्शबंदी, (४) सिंधुबंदी, (५), शुद्धीबंदी, (६) रोटीबंदी, (७) बेटीबंदी या होत त्या लवकरांतल्या लवकर तोडल्या पाहिजेत. त्यासाठी बॅ. सावरकर तीन उपाय सुचवितात. (१) कालबाह्य रूढीवर कठोर हल्ले केले पाहिजेत. (२) विवेकनिष्ठा रुजविली पाहिजे. (३) प्रयत्नवादाचा अंगिकार केला पाहिजे. जातीभेदासंबंधी ते म्हणतात. 'जातीभेद हा हिंदुच्या समाजव्यवस्थेमधला सर्वाधिक मोठा शाप आहे. या महाशापामुळे हिंदू समाज जीवनाचा सामर्थ्यशाली प्रवाह वाळवंटांत किंवा डबक्यांत आटून

नष्ट होऊन जाण्याचे भय आहे. आपल्या जातीप्रथेमध्ये आपल्या खाली असलेल्या जातीवर वर्चस्व गाजविण्याची संधी प्रत्येक जातीस मिळत असते. त्यामुळे ही प्रथा थोडयाबहुत प्रमाणांत सर्वांनाच हवीशी वाटते म्हणून ती चिवट बनली आहे. तरीही या जातीप्रथेच्या व तदुत्पन्न विटाळाच्या भ्रांत समजुतीच पुष्कळ अंशी आपल्या अवनतीस कारण झाल्या आहेत हे कोणाही विचारवंत मनुष्यास नाकारता येणार नाही. म्हणून शेंडयाबुडख्या-सहित सर्व जातीचे एकजात उच्चाटन झाले पाहिजे.'[२२] कोणत्याही पंक्तीत बसून खाणे, पिणे करा. वैद्यकीय दृष्टीने हितकर आणि स्वच्छ असलेले कोणतेही अन्न खा. सर्व हिंदूनी पशुपक्ष्यांचे मांस व मासळी खाण्यास सुरवात केली, तर पांच कोटी लोकांचा अन्नप्रश्न सहज सुटेल. माणसाने काय खावे, काय प्यावे, हा धर्माने निर्णय करण्याचा प्रश्न नव्हे. वैद्यकीय ज्ञानाचे मतच ग्राह्य धरावे. जे अन्न आपणांस आवडते, पचते, नि आरोग्यवृद्धीस उपकारक आहे, ते निर्धास्तपणे खावे. अन्न किंवा पोट हे धर्माचे स्थान नसून अंतःकरण किंवा आत्मा यामध्ये धर्माचा खरा निवास असतो.[२३] सावरकर स्वतः निरीश्वरवादी होते.[२४]

#### विज्ञाननिष्ठा व बुद्धीवाद

आमच्या संस्कृतीचे भूषण म्हणून आम्ही जे ब्रीद मिरवतो ते हे की वेदांत जे सांगितले आहे, त्याच्यापुढे दहापांच हजार वर्षात सामाजिक, राजकीय व धार्मिक विधिनिषेधांत आम्ही रतिभरही पुढे सरकलो नाही. आमच्या संस्कृतीचे मुख्य लक्षण एका शब्दांत सांगायचे तर 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' या शब्दांत सांगता येईल. ही प्रवृत्ती आजचीच नाही. श्रुतिस्मृतीपुराणांच्याही आधी पासूनची आहे. आजपर्यंत सारखी चालत आलेली आहे. ती हितकर आहे किंवा नाही, मनुस्मृतीसारख्या आद्य स्मृतीत ती सांगितली आहे की नाही याची चिकित्सा कोणीच केलेली नाहीं. तरीही ती आचरणीय आहे याचे कारण एकच. ते म्हणजे 'एषः धर्मः सनातनः' ती श्रुतिस्मृतीपुराणोक्त आहे एवढेच. याचे उलट आजच्या यूरोपियन संस्कृतीचे मुख्य लक्षण 'अद्ययावत' ते पूजक आजचे. आम्ही कालचे. ते नव्याचे. आम्ही जुन्याचे. अपरिवर्तनीय शब्दनिष्ठ धर्म आणि प्रत्यक्ष-निष्ठ, प्रयोगक्षम नि प्रयोगसिद्ध विज्ञान यांच्या भिन्न प्रवृत्तींची

ती भिन्न नांवे आहेत. जे धर्मग्रंथ अपौरुषेय म्हणून समजले गेले त्यांच्यात सामावलेली संस्कृतीही अपरिवर्तनीय समजली जाते. जे लोक त्या धर्मग्रंथाची सत्ता आपल्यावर चालूं देतात, ते श्रुतिस्मृतिपुराणोक्ताचे बंदे गुलाम होऊन बसतात.

हीच गोष्ट ख्रिश्चन, यहुदी, पारशी, मुसलमानी प्रभृती यच्चयावत अपौरुषेय मानलेल्या धर्मग्रंथांची. जोवर यूरोप बायबलला अपरिवर्तनीय आणि अपौरुषेय धर्मग्रंथ मानीत होता, तोवर युरोपही असाच आणि याच श्रुति-स्मृतिपुराणोक्तांच्या आडांतील बेडूक होऊन पडला होता. जी युरोपची गोष्ट, तीच मुसलमानी जगताची. केमालपाशाचा तुर्कस्तान सोडला तर बाकीचे मुसलमानी जगत हिंदू जगताप्रमाणेच आजही 'बावा वाक्यं प्रमाणम्'चेच बंदे गुलाम झालेले आहेत. ज्या **श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या** बेडीने आमच्या कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत, ती तोडली पाहिजे. हे सर्वस्वी आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. कारण ही बेडी मानसिक आहे. यापुढे कोणतीही गोष्ट चांगली की वाईट हे एकाच कसोटीवर ठरविले पाहिजे. कोणताही ग्रंथ अपरिवर्तनीय किंवा त्रिकालाबाधीत नाही. त्यांतील सारे ज्ञान, आजच्या विज्ञानाच्या कसोटीवर आम्ही लावणार आणि आम्ही अद्ययावत बनणार.'[२५]

**मानवतावाद**

विश्वाच्या शक्ति बहुतांशाने मानवाला प्रतिकूलच आहेत. अशा परिस्थितीत मानवाला कांही करता येण्यासारखे असेल, तर ते एवढेंच की विश्वशक्तीचे नियम, त्याने कसोशीने शिकून घ्यावेत व स्वतःच्या लाभासाठी उपयोजावेत. मानवजातीच्या हितास साधक ते चांगले, व बाधक ते वाईट. नीतिअनीति यांची व्याख्या मनुष्यजातीच्या सर्वसामान्य हिताच्या कसोटीवर ठरविली पाहिजे.[२६]

**हिंदुत्वाचा अभिमान**

डॉ. आंबेडकरांना लिहिलेल्या पत्रांत सावरकर म्हणतात. 'जर अस्पृश्यवर्ग हिंदु समाजाचा अभिन्न भाग व्हावयाचा असेल, तर नुसती अस्पृश्यता जाऊन

चालणार नाही, तर चातुर्वण्य नष्ट व्हायला हवे. ज्या थोडया लोकांना याची आवश्यकता पटली आहे, त्यापैकी आपण एक आहोत, हे सांगायला मला आनंद वाटतो.'[२७]

पण सावरकरांच्या हिंदुत्ववादाचे ज्येष्ठ पुरस्कर्ते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक श्री. मां. स. गोळवलकर गुरुजींना सावरकरांचा हा विचार मान्य दिसत नाही. ते म्हणतात 'चातुर्वण्य म्हणजे सर्वशक्तिमान परमेश्वराचे चतुर्विध स्वरुप. त्याची पूजा सर्वांनी आपापल्या पद्धतीने व शक्तिनुसार करावयाची. ज्ञानदानामुळे जसा ब्राह्मण श्रेष्ठ, त्याचप्रमाणे क्षत्रीय शत्रूंचा नाश करीत असल्यामुळे तितकाच श्रेष्ठ आहे. शेती व व्यापार करुन समाजाचे धारण पोषण करणारा वैश्य आणि आपल्या कलाकौशल्याने समाजाची सेवा करणारा शूद्र याचेही स्थान कोणत्याही प्रकारे कमी महत्वाचे नाही.[२८] श्री. गोळवलकर गुरुजी पुढे म्हणतात 'आपल्या पूर्वजांनी सांगितले की, आपला समाज हाच आपला परमेश्वर' हा हिंदू समाज विराट पुरुष आहे. सर्वशक्तिमान परमेश्वराचेच ते अभिव्यक्त स्वरुप आहे. पुरुषसुक्तामध्ये सर्वशक्तिमान परमेश्वराचे जे वर्णन आहे, त्यांत म्हटले आहे.

'ब्राह्मणोऽस्य मुख मासीत ।
बाहु: राजन्य: कृत: ॥
उरु तदस्य यद् वैश्य: ।
पदभ्यां: शूद्रो अजायत ॥'

याचा अर्थ असा की ब्राह्मण ज्याचे मुख आहेत, क्षत्रिय त्याचे हात वैश्य ज्याच्या मांडया आहेत, व शुद्र ज्याचे पाय आहेत. ज्या समाजांत अशी चतुर्विध व्यवस्था आहे, तो हिंदू समाज आपला ईश्वर आहे.[२९]

इस्लामही त्याच्या समाजाकडे याच दृष्टीकोनाने पहातो. कुराणामध्ये निर्दिष्ट केलेला ईश्वरी हेतु समजून घेण्याचे एकमेव साधन म्हणजे 'उम्मा' (धर्म समाज) होय असेच त्यांचेही मत आहे.[३०] या दृष्टीकोनाचा मतितार्थ असा की व्यक्तिला समाजाचा एक अभिन्न भाग इतकेच स्थान असूं शकते.

स्वतंत्र अस्तित्व नाही. जर व्यक्तिला स्वतंत्र अस्तित्व नसेल, तर तिचे महात्म्य, किंवा स्वातंत्र्य असूच शकत नाही. **नागरिक व्यक्ति नाहीत.** लोक-शाही अशक्यच. दुसरे असे की हिंदू समाजरुपी विराट पुरुषाचे किंवा परमेश्वराचे वर्णन करण्याकरतां जे रुपक वापरले आहे. त्यांत निरनिराळया वर्णाची उत्पत्ती कशी झाली, याची उपपत्ती उच्चनीचभावाची निदर्शक नव्हे काय ? मग वर्णामध्ये उच्चनीच कोणी नाही, सर्व समानच आहेत असे श्री. गोळवलकर गुरुजी कसे म्हणतात ?

**धर्मनिरपेक्ष शासनासबंधी**

सावरकर म्हणतात 'शासनसंस्थेचा व्यवहार चालविणेसाठी धर्माची' आवश्यकता नसते. तसेच 'हिंदू राष्ट्रवाद' आणि 'धर्मनिरपेक्ष शासन' या दोन्ही कल्पना परस्परभिन्न आहेत. त्यांच्यात विरोध येण्याचे कारण नाही.

**हिंदुत्व**

सावरकरांचे मते हिंदुत्व म्हणजे हिंदु धार्मिकत्व नव्हे. आसिंधु–सिंधुपर्यंता भारतामध्ये जो राहतो व जो या भूमिला 'मातृभू पितृभू' पुण्यभू मानतो तो 'हिंदु' अशी त्यांची व्याख्या आहे. लो. टिळकांच्याप्रमाणे 'प्रामाण्यबुद्धिः वेदेषु' अशी धर्मग्रंथ प्रामाण्याची भूमिका त्यांची नाही. हे त्यांचे वैशिष्ट्य होय. त्यांच्या 'धर्मनिरपेक्ष शासनास' असलेल्या अनुकुलतेचे हे लक्षण मानावे लागते. म्हणजेच त्यांचे 'हिंदुत्व' ही प्रादेशिक कल्पना आहे. धार्मिक नाही. असे म्हटले जाते. व्यापक राष्ट्राभिमानाची द्योतक अशी ही व्याख्या, टिळकांच्या व्याख्येहून व्यापक आहे, हे खरे आहे. त्याचबरोबर वैदिक, बौद्ध, जैन, शीख आदि सर्वांना 'हिंदू' शब्दाच्या व्याप्तीत सावरकरांनी सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे, हेही खरे आहे. तथापि थोडे खोलांत गेल्यावर आपल्या लक्षांत येते कीं, पितृभू व मातृभू मानणारे कोण हे जन्मानेच ठरणार आहे, मानण्यावर नाही, हे उघड आहे. पण 'पुण्यभू' शब्दच या व्याख्येत महत्त्वाचा आहे. एखाद्याचा जो कोणता धर्म असेल (जन्मानेच ठरणारा), तो धर्म ज्या भूमीत जन्मला, विकासला, ती त्याची पुण्यभू. पुण्यभूच्या या अर्थाने वैदिक, बौद्ध, जैन, शीख, इत्यादींची पुण्यभू भारतभूमी होते, तर मुसलमान, ख्रिश्चन

यहूदी, पारशी याची पुण्यभू भारतभूमी ठरत नाही. म्हणजेच हीही कसोटी जन्माने ठरणारीच आहे व धार्मिकच आहे. कारण भारताला पुण्यभू मानण्यासाठी मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, यहुदींना धर्मांतर करावे लागणार हे स्पष्ट होते. हिंदू शब्दाची व्याख्या अशी करून हिंदू व अहिंदू अशा दोन वर्गात भारतीय लोकांची सावरकर विभागणी करतात हे उघड आहे. व ही विभागणीही जन्मावर, धर्मावर आधारलेली आहे, हेही उघड आहे. जन्म किंवा धर्मावर माणसाच्या निष्ठा, भावना विचार अवलंबून असतात असे मानणे सावरकरांच्या बुद्धिवादांत कसे बसते ? व्यावहारिक अनुभवाशी तरी ही समजूत जुळणारी आहे काय ? खुद्द सावरकरांनी अशा कितीतरी देशाभिमानी मुसलमानांची, ख्रिश्चनांची उदाहरणे आपल्या वाङमयांत दिलेली नाहीत काय ?

राष्ट्रकल्पना

धर्म, संस्कृती, भाषा, भौगोलिक एकता, परंपरा, समान-शत्रू यांपैकी एक किंवा अनेक घटकांनी कोणत्याही समाजगटांत एकत्वाची जाणीव निर्माण होते आणि अशी एकत्वाची जाणीव असलेला समाजगट म्हणजेच राष्ट्र होय अशी सावरकरांची व्याख्या आहे. राष्ट्रीयत्व म्हणजे एकत्वाची जाणीव. सामाजिक एकत्वाच्या तत्वज्ञानासच राष्ट्रवाद म्हणतात. हिंदुस्तानांतील लोकांचे एकत्व साधणारा विचार म्हणजेच हिंदूत्व होय. कारण (१) हिंदुस्तानांतील लोकांना प्राचीन काळापासून हिंदू म्हणतात व त्याबद्दल त्यांना ममत्व वाटते. (२) ज्याला 'लीग ऑफ नेशन्स' राष्ट्रीय मताधिक्य म्हणतात, त्या लोकांच्या नांवानेच बहुतेक सर्व राष्ट्रे ओळखली जातात. (३) प्राचीन काळापासून हिंदू समाजांत एकत्वाची भावना आहे. (४) या देशांत हिंदूंची बहुसंख्या आहे. (५) जाती, उपजाती, प्रांतिक भाषा, धर्म या सर्वांच्या अभिमानावर मात करुन हिंदुस्तानला एकत्व ठेवण्याचे सामर्थ्य केवळ हिंदुत्वांत आहे म्हणजेच हिंदू राष्ट्रीयत्वांत आहे. हिंदु राष्ट्रीयत्व हे हिंदु धर्मावर आधारीत असावे असे सावरकरांनी कधीही कोठेही म्हटलेले नाही. हिंदू राष्ट्राची कल्पना हिंदुत्वावर आधारलेली आहे. हिंदू धर्मावर नव्हे.

राष्ट्र कल्पनेसंबंधी सावरकर म्हणतात 'राष्ट्रीयत्व' म्हणजे एकत्वाची जाणीव. हिंदु समाजामध्ये अशी एकत्वाची जाणीव आहे काय? पूर्वी कधी काळी होती काय? मग 'हिंदुत्व' हेच राष्ट्रीयत्व कसे? जन्मसिद्ध उच्च-नीचतेवर आधारलेल्या हिंदू समाजांत एकत्व कधी नांदू शकेल काय?

सावरकर पुढे म्हणतात 'हिंदुस्तानातील लोकांना हिंदुत्वाबद्दल ममत्व वाटते. प्राचीन काळापासून हिंदू समाजांत एकत्वाची भावना आहे.' हे तरी ऐतिहासिक सत्य आहे काय? भारताचा सारा इतिहास याच्या विरुद्ध साक्ष देत नाही काय? या प्रश्नाचा विचार त्यांच्या हिंदुत्वविषयक कल्पनेमुळे त्यांना करता आला नसावा.

हिंदुत्व कल्पना हिंदु धर्माधिष्ठीत नसून प्रादेशिक असल्याचे ते एकीकडे सांगतात तर दुसरीकडे या देशात हिंदूंची बहुसंख्या असल्याचे सांगतात. म्हणजे त्यांच्या 'हिंदुत्व' कल्पनेत प्रादेशिक व धार्मिक कल्पनांची सरमिसळ झालेली दिसते.'

धर्म —

ईश्वर, जीव व जगत् यांचे स्वरुप व संबंधाविषयी विचार करणारे शास्त्र म्हणजे धर्म होय. आदिशक्तीचे स्वरुप, जगताचे आदिकारण, आदि-नियम, त्रिकालाबाधित, शाश्वत व सनातन असतात. पण त्याचा आचारधर्म, कर्मकांड किंवा उपासना पद्धती परिवर्तनशील असते. असे सावरकर मानतात. पण धर्माच्या या दोन भागांमध्ये कांही तार्किक सुसंगती, कार्य कारण भाव असतो किंवा नाही? सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या धर्माच्या व्याख्येप्रमाणे 'व्यक्तिच्या श्रद्धा' एवढाच धर्माचा अर्थ नसतो, तर त्या श्रद्धा व त्यानुसार करावी लागणारी कृती मिळून धर्म होत असतो.[३१] म्हणजे धर्माचा सनातन भाग जो श्रद्धा व आचारधर्म किंवा कर्मकांड यांच्यात कार्यकारणभाव असतो हे स्पष्ट होते. म्हणून अस्पृश्यता जातीयता आदि सप्तशृंखला तोडण्यास आणि हिंदुसमाज सुधारण्यास सावरकरांनी सांगितले. हे त्यांचे कार्य लोकोत्तरच आहे. पण ह्या सर्व शृंखला ज्या धर्म-शास्त्रांतून निर्माण झाल्या त्या धर्मशास्त्राबद्दल सावरकर काहीच दोष देत

नाहीत. उलटपक्षी ईश्वर, जीव व जगत यांचे स्वरुप आणि संबंध किंवा आदिशक्तीचे स्वरुप वगैरे धर्माचा जो भाग आहे, तो त्यांनी सनातन मानला आहे त्यांतूनच या सर्व रूढी निर्माण झालेल्या असतील तर फक्त रूढी तोडून कसे भागेल ? 'सनातन धर्म' म्हणून समजल्या गेलेल्या विचारांचीही फेर-तपासणी करणे जरूर नाही काय ? वास्तविक पहातां जीवनाकडे पहाण्याच्या विज्ञानवादी दृष्टीकोनाचा आग्रहपूर्वक पुरस्कार सावरकर करतात. मग वैज्ञानिक प्रगतीमुळे व विश्वविषयक नवीन वैज्ञानिक ज्ञानामुळे 'ईश्वर, जीव व जगत' यासंबंधीच्या पूर्वीच्या ऋषीमुनींनी केलेल्या कल्पनांमध्ये म्हणजेच धर्मविषयक प्राचीन ज्ञानामध्ये आधुनिक विज्ञानाशी सुसंगत फेरबदल आवश्यक ठरत नाहीत काय ? मग धर्माचा एतद्विषयक भाग सनातन कसा मानायचा ? याचा उलगडा सावरकरांनी केलेला नाही. त्यामुळे हिंदुधर्म ही कल्पना आहे व जातीप्रथा ही वस्तुस्थिती आहे याची जाणीव त्यांना होऊ शकली नाही. साहजिकच लहानसहान संकुचित व प्रादेशिक भावनांवर व जातीविषयक भावनांवर हिंदुत्वाची भावना मात करील हा त्यांचा आशावाद भ्रामक ठरला यांत आश्चर्य कसले ? गेली शंभराहून अधिक वर्षे या देशांत राष्ट्रीयत्वाचा व हिंदुत्वाचा विचार मांडला जात आहे. तरीही वरचेवर जातीयवाद वाढतोच आहे. एवढेच नव्हे तर सर्वच संकुचित भावना वाढत आहेत, राष्ट्रीयत्वावर मात करीत आहेत. अशीच सद्यस्थिती नाही काय ? ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, सवर्ण अस्पृश्य कलह, हिंदु-मुस्लीम दंगे, अस्पृश्या-वरील व स्त्रियांवरील अत्याचार, हे सारे काय सांगतात ? दुसरे असे कीं हिंदु-धर्माचे स्वरुपच सामाजिक उच्चनीचतेवर व विषमतेवर इतके आधारलेले आहे की सावरकर ज्यांना हिंदू मानतात, त्या सर्वांचे ऐक्य इतिहासांत कधीही झालेले नाही, सध्यांही होऊ शकत नाही. शिवाय हा अनुभव केवळ हिंदूंचा नसून सर्वच धर्मीयांचा आहे.

### स्त्रीविषयक दृष्टिकोन

'चूल आणि मूल' हेच स्त्रीचे प्रमुख कर्तव्यक्षेत्र आहे. आपल्या बाळाला अंगावर पाजणे हेच स्त्रीचे पृथ्वीतलावरील परमसौख्य आहे. असे सावरकर सांगतात. सावरकरांच्या हिंदुधर्मात जिथे व्यक्तीलाच स्वतंत्र स्थान नाही, तेथे

स्त्रीला नसावे यांत आश्चर्य कांहीच नाही. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिमत्वाच्या विकसनाची संधी, आत्मविश्वास, आत्मविकास, संधीसमानता व यांतून निर्माण होणारे स्वातंत्र्य, लोकशाही या सर्व गोष्टी हिंदुत्ववादी विचारांत अभावानेच चमकतात हे साहजिकच आहे.

धर्म म्हणजे तरी काय? समाजधारणा करतो तो धर्म, अशी धर्माची व्याख्या केली जाते. प्रा. मालवा केळकर म्हणतात 'माणसामाणसांतील नाती व सौहार्द जोपासणे म्हणजे समाजधारणा होय.[३२] माणसामाणसांमधील सौहार्द जोपासणे म्हणजेच त्यांचे जीवनविषयक प्रश्न, चिंता, आकांक्षा, अडचणी सामंजस्याने सुटतील अशी समाजव्यवस्था निर्माण करणे होय.' हे समाजपरिवर्तनाचे कार्य कोणत्या तरी धर्माला आजच्या किंवा यापुढील काळांत शक्य होणार आहे काय? सावरकरांनी या प्रश्नाचा विचार कोठेच केलेला नाही.

अलीकडे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या चिरंतन मानवी मूल्यांच्या पायांवर समाज उभारणी करण्याचे प्रयत्न जगभर चालले आहेत. 'हे विश्वचि माझे घर' अशा विश्वकुटुंबाची कल्पना केल्याशिवाय कोणतेच प्रश्न आजकाल सुटत नाहीत. असा अनुभव प्रत्यही येत आहे. संपूर्ण विश्व हे लहानसे खेडे झाले आहे असा प्रत्यक्ष अनुभव आजच्या तंत्र शास्त्रांनी येत आहे. अशा स्थितीत राष्ट्रीयत्वाच्या पातळीवरला कोणत्याही प्रश्नाचा विचार संकुचित होत नाहीं काय? मानवी एकता, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव व लोकशाही या नवविचारांच्या जगांत जगत्कारण सुसंगत ठरेल, राष्ट्रीयत्व नव्हे. पण राष्ट्रवाद ही तर सावरकरांची मर्यादा आहे.

समाजसुधारक सावरकर हिंदूना कधीच आवडले नाहीत. सनातनी हिंदूनी त्यांचा सदैव निषेधच केला. पण त्यांनी जेव्हा हिंदुसभेचे राजकारण सुरू केले, त्यावेळी सर्व पुराणमतवादी त्यांचे भोवती गोळा झाले. त्यामुळे सावरकर व त्यांचे तथाकथित अनुयायी यांचेमध्ये वैचारिक संदिग्धतेची प्रचंड भिंतच शेवटपर्यंत उभी होती. गांधीजीप्रमाणेच त्यांना असंख्य अनुयायी लाभले. तरीही वैचारिक एकाकीपण त्यांना पत्करावा लागला.

**भाई मानवेंद्रनाथ रॉय ( १८८७–१९५४ )**

भारतांत राजकीय क्रांती होण्यापूर्वी वैचारिक क्रांती होण्याची गरज आहे. या डॉ. आंबेडकर, बॅ. सावरकर यांच्या मताशी भाई रॉय पूर्णतः सहमत होते. यूरोपमध्ये बाराव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत प्रबोधनाची चळवळ झाली, तशी भारतांत व्हावी असे भाई रॉय यांना वाटत होते. यूरोपमधील प्रबोधनाच्या चळवळीचे मूलतत्त्व म्हणजे इतिहासाकडे पहाण्याचा चिकित्सक दृष्टीकोन हे होय. आधुनिक यूरोपच्या शिल्पकारांनी जुन्या कल्पना, समाजसंबंध, सांस्कृतिक मूल्ये व ध्येये यांची कठोर चिकित्सा आरंभली. मानवाच्या विकासासाठी त्यांचा कितपत उपयोग होण्यासारखा आहे, या दृष्टीने छाननी केली. या कसोटीला जे उतरणार नाही, त्याचा निष्ठूरपणे त्याग केला. म्हणून त्यांची एवढी प्रगती होऊ शकली. भारतीयांनाही हेच करावे लागणार आहे, तरच आपण यूरोपच्या बरोबरीने प्रगती करू शकू.[३३] म्हणून भारताच्या प्रबोधन चळवळीस चालना देण्याच्या उद्देशाने 'भारतीय प्रबोधन संस्था' त्यांनी स्थापन केली. तिचेमार्फत प्राचीन भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ठ्यांचे संशोधन करण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. 'जडवाद' 'रानटीयुगापासून संस्कृतीकडे', 'मनुष्य आणि निसर्ग', 'विज्ञान आणि अंधश्रद्धा', 'विसाव्या शतकांतील पाखंडे', 'भारताचा संदेश' आदि ग्रंथ लिहून भाई रॉय यांनी या कार्याला प्रारंभ केला. १९३७ पासून 'इंडिपेन्डंट इंडिया' साप्ताहिक सुरू केले. तेच आता 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट' या नावाने मासिक रुपात बॅ. तारकुंडे चालवीत आहेत. राजकारणासहित सर्व विषयांचा शास्त्रशुद्ध विचार करण्याचे स्वतंत्र व्यासपीठ यामुळे निर्माण झाले. भारतीय इतिहास संशोधनपूर्वक व पूर्वग्रहापासून अलिप्त भावनांनी लिहिला जावा यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी मार्गदर्शक सूत्र म्हणजे विचारांचा इतिहास इतर शास्त्रांच्या इतिहासाला समांतर असतो आणि असा विचारांचा इतिहास धर्माच्या व तत्त्वज्ञानाच्या इतिहासातून शोधता येतो, असा सिद्धांत त्यांनी 'बुद्धी, प्रेरणा आणि क्रांती' या द्विखंडात्मक ग्रंथामध्ये मांडला. प्राचीन इतिहासामध्ये तत्कालीन वैभवाचा, परंपरांचा, थोर पुरुषांच्या पराक्रमांचा, स्थळांच्या वर्णनांचा काही भाग

असतो. त्याचप्रमाणे स्थळकाळांच्या मर्यादा ओलांडून जाणारी चिरंतन मानवी मूल्येंही त्यांतच असतात. त्यांचे संशोधन करण्याचे कार्य प्रबोधनाच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. प्राचीन ग्रीक संस्कृतीची सांस्कृतिक मूल्ये, तत्त्वज्ञानात्मक विचार रोमन साम्राज्याने व धर्मपीठानें खोल गाडून टाकली होती. अरब संशोधकांनी त्यांचे संशोधन केले. त्यावरच आजच्या यूरोपियन संस्कृतीची दैदीप्यमान इमारत उभी राहिली आहे. भारतीय संस्कृतीचे असेच संशोधन आपणांस करावयाचे आहे. असे भाई रॉय यांना वाटत असे.

आधुनिक काळांत मार्क्सवादाचे बरेच आकर्षण युवकवर्गात निर्माण झालेले आहे. पण मार्क्सवाद हेही प्रबोधनाच्या चळवळीचेच अपत्य आहे, असे सांगून त्याचे अधिक संशोधन व्हावे म्हणून 'मार्क्सवादी मार्ग' या नावाचे त्रैमासिक भाई रॉय यांनी सुरू केले. त्याचे रुपांतर पुढे 'मानवतावादी मार्ग' यामध्ये झाले.

रॉय यांचे मते 'सत्यसंशोधन' आणि 'स्वातंत्र्याची आकांक्षा' या मानवाच्या उपजत प्रेरणा आहेत. समाजांतील अनेक व्यक्ती जेव्हा स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रभावित होतात तेव्हांच 'स्वतंत्र माणसांचा समाज' निर्माण होऊ शकतो. तसेच अशा स्वातंत्र्याच्या भावनेने प्रभावित झालेली माणसे असल्याशिवाय राजकीय, आर्थिक व सामाजिक संस्था आपले स्वातंत्र्य वृद्धिगत करण्याचे कार्य यशस्वीरित्या करू शकत नाहीत. असे रॉय यांचे मत होते. म्हणून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या मानवी मूल्यांचा प्रचार त्यांनी सतत केला.

मनुष्य प्राणी स्वभावतःच विचारशील असल्यामुळे नीतिप्रवणही आहे असा विचार रॉय यांच्या सर्व विचारांचा आधार आहे. म्हणून धर्मनिरपेक्ष नीति शक्य आहे असे त्यांचे मत आहे. समाजसुधारणा करणेसाठी ही मानवी मूल्ये– स्वातंत्र्य, समता, बंधुत्व न्याय व इहवादी नीति– समर्थ आहेत. त्यासाठी आता धर्माची आवश्यकता नाही, असे मत त्यांनी सतत मांडले आहे.

मानवाच्या विकासाच्या मार्गातील सर्व अडथळे दूर होणे म्हणजे स्वातंत्र्य असा व्यापक अर्थ रॉय यांनी सांगितला. अशा स्वातंत्र्यासाठी विश्वव्यापी

पातळीवरच आधुनिक काळांत झगडणे शक्य व इष्ट आहे असा गेल्या शतकांतील इतिहासाचा निष्कर्ष त्यांनी मांडला आहे. राष्ट्रीय पातळीवरील तथाकथित स्वातंत्र्यलढा आधुनिक काळांत फक्त मूठभर व्यक्तींच्या हाती सत्ता वळकावण्यासाठी होऊं शकतो. तो यशस्वी झाला, तरी त्यामुळे सामान्य माणसांचे स्वातंत्र्य, वृद्धिगत होत नाही उलट आहे तेवढेही स्वातंत्र्य संकुचित होण्याचा म्हणजेच हुकूमशाहीचा धोका निर्माण होतो असा त्यांनी सतत इशारा दिला. त्यांनी आपल्या राजकीय धोरणाचे ते मूळसूत्रच बनविले होते. त्याचप्रमाणे सर्व सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये, अर्थपद्धती, राजकीय संस्था, सर्व जगांतील मानवी समाजाची संपत्ती आहे असा विचार त्यांनी स्पष्टपणे मांडला होता. म्हणजेच ते खरेखुरे विश्वकुटुंबवादी होते. रॉय यांचे मताप्रमाणे मानवाच्या प्रगतीला तीन सांस्कृतिक मूल्यांची गरज आहे, ती म्हणजे स्वातंत्र्य, बुद्धीप्रामाण्य व इहवादी नीति. आधुनिक लोकशाहीचे तेच अधिष्ठान आहे. सर्व विज्ञान यावरच उभे आहे. आधुनिक काळांतील वैज्ञानिक प्रगतीमुळे या मूल्यांना सामर्थ्य मिळाले आहे. म्हणून रॉय यांनी त्यांच्या विचारांना वैज्ञानिक मानवतावाद असे नांव दिले आहे.

भारतीय इहवादासंबंधी रॉय म्हणतात 'भारतांत इहवादाला सर्वमान्य असा कोणताच अर्थ प्राप्त झाला नाही. तो पाश्चात्त्य संकल्पनेशी मिळता जुळता नाही. तसेच पौर्वात्यही नाही. पाश्चात्य राष्ट्रांतील इहवाद धर्म-सुधारणेच्या व प्रबोधनाच्या चळवळीचे अपत्य म्हणून जन्माला आला. शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारामुळे व उदारमतवादी लोकशाहीच्या तत्त्वज्ञानामुळे त्याला वळकटी आली. म्हणजेच मानवाला बुद्धीसामर्थ्यामुळे समाजकारणांत व राजकारणांत निर्णायक स्थान प्राप्त झाले. शासनाचा पाया धर्म नव्हे हे शाबीत झाले. भारतांत असे कांहीच घडले नाही, त्यामुळे येथे इहवाद म्हणजे कांही भारतीय परंपरा व पाश्चात्य संकल्पना यांचे मिश्रण झाले आहे.' स्वातंत्र्य-प्राप्तीच्या काळांतील जातीय दंगलीच्या पार्श्वभूमीवर 'एक राजकीय सोय' म्हणून येथे 'धर्मनिरपेक्ष शासनाची संकल्पना' निर्माण झाली. याला इहवाद म्हणता येणार नाही. कारण इहवाद ही प्रामुख्याने सांस्कृतिक संकल्पना आहे. राजकीय नव्हे. पण भारतांत ती राजकीय संकल्पना – तीही

सोय म्हणून आली आहे व तिलाही आता जातीयवादामुळे धोका निर्माण होऊं पहात आहे.

---

संदर्भ : १. जवाहरलाल नेहरु – आत्मचरित्र – ७८
२. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण २ रे
३. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ५ वे – पान नं. १११
४. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ५ वे – पान नं. १११
५. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ३ रे
६. जवाहरलाल नेहरु – लेखन भाषणे – ४९–५३ – पा. नं. १०२
७. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ४ थे
८. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ४ थे
९. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ४ थे
१०. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ५ वे
११. कुरुंदकर, डॉ. राजूरकर – पं. नेहरु एक मागोवा – प्रकरण ५ वे
१२. जवाहरलाल नेहरु – भारताचा शोध – ४८०
१३. जवाहरलाल नेहरु – भारताचा शोध – ४८०
१४. म. द्यां. ढोले – मंडल अहवालाची चिकित्सा – प्रकरण ३ रे
१५. बी. आर. आंबेडकर – लेख, भाषणे – पा. नं. ३८
१६. वसंत पळशीकर – नवभारत मासिक – डिसेंबर ८५ कॉंग्रेस खास अंक
१७. वसंत पळशीकर – नवभारत मासिक – डिसेंबर ८५ कॉंग्रेस खास अंक
१८. बी. आर. आंबेडकर – निवडक भाषणे – संपा. बी. जी. जावळे
१९. बी. आर. आंबेडकर – निवडक भाषणे – संपा. बी. जी. जावळे
२०. बी. आर. आंबेडकर – लेख व भाषणे – पा. नं. ४४
२१. डॉ. अशोक मोडक – समाजसुधारक सावरकर – लेख
२२. ज. द. जोगळेकर – सावरकरांचा राष्ट्रवाद – लेख
२३. वि. दा. सावरकर – जात्युच्छेदक निबंध – पा. नं. ८
२४. धनंजय कीर – सावरकर चरित्र – पा. नं. १९८
२५. वि. दा. सावरकर – दोन शब्दांत दोन संस्कृती (सावरकर खास अंक) – पा. नं. १२१
२६. वि. दा. सावरकर – समग्र सावरकर वाङ्मय खंड ३ रा – २९०-२९७
२७. धनंजय कीर – सावरकर चरित्र – पा. नं. १९८
२८. मा. स. गोळवलकर – विचारधन – पा. नं. ९६
२९. मा. स. गोळवलकर – विचारधन – पा. नं. २५
३०. प्रा. अ. भि. शहा – Challenges to secularism – ३३
३१. प्रा. अ. भि. शहा – Challenges to secularism – ३३
३२. प्रा. भालबा केळकर – विज्ञाननिष्ठ सावरकर – लेख
३३. मानवेंद्रनाथ भाई रॉय – Renaissance movement – ३१

# ११

# सर्वधर्मसमभाव आणि इहवाद

जनता पक्षीय केंद्र–सरकारने आणलेल्या पंचेचाळीसाव्या घटना दुरुस्ती विधेयकांत इहवादाचा (Secularism) अर्थ 'सर्व धर्मांचा सारखाच आदर करणे' असा दिला होता. पण त्या विधेयकांत दिलेली व्याख्या वगळून विधेयक मान्य झाले. त्यानंतरच्या काळांत मात्र इहवादाचा अर्थ 'सर्वधर्म समभाव' असावा असेच शासकीय व अन्य क्षेत्रांत रूढ झालेले दिसते. ही सर्वच कृती गूढ वाटावी अशीच आहे. काही विचारवंत मात्र (कै. गं. बा. सरदार, कै. नरहर कुरुंदकर) असा अर्थ करणे बरोबर नाही असे सांगतात.[१]

### १. गांधीजींचे विचार

गांधीजींनी इहवादाचा अर्थ 'सर्वधर्म समभाव' असे कधीही सांगितले नाही, तरी त्यांची स्वतःची भूमिका मात्र 'सर्वधर्मीसमानत्व' अशीच होती. त्यांचे पट्टशिष्य कै. विनोबा भावे यांनी ही भूमिका ओवीबद्ध केली आहे.

अहिंसा सत्य अस्तेय, ब्रम्हचर्य असंग्रह ।
शरीर श्रम आस्वाद, सर्वत्र भयवर्जन ॥

सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी स्पर्शभावना ।
ही एकादश सेवावी, नम्रत्वे व्रतनिश्चये ॥

गांधीजी म्हणतात,

'ख्रिस्ती लोकांचा गॉड', 'हिंदु लोकांचा ईश्वर', हाच मुसलमानांचा अल्ला आहे. त्याचीच आपण सर्वजण लेकरे आहोत. म्हणजेच आपण सर्वजण बंधू बंधू अगर बंधुभगिनी झालो'.

'सर्व माणसे समान आहेत'.

'ईश्वरावर जिवंत श्रद्धा असणे म्हणजे मानव–जातीसंबंधी बंधुभाव बाळगणे होय'.

'सर्वधर्म ईश्वरप्रणीत आहेत. अंशतः सत्य आहेत. समान आहेत'.

'महंमद, येशू ख्रिस्त, यांना मी ईश्वराचे प्रेषितच मानतो. एकमेव किंवा शेवटचा प्रेषित मात्र कोणालाच मानीत नाही. ईश्वराच्या पैगंबरांची मालिका अखंड चालत राहणार आहे'.

'आदर आणि सहिष्णुता अंगी बाणवली, तर आपण सर्वांकडून कांही शिकू शकू'.

'ख्रिश्चन धर्माची विशेष देणगी–प्रेम, हिंदु धर्माची मोठी देणगी जीवमात्राचे ऐक्य, इस्लामची देणगी–बंधुत्व, हे सर्व एकत्र यायला हवे'.

'मी वेदान्त दर्शनाचा अनुयायी आहे. जैन दर्शनांतील अनेकांतवाद यांत समाविष्ट आहे, असे मी मानतो'.

'जैन व बौद्ध धर्म म्हणजे हिंदु धर्मात सुधारणा घडवून आणणेसाठी केलेल्या जबरदस्त चळवळी होत'.

'शीखधर्म व हिंदुधर्म यांत कांहीच फरक मला दिसत नाही. शीख गुरुंची भजने, हिंदुपुराणांतून व धर्मग्रंथातून घेतलेली आहेत'.

'येशू ख्रिस्ताचे गिरीप्रवचन व भगवद्गीता यांत कांहीच फरक नाही'.[२]

गांधीजींचे वरील विचार म्हणजे 'सर्वधर्मसमभाव' असे मानण्यास हरकत नाही. सर्व धर्मांची मूलतत्त्वे एकच असून ती वर सांगितलेप्रमाणे, 'शुद्ध नीतितत्त्वे'च होत, अशी त्यांची धारणा होती. यांत कोणत्याही धर्माबद्दल (स्वतःच्याही) फाजील धर्माभिमान अगर एखाद्या धर्माबद्दल द्वेषभावना दिसून येत नाही, ही स्वागतार्ह बाब आहे, यांत शंका नाही. पंडित नेहरुंनी याच मताला पुष्टी दिली आहे. ते म्हणतात 'गांधीजी सर्वार्थाने धार्मिक गृहस्थ होते. अंतःकरणपूर्वक हिंदू होते. पण त्यांचा हिंदुधर्म कोणतेही कर्मकांड, पंथ किंवा रुढी, पूजाविधी न मानणारा होता' जे पूर्वजांचे आचार, व्यवहार मला कळत नाहीत, त्यांचा गुलाम होऊन मी राहणार नाही. 'नैतिकतेच्या आधारावर त्यांचे समर्थन मला करता येणार नाही' असे ते म्हणत. 'सत्य किंवा प्रेम या नैतिक कायद्यावर त्यांची श्रद्धा होती. त्याच्याशी विसंगत अशी धर्मग्रंथातील वचने अगर थोर पुरुषांची वचनेही त्यांना मान्य नव्हती.'[३]

पण याठिकाणी 'सत्य' व 'प्रेम' यांचा कोणता अर्थ गांधीजींना अभिप्रेत होता, हे गूढच आहे. महाभारतांमध्ये (शांति अ १६२) अंतिम जीवन-मूल्यांचा 'सत्य' या एका संकल्पनेत अंतर्भाव केला आहे. **धर्म, तप, योग, यज्ञ आणि सनातन ब्रह्म म्हणजे सत्य होय.** असे तेथे म्हटलेले आहे.[४अ] गांधीजी प्रारंभीच्या काळांत 'परमेश्वर म्हणजे सत्य' असे म्हणत असत. नंतरच्या काळांत 'सत्य हाच परमेश्वर' म्हणत असत. यांतून अनेक विद्वान वेगवेगळे अर्थ घेत राहिले. हे सर्वश्रुतच आहे.

प्रा. गोवर्धनदास पारीख गांधीजींसंबंधी म्हणतात 'एकंदर मानवजाती-बद्दल प्रेम आणि सारी माणसे समान मानणे हा त्यांच्या धार्मिकतेचाच भाग, होता. मानवाच्या विकासाला धर्माने दिलेली ही देणगीच होय. वंश, वर्ण, जात, धर्म, लिंग आदि कारणांवरून माणसामाणसांत भेदभाव करणे ही एक हिंसाच होय, असे त्यांना वाटत होते. या भेदाविरुद्ध त्यांनी दक्षिण आफ्रिके-तही लढा दिला. भारतांतला जातिभेद, अस्पृश्यता व स्त्रियांना दुय्यम लेखण्याची प्रवृत्ती यांवर त्यांनी हल्ला चढविला. सामाजिक उतरंडीत जो

सर्वांत तळचा ठरविला होता, त्याला समानतेचे व प्रतिष्ठेचे जीवन जगता आले पाहिजे हीच त्यांची अंत्योदयाची कल्पना होती'.[४ब]

श्री. पन्नालाल सुराणा म्हणतात 'धारणात् धर्मः ही धर्माची कल्पना खूप उदात्त करून मांडण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. पण ईश्वर व धर्म या कल्पना मुळांतच श्रद्धेवर आधारलेल्या आहेत'. गांधीजी स्वतःला 'सनातनी हिंदु' म्हणवून घेत. प्रार्थना, उपवास, मौन या धार्मिक आचारांचा ते सतत अवलंब करीत. मोक्ष ही हिंदु विचारांतील मध्यवर्ती कल्पना त्यांना मान्यच होती. ईश्वरनिष्ठ धार्मिक बैठक ही त्यांची सर्वांत मोठी मर्यादा होती.[५]

म. गांधीचे संपूर्ण जीवन श्रद्धामय होते असा वरील सर्व अवतरणांचा अर्थ आहे. ईश्वराचे एकत्व व पितृत्व आणि मानवांचे भ्रातृत्व, म्हणून मानवी समता या त्यांच्या श्रद्धा होत्या. त्याचप्रमाणे सर्व धर्म ईश्वरप्रणीत आहेत. म्हणून सत्य व समान आहेत. हीही त्यांची श्रद्धाच होती. साहजिकच निरनिराळे धर्मसंस्थापक – महंमद, येशूख्रिस्त त्यांना ईश्वरी प्रेषितच वाटत. म्हणून सर्वांविषयी आदर आणि सहिष्णुता बाळगली तर आपण सर्वांकडून कांही शिकू शकू. हिंदुंच्याकडून जीवमात्राचे ऐक्य, मुस्लीमांकडून बंधुत्व, ख्रिश्चनाकडून प्रेम—हे सर्व एकत्र आल्यास सर्व धर्मांचे ऐक्य साधता येईल, अशी त्यांची श्रद्धा होती.

श्रद्धेमध्ये एक मूलभूत दोष असा असतो की त्यांतील विविध प्रकारच्या विसंगति ती पाहू शकत नाही. गांधीजींचे तसेच झाले असावे असे वाटते. त्यांच्या जीवनांत व अनुभवांत अनेक विसंगती आहेत. पण त्यांना त्या कधी जाणवल्या नसाव्यात. कारण ईश्वरी शक्ती सर्व काही घडवते, मनुष्य प्राणी निमित्त मात्र आहे, अशी स्वतःच्या जीवनाबद्दल त्यांची श्रद्धा होती. तेव्हा त्या विसंगतीची समीक्षा करण्याची गरज त्यांना वाटलीच नसावी. तथापि इतिहासाचे विद्यार्थी या नात्याने आपणांस मात्र अशी समीक्षा केली पाहिजे.

## २. गांधी विचारांची समीक्षा

### (अ) सर्वधर्मसमभाव

त्यांचा सर्वात मोठा विचार म्हणजे '**सर्वधर्मसमभाव**' हा होय. सर्व धर्म ईश्वरप्रणीत आहेत. महंमद, येशुख्रिस्त आदि धर्मोपदेशक ईश्वरी प्रेषित

आहेत असे गांधीजी मानीत. मग त्यांनी प्रतिपादन केलेले धर्म संपूर्ण सत्य मानले पाहिजेत. धर्मोपदेशकांना ईश्वरी प्रेषित मानल्यावर त्यांच्या उपदेशाचा संपूर्ण स्वीकार करणे ईश्वरभक्त या नात्याने त्यांचे कर्तव्यच आहे. असा स्वीकार केल्यास ते कोणत्याही एकाच धर्माचे अनुयायी होऊ शकत नाहीत पण ते स्वतःला 'सनातनी हिंदु' म्हणवून घेत होते. मग ईश्वराच्या एकत्वाला, त्याच्या पितृत्वाला व धर्माच्या ईश्वरप्रणितत्वाला काय अर्थ राहिला ? पण या तार्किक युक्तिवादाचा गांधीजींना काहीं उपयोग नव्हता. कारण एकतर ते शेवटचा प्रेषित कोणालाच मानीत नव्हते आणि दुसरे म्हणजे विवाद्य प्रश्न उत्पन्न झाला की त्यांचा 'आंतला आवाज' निर्णायक असे. त्यांचेपुढे कोणताही धर्मोपदेश, धर्मवचन किंवा युक्तिवाद कांही उपयोगाचे नाही. पण हे त्यांच्या स्वतःपुरते ठीक असले तरी इस्लामच्या किंवा कोणत्याही इतर धर्मपंडितांना ते कसे मान्य होणार ?

प्रा. अ. भि. शहा यांनी कांही इस्लामी धर्मपंडितांची मते यासंबंधी मागितली व ती त्यांच्या 'Challenges to Secularism' या ग्रंथात मांडली आहेत.[६] त्यापैकी श्री. हबीबूर रहमान (हैदराबाद) म्हणतात, 'ईश्वराच्या एकत्वावर निस्सीम श्रद्धा, महंमद पैगंबर हा त्यांचा शेवटचा एकमेव प्रेषित आणि पापपुण्याच्या गणतीचा दिवस या इस्लामच्या पायाभूत कल्पना आहेत. त्यांत किंचितही बदल करणे कोणाही मुसलमानास मान्य होऊ शकत नाही.'

दुसरे एक पंडित श्री. ए. करीम शेख (मुंबई) म्हणतात 'हिंदु किंवा ख्रिश्चन धर्मापेक्षा इस्लाम मूलतः वेगळा आहे. ईश्वराने आपल्या शेवटच्या प्रेषितामार्फत दिलेली जीवनपद्धती म्हणजेच 'इस्लाम धर्म' आहे. त्यामुळे त्यांत काहीही बदल करणेचा कोणालाही अधिकार नाही.'

प्रा. ए. ए. ए. फैजी (मुंबई) म्हणतात, 'सर्वोच्च न्यायालयाने धर्माची व्याख्या केली आहे. त्याप्रमाणे 'माणसाच्या व्यक्तिगत श्रद्धा एवढाच धर्माचा अर्थ नाही. त्या श्रद्धा व त्याला अनुसरून करावी लागणारी कृती मिळून धर्म होतो. जेव्हा एखाद्या धर्माची टीका केली जाते, त्यावेळी त्याचा पायाभूत

सिद्धांत व त्यानुसारची कृती त्यांना आव्हान दिले जाते. म्हणून मुसलमानानेच फक्त इस्लामची चर्चा करावी. अधिक चांगले मुसलमान कसे व्हावे, हे तोच जाणू शकेल व सांगू शकेल. सर्वच धर्मीयांना हा नियम लागू आहे.'

श्री. निजामुद्दिन कुरेशी (अहमदाबाद) म्हणतात, 'या जगाची, मानवी समाजाची त्यांतील सर्व वस्तूंची निर्मिती आल्लाने केली आहे, अशी सर्व मुस्लीमांची श्रद्धा आहे. त्यापैकी कशांतही बदल करणे म्हणजे आल्लाशी द्रोह करणे होय. म्हणून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक किंवा कसलाही प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.'

या तीनचार इस्लामी पंडितांची मते विचारांत घेतली तर त्यांचा दृष्टिकोन गांधीजींच्या धर्मविषयक दृष्टिकोनाशी विसंगतच असल्याचे दिसून येते. 'सर्व धर्मांची मूलतत्वे म्हणजे नीतितत्वेच होत' असे गांधीजी मानतात तर 'इस्लाम त्याहून मूलतः वेगळा असल्याचे या इस्लामी पंडितांचे म्हणणे आहे. ईश्वराच्या पैगंबरांची मालीका अखंड चालणार आहे म्हणून शेवटचा एकमेव प्रेषित मी कोणाला मानीत नाही असे गांधीजी म्हणतात, तर इस्लामी पंडित महंमद हे शेवटचा एकमेव प्रेषित मानतात. गांधीजी सर्व मानवांचे बंधुत्व मानतात. तर बंधुत्वाचे नाते फक्त इस्लाम धर्मियापुरतेच मर्यादित आहे असे इस्लामी पंडित म्हणतात.

हिंदुमुस्लीम ऐक्य हे गांधीजींचे आवडते ध्येय होते. त्यासाठी अनेक वेळा त्यांनी स्वतःचा स्वाभिमानही गुंडाळून ठेवला होता. देशाच्या फाळणीनंतरच्या काळांत स्वतःचा जीवही धोक्यात घालून त्यांनी हिंदुमुस्लीम ऐक्यासाठी प्रयत्न केले होते. मुसलमानांनी राष्ट्रीय चळवळीत सहभागी व्हावे, इंग्रजांविरुद्ध एकसंघ फळी भारतीय जनतेची उभी करावी यासाठी मुसलमानांना ते मागतील तेवढ्या सवलती देण्यास ते तयार होते. या त्यांच्या औदार्यपूर्ण भूमिकेमुळे त्यांना हिंदूंची अप्रीति व रोष पत्करावा लागला व मुसलमानांचेही समाधान होऊ शकले नाही. या दारुण अपयशाचे कारण या वैचारिक विसंवादामध्ये आहे असे गांधीजींना कधीच वाटले नाही. कारण 'ईश्वरी इच्छेच्या श्रद्धेमुळे' त्यांना आत्मसमीक्षा करावयाची गरज वाटली नाही.

## (ब) हिंदुमुस्लीम ऐक्य

गांधीजींच्या जीवनांतील दुसरा विचार हिंदुमुस्लीम ऐक्याबाबत आहे. वर उल्लेखलेल्या वैचारिक क्षेत्रातील विसंगतीचाच हा परिणाम आहे. सर सय्यद अहंमदखान यांच्या शिकवणुकीचा तर्कशुद्ध परिणाम मुस्लीम फुटिरतावादांत होणे अपरिहार्य होते. वहाबी चळवळीच्या काळापासून भारतीय मुसलमान स्वतंत्र मुस्लीम जगताची स्वप्ने पहात होते. विसाव्या शतकांत महंमद इकबालच्या साहित्यात त्याचा प्रभाव जाणवतो. सर सय्यद अहंमदखान व नंतर महमद इकबाल दोघांच्याही मते इस्लामला कोणतेच राष्ट्र नसते. इस्लाम धर्म उम्मत (धर्मसमाज) एक मानतो. कुराणांतील वचनाप्रमाणे ईश्वरी इच्छा जाणून घेण्याचे व त्याची कृपा साध्य करून घेण्याचे एकमेव साधन उम्मत हेच आहे. त्यांत राष्ट्रनिष्ठेच्या नावाखाली भेद निर्माण करणे इस्लामद्रोही आहे. म्हणून १८६७ मध्येच सर सय्यद यांनी सांगितले होते की हिंदु व मुसलमान यांचे एक राष्ट्र कधीही नव्हते व कधी होणार नाही.

गांधीजींचे गुरु कै. गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९०८ मध्येच 'मुस्लीम समाज एकराष्ट्रीयत्वाच्या मार्गातील फार मोठा अडथळा असल्याचे मत व्यक्त केले होते. विश्वमुस्लीमवाद, ब्रिटीशांशी एकनिष्ठा, धर्माची अपरिवर्तनीयता, शरीयत कायद्यावरील अंधनिष्ठा याबाबत मुसलमानामध्ये कितीही मतभेद असले तरी भारताशी एकात्म व्हावयाचे नाही, शत्रूभावच ठेवायचा, याबाबत सर्वांचे एकमतच होते. एच्. डी. हॉडसन यांच्या The Great Devide या ग्रंथांत म्हटले आहे. '१९४७ साली भारताची फाळणी झाली, त्याची सुरवात महंमद गझनीने १०१८ मध्ये पंजाब जिंकला, त्याचवेळी झाली होती. जमातीचे शत्रूत्व तेव्हापासून अटळ झालेले होते.[७]

असे असूनही १९१६ मध्ये लो. टिळक व पंडित मोतिलाल नेहरू यांनी बॅ. जीनाशी लखनौ करार केला. लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा विधिमंडळांत व सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना जादा जागा देण्याचे तत्व त्यानुसार मान्य

केले. राखीव मतदार संघही मान्य केले, याचे आश्चर्य वाटते. शेवटी शेवटी तर संपूर्ण देशाची सत्ता जीना आंबेडकरांच्या हाती देण्यास हरकत नाही, अशी भूमिका गांधीजींनी घेतली, हेही आश्चर्य नव्हे काय ?

टिळक, गोखले, मोतिलाल नेहरु, गांधी या सर्व हिंदु पुढाऱ्यांच्या भूमिकेचा अर्थ कसा लावायचा ? मुस्लीम पुढाऱ्यांची मनोभूमिका व इतिहास लक्षांत घेऊनही त्यांना चुचकारण्याचे प्रयत्न चालू होते असे समजायचे की त्यांनी मुस्लीम जातीयवादाच्या आक्रमक व फुटीर स्वरुपाचा अभ्यासच केलेला नव्हता म्हणावयाचे ? की मुसलमानांच्या मनांत इतिहास काळात निर्माण झालेला अविश्वास किंवा भय कसे काढून टाकता येईल, या एकाच विचाराने त्यांची पावले पडत होती, असे समजायचे ?

गांधींच्या बाबतीत बोलायचे तर हिंदु-मुस्लीम ऐक्य हे त्यांचे आवडते ध्येय होते. त्यासाठी सर्वधर्मसमभावाचा उपदेश ते करीत होते. त्यांतून किमानपक्षी धार्मिक सहिष्णुता व सामंजस्य निर्माण व्हावे, एवढेच त्यांची अपेक्षा असावी. पण ते तर साध्य झाले नाहीच उलट मुसलमानांची भूमिका अधिक ताठर झाली. व शेवटी स्वातंत्र्याबरोबर देशाची फाळणी पत्करावी लागली. हजारो लोकांच्या कत्तली झाल्या. हे दारूण अपयश त्यांच्या जीवनांतील भयानक विसंगतीच होय.

**( क) अस्पृश्यता निवारण**

हिंदु-मुस्लीम ऐक्या इतकेच गांधीजींचे दुसरे आवडते ध्येय अस्पृश्यता निवारणाचे होते. चातुर्वण्य, पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त हे सनातन हिंदु धर्माचे सर्व मूलभूत सिद्धांत गांधीजींना मान्य होते. म्हणूनच ते स्वतःला 'सनातनी हिंदु' म्हणवून घेत. 'सर्व वर्ण समान, उच्चनीच कोणी नाही असे ते मानीत असत.' अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील कलंक आहे हे आंधळासुद्धा पाहू शकेल ? असे ते म्हणत. त्याबरोबरच 'वर्ण जन्मावरून आहे. वर्णाश्रम हा कायदा आहे. त्याचे व्यावहारिक रूप ज्ञाति (जाती) आहे. जातिबहिष्कार हा दंड

आहे. सर्व जातीच्या हाती तो असला पाहिजे ' असेही म्हणत असत. हा परस्परविरोध नव्हे काय ? चातुर्वण्य, वर्णाश्रम, कर्मसिद्धांत, पुनर्जन्म मान्य करून व जातीसंस्था कायम ठेऊन अस्पृश्यता निवारण करायचे म्हणजे अस्पृश्य मानलेल्यांना केवळ स्पृश्य मानावयाचे इतकेच की काय ?

जातिसंस्था परंपरागत हिंदु समाजव्यवस्थेचा कणा आहे. आहार, पोषाख, व्यवसाय, धर्मकृत्ये, कुटुंबनीती, सामाजिक संबंध वगैरे लहान मोठ्या सर्व बाबतीत जातिसंस्थेचे कडक निर्बंध प्रत्येक माणसाला बंधनकारक असतात. जातिसंस्था स्वायत्त असून तिचे रक्षण करण्याची जबावदारी जात-पंचायतीची असते. सरकार कोणत्याही जातीच्या अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप करू शकत नाही. जातिसंस्था जन्मसिद्ध उच्चनीचभाव व अधिकारभेद यांवर म्हणजेच वर्णव्यवस्थेवर आधारलेली आहे. ती ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत अनेक समाज घटकांची उतरंड आहे. तीत निरनिराळ्या लोकांची जन्मतःच गुणकर्मानुसार विभागणी होते, असे मानलेले आहे. पण यांत गुण म्हणजे सत्व, रज, तम हे त्रिगुण होत. सात्विक वृत्तीचे पुण्यशील लोक ब्राह्मण कुटुंबात जन्माला येतात. त्यांना जप, तप, शुचिर्भूतपणा इ. कर्मे नेमून दिलेली असतात. रजोगुणाचे प्राबल्य असणारे लोक क्षत्रीय कुटुंबात जन्म घेतात. शौर्य, तेज, दान, प्रभुत्व शक्ती ही त्यांची नियत कर्मे होत. तमोगुणयुक्त राजस वृत्तीचे लोक वैश्याच्या जन्माला येतात. शेती, गोरक्षण, व्यापार ही त्यांची स्वभावसिद्ध कर्मे होत. रजोगुणमिश्रीत तमोगुणी मनुष्य शुद्र वर्णात जन्मतो. त्रैवर्णिकांची सेवाचाकरी करणे त्यांचे कर्तव्यकर्म ठरते. अशी गुणकर्मानुसार वर्णविहित कर्माची विभागणी ईश्वरप्रणीत मानली असल्याने शाश्वत आणि अपरिवर्तनीय मानली जाते.

जगाचे आदि कारण मानलेल्या विराट महापुरुषाचे मुख, हात, पाय मांड्या याच्यापासून हे चार वर्ण उत्पन्न झाले अशी उपपत्ती श्रुती सांगतात. ही रुपकात्मक असली तरी ती उच्चनीचभावाची, अधिकार भेदाची व सामाजिक विषमतेची निदर्शक आहे यांत शंका नाही. सर्वांनाच उपजीविकेसाठी जातीविहीत ठरविलेला व्यवसाय करणेशिवाय गत्यंतर नसलेमुळे समाजाचा

नित्याचा व्यवहार चालू राहिला तरी त्यांतून व्यापक सामाजिक जाणीवा विकास पावण्याऐवजी संकुचित जातिनिष्ठा पोसत राहील्या.[८]

अशी वर्णव्यवस्था असतांना 'सर्व वर्ण समान, उच्चनीच कोणी नाही' असे गांधीजी कसे म्हणतात? अस्पृश्यता निवारणासाठी त्यांचेएवढे प्रयत्न अन्य कोणी स्पृश्य हिंदूने केलेले नसतांनाही अस्पृश्यांची सहानुभूती, विश्वास किंवा प्रेम त्यांना मिळवता आले नाही. हे अपयश त्यांच्या जीवनांतील विसंगती नव्हे काय?

**(ड) शासनांत धर्मनिरपेक्षता आणि समाजजीवनांत सर्वधर्मसमभाव**

अशी गांधीजींची विचारसरणी होती.[९] पण ईश्वराचे पितृत्व आणि मानवाचे भ्रातृत्व सर्व धर्मियांना मान्य असले तरी त्यांत तर्कदृष्टया ग्रहीत धरलेले बंधुत्व म्हणजे समानत्व व प्रेम हिंदूना व मुस्लीमांना कितपत मान्य होण्याजोगे आहे? वर्णाश्रम धर्माचा विचार करताना आपण यांचा विचार केला आहे. सर्व जीवमात्राच्या ऐक्याची आकांक्षा बाळगणारा हिंदुधर्म स्वधर्मातील बंधुभगिनीबद्दल पशुवत क्षुद्र वृत्ती बाळगतो ही वस्तुस्थिती कशी दुर्लक्षिता येईल? हिंदूधर्म ही कल्पना आहे आणि जातिसंस्था ही वस्तुस्थिती आहे हे लक्षांत घेऊनच जीवमात्राच्या ऐक्याचा अर्थ लावला पाहिजे. जैनधर्मीयांच्या भूतदयावृत्तीचा उल्लेख करतांना गांधीजींनी म्हटले आहे 'किडयामुंग्यांना साखर खाऊ घालतांना त्यांची भूतदया प्रगट होते. पण व्यापारउद्योग करतांना मात्र ती लुप्त होते.' ते त्यांचे विधान थोडा फरक करून हिंदूंच्या जीवमात्राच्या ऐक्याला लावतां येणार नाही काय?

इस्लाम धर्मियांचा बंधुभाव स्वधर्मियांपुरताच मर्यादित आहे. इतरांना ते काफीरच समजतात. कुराण किंवा तलवार यांतून त्यांना निवड करणेस सांगण्यात येते. शिवाय त्यांच्यातही शिया, सुन्नी, अहंमदीया असे भेद आहेतच. एकमेकांच्या कत्तली करण्यापर्यंत त्यांचीही मजल जाते. मग बंधुभाव कोठे राहीला?

भगवान येशूचा संदेश सेवेचा, दयेचा आणि प्रेमाचा होता. तो बहुधा येशुबरोबरच सुळी गेला असावा. जो ख्रिस्ती धर्म आपण पहातो, तो देवपुत्र

येशुचा वाटत नाही. तर मानव-पुत्र सेंट पॉलचा वाटतो. रोमन सम्राट ख्रिश्चन होताच राजसत्ता व चर्च एक झाले. प्रेमळ सेवामार्ग सांगणारा धर्म शस्त्र हाती घेऊन उभा ठाकला. जणू ख्रिस्ती धर्माने जगाला घोषित केले. 'डाव्या गालावर कोणी आघात केला तर उजवा गाल पुढे कर' हा धर्म प्रत्येकाने मान्य केलाच पाहिजे. असे न केल्यास त्याचा गळा कापून ठार करण्यात येईल !

तत्व आणि व्यवहार यांत परस्पर विरोध असावा असाच अलिखीत नियम सर्वच धर्मात आहे की काय? 'पुराणांतली वांगी पुराणांत' ही म्हण यावरुनच पडली की काय ? हिंदुधर्मातील जीवमात्राचे ऐक्य, ख्रिश्चन धर्मातील प्रेम व इस्लाममधील बंधुत्व ही तत्त्वे त्या त्या धर्मियांनाही कधी व्यवहारात उतरविता आली नाहीत, ती सर्व एकत्र यावीत असे गांधीजी म्हणत असत ! याचा अर्थ असा दिसतो की कोणत्याही धर्माच्या मुळाशी कांही नैतिक तत्त्वे असली तरी त्याबरोबरच त्यांच्या अनुयायांना, त्यांच्या धर्मसंस्थापकांनी, व धर्मग्रंथांनी किमान कर्मकांड किंवा आचारविधी सांगितलेला असतो. त्यावर त्या अनुयायांची श्रद्धा, भक्ती असते. किंबहुना तो म्हणजे धर्म असेच त्यांना वाटते. आपली पद्धती चांगली, श्रेष्ठ, दुसऱ्याची कनिष्ठ अशी भावना त्या अनुयायामध्ये आपोआपच निर्माण होते. ईश्वर जरी एक मानला (सर्वजणच तसे मानतात असे नाही) तरी, त्याची कृपा, दया मिळवणेचे मार्ग भिन्न भिन्न सांगितलेले असतात त्यामुळेच वेगवेगळे धर्म निर्माण झालेले असतात. प्रत्येक धर्माने सांगितलेली ईश्वराची उपासनापद्धती, समाजधारणापद्धती वेगवेगळी असते. शैव, वैष्णव, शिया, सुनी, कॅथालिक, प्रॉटेस्टंट हे भेद वेगळे काय सांगतात ? त्याला कारण त्यांची केवळ विचारसरणी किंवा नीतितत्त्वे नसतात, तर त्याबरोबरच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक प्रमाणांत त्या धर्माची उपासनापद्धती, पूजाअर्चा (पूजाविधी) त्याने घालून दिलेले समाजसंबंध या सर्वांच्यामुळे त्यांच्या अनुयायामध्ये निर्माण होणारी 'सामूहिक भावना' हीही कारण असतात. धर्म मानवांचे ऐक्य घडविण्याचा दावा करीत असले तरी त्यांच्यामध्ये तीव्र स्वरुपाचे भेद व द्वेषही तेच निर्माण करतात ही वस्तूस्थिती आहे.[१०]

कोणताही धर्म एक सामाजिक घटना असते. त्याचे स्वरुप केवळ त्याच्या पोथ्या वाचून कधीच कळत नसते. त्याचे धर्मग्रंथ व संस्थापक त्याला फक्त आकार देतात. अनेक इहलौकिक हितसंबंध, लोकांच्या इच्छा-आकांक्षा, श्रद्धा त्यात सामील होतात. त्या सामाजिक घटनेला एक इतिहास, एक परंपराही असते. या सर्व बाबी मिळून धर्म होत असतो.[११]

तेव्हा सर्व धर्मांची मूलतत्त्वे एकत्र करून सर्वधर्मसमभाव लोकांमध्ये निर्माण करण्याच्या गांधीजींचा प्रयत्न वैचारिक पातळीवरसुद्धा शक्य झाला नाही यांत आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. ही त्यांच्या जीवनांतील सर्वात मोठी विसंगती होय.

### ३. गांधीजी आणि इहवाद

प्रवृत्तीपरता आणि धर्मांची परिवर्तनीयता ही इहवादाची दोन तत्त्वे गांधीजींच्या आचरणांत स्पष्टच दिसतात. ईश्वराच्या पैगंबरांची मालिका अखंड चालूच राहणार आहे, 'अशी त्यांची श्रद्धा' त्याचीच द्योतक होय. त्यांचे संपूर्ण जीवन इहलोकांच्या जीवनाचे प्रश्न सोडविण्यासाठीच खर्ची पडलेले आहे. चिंता, विचार सर्व त्याचेच आहेत. शासनाची भूमिका निर-निराळ्या धर्माबाबत तटस्थतेची असावी अशीच त्यांची भूमिका होती. सहिष्णुता हा त्यांचा स्थायीभावच होता. शिवाय ते पूर्णपणे धार्मिक वृत्तीने वागणारे होते. धर्मांची परिवर्तनीयता मानत असूनही धर्माचा काही भाग सनातन मानीत होते. म्हणूनच ते स्वतःला 'सनातनी हिंदू' म्हणवून घेत होते. चारित्र्य वैराग्याचे पुरस्कर्ते होते. ईश्वरीसत्ता मानणारे होते. तीच माणसाच्या हातून सर्व कांही घडवते अशी त्यांची श्रद्धा होती. तरीही त्यांच्या 'आंतल्या आवाजाला' अमान्य असणारी किंवा न्याय व समतेविरुद्ध जाणारी कोणतीही गोष्ट मोडीत काढून रद्द करण्याची त्यांची तयारी होती.[१२] जातीयता, अस्पृश्यता, स्त्रियांना कमी लेखण्याची प्रवृत्ती याबाबत जुन्या धार्मिक कल्पना डावलूनच स्वतःची मते त्यांनी बनवली होती. एवढेच नव्हे तर अनेकांच्या विरोधांना डावलून ती प्रचारली होती. आचरली होती. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे 'सत्याचे प्रयोग' होते. ते कर्ते सुधारक होते, केवळ बोलके नव्हते.

इतके सर्व असूनही त्यांनी विचारप्रतिपादनासाठी धार्मिक परिभाषा स्वीकारली होती. ती लोकांना समजायला सोपी व आकर्षक असते, त्यांना लवकर समजते असा त्यांचा दावा आहे. कदाचित तो खराही असू शकेल. पण लोक त्यांतून कोणता अर्थ घेतात हा खरा प्रश्न आहे. उदा. 'धर्म ! गांधीजींचा अर्थ' नीति ! पण लोक अर्थ घेतात, हिंदुधर्म, इस्लाम किंवा ख्रिश्चन, जैन, बौद्ध धर्म. दुसरा शब्द 'ईश्वर'–गांधीजींच्या मते 'सत्य हाच ईश्वर'. पण लोक समजतात विश्वाचा निर्माता, नियंता वगैरे. तसेच 'रामराज्य', समाजवाद्यांना वाटते 'राजापद्धतीचे राज्य' किंवा 'सरंजामशाही' मुसलमानांना वाटते 'हिंदुराज्य' गांधींचा अर्थ वेगळाच राहीला. पंडित नेहरु म्हणतात 'गांधीजीबद्दल बोलायचे तर त्यांचे विचार समजणे मोठे कठीण काम असते. चळवळीच्या धार्मिक व आध्यात्मिक बाजूंवर ते नेहमीच भर देत असत. जीवनाकडे धार्मिक दृष्टीने पाहण्याची शिकवणूक त्यापासून मिळत असे.' त्याचा परिणाम असा झाला की जनसमुदायांत तरी राष्ट्रीय चळवळीला धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीचे स्वरुप आले.[१३]

त्यामुळे विचारप्रसारासाठी व समाजपरिवर्तनासाठी त्यांच्या विवेचनशैलींचा उपयोग केवळ घातकी होता, हे अनुभवाने शाबीत झाले आहे. जन्मभर ज्या लोकांचे व संस्थेचे नेतृत्व त्यांनी केले ते काँग्रेसनेतेही त्यांना नीट समजून घेऊ शकले नाहीत, याची कबूली त्यांनी स्वतःच दिली आहे. समाजरचना निश्चित कोणत्या तत्वांवर आधारलेली असावी यासंबंधी त्यांच्या मताबद्दल बराचसा गोंधळच आहे. कोणी त्यांना पुरोगामी, क्रांतिकारक ठरवितात, कोणी धार्मिक मानवतावादी, तर कोणी प्रतिगामी पुनरुज्जीवनवादी मानतात. म्हणजेच परस्परविरोधी विचारांची अनेक मंडळी त्याचे विचार सोयीप्रमाणे घेऊ शकतात. सर्वधर्मसमभावाचे नावाखाली सध्या धर्मांधता बोकाळत चालली आहे ती यामुळेच.

## ४. सर्वधर्मभ्रमभाव

'समाजधारणा करतो तो धर्म' ही धर्माची व्याख्या सर्वमान्य दिसते. समाजधारणा म्हणजे इहपरलोकी मानवाचे कल्याण साधणे, मानवामध्ये

सौहार्दपूर्ण व नीतिचे संबंध प्रस्थापित करणे, मानवी ऐक्य संवर्धन करणे म्हणजेच लोकयात्रा नीट चालण्याला मार्गदर्शन करणे होय. कोणत्याही धर्माचे हेच मुख्य प्रयोजन असते. या कामी सर्वच धर्मांना अपयश आलेले आहे असा इतिहासाचा अनुभव आहे. म्हणून प्राचार्य आगरकर म्हणाले 'यापुढील काळात धर्माची आवश्यकता बिलकूल नाही' आपले इहपरलोकी कल्याण धर्माने साधू शकेल हा 'मानवाचा भ्रम' ठरला असून त्यासाठी आता त्याला विज्ञानाचीच व त्यावर आधारलेल्या इहवादी तत्वज्ञानाची कांस धरावी लागणार आहे म्हणून इहवादाचा अर्थ सर्वधर्मसमभाव करणे चूक असून 'सर्वधर्मभ्रमभाव' असा केला पाहिजे असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात हेच योग्य वाटते.[१४]

## ५. परंपरागत धर्माचा प्रभाव

राममोहन रॉय म्हणत असत 'धर्म हे समाजाचे हृदय आहे. त्याच्या सर्व व्यवहारांत सुधारणा करावयाची असेल, तर प्रथम त्यांच्या हृदयांत म्हणजेच धर्मात सुधारणा झाली पाहिजे.' त्यांचेपासून म. गांधी पर्यंत बहुतेक नेत्यांनी यादृष्टीने धर्मसुधारणेचे व त्याद्वारा समाज सुधारणाचे प्रयत्न सातत्याने केल्याचे आतापर्यंत आपण घेतलेल्या आढाव्यावरून दिसून येते. टिळक म्हणत असत 'आमची परंपरागत संस्कृती व आपला धर्म यांच्या चौकटीत बसेल, अशाच रीतीने सुधारणांची आखणी करावी.[१५] जे फेरफार करायचे, त्यामुळे हिंदुत्वाचा अभिमान नष्ट होऊं नये, अशी खबरदारी घेतली पाहिजे. गीता, उपनिषदे यातील तत्वज्ञान आणि श्रुतीस्मृतिप्रणीत वर्णाश्रम धर्म यांच्या आधाराने, परंपरेने चालत आलेले जे काही एक वैशिष्ठ्य ते हिंदूत्व किंवा हिंदु धर्म होय.[१६] हा धर्माधिष्ठीत सुधारणांचा मार्ग होय. गांधीजींच्या जीवननिष्ठेतही धर्माला अग्रस्थान होते. लोकहितवादी व बाळशास्त्री जांभेकर, न्यायमूर्ती रानडे हेही सर्व सुधारणा धर्मशास्त्राच्या आधाराने व्हाव्यात असेच म्हणत असत. म. फुले व डॉ. आंबेडकर यांनी हिंदुधर्माच्या धार्मिक व सामाजिक गुलामगिरीविरुद्ध जरी बंड पुकारले होते. तरी त्यांची वृत्ती मूलतः धार्मिकच होती. महात्मा फुले सत्यधर्माचे संस्थापक झाले व डॉ. आंबेडकरांनी

बौद्ध धर्माचा स्वीकार केला. आधुनिक भारताच्या इतिहासांत राममोहन रॉयपासून म. गांधीपर्यंत सर्व नेत्यांना धर्म व समाज जीवन यांचा मेळ घातला पाहिजे असेच वाटत होते. धर्म व राजकारण यांची फारकत झाली पाहीजे म्हणणारांना धर्म म्हणजे काय? व राजकारण म्हणजे काय? याचा अर्थंच समजत नाही असेच गांधीजींचे मत होते.

## ६. धर्म आणि समाजकारण यांची फारकत

देशाची प्रगती आणि व्यक्तिमत्वाचा विकास अशा दोन्ही दृष्टींनी पहाता धर्म आणि समाजकारण यांची पूर्ण फारकत झाली पाहिजे असा निखळ इह-वादी विचार एकटया आगरकरांनीच व त्यानंतरच्या काळात जवाहरलाल नेहरु आणि मानवेन्द्रनाथ रॉय यांनी मांडला. आगरकर अज्ञेयवादी तर रॉय भौतिकवादी होते. मानवाच्या विकासासाठी व कल्याणासाठी यापुढे धर्मसंस्थेची आवश्यकता नाही असे या दोघांनाही वाटत होते.

तथापि 'धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य' प्रत्येक व्यक्तीस असावे व असले पाहिजे असेच त्यांचे मत होते. सर्व सामाजिक व्यवहार मात्र धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाने व्हावेत. माणसामाणसांमधील संबंध नैतिक तत्वावर आधारलेले असावेत. धर्म हा मानव व ईश्वर यांचे संबंधापुरता मर्यादित असावा अशी त्यांची मते होती. पंडित जवाहरलाल नेहरु यांची मतेही अशीच होती.

## ७. की तोडिला तरु फुटे आणखी भराने

भारतीय जनता अंध धर्मनिष्ठा व परंपरागत जीवनपद्धती, सामाजिक विषमता, आर्थिक दारिद्रय, बेकारी, अनारोग्य अज्ञान यांनी जर्जर झालेली आहे. त्यामुळे हताश, दैववादी मनोवृत्ती तिचा स्थायीभाव झाला आहे. त्यांचे धर्मजीवन, मूर्तीपूजा, रूढी, पुराणश्रवण व तीर्थयात्रा यामध्ये घुटमळत असते. आतापर्यंत ज्यांनी समाजसुधारणेचे प्रयत्न केले, त्यांनी धार्मिक परिभाषेचेच माध्यम वापरल्याने सर्वसाधारण जनतेची निराश, अंधश्रद्धाळू मनोवृत्ती नष्ट झाली नाही. उलट 'की तोडिला तरु फुटे आणखी भराने', या न्यायाने तिलाच खतपाणी मिळत गेले. आधुनिक शिक्षणाचे संस्कार झालेली सुशिक्षित तरुण

पिढी 'महाजने येन गतः स पंथः' असे म्हणत सामान्य लोकांचे पूर्वग्रह जोपासत राहिली आहे. जुजबी व अर्धवट शिक्षणामुळे त्यांचे जुने संस्कारच दृढमूल होत आहेत.

अशा वातावरणांत इंग्रजी आमदानीमध्ये 'टाळकी मोजण्याची लोकशाही' भारतात आली. 'लोकशाही म्हणजे बहुमताचे राज्य' एवढीच कल्पना जनमानसांत रूढ झाली. स्वराज्यातही यांत फारसा बदल झाला नाही. कर्मठ, अंधश्रद्ध, जातवाल्यांचे नेहमीच बहुमत असते. तेव्हा राज्य त्यांचेच अशी लोकशाही आली. परंपरागत धर्मनिष्ठा आधुनिक परिस्थितीत लोकशाहीचा साज घालून तयार झाली आहे.

सुशिक्षितामध्ये भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीचे श्रेष्ठत्व जोरजोराने सांगितले जात आहे. यातून निर्माण होणारा अहंकार, पाश्चात्य संस्कृतीचा तिरस्कार करायला लावतो मग सर्वधर्मसमभाव कुठे राहिला कोणास ठाऊक !

वास्तविक पाहता १८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली. त्यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष उमेशचंद्र बानर्जी ख्रिस्ती होते. १८८९ साली दादाभाई नौरोजी हे अध्यक्ष पार्शी होते. १८८७ साली बद्रुद्दिन तय्यबजी मुस्लीम अध्यक्ष होते. त्यानंतर यूल वेडनबर्ग, मेहता, पी. आनंदाचार्लू ही नावे पाहिली म्हणजे या राजकीय संस्थेची बैठक जात, धर्म, प्रांत, यांच्या मर्यादा किती सहजपणे ओलांडून ेली होती ते कळून येते. पण या काळात ही चळवळ अगदी अल्पसंख्य वरिष्ठ वर्गापुरतीच मर्यादित राहिली होती. पुढे जेव्हा तिला संघटित व्यापक सामुदायिक चळवळीची अवस्था प्राप्त झाली तेव्हा तिने धार्मिक वळण घेतले. उदारमतवाद मागे पडला. धार्मिक पुनरुज्जीवनवाद प्रभावी झाला. लोकशाही, स्वातंत्र्य या उदारमतवादी ध्येयांच्या सिद्धीसाठी चाललेल्या चळवळींना धार्मिक पुनरुज्जीवनवादाचे अधिष्ठान प्राप्त झाले. लोकशाही म्हणजे 'बहुजनवाद' असा अर्थ झाला. त्यामुळे त्यांच्या अंधश्रद्धाळू परंपरागत धर्मनिष्ठा म्हणजे जातीवाद लोकशाहीच्या नावाखाली प्रभावी झाला.

गेल्या दोनशे वर्षाचा हा इतिहास पाहिला म्हणजे आपला समाज व शासन धर्म निरपेक्षतेच्या तत्वापासून कां व कसा दूर चालला आहे याचा उलगडा होतो. धर्म निरपेक्षता किंवा इहवाद, पंडित नेहरुंच्या बरोबरच केव्हाच मागे पडला आहे. आता आहे तो सर्वधर्मसमभाव. या सर्वधर्मसमभावामध्ये 'समभाव' गौण ठरला असून 'धर्मभाव' प्रमुख झाला आहे. एवढेच नव्हे तर त्याला स्वधर्म-भावाचे म्हणजेच जातीयवादाचे स्वरुप आले आहे. आपले शासन धर्मनिरपेक्ष किंवा इहवादी आहे असे घटनेमध्ये म्हटले आहे. सर्व पक्षांची (जातीय-वाद्यांचीही) त्याला मान्यता मिळाली आहे. पं. नेहरु धर्मनिरपेक्षतेचा व इहवादाचा पुरस्कार करीत होते. त्यांतील फक्त 'उपचार' आता उरला आहे. त्याची अधोगती सर्वधर्मसमभावांत म्हणजेच जातीयवादात झाली आहे.

---

संदर्भ :
१. गं. बा. सरदार – धर्म आणि समाजपरिवर्तन – पृ. क्र. ५०
२. मो. क. गांधी – गांधी विचार दर्शन भाग ९ वा
३. पं. नेहरु – डिस्कवरी ऑफ इंडिया – पृ. क्र. ४३२ – ३३
४. अ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – लेखसंग्रह पृ. क्र. – ३०८
४. ब प्रा. गोवर्धनदास पारीख – महात्मा गांधी
५ पन्नालाल सुराणा – लोकशाही समाजवाद – लेखसंग्रह पृ. क्र. ५४ – ५५
६. प्रा. अ. भि. शहा – Challanges to Secularism – पृ. क्र. ४० – ४६
७. टाईम्स लेख – १०–२–१९७०
८. गं. बा सरदार – महात्मा फुले – पृ. क्र. ५ – ६
९. गं. बा. सरदार – धर्म आणि समाजपरिवर्तन – पृ. क्र. ५०
१०. प्रा. अ. भि. शहा – Challanges to Secularism – पृ. क्र. ७३
११. नरहर कुरुंदकर – जागर – पृ. क्र. – २००
१२. नरहर कुरुंदकर – जागर – पृ. क्र. – १३३
१३. पंडित नेहरु – आत्मचरित्र – पा. नं. ७४
१४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – मुलाखत
१५. श्री. वा. बनहट्टी – टिळक आणि आगरकर
१६. लो. टिळक – केसरीतील लेख भाग ४ था – पा. नं. ३७०

# १२

# राष्ट्रीय एकात्मता आणि इहवाद

राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी स्वातंत्र्यानंतर आजपावेतो पुष्कळ विचार झाला आहे. तरीही राष्ट्रीय एकात्मता देशामध्ये समाधानकारक प्रमाणात निर्माण झालेली दिसत नाही. राष्ट्रीय एकात्मता राष्ट्रीयत्व गृहीत धरते, देशामध्ये राष्ट्रीयत्व सिद्ध झालेले आहे. परंतु राष्ट्रीयत्वाची भावना देशाच्या विविध प्रदेशामध्ये अगर राष्ट्रीय समाजाच्या वेगवेगळ्या भागामध्ये अद्याप पुरेपुर भिनलेली नाही. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या अधिक विचाराची, आंदोलनाची व त्यासाठीच्या क्रियात्मक उपायांची आवश्यकता आहे. अशी पार्श्वभूमी या संज्ञेमागे असते.

भारत हा राज्यसंघ आहे, असे भारतीय राज्य घटनेमध्ये म्हटले आहे. निरनिराळ्या राज्यांना भारत या राष्ट्रामध्ये एकत्रीत आणण्याची घटना या विधानामध्ये ध्वनीत होते. त्याचप्रमाणे विविध धर्माचे समाज या राष्ट्रामध्ये सामावलेले आहेत. हे 'श्रद्धा व उपासना यांचे स्वातत्र्य' या भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकांतील घोषणेने स्पष्ट होते.

सामाजिक, आर्थिक प्रशासनिक, राजकीय अशी विविध अंगे विकासाच्या प्रक्रियेला असतात. भारतांमध्ये राष्ट्र बांधणीचे कार्य स्वातंत्र्य लढ्यामध्ये व

सामाजीक सुधारणासाठीच्या चळवळीमध्ये समाजप्रबोधनाच्या मार्गाने पार पडले. सामाजिक विकासाची प्रक्रिया राजकीय आर्थिक विकास प्रक्रियांच्या मानाने मागे पडली. त्यामुळे समाजाच्या विविध स्तरामध्ये व विभागामध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना जितकी मनस्वीपणे भिनावयांस पाहिजे होती, तितकी भिनू शकली नाही. त्यामुळे वेळोवेळी भिन्न भिन्न प्रदेशामध्ये व समाज विभागामध्ये तणाव निर्माण होतात. तणावांचे रुपांतर हिंसाचारात होते व राष्ट्रीय ऐक्याला तडा जातो कीं काय? अशी भीती वाटू लागते.

शिवाय राष्ट्र ही संकल्पना अगदीच अलिकडील म्हणजेच भारतात ब्रिटीश राज्याची स्थापना झाल्यानंतरची आहे. पण भारतीय समाज पद्धती प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. हिंदू समाजामध्येसुद्धा निरनिराळ्या जाती जमाती संस्कृतीच्या भिन्न पातळीवर स्थिरावल्या होत्या, बहुसंख्य हिंदु व अल्पसंख्य मुसलमान यांच्यात ऐतिहासिक कारणांनी वितुष्ट असे. या वितुष्ठाचे रुपांतर, तात्कालिक कारणांवरुन हिंसाचारात वेळोवेळी होई. ही सर्व परिस्थिती राष्ट्रीय एकात्मतेचा अधिक विचार करावयांस लावणारीच आहे.

## एकात्मता म्हणजे काय ?

एकात्मता म्हणजे एक आत्मा किंवा एक जीव. एकजीव झाल्याची भावना. राष्ट्रीय एकात्मता याचा अर्थ, राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादेत राहणाऱ्या सर्व लोकांचे–त्यांची भाषा, धर्म, लिंग, जात, वर्ण कोणताही असो–दृढ असे ऐक्य होणे होय. पण ऐक्य म्हणजे एकत्र बांधून ठेवणे किंवा एकगठ्ठा करणे नव्हे. तसेच कोणाच्याही हुकूमाप्रमाणे वागणे अगर आज्ञेत राहणेही नव्हे. खरेखुरे ऐक्य काही विचारावर किंवा बाबी संबंधी होवू शकते. राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात भारतीय संविधान अशी बाब होवू शकते. समान नागरिकत्व, धार्मिक स्वातंत्र्य, धर्म आणि शासनाची अलिप्तता, आणि संसदीय लोकशाही या भारतीय संविधानाच्या पायाभूत कल्पना आहेत. त्यावर सर्व भारतीय लोकांचे दृढ ऐक्य घडवून आणणे हा राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ होय.

राष्ट्रीय एकात्मतेसारखी घटना, 'पी हळद कीं हो गोरी' म्हणण्यासारखी झटपट होणारी नाही. जीवनांतील अनेकविध घटकांच्या समुच्चयाने व

जाणीवपूर्वक होणारा तो परिणाम आहे. धर्म, भाषा वंश, जात, लिंग इ. बाबतीत विविधता असूनही भारतातील प्रत्येक नागरिकांस या विविधतेमधील एकतेची जाणीव होईल. एकतेच्या मूल्याचा स्थायीभाव प्रत्येक नागरिकांत निर्माण होईल आणि प्रसंग पडला तर, राष्ट्र हितासाठी तो सर्वस्व समर्पण करण्यास तयार होईल, त्यावेळी राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली असे म्हणता येईल. सर्वसामान्य माणसांतील राष्ट्रभावनेचे प्रमाण वाढविणे व भेद, अन्याय, उपेक्षा आदि जाणीवा कमी करणेच्या प्रक्रिया, लोकशाही आदर्शावरील निष्ठा कायम ठेवून साध्य करणे, हा राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ आहे. ही प्रक्रिया अनेक वर्षे सातत्याने व निष्ठेने चालणारी असते. हिच्या निर्मितीत सर्वांत मोठा वाटा अस्तित्वात असलेल्या भिन्न समाज गटांना न्याय्य वागणूकीची मनातून खात्री वाटणे हा असतो. सर्वच गटांना आपल्यावर इतर गट एकएकटे अगर एकत्र मिळून जाणीवपूर्वक अन्याय करणार नाहीत, याची खात्री वाटणे, सर्वांत महत्वाचे आहे.

## भिन्न दृष्टीकोन

चार वेगवेगळ्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नाचा विचार आतापर्यंत करण्यांत आला आहे. (१) राष्ट्रवादी दृष्टीकोन. (२) मार्क्स-वादी दृष्टीकोन. (३) जातीयवादी दृष्टीकोन. (४) लोकशाही किंवा मानवतावादी दृष्टीकोन.

### (अ) राष्ट्रवादी दृष्टीकोन

भारत हे एक राष्ट्र आहे. व आपण त्याचे नागरिक आहोत, म्हणून आपली सर्वोच्च निष्ठा राष्ट्रावर असली पाहिजे. त्याशिवाय असणाऱ्या आपल्या निष्ठा कुटुंबाशी, जातीशी, धर्माशी, राज्याशी, पक्षाशी, मित्राशी किंवा इतर कोणा-शीही असल्या, तरी त्या गौण मानल्या पाहिजेत. सर्व धर्म सारखेच मानावेत, त्यांचेमध्ये आपपरभाव करू नयें. सर्व नागरिकांना समान अधिकार व धार्मिक स्वातंत्र्य असावे, पण शासन धर्मनिरपेक्ष असावे.

याचे सर्वश्रेष्ठ पुरस्कर्ते भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु हे होते. त्यांचे मताप्रमाणे विभाजक शक्तींनी भारताला खच्ची करून टाकले

आहे, त्यामुळेच आतापर्यंतच्या इतिहासांत तो अनेकवेळा परकी आक्रमणाला बळी पडला आहे. भारतीयांच्या अंधधर्मश्रद्ध दृष्टीकोनातून या विभाजक शक्ती निर्माण झाल्या आहेत. त्यांचा सामना विविध मार्गांनी करावा लागेल. (१) भारतीय केंद्र सत्ता सामर्थ्यवान बनविली पाहिजे. (२) आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती अति झपाट्याने घडवून आणली पाहिजे. (३) शासन धर्मनिरपेक्ष व लोकसत्ताक ठेवले पाहिजे. (४) कोणत्याही धर्माच्या वर्चस्वाला विरोध केला पाहिजे. (५) सर्व नागरिकांना समान दर्जा, अधिकार व धार्मिक स्वातंत्र्य दिले पाहिज.

त्यांच्या सर्व कार्याचा या दृष्टीने आढावा घेतला तर त्यांच्या सरकारने केलेले पहिले महत्त्वाचे कार्य म्हणजे वरील सर्व मार्गांचा समावेश असणारी राज्यघटना हे होय. दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे सर्व लहानमोठी संस्थाने नष्ट केली, औद्योगिक व शेतीचे उत्पादन वाढविणेसाठी एकामागोमाग पंचवार्षिक योजना आखून कार्यवाहीत केल्या. त्यामुळे अन्नधान्याच्या व औद्योगिक उत्पादनाच्या बाबतीत भारत जगातील प्रमुख विकसनशील देश बनला. शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठे व शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीसाठी प्रयोगशाळा व संशोधन संस्था देशाच्या विविध भागात स्थापन केल्या. समर्थ लष्करी सत्ता म्हणून आजच्या जगात भारत गणला जातो. घटनेने निर्माण केलेली धर्मनिरपेक्ष शासनाची कल्पना बऱ्याच अंशी प्रत्यक्षांत उतरवली. हिंदू धर्मीय सामाजिक आचारासाठी विविध व्यक्तीगत कायदे एकत्र करुन, त्यांची सुधारणा करून, हिंदू कोड तयार केले. स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखून भारताची प्रतिष्ठा वाढविली व अलिप्त राष्ट्र चळवळीचा पाया घातला.

### (ब) मार्क्सवादी दृष्टीकोन

भारत हे एक राष्ट्र नसून अनेक राष्ट्रांचा संघ आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामीळनाडू आदि अनेक स्वायत्त राष्ट्रांचा त्यात समावेश होतो. या सर्व राष्ट्रांना समान दर्जा व स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळावा अशी त्यांची मागणी आहे. यामुळे राष्ट्रीय एकात्मता घडून येईल, असे त्यांचे मत आहे. पाया आणि त्यावरील इमारतींचा दृष्टांत वापरुन ते म्हणतात,

'संपत्ती उत्पादनाची, विभाजनाची व विनिमयाची साधने व त्यावरील मालकी हक्क संबंध हाच सर्व समाज व्यवस्थेचा पाया आहे. त्यातून आर्थिक विषमता व परस्पर विरोधी हितसंबंध असलेले वर्ग निर्माण होतात. धर्म, संस्कृती, साहित्य, भाषा वगैरे बाबी म्हणजे वरील पायावर उभारलेल्या इमारतीचे भिन्न भाग होय. अशा समाज रचनेमुळेच बहुसंख्य समाजाला दारिद्रय, बेकारी, अनारोग्य, अज्ञान, उपासमार सहन करावी लागते. हा अन्याय व विषमताग्रस्त समाज मुळापासून उखडून काढल्याशिवाय एकात्मता निर्माण होणार नाही. यालाच क्रांती म्हणतात. पाया उखडून काढल्यावर त्यावरील इमारतीचा डोलारा आपोआपच कोसळणार हे उघड आहे. यासाठी सर्व सामाजिक व्यवहारावरील प्रभुत्वाचे किंवा मार्गदर्शकत्वाचे स्थान धर्माला असू नये, असे हा दृष्टीकोन मानतो. पण वैचारिक, सांस्कृतिक कल्पनांना असे दुबळे, औपचारिक स्थान देणारा मार्क्सवादी दृष्टीकोन सर्वमान्य होऊ शकत नाही. कारण सत्य, न्याय, दया, प्रेम, स्वातंत्र्य वगैरे चिरंतन मानवी मूल्यांना व त्यावर आधारलेल्या संस्कृतीला स्थानच रहाणार नाही. मग मानवी प्रगती मोजायची तरी कशी? मार्क्सवादी दृष्टीकोनातून झालेल्या रशियन व अन्य क्रांतीतून निर्माण झालेल्या सत्तांचा इतिहास पाहिला तर उच्चतर मानवी संस्कृती निर्माण करण्यास व राष्ट्रीय एकात्मता साधण्यास हाही दृष्टीकोन समर्थ नाही, असाच निष्कर्ष काढावा लागतो.

**(क) जातीयवादी दृष्टीकोन**

याचे दोन प्रकार आहेत. (१) सर्व धार्मिक भेद धर्मांतराने संपवावेत. उदा. भारतात हिंदूंची फार मोठी लोकसंख्या आहे. मुसलमान, ख्रिश्चन बौद्ध, जैन, शीख हे प्रमुख अल्पसंख्य समाज आहेत. या अल्पसंख्य समाजांचे धर्मांतर करून सर्वांनाच हिंदू करावयाचे म्हणजे एकात्मता निर्माण होईल. धर्मांतर न करता त्यांचे राजकीय हक्क नष्ट करून व त्यांना दुय्यम नागरीक ठरवूनही एकात्म समाज निर्माण करता येईल. मुस्लीम राज्यातील शासन मुस्लीम धर्मशास्त्रानुसार चालेल व तेथील अल्पसंख्यांकांना असेच धर्मांतर करावयास लावून अगर त्यांचे राजकीय हक्क हिरावून घेऊन एकात्मता निर्माण

करता येईल. पूर्वी युरोपमध्ये राजाचा धर्म असेल तोच प्रजाजनाने आपला मानावा अगर आपल्या धर्माचा राजा जेथ असेल तेथे जाऊन रहावे, अशी प्रथा होती. तसाच हा प्रकार होऊ शकेल. भारतापुरते बोलायचे तर, या दृष्टीकोनातून एकात्मता निर्माण करणेचे प्रयत्न मुस्लिमांकडून होऊन चुकलेले आहेत व अपयशी ठरलेले आहेत. भारतात एक हजार वर्षे इस्लामी राज्य होते. त्यांनी हिंदूना बाटवून मुसलमान करणेचे सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले होते. परंतु भारतात इस्लामी धर्माप्रमाणे राज्य करणे, तर त्यांना जमले नाहीच, पण साधी इस्लामी बहुसंख्याही येथे निर्माण करता आली नाही. ख्रिश्चन मिशनरी लोकांनाही यापेक्षा वेगळा अनुभव आलेला नाही. धर्माच्या बाबतीत हिंदू समाज अत्यंत चिवट आहे. असा याचा अर्थ होतो. मुसलमान व इतर अल्पसंख्यांकांना धर्मांतरांचे मार्गाने हिंदू करून एकात्मता निर्माण करावी म्हटले तर हिंदू धर्मातील जातीप्रथा आड येते. धर्मांतरीत हिंदूना कोणत्या जातीत घालावयाचे ? दुसरे म्हणजे सर्वधर्मसमभाव मानणारे हिंदू धर्मीय इतर धर्मीयांचे धर्मान्तर तरी कसे करणार ? त्यामुळेच की काय इतर धर्मीयांचे धर्मांतर करून त्यांना हिंदू करून घेतल्याची उदाहरणे फारच कमी आढळतात. (२) इतर धर्मीयांचा जातीयवाद कांही प्रमाणांत खपवून घेऊन एकात्मता निर्माण होईल असेही सुचविले जाते. पण हा मार्ग व्यर्थ आहे, कारण जातीयवाद आणि एकात्मता या मुळातच परस्पर विरोधी कल्पना आहेत.

**(ड) लोकशाही आणि मानवतावादी दृष्टीकोन**

जनता सार्वभौम आहे. राजकीय व आर्थिक सत्ता लोकांचे प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असावी. जनता व शासन यांच्यामध्ये जास्तीतजास्त जवळीक किंवा एकात्मता व सहभाग असावा, यासाठी सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण व्हावे असे हा दृष्टीकोन मानतो. कुटुंबनिष्ठा, ग्रामनिष्ठा, राज्यनिष्ठा, पक्षनिष्ठा, धर्मनिष्ठा अशा अनेक निष्ठा प्रत्येक व्यक्तीला असतात. त्या परस्पर विरोधी नसतील तर कोणीही व्यक्ती अनेक निष्ठा बाळगू शकेल. विकेंद्रीकरण व स्वातंत्र्यामुळे राष्ट्र दुर्बल न होता, सामर्थ्यवान होऊ शकते. व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तिप्रतिष्ठा मानणाऱ्या लोकशाही विचारांची जोड नसेल, तर कोणतीही समूह निष्ठा—राष्ट्र निष्ठा सुद्धा—घातक ठरू शकते.

लोकशाही निष्ठेअभावी राष्ट्रनिष्ठा आक्रमक हुकूमशाही अगर जातीयवादी होऊ शकते.

भारत बहुधार्मिक, बहुभाषिक देश आहे. सांस्कृतिक विविधतेने नटलेला देश आहे. म्हणून येथे केंद्रसत्ता व प्रादेशिक सत्ता अगर राष्ट्रनिष्ठा व प्रदेश-निष्ठा यांनी एकमेकांशी सुसंवाद राखणे इष्ठ ठरेल.

या चारही दष्टीकोनांची काटेकोर विभागणी करता येत नाही. अनेकवेळा व अनेकठिकाणी ते एकमेकांत मिसळून गेलेले दिसतात. तथापि या सर्व दृष्टीकोनांचा झगडा सतत चालत राहिला आहे. असे थोडया अवलोकनाने आपल्या लक्षांत येवू शकेल.

## भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला असलेले धोके

(१) अंगभूत धोके, (२) प्रासंगिक धोके, (३) शासकीय धोरणांतील चुकांनी निर्माण केलेले धोके.

### (१) अंगभूत धोके

भारत हा अनेक धर्मीय लोकांचा संयुक्त देश आहे. कोणत्याही एकाच धर्मीय लोकांचा बनलेला हा देश नव्हे. ही भारताच्या इतिहासावरून स्पष्ट होणारी परिस्थिती आहे. त्यामुळे या भिन्न धर्मीय लोकांमध्ये धर्मसमन्वयाची भूमिका असेल तरच एकातमता निर्माण होणे शक्य आहे. हिंदू व इस्लाम हेच प्रमुख धर्म असून हिंदू जवळ जवळ ८३ टक्के व मुसलमान सुमारे ११ टक्के आहेत. इतर धर्मीय लोक सर्व मिळून ५ ते ६ टक्क्यामध्ये येतात. पैकी हिंदुंना धर्म समन्वय मान्य होवू शकतो, पण मुसलमानांना नाही. त्यांचे मताप्रमाणे इस्लाम हा सर्वश्रेष्ठ धर्म असून तोच एकमेव खरा धर्म आहे. बाकी सर्व धर्म त्याच्या भ्रष्ट नकला असून त्या नष्टच करायला हव्यांत. अशा स्थितीत धर्म समन्वयाची भूमिका त्यांना कशी मान्य होणार? याचा परिणाम गेल्या १०० वर्षात अनेक वेळा अनेक निमित्ताने हिंदू मुसलमानांमध्ये सतत दंगे, अत्याचार व रक्तपात होत आला आहे. अलिकडे हिंदूमध्येही अशीच

प्रतिकाराची भावना निर्माण होत असून यापुढे तेही आक्रमक भूमिका घेवू लागतील, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. म्हणून भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेला हाच सर्वात मोठा धोका आहे.

(२) **प्रासंगिक धोके**

भारताची स्वतंत्र घटना अमलात आल्यानंतर प्रादेशिक राज्ये व केंद्रसत्ता यांच्यात विग्रह निर्माण होवू लागले. या विग्रहांचे दोन प्रकार आहेत. (१) भारतातून फुटून सार्वभौम सत्ता मिळवण्याच्या आकांक्षेने उत्पन्न झालेले विग्रह. (२) प्रदेश राज्याच्या अधिकारामध्ये वाढ व्हावी या इच्छेने घडणारे विग्रह. दोन्ही प्रकारचे विग्रह सध्या चालू असून त्यात राजकीय हिंसाचार अधूनमधून उफाळून येतो. भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भातही असे विग्रह पेटले होते. पण भारतीय सार्वभौम सत्तेस नकार देणारा व स्वतंत्रतेसाठी संघर्ष करणारा प्रदेशवाद फार मर्यादित स्वरूपाचा आहे. भारताच्या ईशान्येकडील राज्यामध्ये भारतातून फुटून निघण्याची प्रवृत्ती बळावत आहे. पंजाबचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्यांकरिता उठाव करणारे शीख अतिरेकीही दिसत आहेत. पण कर्नाटक, आंध्र, तामीळनाडू, पश्चिम बंगाल इत्यादि प्रदेश राज्ये अधिक स्वायत्ततेची व जादा अधिकारांची मागणी करीत आहेत. आसाम मध्येही अलिकडे हिंसाचार वारंवार घडत आहे. अकाली शीखांच्या धर्मगुरूंनी या पंजाबी आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारले आहे. त्यामुळे पंजाब विरुद्ध केंद्रसत्ता असे शुद्ध राजकीय स्वरूप त्या झगडयाला राहिले नाही. हिंदू विरुद्ध शीख असे विपर्यस्त रुप त्या आंदोलनाला आले आहे. आर्थिकदृष्टया अत्यंत महत्त्वाची त्यांची मागणी म्हणजे, सतलज व बियास या नद्यांच्या पाणी वाटपासंबंधीची आहे. चंदिगडचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. राज्यांच्या अधिक अधिकाराच्या मागण्या समंजसपणे मान्य केल्यास प्रादेशिक अहंकारातून होणारा हिंसाचार समाप्त होईल. पण केंद्रसरकारची भूमिका कशी राहील, यावर एकात्मतेला असलेल्या धोक्याचे स्वरुप ठरणार आहे. दक्षिणेकडील राज्यामध्येही भारतातून फुटून निघण्याची द्रविड लोकांची चळवळ होती ती आता थंडावलेली दिसते.

(३) शासकीय धोरणांतील चुकांनी निर्माण केलेले धोके

(१) यात दोन प्रकार आहेत. (अ) सांस्कृतिक व धार्मिक धोरणविषयक (ब) आर्थिक व राजकीय धोरणविषयक. भिन्न सांस्कृतिक गट असणाऱ्या समाजात निर्माण झालेले गैरसमज किंवा मतभेद समजून घेवून मिटवण्याजोगे असतात, पण त्याऐवजी त्यांना विपर्यस्त रुप देण्याचे प्रयत्न शासनाकडून केले गेल्यास शासन व जनता यांचेमधील संबंध विकोपाला जातात व हिंसाचार माजतो. उदा. आसाम मधील लोकांच्या वाढत्या मागण्यांचे समाधान होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तेथे भांडवल गुंतवणूक करण्याची गरज होती, त्याऐवजी तेथील असंतोष समजून न घेता, शासनाने दडपशाहीचे धोरण अवलंबिले. लोकशाहीची विटंबना करणाऱ्या निवडणूका लादल्या, आसामी लोकांच्या सांस्कृतिक पिळवणुकीविरुद्ध व आसामला केंद्र सरकारची वसाहत समजणाऱ्या धोरणाविरुद्ध आवाज उठविणे हा तेथील भाषिक आंदोलनाचा हेतू होता. 'परकी घुसखोरांना हाकला' ही घोषणा लोकजागृतीचे तंत्र होते. आसाम साहित्य सभेने 'पूर्वेकडील ग्रहण' या नावाच्या पुस्तकांत त्यांच्या सर्व मागण्या मांडल्या आहेत, त्यांत म्हटले आहे. 'स्वातंत्र्य मिळाल्यापासून आसामला वसाहतीसारखे वागविण्यांत येत आहे. देशांतील इतर भागाकडून व परकियांकडूनही त्याची सतत पिळवणूक होत आहे. फोडा, झोडा ही ब्रिटिश नीतीच स्वातंत्र्यातील सरकारही अवलंबीत आहे. राज्याचे सतत तुकडे पाडले जात आहेत. उदा. (१) ५–२५ दशलक्ष टन क्रुडऑईल आसाममधून मिळते. ते पाईपलाईनने बरौनी येथे नेऊन शुद्ध केले जाते, तेल शुद्ध करण्याचा खर्च गोहत्ती येथील कारखान्यात जेवढा येतो त्यापेक्षा दर टनास १.७ पट जास्त खर्च बरौनी येथे येतो. बरौनी येथील कारखाना तज्ञांची संमती नसताना चालू केला. आसामला रॉयल्टी म्हणून दर टनास ४२ रु. इतके क्षुद्र वेतन मिळते. क्रूड ऑईलचा दर टनास १६०० रु. आहे. रॉयल्टीचे दर वर्षी २२ कोटी आसामला मिळतात. त्यावेळी तेलाची किंमत ८४० कोटी असते. या तफावतीमधून आसामचे दर माणसी उत्पन्न ४५४ रु. वाढले असते.

(२) ३० लक्ष क्युबिक फीट नैसर्गिक वायू आसामच्या तेल क्षेत्रातून दररोज जाळला जातो. त्याचा उपयोग राज्यातील इतर कारखान्यातून

वीजनिर्मितीसाठी करता आला असता. ४० मेगॅवॅट वीज निर्मितीचे कार्य ७ वर्षे थांबवून ठेवण्यांत आले होते. त्याचे कारण ऑईल इंडिया लि. कंपनीने आसाम राज्य इलेक्ट्रीक कंपनीला गॅस नाकारला हे आहे.

(३) चहाच्या मळयातून २७० दशलक्ष किलो चहा (किंमत सुमारे ४०० कोटी रु.) निर्माण होतो. त्याचे नियंत्रण कलकत्ता व लंडन येथून होते. सार्व-जनिक क्षेत्रातील आसाम टी कॉर्पोरेशनने गेल्या अनेक वर्षांत उत्तम रितीने काम केलेले असून सुद्धा त्यांचेकडे हे काम दिले जात नाही. या मालाची विक्री व वाटप जुन्या लिलाव पद्धतीने केले जाते. त्यामुळे कलकत्त्याचे व्यापारी लोकांना फायदा मिळतो.

(४) आसाममधील कागदाचा लगदा राज्याबाहेर पाठवून तेथे त्याचा कागद तयार केला जातो. तोच कागद आसामला बंगाल, बिहार कडून जादा किंमत व भाडे देवून खरेदी करावा लागतो. जंगलाची तोड एकसारखी चालू असते. त्यापासून कलकत्त्याचे व्यापारी प्लायवूड बनवतात व फायदा मिळवतात.

(५) ईशान्य रेल्वे आसामच्या प्रदेशातून ६० टक्के जाते, पण रेल्वेमध्ये १० टक्के आसामी लोकांना काम मिळते. केंद्र सरकारचे कोणत्याही उद्योगांत हेच प्रमाण आहे. या सर्व उदाहरणावरून असे स्पष्ट दिसते की, आसामी लोकांच्या असंतोषाचे मूळ त्यांच्या आर्थिक मागासलेपणांत आहे. शेती व उद्योग अविकसित असलेमुळे बेकारी मोठ्या प्रमाणावर आहे. स्थानिक शेत-कऱ्यापैकी ७७ टक्के लोक भूमिहीन किंवा अल्पभूधारक आहेत. केंद्र सरकारच्या नोकर वर्गापैकी ७० टक्के लोक बंगाली भाषीक असतात. रेल्वे पोस्ट टेलीग्राफ वहातूक दळणवळण व गोडावून वगैरे कामगारांपैकी ५७ टक्के लोक बाहेरचे आहेत. एम्प्लॉयमेंट रिव्हयू कमिटीच्या पहाणीप्रमाणे पहिल्या व दुसऱ्या वर्गातील नोकर वर्गापैकी ३२.७ टक्के लोक स्थानिक आहेत. १९७५ ते १९७८ मध्ये ३३.३ टक्के बेकारांची वाढ सुशिक्षितामध्ये झाली.

(६) पंजाबचे उदाहरण असेच आहे. येथील प्रादेशिक आंदोलनाला जातीय स्वरुप देण्यात आले. पंजाबी हिंदूनी त्यांची मातृभाषा नाकारली व आर्य

समाजाला पाठिंबा देण्यांस सुरुवात केली. शीखांनीही त्यामुळे धर्माचा आसरा घेतला, हरितक्रांतीमुळे आलेली आर्थिक सुबत्ता, शिक्षणाचा प्रसार व गहू, विस्की संस्कृतीचा प्रभाव यामुळे परंपरागत संस्कृतींचा विसर पडला. शिवाय औद्योगिक विकासाकडे दुर्लक्ष, लष्करांत शीखांचे घसरते प्रमाण, रावी-बियांस नद्यांचे पाणी वाटपातील अन्याय आदि गाऱ्हाणी मिटविणे जरुरी होते, म्हणून राजकीय मागण्या घेऊन आंदोलन उभारले व त्याला भाषिक व धार्मिक रुप देण्यांत आले.

दरबारासिंग राष्ट्रीय विकास मंडळांत भाषण करतांना ऑगस्ट १९८१ मध्ये म्हणाले, " १.३ दशलक्ष गासड्या कापूस, १.०४ दशलक्ष टन ऊस, पंजाब पिकवितो, पण त्याचे कापसाचे १५ टक्के व ऊसाचे १३.४ टक्के इतकेच मालाचे पक्क्या मालात रुपांतर आम्ही करतो. नव्या योजनेत केंद्र सरकारची एकही योजना राज्यांत सुचविलेली नाही. सुतगिरण्या व साखर कारखाने काढण्यास पंजाब मध्ये परवाने द्यावेत. योजनेवर खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयांपैकी कांही राज्याला ४२ पैसे मिळतात, तसे पंजाबला १५ पैसे मिळतात, अवजड उद्योगासाठी पंजाबवर सतत अन्याय होत आला आहे. ३१ मार्च १९७९ अखेरच्या कालावधीत सुमारे १६ हजार कोटी रुपये केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रांत गुंतविले आहेत, त्यांत पंजाबच्या वाट्याला ३४५ कोटी रुपये आले आहेत ? १९८१च्या अखिल भारतीय शीख बुद्धीवंताच्या मेळाव्यांत बोलतांना अकाली नेते डॉ. गोपालसिंग म्हणतात, आम्हाला पाणी पुरवठा व वीजनिर्मितीच्या अधिक सोई हव्या आहेत. साखर, सिमेंट, कापूस यांच्या अधिक गिरण्या हव्या आहेत. बँकामधील आमच्या बचतीच्या किमान ६० टक्के पंजाबमध्ये गुंतविले जावेत. आज ३२ टक्के गुंतविले जातात. मध्यम व अवजड उद्योग हवे आहेत. आमच्या मालाला योग्य भाव हवा आहे.

देशाच्या फाळणीचा एक परिणाम म्हणून भारतात मुसलमान फार मोठ्या प्रमाणावर अल्पसंख्य झाले होते, फाळणीचा हा राग बहुसंख्य हिंदू येथील अल्पसंख्य मुसलमानांवर काढतील, अशी भीती पंडित नेहरुंना नेहमीच वाटत असे म्हणून अल्पसंख्य असलेल्या समाजाबद्दल सहानुभूतीचे औदार्याचे व संरक्षणाचे धोरण ठेवावे असे ते सांगत.

उदा. ७ ऑगस्ट १९४७ रोजी त्यावेळचे घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना लिहिलेल्या पत्रांत पंडित नेहरु म्हणतात, भारत हा केवळ हिंदूंचांच देश नसून, सर्वांचा देश आहे. याचा विसर पडू देवू नये, तसेच १७ नोव्हेंबर १९५३ रोजी डॉ. कैलासनाथ काटजूंना लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात, भारताचे भवितव्य यापुढील काळात हिंदूंचा दृष्टीकोन कसा राहील, यावर अवलंबून आहे. ते जर आचरणांत असहिष्णू आणि संकुचित मनोवृत्तीचे राहिले, तर भारताचे भवितव्य कठीण आहे. याचा अर्थ मुसलमानांचा दृष्टीकोन कमी घातकी आहे, असा नाही. पण भारताच्या भवितव्यावर त्याचा आता परिणाम होवू शकणार नाही. फाळणीपूर्व काळांत हिंदू व मुस्लीम जातीयवादाचा धोका भारताला होता, पण आतां, हिंदू जातीयवादाचा आहे, कारण आजचा हिंदू धर्म आत्यंतिक कर्मठपणा, कर्मकांड, असमानता व प्राथमिक स्वरुपाच्या धार्मिक चालीरिती यांनीच मुख्यत: घडविला आहे. भारताच्या प्रगतीला हे सर्व विरोधी व हानीकारक आहे.

या दोन्ही पत्रातील मजकुरावरुन पंडीत नेहरुंची मनोभूमिका स्पष्ट होते. त्यावरुन तीन विचार दिसून येतात. (१) मुस्लीम जातीयवादाचा धोका आता राहिलेला नाही. (२) भारत कोणाही एका धर्माच्या लोकांचे राष्ट्र नसून सर्वांचा देश आहे. (३) हिंदू जातीयवादाचा–हिंदू लोकांच्या मधील कर्मठपणामुळे, जुनाट धार्मिक चालीरितीमुळे व असमानतेमुळे--धोका नष्ट केला पाहिजे. या त्यांच्या विचारावरून त्यांनी इस्लामी समाजाचे व त्यांच्या आक्रमक जातीयवादाचे स्वरुप योग्य प्रकारे लक्षांत घेतले नसावे, असे वाटते. मुस्लीमांना, शीखांना किंवा इतर अल्पसंख्यांक समाजाला वाटणाऱ्या असुरक्षिततेचा व भीतीचा त्यांनी सहानुभूतीने विचार केलेला दिसतो, पण त्यांच्या आकांक्षांचा विचार त्यांनी केलेला दिसत नाही. याखेरीज वेगळी शक्यताही असू शकते ती शक्यता अशी. बहूधर्मीय बहूभाषी समाजात वैरभाव खोल असतांत, त्याचा भूतकाळ भिन्नभिन्न असतो, भवितव्यही त्यांना वेगवेगळे घडवावयाचे असते, त्यासाठीच त्यांना स्वायत्तता हवी असते, शासनाची सत्ता मर्यादित करण्याची त्यांची धडपड त्यासाठी असते, तसेंच शासनात त्यांना वाटा असावा, असेही यासाठीच त्यांना वाटते. पंडित नेहरुंनी ही शक्यता

विचारात घेतली नसावी, असे त्यांच्या विचारावरून वाटते. भारतात मुसलमान आता अगदीच अल्पसंख्य राहिले असल्यामुळे त्यांच्या जातीयवादाचा धोका आता राहिला नाही, अशी त्यांची भावना दिसते. पण इस्लामचे आक्रमक स्वरुप त्यांच्या जातीयवादाचा पाया आहे, याचा विचार करतां, पंडित नेहरुंचे मत विसंगत व चमत्कारीक वाटते, तसेंच हिंदू जातीय वादाचा धोका त्यांनी दाखविला, तो वास्तविक असला तरी त्याच्या उत्पत्तीला व भयानक वाढीला इस्लामचा आक्रमक जातीयवादच कारण आहे. हेही त्यांनी विचारात घेतलेले दिसत नाही. तसेच भारताच्या शासनाची धर्मनिरपेक्षता केवळ नकारात्मक असल्यामुळे कोणत्याच जातीयवादाला तोंड देण्याला किंवा त्यावर मात कर-ण्याला समर्थ होवू शकणार नाही. म्हणून तिला सकारात्मक रूप देण्याची गरज आहे. याचीही जाणीव त्यांच्या वरील विचारांत दिसून येत नाही. या सर्व अस्पष्ट, मोघम, नकारात्मक भूमिकेचा परिणाम असा झाला की, सर्व-धर्मसमभाव हाच धर्म निरपेक्षतेचा अर्थ ठरला. व नेहरु ज्या हिंदू जातीयवादाचा धोका दाखवित होते, तोच सर्वधर्मसमभावाचे नावाखाली वाढत राहिला. एवढेच नव्हेतर हिंदू धर्मातील असमानता कर्मठपणा नाहीसा करणाऱ्या ज्या चळवळी राजा राममोहन रॉय पासून चालत आल्या होत्या, त्याही धार्मिक कर्मठपणाच्या हल्ल्यामुळे मुळातून उपटून टाकल्या जातात कीं काय अशी भयानक परिस्थिती आता भारतात निर्माण झाली आहे. राष्ट्रीय एकात्मतेला हा फार मोठा धोका आहे.

आर्थिक आघाडीवरील स्थिती चिंताजनकच आहे, आकाशाला भिडणारी महागाई, चलनवाढ, बेकारी, यांनी थैमान घातले आहे, जीवनावश्यक वस्तूंचे भाव सामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर चालले आहेत, विशेषतः मध्यम वर्ग व श्रमजीवी वर्ग त्यात भरडून निघत आहे. असंघटीत वर्गाची परिस्थिती तर केविलवाणी झाल्याचे दिसते. आर्थिक अराजकतेकडे नेणारी ही स्थितीही एकात्मतेला धोका ठरणार आहे, यात शंका नाही.

भारताच्या सर्वच सरहद्दी पेटल्या आहेत, काश्मीर मध्ये हिंदू मुस्लीम तणाव वाढला आहे, तर पंजाबमध्ये जणू काय अघोषित यादवी युद्ध चालले

आहे. नागालँड, मिझोराम, मणिपूर, आसाम मध्ये अंतर्गत बंडाळचा नित्य होत आहेत. नेपाळ, श्रीलंका बरोबरचे संबंध ताणले गेले आहेत. तर चीन, पाकिस्तान बरोबरचे संबंध विकोपाला गेलेले आहेत. श्रीलंकेमध्ये तामीळ, सिहली व बौद्ध यांचेमध्ये हिंसाचार चालूच आहे. याचा परिणाम भारत श्रीलंका संबंधावर व दक्षिणेकडील राज्यात अस्थिरता निर्माण होण्यांत होत आहे. याशिवाय झारखंड, बोडो, गुरखा अशा सर्वच आंदोलनांनी जोर धरला आहे. संघटीत कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय सुशिक्षित नोकरवर्ग आंदोलने संप घेराव करीतच आहेत, शिवसेना सारख्या असंख्य सेना उघड उघड ठोकशाहीचा पुकारा करीत आहेत. ही अराजकाची व यादवीची पूर्वतयारी नव्हे काय? राज्यकारभारामध्ये बेदिली व अकार्यक्षमता माजली आहे, भ्रष्टाचाराचे आरोप प्रत्यारोप रोज नवेनवे होत आहे, यातून कसा मार्ग काढावा हे समजेनासे झाल्यामुळे, भांबावलेली सत्प्रवृत्त जनता हताश व किमकर्तव्यमुढ होवून बसली आहे.

**एकात्मतेची गृहीत कृत्ये**

(अ) स्त्री पुरुष, वृद्ध, तरुण, पर्वत, नदी, झाडे, माणसे अस्तित्वांत असतात, त्यांना आपण वस्तु किंवा व्यक्ती म्हणतो, पण मित्र, पत्नी, शेजारी या कल्पना असतांत, त्यांचे अस्तित्व मानावयाचे असते, अशा कल्पनांनीच संस्कृती उभी रहाते, पशूंच्या अवस्थेत असणारा मनुष्य संस्कृती निर्माण करतो. सुसंस्कृत बनतो, हे त्यांचे इतर प्राण्याहून वैशिष्टच होय. ज्ञानाचा वाटा यात फार मोठा असतो. 'ज्ञानेनहीनाः पशुभिः समानः' असे म्हटलेले आहे. धर्म, नीती, राष्ट्र या संस्कृतीच्या कल्पना असतात, त्या मानवी जीवनाशी इतक्या निगडीत झाल्या आहेत की, त्याशिवाय माणसाला जगताच येत नाही.

माणसाची अस्मिता त्याच्या जातीवरुन, धर्मावरुन भाषेवरुन आतापर्यंत ओळखली जाते, त्यानुसार भारतात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, शीख आदी अनेक धर्मांचे लोक राहतात, त्या प्रत्येक धर्माच्या लोकामध्ये अनेक पंथोपपंथ आहे, जातींची संख्या अगणीत आहे. त्यामध्ये १५-१६ प्रमुख भाषा बोलल्या जातात, बोली भाषा तर अनंत आहे. या प्रत्येक घटकावरुन

भारतीय लोकामध्ये भेदाभेद निर्माण झाले आहेत, या सर्वामध्ये एकत्र राहण्याची किंवा **एकत्वाची जाणीव निर्माण होण्याची राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने गरज आहे.**

(ब) यासाठी सर्वांना **शासनात समान दर्जाचा सहभाग देणारी राज्यपद्धती कार्यक्षम असावी लागते, व्यावसाईक गतिमानता देणारी अर्थव्यवस्था विकसित व्हावी लागते, तसेच इतरांची सर्वांगीण माहिती देणारी शिक्षण पद्धती तिच्या द्वारे सर्वांचा बौद्धिक विकास व सुलभ सुरक्षित वाहतूक, दळणवळणाच्या सोईही** सहज साध्य असाव्या लागतात.

(क) पाश्चात्त्य राष्ट्रामधील लोकांची घडण सर्वसामान्यपणे एकाच संस्कृतीने झालेली आहे. त्यामुळे त्या लोकांमध्ये **नैतिक एकवाक्यता** म्हणजे **प्रातिनिधीक राजकीय संस्थांवर त्यांची श्रद्धा दिसून येते,** याउलट आशिया आफ्रिकेतील राष्ट्रामध्ये विशेषत: **भारतामध्ये अशी श्रद्धा अगर नैतिक एकवाक्यता दिसत नाही.** एकजिनसीपणा आढळून येत नाही. भिन्न भिन्न समाज किंवा गट सांस्कृतिक विकासाच्या भिन्न भिन्न स्तरावर असलेले दिसतात, त्यांच्यात अलगता, परस्परामध्ये उच्चनीचता, दुरावा, तिरस्कार, द्वेष दिसतो, युगानयुगे त्यांच्यामध्ये झगडे होत असल्याचा इतिहास आहे. त्यामुळे सर्वमान्य स्वरूपाच्या संस्था नाहीत, नैतिक एकवाक्यता नाही. एकात्मतेच्या निर्मितीमध्ये हा सर्वात मोठा अडथळा आहे.

कायदे, आर्थिक नियोजन, केंद्रीय सत्ता, दळणवळणाची साधने, समान आकांक्षा, धर्म, इतिहास इ. बाबी एकत्वाची जाणीव वाढवतात, याउलट दारिद्रय विषमता यामुळे येणारी अन्यायाची जाणीव, नवा फुटीरपणा निर्माण करतात, कोणत्याही राज्यात या दोन्हीही प्रक्रिया सतत चालत असतात, म्हणून राज्य या स्वरुपात आहे, ते राष्ट्र या स्वरूपात सुसंस्कृत जीवनांत स्थिर करण्याची प्रक्रिया जाणीवपूर्वक करावी लागते.

समान नागरिकत्व, धार्मिक स्वातंत्र्य व धर्मापासून शासनाची अलिप्तता हा भारतीय संविधानाचा पाया आहे. या भक्कम आधारावर उभारलेले

शासन कार्यक्षम निपक्षपाती व सर्वांना विकासासाठी समान संधी देणारे असल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता कशी होणार ? भारतातील सर्वच राज्यांना व समाज गटांना त्याचेबद्दल आपलेपणा व विश्वास वाटला पाहिजे, एकात्मतेला निर्माण झालेल्या धोक्यांचा जो विचार आपण केला आहे. त्यावरून आसाम व पंजाब राज्यांना असा विश्वास वाटत नसल्याचे स्पष्ट होते, महाराष्ट्रातही अशीच भावना असल्याचा उच्चार डॉ. चिंतामणराव देशमुख सारख्या उच्चपदस्थ व्यक्तीने मागे केलाच होता, त्यामुळे यातून **प्रादेशिक असमतोल निर्माण होणे अपरिहार्य आहे. हाही एकात्मतेला धोकाच आहे.**

एकात्मतेसंबंधी विचार करणारे जे चार दृष्टीकोन मागे दर्शविलेले आहेत, त्यापैकी मार्क्सवादी व जातीयवादी दृष्टीकोन एकात्मतेला पोषक नाहीत हे त्याच ठिकाणी स्पष्ट केले आहे. कारण ते माणसामाणसांत आपपरभाव निर्माण करतात, परस्पर द्वेष करायला लावतात, राष्ट्रवादी दृष्टीकोनही स्वदेशातील माणसांशीच एकात्मतेचे नाते जोडू शकतो. शिवाय भारतातील मुसलमानांची जी भूमिका आपण पाहिली आहे, त्यावरुन त्यांचेबद्दल सुद्धा आत्मियता बाळगणे, त्याला शक्य होईल काय ? हाही प्रश्नच आहे. मानवतावादी दृष्टीकोन मात्र जगातील सर्वत्र माणसांबद्दल बंधुत्वाचे नाते, आत्मभाव बाळगू शकतो, म्हणून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यांस तो दृष्टीकोन पोषक ठरू शकेल, हे स्पष्ट आहे.

## इहवादच एकात्मतेला पूरक

सर्व धर्मभेद विसरुन जगातील सर्वच माणसे, आपले बंधु मानण्याची परंपरा मानवतावादाने कायम टिकविली आहे, याबाबत दोन मार्ग संभवतात. पहिला सर्वधर्मसमभावाचा, किंवा धर्म समन्वयाचा, व दुसरा इहवादाचा. राष्ट्रीय एकात्मतेला दोन्ही पर्याय पोषकच आहे. पण सर्वधर्मसमभावाचा जो विचार आपण मागे केला आहे, त्यावरून सर्वधर्मसमभाव हे हिंदू जातीयवादाचे दुसरे नांव आहे, हेच स्पष्ट होते. तसेच सर्वधर्म मानवी कृती असल्यामुळे कालसापेक्ष ठरतात. त्यांची ज्यावेळी व ज्याठिकाणी निर्मिती झाली, त्या काळातील व देशातील मानवी गरजानुरुप ते असतात. आजच्या काळात त्यामुळे

ते निरुपयोगी ठरतात, म्हणून आजच्या मानवाचे प्रश्न, गरजा, आकांक्षांना त्यांचा कांही उपयोग नाही. म्हणून मनुष्याच्या खाजगी जीवनापुरतेच किंवा मनुष्य व ईश्वर यांचेमधील संबंधापुरते धर्माचे क्षेत्र मर्यादित ठेवून आधुनिक शास्त्राच्या अनुरोधाने मानवांनी आपले प्रश्न सोडविले पाहिजेत, असे इहवाद सांगतो. हीच भूमिका धर्माच्या गुलामगिरीतून मानवाची मुक्तता करणारी आहे व एकात्मतेला पूरक आहे.

एकात्मतेसाठी नैतिक एकवाक्यतेची व लोकशाही संस्थावरील निष्ठेची गरज आहे. ही गरज इहवाद भागवू शकतो, इहवाद व लोकशाही या सहचारी कल्पना असल्यामुळे इहवादी जीवन निष्ठा मानव समाजात नैतिक एकवाक्यता तर निर्माण करीलच, शिवाय लोकशाही संस्थांवरील विश्वासही वृद्धिगत करील.

**भारताच्या भवितव्याची दिशा – विकेंद्रित लोकशाही**

आता महत्त्वाचा एक प्रश्न राहिला. तो म्हणजे, भारताच्या भावी प्रगतीची व भवितव्याची दिशा कोणती ? स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात भावी राज्य व्यवस्थेसंबंधी किंवा समाज रचनेसंबंधी जो दृष्टीकोन १९३१ मधील कराची काँग्रेस ठरावात मांडला होता, तोच स्वातंत्र्योत्तर काळांतही आपण स्विकारला आहे काय ?

डॉ. रविंद्रनाथ टागोर यांनी आपल्या 'राष्ट्रवाद' या ग्रंथात म्हटले आहे, राष्ट्रीय ऐक्याचा अर्थ एकसारखेपणा निर्माण करणे नव्हे. तसेच राजसत्तेच्या जोरावर दडपशाही करून राष्ट्रीय ऐक्य निर्माण होत नसते, तर भिन्न व्यक्ती अगर समाज–गटामधील सर्व भेद सहानुभूतीने व विचारविनिमयाने संपविणे आणि त्यांचेमध्ये स्वेच्छापूर्वक सहकार्य घडवून आणणे, हा राष्ट्रीय ऐक्याचा मार्ग आहे. युरोप एका पिढीत दोन महायुद्धांची किंमत देऊन हा धडा शिकला, म्हणूनच सध्या त्याची पाऊले संयुक्त युरोपच्या दिशेने पडू लागली आहेत, असाच आदर्श उभा करण्याची संधी भारताला चालून आली आहे. जगातील सर्वच बहुधार्मिक, बहुभाषिक देशांना तो आदर्श ठरू शकेल. अशा

आदर्शाचे स्थूल आराखडे डॉ. रविंद्रनाथ टागोर, म. गांधी व मानवेंद्रनाथ रॉय, जयप्रकाश नारायण यांनी मांडलेले आहेत.

भारताच्या विविधतेचे संरक्षण व ऐक्याचे संवर्धन करणारे केंद्रसरकार यामध्ये त्यांनी सुचविले आहे. सामान्य लोकांना तीत प्रत्यक्ष सहभाग मिळावा, जाणीवपूर्वक सहकार्य करता यावे, यासाठी स्थानिक संस्था सुसंघटित व परिणामकारक व्हाव्यांत. अधिकाधिक जबावदाऱ्या पेलण्यांस समर्थ व्हाव्यात असे उपाय त्यांत सुचविले आहेत.

**भारतीय एकात्मतेचा मार्ग – विकेंद्रित लोकशाही**

भयानक सामर्थ्यवान झालेल्या केंद्र सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण करण्याचे व बेफिकीर व निर्दय नोकरशाहीचे अवाढव्य वाढलेले प्रस्थ मोडून काढण्याचे उपाय त्यांत सांगितले आहेत. संरक्षण, परराष्ट्र संबंध, दळणवळण चलन व्यवस्था व नियोजन एवढ्या पुरती केंद्र सत्ता मर्यादित ठेवून इतर सर्व कारभार व व्यवस्था राज्याकडे, तेथून जिल्ह्याकडे, तालुक्याकडे व शेवटी खेड्यांतील लोकांकडे सुपूर्त करावी, म्हणजे खरीखुरी लोकशाही नांदेल, अशी भूमिका त्यांनी मांडली, हाच राष्ट्रीय एकात्मतेचा व समर्थ राष्ट्रांच्या उभारणीचा योग्य मार्ग असल्याची त्यांना खात्री वाटत होती. पण राज्य घटना तयार करतानांच हा मार्ग आपण सोडून दिला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत ज्या भाषावार प्रांतिक पुनर्रचनेचा व प्रांतिक स्वायत्ततेचा आपण पुकारा करीत होतो, तेच राज्य घटना तयार करतांना व त्यानंतरच्या काळात आपणांस फुटीरवादाचे चिन्ह वाटू लागले, सर्वस्वी केंद्रावलंबी अशी राज्ये व महासामर्थ्यवान केंद्रसत्ता राष्ट्रीय एकात्मतेला किंवा लोकशाहीला कसे काय पुरक ठरू शकतात, हे गूढच आहे. धोरण बदलाच्या या कृतीमुळे भाषावार प्रांत रचनेच्यावेळी केंद्रीय नेत्यांना जनतेला आपले सामर्थ्य दाखवावे लागले. लोकभावनांना मान देण्याचे शहाणपण उशीरा का होईना केंद्र सत्तेने दाखविले, परंतु या पुर्नरचित प्रांताना आर्थिक व राजकीय फारसे अधिकार नाहीत. म्हणून प्रांतांनी केलेल्या मागण्यांना आजही फुटीरवादाचा रंग दिला जातो. हे नाकारता येणार नाही. पंजाब, आसाम, तामीळनाडू, आंध्र या राज्यातून

अशा मागण्या सातत्याने पुढे येतात. पण त्यांचेकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. यामुळे त्या राज्यातील चळवळी एकात्मतेला धोका ठरतील अशी चिन्हे दिसत आहेत.

**सद्य:स्थिती**

भारतीय जनतेच्या विविध विभागांना एकमेकांच्या प्रश्नांची साधी जाणही दिसत नाही. मग एकमेकांच्या आकांक्षामध्ये व सुखदु:खामध्ये सहभागी होण्याची वात तर सोडूनच द्या. आपण अमूक जातीचे, धर्माचे किंवा भाषिक गटाचे असल्याची जाणीव जितकी प्रबळ दिसते, तितकी राष्ट्रीयत्वाची, मानवतेची, न्यायाची दिसून येत नाही.

दीर्घकालीन निश्चित सांस्कृतिक धोरण आपण कधीच आखले नाही, भिन्न समाज गटांना व त्यांच्या संस्कृतीला एकत्र आणण्याचा कधीच जाणीव पूर्वक प्रयत्न झाला नाही. आर्थिक विकासातून सर्व काही ठीक होईल, असा भाबडा आशावाद बाळगण्यात आला, इराणमध्ये विकासाचा दर दरमाणशी १२ असतानाही खोमेनी विजयी झाला, यातील भयानक अर्थाची दखल कोणीही घेतली नाही. पंजाबचे उदाहरण तरी वेगळे आहे काय?

राष्ट्रीय ऐक्य म्हणजे हिंदू मुस्लीम ऐक्य एवढीच समजूत रूढ झाली. अस्पृश्य, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन यांचा विचार कधी झाला नाही. सामाजिक एकात्मतेशिवाय राष्ट्रीय एकात्मता कशी होईल. असा विचार करावासा वाटला नाही. हिंदु समाजांची स्थिति तरी एकात्म आहे काय ?

## काय केले पाहिजे

एकत्र राहण्याची इच्छा व अवघाची संसार सुखाने करण्याची ईर्षा यातून व्यापक समाज भावना किंवा राष्ट्रीयत्व निर्माण होते, हा इतिहासाचा निष्कर्ष आहे. (१) यासाठी व्यापक व जलद औद्योगिकीकरण, जागृत विद्यापिठांची स्थापना, त्याद्वारे विद्या व ज्ञान यांचा प्रसार या मार्गाने संपूर्ण समाजाचे आधुनिकीकरण करणेची जरूरी आहे. ( २ ) नकारात्मक निष्क्रीय धर्मनिरपेक्षतेला सकारात्मक इहवादाचे अधिष्ठान दिले पाहिजे. त्याशिवाय

भारतीय समाजात नैतिक एकवाक्यता येणार नाही. आणि अशा एकवाक्यते-शिवाय एकात्मता होणार नाही. (३) प्लेटो ॲरॅस्टॉटल पासून शिक्षण हे अशा सामाजिक पुनर्रचनेचे प्रभावी साधन मानलेले आहे. विधायक वृत्तीचा विकास व संस्कृतीचे माध्यम हे त्याचे कार्य आहे. पंडित नेहरुंनी १९४८ साली शिक्षण मंत्र्यांच्या परिषदेत सांगितले की, शिक्षणाचा संपूर्ण पायाच आमुलाग्र बदलला पाहिजे, कोठारी आयोगानेही हाच विचार त्यांच्या अहवालामध्ये मांडला आहे, तो म्हणतो, शिक्षणामध्ये क्रांती झाली तरच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांत क्रांतीला गती येईल. कारण शैक्षणिक प्रश्न सामाजिक आर्थिक प्रश्नामध्ये गुंतलेले असतात, तरीही साधे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्री-करणही अद्याप होवू शकलेले नाही. ६४ टक्के लोक अजूनही निरक्षर आहेत. दारिद्रय रेषेखाली तेवढेच लोक आहेत. दारीद्रय आणि निरक्षरता हे ग्रामीण भारताचे व्यवच्छेदक लक्षण झालेले आहे.

इंग्लंड व युरोपमध्ये शिक्षणाचे सार्वत्रीकरण झालेले आहे. त्याचे आधारा-वरच ती राष्ट्रे प्रगत झालेली आहेत व तेथील लोक विकासान्मुख झालेले आहेत, त्यांनी विद्यापीठांचा सांधा भोवतालच्या परिसराशी जोडला. शिक्षण व संशोधन याद्वारे त्यांनी मानसिक व बौद्धिक आधुनिकीकरण घडवून आणले. पंचवार्षिक योजनामध्ये आपण शिक्षणासाठी ३ टक्केपेक्षा अधिक खर्च करू शकलो नाही. विकसित देश शिक्षणावर ६ ते ८ टक्क्यावर खर्च करतात. आंतरराष्ट्रीय खेळांच्या सामन्यामध्ये भारताला यामुळेच नामुष्की पत्करावी लागते.

## एकात्मतेसाठी शिक्षण

शिक्षणाचे नियोजन लोकशाहीचा आदर्श ठेवूनच केले पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या मानवी मूल्यांचा अंतर्भाव शिक्षणात व्हावा, व व्यक्ती विकास हेच शिक्षणाचे ध्येय ठरविले जावे. शिक्षण क्रमात विविध शास्त्रांचा, भाषांचा व इतिहासाचा समावेश आवश्यक आहे. इतिहासात घटनांची जंत्री महत्त्वाची नसून प्रवाहांची चिकित्सा महत्वाची मानली पाहिजे. राष्ट्र बांधणीची प्रक्रिया स्वातंत्र्य आंदोलनात सुरू झाली, त्यातही समाज

सुधारणा, धर्मपरिवर्तन शैक्षणिक संस्थांची निर्मिती अशा पुनर्निर्माणाच्या कार्याचा सहभाग होता, पण पुढे राजकारणाच्या रेटचामुळे ते मागे पडले किंवा त्यासाठी राजकारणाच्या गाडचाला जुंपण्यांत आले. म्हणूनच आजची स्थिती आली आहे.

## जातीयवादाचा धोका निवारण्याची तरतूद

आपल्या राज्य घटनेमध्ये संभाव्य जातीयवादाचा धोका निवारण्याची तरतूद केलेली आहे. समान नागरिकत्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य आणि शासन व धर्म यांची फारकत, हीच ती तरतूद होय. अल्पसंख्यांक समाजांचे स्वतंत्र मतदार संघ त्यांत नष्ट करून टाकलेले आहेत. शिवाय सर्वांसाठी समान नागरिक कायदा करण्याचा आदेशही, शासनाला ४४ व्या कलमान्वयें दिला आहे. घटना समितीमध्ये या कलमावरील चर्चा चालू असतांना, मुस्लीम सभासदांनी अशी सूचना आणली होती की, या कलमांतून मुस्लीम समाजाचा व्यक्तिगत कायदा--शरियत– वगळण्यात यावा, पण ती फेटाळण्यात आली, म्हणजे समान नागरी कायदा होणार हे निश्चित झाले. हिंदू कोड बिला-वरील चर्चेमध्येही पंडित नेहरूंनी याचा उल्लेख केला होता, त्यावेळी ते म्हणाले ' ८५ टक्के भारतीय लोक यामुळे एका कायद्याखाली येत आहेत, ती घटना १०० टक्के लोक एका नागरी कायद्याखाली घेण्याच्या दृष्टीने उचीत पार्श्वभूमी तयार करील.' इंग्रजी राज्य परकीयांचे असूनही लॉर्ड मेकॉले यांच्या नेतृत्वाखाली इंग्लीश कायद्याच्या धर्तीवर एकंदर भारतीय समाजाच्या सर्व आचार विचारांचे नियमन करणारे कायदे त्यांनी केले, मग स्वातंत्र्यात लोकांचे राज्य होवूनही भिन्न समाज गटांना वेगवेगळे कायदे असणे, राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने कसे योग्य ठरेल ?

## समान नागरी कायदा आणि शासन

वास्तविक पाहतां, मुस्लिमांनी व्यक्तिगत कायद्याच्या म्हणजे शरियतच्या नावाखाली समान नागरी कायद्याला विरोध करणे, योग्य नाही. १८७२ च्या मॅरेज ॲक्टने कोणत्याही धर्माचे नसलेल्या लोकांना रजिस्ट्रार पुढे जावून विवाह नोंदविण्याची सोय केली. १९२३ च्या ३० व्या कायद्याने त्यांत दुरुस्ती करून, हिंदू बौद्ध व जैन धर्माच्या लोकांना या कायद्यातील काही तरतुदींचा

फायदा मिळवून दिला. १९५४ च्या कायद्यान्वये आपण कोणत्याही धर्माचे नसल्याबद्दल प्रतिज्ञापत्र देण्याचे कारणही राहिले नाही, घटस्फोट सुलभ झाला, त्यामुळे हिंदू संयुक्त कुटुंबपद्धती आपोआपच मोडून पडली. वारसा कायदाही त्यानुसार बदलला. हे समान नागरी कायद्याचे छोटे रुपच नव्हे काय ? शरियत कायद्यांत आता काय राहिले आहे ? शरियतचा एक भाग गुन्ह्यां-संबंधीचा कायदा आहे, एक भाग राज्य रचना सांगतो, एक भाग अर्थव्यवहार व समाज रचना सांगतो, एक भाग आंतरराष्ट्रीय कायद्याचा व एक भाग साक्षीचा कायदा सांगतो. सगळ्यांचा सगळा गुन्ह्यासंबंधीचा शरियतचा कायदा इंग्रजी अमदानीत फार पूर्वीच रद्द झाला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालातच साक्षीचा व पुराव्याचा कायदा संपलेला आहे. आंतरराष्ट्रीय धोरण, राज्य रचना आणि व्यवहार याबाबत शरियतचा कायदा अस्तित्वांतच नाही. अशा क्रमाने ८० टक्केहून जास्त भाग रद्दच झालेला आहे, उरलेल्या २० टक्के कायद्यांत विवाह वारसा वगैरे बाकी आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातही मुस्लीम धर्मात हस्तक्षप करणारे कायदे झालेले आहेत, स्पेशल मॅरेज ॲक्ट हा अशा प्रकारचा सर्वांत मोठा हस्तक्षेप आहे. या कायद्याने मुस्लीम स्त्रीचा मुसलमान धर्मात असतांना कायदेशीर बिगर मुस्लीम माणूस पति असू शकतो व मुस्लीम पुरुषाची कायदेशीर पत्नी बिगर मुस्लीम असू शकते, याला मान्यता दिली आहे. तेंव्हा कोणत्याही कारणाने राज्यकर्त्यांनी समान नागरी कायदा लांबणी-वर टाकणे समर्थनीय ठरणार नाही. दुसरे असे की, धर्मनिरपेक्षतेच्या नकारात्मक कल्पनेमुळे कोणत्याही धर्माच्या अंतर्गत व्यवहारामध्ये हस्तक्षेप करणे होता होईतो टाळावे अशी समजूत झाली आहे. ही समजूत कदाचित राजकारणी मंडळींना सोईची ठरत असेलही, पण भारतातील इहवाद यशस्वी करावयाचा असेल तर ही चुकीची समजूत टाकून दिली पाहिजे, त्यासाठी फ्रान्सच्या इतिहासातील एक उदाहरण फार उद्‌बोधक ठरेल, तेथे प्रॉटेस्टंट व कॅथोलिक यांचे धार्मिक झगडे अनेक वर्ष चालून फार मोठा रक्तपात झाला, शेवटी १५९८ मध्ये त्या दोन्ही गटामध्ये नांन्तेजचा तह झाला. या तहान्वये प्रॉटेस्टंटांचे हवाली काही सैन्य व काही नगरांचा संपूर्ण कारभार करण्यांत आला व त्यांना अंतर्गत स्वायत्तता देण्यांत आली. त्यामुळे कॅथॉलिक फ्रान्सच्या

राज्यांतर्गत एक वेगळे राज्यच प्रॉटेस्टंटाना मिळाले, पण कोणत्याही राज्य सत्तांना राज्यांतर्गत दुसरे राज्य परवडू शकत नाही. हा अनुभव लवकरच आला, या तहाने जे दिसले होते ते समाप्त करण्याचा प्रयत्न कॅथॉलिकांनी सुरू केला व प्रॉटेस्टंटांना मिळाले होते तो आधार गृहीत धरुन सर्व फ्रान्समधून कॅथोलिकांचा पाडाव करण्याचा प्रॉटेस्टंट प्रयत्न करु लागले. त्यातून हा तह मोडला व पुन्हा युद्ध सुरू झाले. याचा अर्थ असा की, धर्माला त्याचे कारभारात हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन देऊन इहवाद यशस्वी करता येत नसतो, भारतीय इहवाद्यांनी यातून आवश्यक तो बोध घेतला पाहिजे.

सद्या भारतात परिस्थिती अशी आहे की, सरहद्दीच्या बाहेर पाकिस्तान तर सरहद्दीच्या आंत पळून आलेले संतप्त निर्वासित आणि आपला सवता सुभा राखून ठेवण्याची धडपड करणारे जातीयवादी मुस्लीम राजकारण या सर्वांचा परिणाम सुशिक्षित हिंदूवर होणे अपरिहार्य आहे. मुस्लीम जातीयवाद जसाच्या तसाच जिवंत असल्यामुळे हिंदूमधून इहवादी प्रेरणा मावळत चालल्या आहेत व त्यातून हिंदू जातीयवादी नेतृत्व बलवान होत आहे. भारतीय इहवादाला हा फार मोठा धोका आहे. याला उपाय एकच आहे. तो म्हणजे मुस्लीम समाजात सुधारणावाद प्रभावी केला पाहिजे. त्याकरितां किमान २ गोष्टी प्रथम केल्या पाहिजेत.

(१) मुस्लीम समाजाला ऐतिहासिक सत्य नाकारण्याची सवय आहे, ती त्यांना वरचेवर स्पष्ट करून सांगितली पाहिजे. तसेच त्यांच्या धर्माची चिकित्सा सातत्याने केली पाहिजे व इतरांना करू दिली पाहिजे. अन्य धर्मांची अशी चिकित्सा पूर्वीपासूनच सातत्याने होत आली आहे व यापुढेही तशी होत राहील.

(२) भारतात सार्वभौमत्व जनतेचे आहे, आल्लाचे नाही हे त्यांना पटविले पाहिजे. सार्वजनिक जीवनांतील कोणत्याही बाबीसंबंधी कायदा करण्याचा अधिकार भारतीय संसदेला आहे, हेही त्यांना पटविले पाहिजे. कुटुंब नियोजन व समान नागरी कायदा यांची आवश्यकता त्यांना पटविली पाहिजे.

## हिंदू जातीयवाद

हिंदू मध्ये जातीयवाद नाही असे नाही, उलट तो अतिशय चिवट व बळकट आहे. त्यांत दोन प्रकार आहेत.

(१) हिंदूंच्या या प्रकारच्या जातीयवादी चळवळीचे स्वरुपच वरपांगी का होईना पण सुधारणावादाचे आहे. स्मृतींचा कायदा प्रमाण मानावा व भारतात तो पुन्हा लागू करावा, तो निर्दोष आहे, अशी भूमिका त्याने कधीही घेतलेली नाही.

(२) हा दुसऱ्या मताचा जातीयवाद कर्मठ, सनातनी, ग्रंथप्रामाण्यवादी, जुनाट धार्मिक रुढी चालीरीती प्रमाण मानणारा आहे. अलीकडील काळात कर्मठ हिंदू जातीयवाद वाढत चालल्याचे दिसून येते. गंगाजळाचे वाटप करण्याची चळवळ गोवधबंदीसाठी कायदा करावा म्हणून केलेली चळवळ व सध्या रामजन्मभूमी बाबरी मशिदीसंबंधीची चळवळ यातून सातत्याने जातीय द्वेषाचे वातावरण जाणून बूजून वाढविले जात आहे. त्यामुळे सामाजिक शांतता, सलोखा, सामंजस्य व ऐक्य यांच्या शक्ती कमकुवत होत आहेत व बेजबाबदारपणे जातीद्वेष वाढविणाऱ्या शक्ती बळकट होत आहेत. पंडित नेहरुंनी म्हटल्याप्रमाणे हिंदु बहुसंख्येने असलेल्या समाजाचा दृष्टीकोन जर असा असहिष्णू, कर्मठ व आक्रमक होत गेला तर भारताचे भवितव्य कठीण आहे. यासाठीच १९४७ मध्ये त्यांनी सांगितले होते, की भारताच्या ऐक्यासाठी व लोकशाही समाजाच्या उभारणीसाठी इहवादाची आवश्यकता आहे. तो इशारा आपण मानला नाही व क्रमाने देशात जातीय वातावरण राजकीय स्वार्थ बुद्धीने व्यापकपणे पसरविले जात आहे. यातून भारताचे ऐक्य व लोकशाही नष्ट होण्याचा धोका आहे, हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे.